म.ग्रं.सं., संग्रह शाखा, ठाणे.
विषय : निबंध
दा.क्र. : ३३६०

गत शतक शोधितांना

डॉ. स. गं. मालशे

REFBK-0026043

म. ग्रं. सं. ठाणे.
ाय निबंध
क्र. ३३६०

संदर्भ
निबंध
३३६०
२६०४३
२१।१।६०



गतशतक शोधितानां

लेखक

डॉ. स. गं. मालशे


REFBK-0026043

प्रतिमा प्रकाशन, पुणे-३०

प्रकाशन क्रमांक : ४७

प्रकाशक :

प्रतिमा प्रकाशन
अरुण वि. पारगावकर
१३५९ सदाशिव पेठ, पुणे ३०
फोन ४३७४४४

मुद्रक :

मधुकर ल. ठाकर
गुरुसेवा मुद्रणालय
शाहू वसाहत, सव्हें नं ९२
लक्ष्मीनगर, पुणे ९

© डॉ. स. गं. मालशे

मुखपृष्ठ : अभय पुरंदरे

प्रथमावृत्ती : ४ सप्टेंबर १९८९

मूल्य : पंचावन रुपये

पृष्ठे : १६०

कै. अ. स. भिडे

तथा भिडेगुरुजी

आणि

कै. पा. श्री. मालशे

तथा पांडूदादा

यांच्या पुण्यस्मृतीस

लेखक–परिचय

डॉ. स. गं. मालशे

जन्म : गांग्रई, ता. चिपळूण येथे २४ सप्टेंबर १९२१.

शिक्षण : प्राथमिक शिक्षण कोकणात व इंग्रजी शिक्षण मुंबईस–युनियन हायस्कूल व सिद्धार्थ कॉलेजमधे. एम. ए. परीक्षेत न. चिं. केळकर सुवर्णपदक (१९४६), 'फादर स्टीफन्स यांच्या क्रिस्तपुराणाचा भाषिक आणि वाङ्मयीन अभ्यास' या प्रबंधाबद्दल मुंबई विद्यापीठाची पीएच्. डी. पदवी (१९६१).

व्यवसाय : सिद्धार्थ कॉलेज, कीर्ती कॉलेज, ठाकरसी महिला विद्यापीठ येथे मराठीचे प्राध्यापक. काही काळ 'मराठी संशोधन मंडळाचे' संचालन. १९८१ पासून निवृत्त.

'महाराष्ट्र साहित्य–पत्रिका', 'मराठी संशोधन–पत्रिका', 'इये मराठीचिये नगरी' यांचे संपादन. १९४३ पासून विविध प्रकारचे लेखन. प्राचीन आणि अर्वाचीन वाङ्मयाची संशोधनपर समीक्षा करणारे लेखन आणि संपादन. विधवाविवाह–चळवळ १८००–१९००, आवड–निवड, नीरक्षीर, संतर्पण, आगळं–वेगळं, ऋणानुबंधांच्या गाठी आणि तारतम्य, तसेच केशवकुमारकृत 'झेंडूच्या फुलां'ची सुवर्णमहोत्सवी आवृत्तीचे संपादन ही पुस्तके विशेष उल्लेखनीय.

लेखकाची ग्रंथ–सूची पृष्ठ १५३ पहा.

भूमिका

एकोणिसावे शतक म्हणजे कलहशतक म्हणतात, ते पुष्कळसे खरे आहे. या शतकातील अनेक महत्त्वाच्या पुस्तकांचे संपादक माझ्याकडून संशोधनपर टीका-टिप्पणींसह झाले आहे. म. फुलेकृत 'शेतकऱ्याचा असूड', 'म. फुले : समग्र वाङ्मय' ताराबाई शिंदेकृत 'स्त्रीपुरुष–तुलना', लोकहितवादीकृत 'जातिभेद' मं. रा. तेलंगकृत 'सं. हजामत' इत्यादी लेखन माझ्या 'तारतम्य' या पुस्तकात संकलित झालेले आहे. या लेखसंग्रहाचे स्वरूप तशाच धर्तीचे आहे. किंबहुना 'तारतम्य'चे हे एक विस्तारण आहे.

मराठी गद्यनिर्मितीची नांदीच असे जार्विसचे परिपत्रक (१८२५), बळवंतराव मल्हारराव चिटणिस यांनी रेखलेली छत्रपती प्रतापसिंह यांची 'लेखी' तसबीर (१८२८), दोन दुर्मिळ पुनर्विवाह प्रकरणे (१८३७ व १८४१), बॉम्बे असोसिएशन या पहिल्या राजकीय संस्थेने पार्लमेंटकडे पाठविलेले दोन अर्ज (१८५२ व १८५३), सत्तावन्नच्या स्वातंत्र्यसमराची समकालीन कात्रणे, जनगणना-विषयक परिपत्रक (१८७१) माधवदास रघुनाथदासकृत 'आत्मलिखित पुनर्विवाह-चरित्र (१८९१) या मूळ साधनांच्या निमित्ताने केलेल्या व्यासंगाचे फलित येथे मांडले आहे.

अव्वल इंग्रजी काळात मुंबई हेच पश्चिम भारताचे केंद्र बनले होते. विशेषतः त्या काळातले गुजराती आणि मराठी समाजांचे संबंध 'एकमेकां साह्य करूं' अशा स्वरूपाचे होते; मग ते संबंध अर्जविनंत्याचे राजकारणी असोत, परदेशपर्यटनाच्या प्रायश्चित्तांसारखे धार्मिक असोत, 'लालभडाक'च्या जादूटोण्याच्या दंभस्फोटा-सारखे असोत, विधवाविवाहाच्या चळवळीसारखे सामाजिक सुधारणेचे असोत किंवा क्रमिक पुस्तकांच्या उपक्रमांसारखे शैक्षणिक असोत. एकोणिसाव्या शतकतील रंगभूमीशी निगडित असे दोन लेख पुस्तकात आहेत. त्यांतील एकाचे स्वरूप शुद्ध संशोधनपर आहे; दुसरा इचलकरंजीकर नाटक मंडळीसारख्या महत्त्वाच्या मंडळीच्या कार्याचे मूल्यमापन करणारा आहे. 'शिवस्मारक आणि रे. टिळक' या स्फुट लेखातील ख्रिस्ती रे. टिळकांच्या बावनकशी देशभक्तीपुढे दत्त म्हणून उभी ठाकलेली शृंगापत्ती जाणकारांस खचितच मजेदार वाटेल.

आधी समीक्षा आणि त्यात संशोधनपर म्हणून किचकट अशा लिखाणाचे स्वागत सध्याच्या महर्गतेच्या काळात कोण करणार ? पण 'प्रतिमा प्रकाशन'चे श्री. अरुण पारगावकर यांनी ते मनापासून केले. याविषयी त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच. डॉ. हेमंत इनामदार आणि श्री. गो. रा. परांजपे यांनी हा योग

जुळवून आणला. माझे स्नेही श्री. रघुनाथराव भानप यांच्या सूचनांचा मला फार उपयोग झाला. मुं. म. ग्रंथसंग्रहालयाच्या श्रीमती लतिका जोशी आणि श्री. मनोहर परायणे यांनी मला संदर्भसाहाय्य केले. माझे लेख या ग्रंथात समाविष्ट करण्यास निर-निराळचा नियतकालिकांनी अनुज्ञा दिली त्यांचा मी ऋणी आहे. श्री. अभय पुरंदरे यांनी सुवक वेष्ठन चढवले. मे. गुरुसेवा मुद्रणालयाचे श्री. मधुकर ठाकर यांनी अल्पावधीत मुद्रण केले. या सर्व सुहृदांचा मी ऋणी आहे.

संशोधनपर समीक्षा ही, वहुधा, अप्रिय पण पथ्यकर बोलायला लावते. कधी कधी तर छपन्न कोटी यादवगण एका बाजूला नि सत्याचा श्रीकृष्ण एका बाजूला यात निवड करायला लागते. अशी निर्भीक निवड झाल्याने या कलह-शतकाचा समज वाढविण्यास हातभार लागला असेल, तर या लेखसंग्रहाचे साफल्य झाले, असे म्हणता येईल.

३ मनाली, कॉलेज गल्ली —स. गं. मालशे
आगरवाजार, मुंबई ४०००२८
२ एप्रिल १९८९

अनुक्रमणिका

१. अव्वल इंग्रजीतील ग्रंथनिर्मितीची नांदी ९

२. छत्रपती प्रतापसिंह यांची 'लेखी तसबीर' २०

३. गुजराती–मराठी संबंध ३३

४. मानवधर्मसभा आणि 'लालभडाक'चा दंभस्फोट ४८

५. परदेशपर्यटन आणि प्रायश्चित्ते ५६

६. दोन दुर्मिळ पुनर्विवाह प्रकरणे : प्रस्तावना ६७

७. एका मराठी पुनर्विवाहाची शोकान्तिका ७७

८. एका गुजराती पुनर्विवाहाची सुखान्तिका ८४

९. पश्चिम भारतातील पहिली राजकीय संस्था : धी बॉम्बे असोसिएशन ९६

१०. सत्तावनी समकालीन कात्रणे : प्रस्तावना ११०

११. झाशीवालीपुढे खेळ सादर करणारा 'सदोबा नाटकवाला' कोण ? ११६

१२. इचलकरंजीकर नाटकमंडळीची भरीव कामगिरी १२३

१३. शिवस्मारक आणि रे. टिळक १३१

१४. भारतीय जनगणनेची शंभरी १३६

निर्देश–सूची १४३

डॉ. स. गं. मालशे ग्रंथ–सूची १५३



१. अव्वल इंग्रजीतील मराठी ग्रंथनिर्मितीची नांदी

भारतातील इंग्रजी राजवटीचा सर्वांत लोककल्याणकारक व तितकाच क्रांतिकारक ठरलेला पैलू म्हणजे सार्वत्रिक शिक्षण. या स्पृहणीय उपक्रमातील योग्य दिशेने पडलेले पहिले पाऊल, असे ज्याचे वर्णन करता येईल, असे ८ एप्रिल १८२५ रोजी निघालेले परिपत्रक आहे. पण त्यापूर्वी त्याची पार्श्वभूमी ध्यानात घेणे आवश्यक ठरेल.

इ. स. १८१८ मध्ये पेशवाई गेली नि आंग्लाई सुरू झाली. कलकत्त्याहून ईस्ट इंडिया कंपनीचा अंमल पश्चिम भारतावरही चालू झाला. कंपनी सरकारचे या प्रांतातले प्रमुख ठाणे मुंबई हे होते. मुंबई इंग्रजांच्या ताब्यात पूर्वीपासूनच होती. १५३४ साली गुजरातचा बादशाहा सुलतान बहादर याच्याकडून ती पोर्तुगीजांकडे व राजकन्या कॅथेरिना हिच्या विवाहाचा हुंडा म्हणून पोर्तुगीजांकडून १६६१ साली इंग्रजांकडे आलेली होती. पेशवे व इंग्रज यांच्यात झालेल्या सत्तासंक्रमणापूर्वी जवळजवळ शंभर वर्षे अगोदर मुंबईत शैक्षणिक उपक्रमाचा प्रारंभ झालेला होता. रे. रिचर्ड कॉब या ख्रिस्ती धर्मगुरूने मुंबईत पहिली शाळा इ. स. १७१८ साली उघडली होती. तिचा हेतू युरोपियन लोकांच्या गरीब मुलांना ख्रिस्ती धर्माचे शिक्षण देणे हा होता.[१] ही शाळा बराच काळपर्यंत खाजगी वर्गण्यांमधून

चालत असे. पुढे १८०७ साली कंपनी सरकारने या शाळेला वार्षिक अनुदान चालू करून ती ताब्यात घेतली. एकीकडे कंपनी सरकारच्या मराठा सरदारांवरोवर लढाया चालूच होत्या, अधिकाधिक मुलूख ताब्यात येत होता. या नवीन मुलखातील एतद्देशीय लोकांच्या मुलांना शिक्षण देण्याची समस्या निर्माण झाली. कंपनी सरकारने १८१५ मध्ये 'बॉम्बे एज्युकेशन सोसायटी' ही संस्था स्थापन केली व तिच्या ताब्यात वरील शाळा देऊन तिच्यामध्येच एतद्देशीय लोकांच्या गरीव मुलांच्या शिक्षणाची सोय केली.[२]

मराठी पुस्तकमुद्रणाच्या दृष्टीने श्रीरामपूर, तंजावर इत्यादी ठिकाणी स. १८१८ सालापूर्वी जे प्रयत्न झाले, त्यांचा आढावा प्रा. अ. का. प्रियोळकर यांनी आपल्या 'द प्रिंटिंग प्रेस इन इंडिया' या सुप्रसिद्ध ग्रंथात दिलेलाच आहे. १८१८ मध्ये झालेल्या सत्तासंक्रमणानंतर १८१९ मध्ये माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन हा मुंबई इलाख्याचा गव्हर्नर झाला. या प्रांताची घडी बसविण्याच्या दृष्टीने एल्फिन्स्टनने आपले धोरण उदार ठेवले होते. त्याचे शैक्षणिक धोरण तर विशेषच शहाणपणाचे होते. बॉम्बे एज्युकेशन सोसायटीचा अध्यक्ष या नात्याने त्याने १८२० मध्ये एक सभा घेऊन इंग्रजी व देशी भाषांतून पाठ्यपुस्तके तयार करण्यासाठी व देशी शाळांना मदत करण्यासाठी 'नेटिव्ह स्कूल ॲन्ड स्कूलबुक कमिटी' म्हणून एक समिती स्थापन केली.[३] या समितीने आपल्यासमोर देशी भाषांतून ज्ञानप्रसार करण्याचे ध्येय प्रथमपासून ठेवले होते. समितीच्या १८२१ सालच्या इतिवृत्तात म्हटले आहे :

'In imparting to the natives useful knowledge to any extent, and with the hope of any good permanent effect, it is evident the language of the country must be the chief and proper vehicle.' [४]

परंतु दरम्यान बॉम्बे एज्युकेशन सोसायटीने आपला व्याप आखडता घ्यायचे ठरवून आपले कार्य युरोपियन व युरेशियन मुलांपुरतेच पूर्वीसारखे मर्यादित करावे, असा निर्णय घेतला. तेव्हा एल्फिन्स्टनने 'बॉम्बे नेटिव्ह स्कूलबुक ॲन्ड स्कूल सोसायटी' ही वेगळी संस्था २१ ऑगस्ट १८२२ रोजी स्थापन केली. हिचे देशी नाव 'मुंबईची हैदशाळा व शाळापुस्तक मंडळी' असे रूढ झाले. या संस्थेची पुढे जी स्थित्यंतरे होत गेली त्यांची माहिती अशी :

'हा कारखाना माहे आगस्ट सन १८२० सांत चालू झाला, त्या वेळी हा मुंबई इडचुकेशन सोसायटी या कारखान्याचा भाग होता. त्या सोसायटीपासून हा माहे आगस्ट १८२२ सांत निराळा झाला, व त्यास मुंबई येथील शाळा व शाळापुस्तक मंडळी असे नाव ठेवले. सन १८२७ सांत हे नाव फिरवून मुंबई येथील

शिक्षामंडळी असे नाव दिले, व हे नाव माहे एप्रिल सन १८४० सांत बोर्ड आफ् इडचुकेशन यांची नेमणूक झाली तेथपर्यंत चालत होते. नंतर शिक्षामंडळीच्या शाळा व एल्फिन्स्तन् विद्यालयांतील विद्यार्थी हे एकत्र करून आणि सर्व पूर्वीची नावे रद्द करून एल्फिन्स्तन् नेटिव इन्स्टिटचूशन हे नाव दिले. याप्रमाणे आजपर्यंत फेरफार होत आले.'[५]

परिपत्रक हैंदशाळा शाळापुस्तकमंडळीचा कार्यवाह या नात्याने जॉर्ज जर्विस यांनी काढलेले आहे. पाश्चात्त्य विद्या देशी भाषांच्या माध्यमातून द्यावयाची, हे उद्दिष्ट ठरविल्याबरोबर संन्याशाच्या लग्नाला शेंडीपासून तयारी, म्हणतात तशी परिस्थिती शासनकर्त्यांसमोर दत्त म्हणून उभी राहिली. ख्रिस्ती मिशनरी शाळांसाठी काही पुस्तके आधी तयार झाली होती. पण एक तर ती प्राथमिक स्वरूपाची होती व दुसरे म्हणजे सरकारचे धोरण धर्मनिरपेक्ष राहावे यावर एल्फिन्स्टनचा कटाक्ष होता.[६] जॉर्ज जर्विस हा वरील शिक्षामंडळीच्या कार्यवाहपदी १८२३ ते १८२९ या काळात होता. या मंडळीकडून १८२३ पर्यंत 'लिपिधारा', 'अंकलिपि', 'बोधवचन', 'पंचोपाख्यान' व 'विदुरनीति' अशी मराठी पुस्तके तयार झाली होती.[७] परंतु केवळ अंकलिपीने वा पुराणातल्या गोष्टींनी नव्या उपक्रमाची गरज भागण्यासारखी नव्हती. अभ्यासक्रमातील विविध विषयांवरील पुस्तके तयार होणे अगत्याचे होते. ही पुस्तके सरकारी देखरेखीखालीच सिद्ध व्हावीत व सरकारी छापखान्यातच मुद्रित व्हावीत, अशी एल्फिन्स्टनची दृष्टी होती. त्यामुळे मिशनऱ्यांच्या छापखान्यातून हे कार्य करून न घेता शाळा-पुस्तकमंडळीचा स्वतःचा छापखाना असावा, असे ठरले. हा छापखाना सुरू करण्याची सूचना पुढे येताच एतद्देशीय लोक शहाणे होऊन लवकरच इंग्रजी सत्तेचे जू झुगारून द्यायला कमी करणार नाहीत, अशी भीतीही (जी पुढे खरी ठरली!) व्यक्त करण्यात आली होती. परंतु एतद्देशीयांची सुधारणा हे एल्फिन्स्टनने आपले मनोमन कर्तव्य मानले होते. त्याने या परिणामांची क्षिती न बाळगता आपले धोरण अमलात आणले.[८]

या धोरणाची नांदी म्हणजे प्रस्तुतचे सरकारी परिपत्रक. हे पत्रक इंग्रजी, मराठी व गुजराती या तीन भाषांत असून त्याची दर भाषेगणिक अनुक्रमे चौदा, वीस व वीस अशी पृष्ठे आहेत. सु. आ. गावस्कर यांच्या 'मराठी दोलामुद्रिते' (इ. स. १८६७ पूर्वी मुद्रित झालेल्या मराठी पुस्तकांची यादी) या पुस्तकात या पत्रकाचे वा पुस्तिकेचे वर्णन पुढीलप्रमाणे करण्यात आलेले आहे[९] :

जार्विस जार्ज, ग्रंथांची भाषांतरे किंवा ग्रंथ करणारांस बक्षिसाविषयींचे प्रसिद्धिपत्र : मुंबई, हैंदशाळा शाळापुस्तक मंडळी, १८२५, पृ. १४+२०+२०, ७"७.×४"४.

हे परिपत्रक पुस्तिकारूपात शासकीय विभागीय ग्रंथालय, पुणे ३० येथील दातेसंग्रहात तसेच मुं. म. ग्रंथसंग्रहालयात पाहावयास मिळते.[१०]

या प्रसिद्धिपत्रातील आशयावरून सुचणारे काही विचार येथे सूत्ररूपाने मांडण्यात येत आहेत :

(१) **विकासबीजे** : परिपत्रकातील अभ्यासविषयांचा विचार केल्यास महाराष्ट्र व गुजरात या उभय प्रांतांच्या स्वातंत्र्यपूर्व काळातील शैक्षणिक विकासाची बीजे या पत्रकात साठविलेली आहेत, असे म्हणता येईल. काही तपशील वजा करता, आपल्या अभ्यासक्रमाची रूपरेषा व विषय स्थूलमानाने तेच राहिलेले दिसून येतात.

(२) **माध्यमाचा प्रश्न** : येथे भाषांतररूपाने मागविण्यात आलेली पुस्तके प्रामुख्याने मराठी व गुजराती या भाषांत आहेत. त्यावरून एल्फिन्स्टन व जर्विस यांच्या प्रोत्साहनाने सुरू झालेल्या या उपक्रमाचे उद्दिष्ट स्पष्ट होते. ते उद्दिष्ट म्हणजे या उभय भाषा शिक्षणाचे माध्यम बनाव्या. या बाबतीत प्रारंभी तरी कसलीही आशंका राज्यकर्त्यांच्या मनात नव्हती. एतद्देशीय लोकांचीही इच्छा तशीच होती. कारण एल्फिन्स्टननंतर गव्हर्नरच्या जागी सर जॉन माल्कम हा आला. त्याच्या कारकीर्दीत एल्फिन्स्टनच्या नावाने प्राध्यापकपदे स्थापन करण्यासाठी लोकांनी वर्गणी गोळा केली होती. यामागील उद्दिष्ट जाहीर करताना माल्कमने म्हटले होते,

'...they regard it (English) merely as help to the diffusion of the European arts and sciences among them by means of translations by those who have acquired a thorough acquaintance with it.'[११]

एल्फिन्स्टन व माल्कम यांच्या या धोरणाला वार्डन या गव्हर्नरच्या सल्लागाराचा विरोध होता. १८२३ सालच्या एप्रिलमध्ये सुरू करण्यात आलेल्या 'एंजिनियर्स इन्स्टिटचूट 'मध्ये देशी भाषाच माध्यम ठरविण्यात आल्या होत्या व ते ज्ञानग्रहणाच्या दृष्टीने विशेष उपयुक्त ठरले होते, असाच माल्कमचा अभिप्राय होता. पण माल्कम १८३० मध्ये परत गेला व तदनंतर देशी भाषांतील भाषांतरित पुस्तकांना उत्तेजन देण्याच्या बाबतीत सरकारने हात आखडता घेतला. १८३५ मध्ये मेकॉलेचे 'मिनिट' प्रकट झाले. त्यानुसार भारतीय विद्या व भाषा व्यर्थ असून पाश्चात्त्य विद्या, व त्याही इंग्रजी या पाश्चात्त्य भाषेच्या माध्यमातून शिकविणे, हेच धोरण स्पष्ट करण्यात आले. तरीसुद्धा मेजर कँडीसारख्या शिक्षणाधिकाऱ्याच्या समंजस धोरणामुळे पश्चिम भारतातील देशी भाषेच्या माध्यमाच्या उपक्रमाची प्रगती फारशी

खंडित झाली नाही. परंतु १८४४ साली एर्स्किन पेरी हा शिक्षणमंडळीच्या अध्यक्ष-पदी आला. तो देशी भाषांच्या माध्यमाविरुद्ध होता. पण कर्नल जर्विससारख्या शिक्षणमंडळाच्या परकीय सदस्यांनी व एतद्देशीय सदस्यांनी देशी भाषांचे समर्थन केले. तेव्हा मुंबई सरकारचे शैक्षणिक धोरण मेकॉलेच्या 'मिनिट'मधील आदेशाच्या विरुद्ध आहे, अशी तक्रार पेरीने कलकत्त्यास केली. शेवटी १८५१ मध्ये बेथ्यूनच्या इतिवृत्तानुसार देशी भाषांच्या माध्यमाची इतिश्री झाली. पुढे विद्यापीठे स्थापन झाल्यावर एक विषय म्हणून देशी भाषा राहिल्या. पण चारदोन वर्षांत तेथूनही त्यांचे उच्चाटन झाले. माध्यमविषयक झालेल्या भवति–न–भवतीची इत्थंभूत हकीगत कै. रा वि. परुळेकरांच्या एका लेखात वाचावयास मिळते.[१२]

(३) **भाषांतराच्या सूचना** : प्रसिद्धिपत्रात भाषांतरकारांना केलेल्या सूचना मौलिक असल्यामुळे त्यांचे येथे पुनर्विधान करण्यात येत आहे : (अ) या देशातील लोकांच्या चालीरीतींचा विचार करून इंग्रजीतील संपूर्ण अर्थ आणण्यासाठी मुळात थोडी फिरवाफिरव करावी. (आ) भाषांतराची भाषा लोकांना समजेल अशी साधी असावी. (इ) भाषांतराची भाषा मुद्दाम प्रौढ व अवघड बनवू नये. (ई) पारिभाषिक शब्दांची वाण पडेल तेथे या भाषांच्या संदर्भातील मूळ भाषांतील (गुजराती–मराठीसाठी संस्कृतमधील व हिंदुस्थानीसाठी अस्सल फारशीतील) शब्द घ्यावे. (उ) असे पारिभाषिक शब्द मूळ भाषांतही न मिळाल्यास इंग्रजी शब्द उपयोजिण्यास हरकत नाही.

–या सर्व सूचना अत्यंत व्यावहारिक स्वरूपाच्या आहेत यात शंका नाही. पाश्चात्त्य व भारतीय यांच्या चालीरीती सांस्कृतिक दृष्ट्या भिन्न आहेत, तसेच या उभयविध भाषांच्या मूलप्रकृतीतही लक्षणीय भेद आहेत, याची जाण या सूचनांत दिसून येते. वरीलपैकी 'इ' सूचनेचा आशयही महत्त्वाचा आहे. कारण गद्याच्या पुनरुज्जीवनाच्या त्या प्रारंभकाळी संस्कृतप्रचुर व जादा प्रासयुक्त लेखन करण्याची उत्साही लकब प्रचलित होती. तत्कालीन चलनी हिंदीवर वा हिंदुस्थानीवर उर्दूचा ठसा होता, हे ध्यानात घेऊन 'हिंदुस्थानी' भाषेची मूळ भाषा 'फारशी' मानून तिच्यातील शब्द घेण्याची शिफारस करण्यात आलेली आहे. पाश्चात्त्य विद्या प्रथम देशी भाषांतून मांडली जात होती व तीही शालेय पातळीवरच्या पाठ्यपुस्तकात मांडली जात होती, हे ध्यानात घेतल्यास या सूचनांचा सुलभतेकडे असणारा एकंदर कल रास्तच म्हणावासा वाटतो.

(४) **गुजरातीची लिपी** : प्रसिद्धिपत्रात मराठीप्रमाणेच गुजराती भागही देवनागरीत असलेला पाहून सकृद्दर्शनी कोणास आश्चर्य वाटण्याचा संभव आहे; परंतु गुजराती भाषेची अन्य भाषांहून असलेली लिपिभिन्नता हा एक योगायोग आहे. परंपरा पाहिल्यास मराठीप्रमाणे गुजरातीचीही मूळ लिपी देवनागरीच

होती. तिला 'शास्त्री' लिपी असे म्हणत.[13] मराठीसाठी जशा बालबोध व शीघ्रलिपी म्हणून मोडी अशा दोन लिप्या होत्या, तशाच गुजरातीच्याही शास्त्री व शीघ्रलिपी म्हणून 'महाजन' अशा दोन लिप्या होत्या. या महाजन लिपीलाही पूर्वी शिरोरेषा असे. पत्रव्यवहार, जमाखर्च यांसारख्या हरघडीच्या लेखनासाठी शीघ्रलिप्याच योजल्या जात असत. त्यामुळे मराठी भाषेची लिपी मोडीच, अशी समजूत होऊन आद्य मुद्रणात मराठी छपाईसाठी मोडी टंक पाडलेले दिसून येतात.[14] पण मुद्रणाच्या बाबतीत मराठीने मोडी लिपी अंगिकारली नाही. गुजरातीची शीघ्रलिपी 'महाजन' ही पारशी समाजातील आद्य मुद्रकांनी प्रथम मुद्रणात योजली. ती 'मोडी'प्रमाणे मागे न पडता कायम झाली. पुढे मुद्रण-सुलभतेसाठी 'महाजन' लिपीची शिरोरेखाही गेली. सारांश, मुद्रणाच्या त्या प्रारंभकाळी गुजराती भाषेसाठी परिपत्रकात योजण्यात आलेली देवनागरी लिपी ही अनैसर्गिक होती, असे म्हणता येणार नाही.

(५) **पारितोषिकांच्या भरघोस रकमा** : परिपत्रकाच्या गाभ्याकडे वळताच प्रथमदर्शनी नजरेत भरणारी गोष्ट म्हणजे पारितोषिकांच्या रकमा. त्या काळचे जीवनमान ध्यानात घेता, भाषांतरासाठी वा स्वतंत्र रचनेसाठी शंभरपासून पाच हजारपर्यंत ठेवलेल्या रकमा भरघोस होत्या, खरेखुरे उत्तेजन देणाऱ्या होत्या, यात शंकाच नाही. बक्षिसांच्या भरघोसपणामुळे ग्रंथ रचण्यासाठी अहमहमिका लागून एका विषयावर एकाहून अधिक ग्रंथ तयार होतील, याची कल्पना संयोजकांना होती. त्यासाठी अशा ग्रंथकारांनी आपण कोणता ग्रंथ तयार करीत आहो, हे कार्यवाहांस आधी कळवावे असे पत्रकात म्हटले असून, सादर झालेल्या ग्रंथांपैकी सर्वोत्तम ग्रंथास बक्षिस मिळेल असा निर्वाळा दिलेला आहे. ग्रंथांची गुणवत्ता उंचावण्याच्या दृष्टीने ही चुरस उपयुक्त ठरली असेल, यात शंका नाही.

(६) **स्त्रीशिक्षण** : इंग्रज सरकारने स्त्रीशिक्षणाच्या प्रश्नाला प्रथम येथे चालना व उत्तेजन दिले, ही वस्तुस्थिती कोणीही नाकारू शकणार नाही. मुंबईमध्ये हिंदू मुलींच्या शिक्षणासाठी पहिली शाळा १८२४ मध्ये अमेरिकन मिशनने सुरू केली.[15] त्यानंतर वर्षभरात निघालेल्या या पत्रकात स्त्रियांना विद्या व नीति-शिक्षण देण्याची आवश्यकता प्रतिपादणारा ग्रंथ मागविण्यात आला होता. तेव्हा शासकीय पातळीवरील स्त्रीशिक्षणाचे सूतोवाचही या प्रसिद्धिपत्रकात झालेले आहे, हे दिसून येते.

(७) **कथाग्रंथांची गंगोत्री** : विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात अन्य ज्ञानविषयांबरोबर नैतिक शिक्षणाचाही अंतर्भाव असतो, किंबहुना शिक्षणाचे ते एक व्यापक उद्दिष्टच असते. या पत्रकाद्वारे विद्यार्थ्यांच्या सामान्य ज्ञानात भर घालणारे व नीतितत्त्वे शिकविणारे मनोरंजक व बोधप्रद कथाग्रंथही मागविण्यात आले होते. मराठी कथावाङ्मयाची गंगोत्री समजला जाणारा सदाशिव काशिनाथ छत्रेकृत

'बाळमित्र' (१८२८) या सरकारी उपक्रमातूनच सिद्ध झाला. तात्पर्य, आधुनिक मराठी कथासाहित्याचे बीजही येथेच आढळून येते.

(८) **हिंदुस्थानी पुस्तके** : ही पुस्तके एतद्देशीयांपैकी मुसलमान प्रजेसाठी तयार केली जाणार होती. 'ऊर्दू' साठीच येथे 'हिंदुस्थानी' शब्द योजलेला आहे. कलकत्त्याला 'कलकत्ता स्कूलबुक सोसायटी'ची स्थापना १८१८ साली झाली होती[१६] व तेथे काही हिंदुस्थानी पुस्तके आधीच तयार झालेली होती, हे या परिपत्रकावरून दिसते. तेव्हा द्विरुक्ती होऊ नये अशी काळजी घेण्यात आली होती. गुजरात व महाराष्ट्र यांच्या संदर्भातली खास पुस्तके या प्रांतातील मुस्लिम विद्वानांकडून वा फारशी पंडितांकडूनच होण्यासारखी होती. तेव्हा अशा प्रकारची पुस्तके हिंदुस्थानी भाषेत मागविण्यात आलेली दिसतात.

(९) **भाषाविकास** : ज्ञानविषयांखेरीज केवळ भाषांच्या विकासाच्या दृष्टीने उभय भाषांचे कोश–व्याकरणेच नव्हेत, तर पारिभाषिक शब्दकोशही–तयार करण्याची सूचना त्यात होती, हे उल्लेखनीय होय.

(१०) **संगीतविषयक ग्रंथ** : विलायती संगीतावर मराठी व गुजराती या दोन्ही भाषांत ग्रंथ मागविले होते. अर्थात् हे संगीत मराठी भाषिकांपेक्षा गुजराती भाषिकांपैकी केवळ पारशी समाजाच्याच विशेष अंगी लागले, हे भावी इतिहासावरून दिसून येते.

(११) **केनडीकृत 'मार्शल लॉ' वरील पुस्तक** : या पुस्तकाचे भाषांतर मराठी व हिंदुस्थानी या भाषांत मागविलेले आहे; पण गुजरातीत मागविलेले नाही. त्याचे कारण उघडच असे दिसते की, गुजराथचा जो प्रांत त्या काळी ब्रिटिश अमलाखाली आलेला होता, त्यातली प्रजा सैन्यभरती होणाऱ्यांपैकी नसावी, निदान सैन्यात भरती होणाऱ्या गुजराती भाषिकांची संख्या अगदी अत्यल्प असावी.

(१२) **भारतीय विद्येची बूज** : प्रस्तुत शैक्षणिक उपक्रमामागे पाश्चात्त्य विद्यांचे शिक्षण देशी भाषांच्या माध्यमाद्वारे द्यावयाचे, हे मूलाधार असे विचारसूत्र होते व ते सरकार व एतद्देशीय नेत्यांनाही मान्य झालेले होते. तरीसुद्धा येथे अभ्यासविषयानुवर्ती भारतीय संचिताकडे सर्वस्वी डोळेझाक केल्याचे दिसून येत नाही; कारण बहुतेक विषयांच्या संदर्भात उपलब्ध होण्याजोग्या भारतीय ग्रंथांतील वेचे सिद्ध करण्याचे आवाहन या परिपत्रकात करण्यात आलेले आहे.

(१३) **भाषिक महत्त्व** : हे परिपत्रक म्हणजे अव्वल इंग्रजीतील आद्य गद्याचा तसेच आद्य मुद्रिताचा एक नमुनाच आहे. तेव्हा त्याच्या काही भाषाविशेषांची व मुद्रणविशेषांची आजच्या प्रमाणलेखनाशी व मुद्रणाशी तुलना करून पाहिल्यास ती उद्बोधक ठरावी.

अर्थप्रक्रिया

अर्थदृष्ट्या पुढील काही शब्दांच्या योजनेतील वेगळेपणा नजरेत भरतो– इरेने = चढाओढीने, कुमार = म्हैसूर,[१५] चाळिलेल्या=संपादिलेल्या, दाटून = मुद्दाम (हा शब्द ग्रामीण मराठीत प्रचलित आहे), नवा=स्वतंत्र, भाषांतरित नसलेला, नेमाचा लेख=ठरावाचा लेख, प्रौढ=उच्च, बहुतकरून = प्रामुख्याने, बाळबोध=प्राथमिक, मिळवून=ताडून, मूळगोष्टी=मूळतत्त्वे, यौगिक=Technical व Cognate, शिक्षा = शिक्षण, साफ = पक्की (fair), हिंद = भारत, हिंदुस्थान. इंग्रजीतील विविध पारिभाषिक शब्दांचे या परिपत्रकात केलेले मराठीकरण कळण्याच्या दृष्टीने पुढील यादी उपयुक्त ठरेल.

परिभाषा

Amusing Tales–चमत्कारिक गोष्टी
Animal Biography--जीवकथाग्रंथ
Antiquities–बहुकाळी–पदार्थ
Architecture–बंधनविद्या
Authentic–पत्तेवार
Cement–लुकण
Chemical Amusement–रसायण कौतुक
Chiefly–बहुतकरून
Cognate–मूळभाषा
Cognate–यौगिक
Collate–मिळवून (ताडून)
Comparison–मिळवून चौकशी
Competition– इरा (इरई)
Complete–सांग
Composition–ग्रंथशिक्षा
Edited–चाळिलेला
Elements–मूळ गोष्टी
Elementary–बाळबोध
Ethics–नीति
Experimental–कृत्रिम
Fables–कहाण्या
Fair–साफ, कच्ची नव्हे ती
Geology–भूमितीतील वृत्तांत
Higher–प्रौढ
Improvement of mind–चित्तप्रसादन
Joiner–कळाशी
Jurisprudence–राजनीति
Logic–न्याय
Martial Law–योधकांचा न्याय
Mechanics–शिल्पयंत्रवृत्तांत
Methods of Managing School–शाळाशिक्षापद्धति
Natural–सिद्ध
Old–बहुकाळी
Perspective–जसे दिसते तसेच काढावे
Philosophy–नीतिविवेक
Principle–मूळ गोष्ट
Probabilities–संभवासंभव
Rural economy–कृष्यादि परिपाटी
Technical–यौगिक
Trades–कळा
Theory of Numbers–अंकसारणी
Unnecessary–दाटून

नव्या शास्त्रीय ज्ञानाची परिभाषा मराठीत सिद्ध झालेली नव्हती. तरीपण अंकसारणी, कळाशी, पत्तेवार, संभावासंभव, सांग हे सुटसुटीत शब्द लक्षणीय वाटतात.

मुद्रणविषयक वैशिष्टचे

विरामचिन्हे : मेजर कँडी यांची 'विरामचिन्हांची परिभाषा' १८५० साली प्रसिद्ध झाली व मराठी गद्यलेखनात विरामचिन्हांचा बराच नेटका उपयोग होऊ लागला. या परिपत्रकाच्या इंग्रजी विभागात विरामचिन्हांचा उपयोग बराच नियमित आहे; परंतु मराठीतील विरामचिन्हांची व्यवस्था खूपच अपुरी दिसून येते. तिची काही वैशिष्टचे अशी : (१) पूर्णविरामाचा उपयोग प्रायः जिथल्या तिथे केलेला आहे. (२) स्वल्पविरामाचे चिन्ह नाही. उदा० (अ) पैसा श्रम वेळ (आ) सिद्ध कृत्रिम आणि यांत्रिक. (३) स्वल्पविरामाच्या व अर्धविरामाच्या जागी कधी पूर्णविराम तर पुष्कळदा अपसारण चिन्ह (–) विशिष्ट प्रकारे योजलेले दिसते. उदा० (अ) त्यांहीं हें लक्षात ठेवावें–कि–या देशांतील लोकांचे... (आ)...ही मंडळी करीत नाहीं–तर–यामध्यें नेमिली नाहींत–असे ग्रंथ योजून ..

तालव्य व दन्ततालव्य : मराठीत च्, ज्, झ् या व्यंजनांचे काही शब्दांत तालव्य, तर काहींत दन्ततालव्य असे दोन प्रकारचे उच्चार होतात. दन्ततालव्य अक्षराच्या शिरोरेषेच्या प्रारंभी बिंदू देऊन हा भेद येथे दाखविण्यात आलेला आहे. ही पद्धती त्या काळी थोडीफार रूढ असावी. बहुधा १८२५ सालीच रचलेल्या पंडितत्रयाच्या व्याकरणात ती दिसते. त्या व्याकरणाच्या अलीकडे प्रसिद्ध झालेल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत, दादोबांनी आपल्या व्याकरणाच्या पहिल्या आवृत्तीत (१८३६) व सातव्या आवृत्तीत (१८७९) या पद्धतीचा उल्लेख केलेला आहे, असे कै. प्रियोळकरांनी म्हटले आहे.[१८] तेव्हा ही पद्धत पुढे पन्नाससाठ वर्षे फुटकळपणे चालू असावी असे दिसते.

बिंदूचे स्थान : वेलांटीनंतर नेहमी येणारा अनुस्वार–बिंदू वेलांटीच्या मागे दिलेला आढळतो.

दीर्घ उकार : दीर्घ उकार 'ऊ' असा मुद्रित करण्याऐवजी 'होउन' असा मुद्रित केलेला आहे.

रकार : 'दुसऱ्या' या शब्दातील रकार 'दुसर्या' असा रफारयुक्त आढळतो. 'महाराष्ट्र' या शब्दातील दोन फाटचांच्या रकाराच्या चिन्हाऐवजी एक फाटा योजून काम भागविले आहे. उदा० 'महाराष्ट्र'.

शब्दाची जोडतोड : विशेषण–विशेष्य, दर्शक सर्वनाम–दर्शक शब्द हे कधी कधी जोडून मुद्रित झालेले आहेत. उदा: हावेततसे, कितीदिवसांनी, त्यासर्वांस.[१९] 'प्रसिद्धिपत्र' हा शब्द 'प्रसिध्धि पत्र' असा तोडलेला आढळतो.

फलश्रुती

या परिपत्रकाचे ऐतिहासिक व शैक्षणिक महत्त्व अधिक विवरून सांगण्याची आवश्यकता नाही. मुंबईचा पहिला गव्हर्नर माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन याने प्रारंभिलेल्या या शैक्षणिक उपक्रमाचा विकास घडवून आणण्यात, या परिपत्रकाखाली स्वाक्षरी असणारा तत्कालीन शिक्षणयंत्रणेचा कार्यवाह कॅप्टन जॉर्ज जर्विस (१७९४–१८५१) याचा मोठा वाटा आहे. 'इ. स. १८२६ ते १८३० पर्यंत शालेय पुस्तके रचून ती छापण्यासाठी २,०१,९२३ रुपये खर्च झाल्याचे सरकारी दप्तरांत नमूद आहे.'[२०] त्या काळाचा व खर्च केलेल्या पाच वर्षांच्या कालावधीचा विचार केल्यास ब्रिटिश अमलाच्या प्रारंभकाली तरी शासनाचे धोरण चांगलेच उदार होते असे म्हणावेसे वाटते. या पत्रकाची शैक्षणिक फलश्रुती लक्षणीयच होती. कोश, व्याकरण, शिक्षणशास्त्र, गणित, शिल्पविद्या, ज्योतिष, सिद्धपदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, वैद्यक, इतिहास, भूगोल, कथासाहित्य या विषयांवर अनेक पुस्तके मराठीत प्रसिद्ध झाली. या जंत्रीवजा गद्य–पत्रकात आविष्काराची सफाई अपेक्षित नाही. शासकीय आदेशाचा व्यावहारिक विषय यात आविष्काराची नवी वाट चोखाळीत आहे. तेव्हा प्रकटीकरणाच्या प्रयत्नांची धडपडच येथे पाहावयास मिळाली, तर त्यात नवल नाही. भावी काळात 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार' होऊन पुढे त्याला जे बाळसेदार स्वरूप प्राप्त झाले, त्याचे बोबडे स्वरूप तेथे दिसते. आधुनिक महाराष्ट्राच्या प्रबोधनाची नांदी म्हणूनच प्रसिद्धिपत्राचे खरे महत्त्व आहे.

संदर्भ

१. जे जर्सन द कुन्हा, **ओरिजिन ऑफ बॉम्बे,** मुंबई १९००, पृ. ३६४.

२. वकील के. एस्. **एज्युकेशन इन इंडिया,** कोल्हापूर, १९३७, पृ. ५.

३. **सिलेक्शन्स फ्रॉम एज्युकेशनल रेकॉर्डस् (बॉम्बे), भाग २,** संपा. आर. व्ही. परुळेकर व सी. एल्. बक्षी, मुंबई, १९५५, (प्रस्तावना), पृ. १५.

४. **सिलेक्शन्स फ्रॉम एज्युकेशनल रेकॉर्डस्, भाग २,** पूर्वोक्त, पृ. २७.

५. **पहिला रपोट, बोर्ड ऑफ एज्युकेशन यांचा,** (१८४३), पृ. ३.

६. टी. इ. कोलब्रुक, **लाइफ आफ माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन,** भाग २, लंडन, १८८४, पृ. १५६.

७. कृ. भि. कुळकर्णी, **आधुनिक मराठी गद्याची उत्क्रांति**, मुंबई, १९५६, पृ. ३०.

८. **तत्रैव**, पृ. ३३.

९. सु. आ. गावस्कर, **मराठी दोलामुद्रिते**, द्वि. आ; मुंबई १९६१, पृ. ३.

१०. सदर परिपत्रक अभ्यासण्यास ग्रंथालय–संचालक श्री. कृ. द. पुराणिक यांनी अनुज्ञा दिल्याबद्दल आभार.

११. **सिलेक्शन्स फ्रॉम एज्युकेशनल रेकॉर्डस्**, पूर्वोक्त, 'प्रस्तावना', पृ. २३ वरून उद्धृत.

१२. रा. वि. परुळेकर, 'द मीडियम ऑफ इन्स्ट्रक्शन' **श्री. आर. व्ही. परुळेकर फेलिसिटेशन** व्हॉल्यूम, मुंबई, १९५६, पृ. १–४०.

१३. अ. का. प्रियोळकर, **द प्रिंटिंग प्रेस इन इंडिया**, मुंबई, १९५८, पृ. ७६–७७.

१४. **तत्रैव**, पृ. ७४–७५.

१५. तुकाराम नथोजी, **अमेरिकन मराठी मिशनाचा शंभर वर्षांचा संक्षिप्त इतिहास**, अहमदनगर; १९१५, पृ. ५३–५४.

१६. कृ. भि. कुळकर्णी, पूर्वोक्त, पृ. ३४.

१७. 'कुमार' हे इंग्रजीतील 'म्हैसूर'चे भाषांतर आहे. गुजराती भागातही तेच आढळेल. परंतु प्राचीन देशनामांचे स्पष्टीकरण करणाऱ्या कोशांतून 'कुमार' या नोंदीवर असा अर्थ मिळत नाही. भारतीय चरित्रकोश-मंडळाचे म. म. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांनी ४–१०–७४ रोजी प्रस्तुत लेखकास लिहिलेल्या पत्रोत्तरातही असाच आशय व्यक्त केला आहे.

१८. **महाराष्ट्र भाषेचे व्याकरण**, संपा. अ. का. प्रियोळकर, मुंबई, १९५४, पृ. १३–१४.

१९. 'त्या वेळी' यासारखी शब्दसंहती 'त्यावेळी' अशी जोडून मुद्रित केलेली सध्याही पुष्कळदा आढळते.

२०. कृ. भि. कुळकर्णी, पूर्वोक्त, पृ. ३७.

२. छत्रपती प्रतापसिंह यांची 'लेखी तसबीर'

सातारचे छत्रपती प्रतापसिंह (ज. १७८२ मृ. १८४७) हे एक फार कर्तव्य-दक्ष पण दुर्दैवी राज्यकर्ते होऊन गेले. त्यांच्या प्रगतिशीलतेचे प्रतीक म्हणजे शीर्षकात उल्लेख केला आहे ती 'लेखी तसबीर.'

छत्रपती प्रतापसिंहांची पदच्युती कशी अन्यायाने झाली तिच्यासंबंधी इंग्रजी आणि मराठी ग्रंथांतून व कागदपत्रांतून पुष्कळच माहिती उपलब्ध होते. काही अनुपलब्ध अशी माहिती 'प्रभाकर' साप्ताहिकाच्या दुर्मिळ संचिकामधून जी आढळून आली, तीमध्ये संपादक भाऊ महाजन यांनी लिहिलेला मृत्युलेखवजा मजकूर खरोखर अत्यंत विदारक होता. त्यातला बराच भाग येथे उद्धृत करणे अनाठायी होणार नाही.

सातारच्या प्रतापसिंहाचा मृत्यू

या महिन्याचे १४ वे तारखेस प्रतापसिंग महाराज सातारचा माजी राजा हा मरण पावला ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. या राजाने इंग्रेज सरकारचा गैरइनसाफ जाहीर करून इंग्लंडांत मोठा गवगवा केला. यामुळें कोर्ट डरेकटर यांस जो त्रास जाहाला होता तो या राजाच्या मरणेंकरून दूर झाला आहे. टामसन

वगैरे राजाचा पक्ष धरणारे याचे सर्व श्रम शेवटी व्यर्थ झाले. या राजाचा मुकद्दमा विलायतेस गेल्यापासूनच यास दाद मिळेल अशी हिंदुस्थानांतील कोणी एका आसामीनेही आशा केली नव्हती. कारण इंग्रजांपासून कोणास इनसाफ मिळाला आहे? या राजास इनसाफ मिळण्यापूर्वी या दुनियेतील अस्थिर विषय सोडून जावे लागेल असे तर आबालवृद्धांनी भविष्य केलें होतें तेच शेवटीं प्रत्ययास आलें. इंग्रजांच्या राज्यांत पूर्वीचे मुसलमान बादशहा यांचे राज्यांतले पेक्षा इनसाफ फार असे म्हणतात, परंतु ही गोष्ट केवळ मिथ्या आहे. याचे राज्यांत इनसाफ म्हणून मिरवतात तो इतकाच की कोणी एकादे भिकाऱ्याने चोरी केली असता व तो सापडला असता तो शासनावाचून सुटत नाही व कोणाच्या देण्याघेण्याच्या फिर्यादी असल्या तर त्यास कोडते तोंड पसरून उघडीच असतात. त्याणें आपलें घरदार भरीस घालावे अफिलावर अफिलें करीत असावीं याचेंच नांव इनसाफ...

इंग्रेज सरकारने पेशवे सरकारचे राज्य घेतले त्या वेळेस प्रतापसिंग कैदेत होता. त्यास कैदेतून काढून त्याचे राज्य न घेतां त्यास गादीवर बसविला अशी एक इंग्रज लोक थोरवी सांगतात, ती खरीही आहे हें आम्ही कबूल करितों. परंतु अशे थोरपणाची कृत्ये पूर्वीचे जंगली मुसलमानांचे राज्यांत घडून येत नसत असा अर्थ नाही. हिंदूंविषयी महा चांडाळ व निष्ठुर अशे औरंगजेबाने शाहूपाशी कशी वर्तणूक केली ही ध्यानांत आणल्यावर स्पष्ट दिसोन येईल की महानिष्ठुर जंगली लोक या आमचे सुधारलेले सरकारचे जातीचे लोकांपेक्षा शतगुणित किंवहुना सहस्रगुणित चांगले–जळो यांचा इनसाफ. असले इनसाफापेक्षां बे इनसाफ बेहेत्तर आहे. आमचे लोक अशी गोष्ट सांगत असतात कीं पेशव्यांचे राज्य घेतल्यानंतर रत्नागिरी तालुक्यांतील एका साहेबानें आपले कोडतांत दोन तसबिरी टांगून ठेविल्या होत्या. एक तसबीर नग्न होती व एक तसबीर लंगोटी नेसविली होती. एका गृहस्थाने त्या साहेबास विच्यारिलें कीं या तसबिरी वस्त्रांविरहित कां आहेत? त्याचा अर्थ काय? त्या साहेबानें उत्तर दिल्हें जे आमच्या या कोडतांत इनसाफ मागायास येतील त्यात जो कब्जा हरेल त्याची दशा या नग्न तसबिरीप्रमाणे होईल, व जो जिंकेल त्याचें सर्वस्व जाऊन तेवढी लंगोटी मात्र राहील, असा आमचे येथे इनसाफ आहे.[१]

'प्रभाकरा'च्या संचिकांची पाहणी चालू असता डॉ. भी. ब. कुलकर्णी यांनी प्रतापसिंहासंबंधीचे मोडी लिपीतील एक हस्तलिखित उपलब्ध करून दिले. प्रत्यक्ष निरीक्षण केल्यावर सदर हस्तलिखित म्हणजे मोडी लिपीतील शिळामुद्रित पुस्तिका आहे हे ध्यानात आले. आजवर मुद्रित झालेल्या प्रतापसिंहविषयक साधनसामग्रीत या पुस्तिकेचा उल्लेख एकाच ठिकाणी दिसून आला.[२] एक दुर्मिळ अस्सल साधन म्हणून तिचे महत्त्व मोठे आहे.

पुस्तिकेचे बाह्यांग

इंग्रजांनी पेशव्यांचा पराभव करून ११ एप्रिल १८१८ रोजी सातारच्या गादीवर प्रतापसिंहाची पुन्हा स्थापना केली. तदनंतर दहा वर्षांनी, १५ ऑगस्ट १८२८ रोजी प्रस्तुत पुस्तिका शिळामुद्रित झालेली आहे. या पुस्तिकेला मुखपृष्ठ नाही. 'श्रीमलारीर्जयति' असा श्रीकारशब्द शिरोभागी आहे. व नंतरच्या ओळीपासून प्रत्यक्ष मजकूरच सुरू झालेला आहे. पृष्ठाचा आकार २४½×१५ सें. मि; तर पृष्ठातील प्रत्यक्ष मजकुराची चौकट २०×११ सें. मि. आहे. दर पृष्ठात ११ ओळी व दर ओळीत ६/७ शब्द आहेत. मोडी अक्षर वळणशुद्ध व लपेटदार आहे. एकूण पृष्ठे ६५. शेवटच्या ६४ व ६५ पृष्ठावरील अक्षर फार मोठे, अगदी ढोबळे आहे. इतरत्र मात्र ते एकसारखे आढळते. पृ. ६२ व ६३ यांचे ठसे उमटलेले नसल्याने ती पृष्ठे कोरी सुटलेली आहेत. म्हणजे दिनचर्येचा अखेर अखेरचा सु. १५० शब्दांचा मजकूर या पुस्तिकेत कमी आहे, पहिली ५२ पृष्ठे व ५३ वरील काही ओळी हा मजकूर खुद्द लेखकाच्या म्हणजे बळवंतराव मल्हारराव चिटणीस यांच्या हातचा असून पुढचे अक्षर विठ्ठलराव अमृत दिघे–चिटणीस यांच्या हातचे आहे. बळवंतराव मल्हारराव हे प्रसिद्ध पुरुषच होते. विठ्ठलराव दिघे या गृहस्थांचा उल्लेख 'भोसल्यांचे कुलाचार' या ऐतिहासिक प्रकरणात 'विठ्ठल अमृत कारकून निसबत चिटणीस यांनी विडे बांधवावे' असा येतो.[३] यावरून हे गृहस्थ बळवंतराव मल्हारराव यांच्या हाताखाली कारकून म्हणून असावे व बळवंतरावांच्या आज्ञेवरून त्यांनी शिळामुद्रणासाठी या पुस्तिकेचा उत्तरेभाग उतरून काढला असावा असे दिसते.

दुर्मिळ शिळाछाप मुद्रण

राजा प्रतापसिंह यांच्या प्रगतिशील उपक्रमाचा एक प्रत्यंतरपुरावाच या पुस्तिकेच्या रूपाने उपलब्ध झाला आहे असे म्हणता येईल. कै. अ. का. प्रियोळकर यांच्या 'The Printing Press in India' या ग्रंथात, दातेसूचीत किंवा सु. आ. गावस्करकृत 'मराठी दोलामुद्रिता'च्या यादीत या उपक्रमाचा उल्लेख नाही. एल्फिन्स्टन याने १८२२ साली मुंबईत छापलेले बालबोध 'पंचोपाख्यान' प्रतापसिंहासाठी खास पाठविलेले होते.[४] प्रतापसिंहाने 'सभारंजनी' सारखी पुस्तके छापून १८२७ पासून साताऱ्यास मुद्रणाचा उद्योग केला होता, असा उल्लेख प्रबोधनकार ठाकरे यांच्या 'रंगो बापूजी'मध्ये येतो.[५]

ह्या पुस्तिकेच्या कर्त्याविषयी–बळवंतराव चिटणिसाविषयी–अधिक माहिती मिळवीत असता सदर 'लेखी तसबिरी' शी तंतोतंत जुळणाऱ्या धुळ्याच्या हस्तलिखिताची माहिती पाहण्यात आली. मला उपलब्ध झालेल्या शिळामुद्रित

प्रतीत नसलेला दोन पृष्ठांचा मजकूर सदर हस्तलिखितात मिळेल, या कल्पनेने बरे वाटले. रामदासी संशोधन खं. १ ते ४ यांत दिलेली धुळ्याच्या श्रीसमर्थ वाग्देवतामंदिरातील हस्तलिखितांची सूची पाहिली, पण प्रस्तुत हस्तलिखिताचा उल्लेख मिळाला नाही. तेव्हा प्रत्यक्ष धुळ्यास जाऊन श्रीसमर्थ वाग्देवतामंदिरातील हस्तलिखिते धुंडाळली. सूचीखंडांत अंतर्भूत न झालेल्या हस्तलिखितांचे व कागदपत्रांचे कित्येक रुमाल मंदिरात आहेत. त्यात चिटणीसघराण्याची दोन दप्तरे आहेत. त्यांपैकी दप्तर क्र. १ मध्ये या 'लेखी तसविरी'चे हस्तलिखित आढळले. हे हस्तलिखित ६४ व्या पृष्ठावर 'वेव्हार निरनिराळा राखिला त्याजकडील कारभारी राजा–' या मजकुराने संपते. मला उपलब्ध झालेल्या शिळामुद्रित प्रतीत जो उपसंहारात्मक व कालनिर्देशात्मक मजकूर आहे, तोही मंदिरातील हस्तलिखितात नाही. शिळामुद्रित प्रतीचा प्रारंभ 'श्रीमलारीर्जयति' असा आहे, तर मंदिरातील हस्तलिखिताच्या शिरोभागी नुसतेच 'श्री' हे अक्षर आहे. शिळामुद्रिताचे लेखन पुस्तिकेचा कर्ता बळवंतराव मल्हारराव व विठ्ठल अमृत दिघे या दोघांनी केल्याचा निदर्शक असा–'येथपर्यंत आक्षर खुद बळवंतराव याचे' व 'येथून आक्षर विठ्ठल आमृत दिघे चिटणीस याचे आसे'–हा मजकूर मंदिरातील हस्तलिखितात नाही. ह्या 'लेखी तसविरी'च्या म्हणजे शब्दचित्राच्या कर्त्याचा, बळवंतरावाचा उल्लेख या पुस्तिकेच्या प्रारंभीच येतो, तो मात्र मंदिरातील हस्तलिखितात आहे. यावरूनही या पुस्तिकेचा कर्ता बळवंतराव मल्हारराव असावा व विठ्ठलराव अमृत दिघे हा उत्तरार्धाचा लेखनिक (कर्ता नव्हे) असावा हे स्पष्ट होते. एकंदरीत धुळे येथील श्रीसमर्थ वाग्देवतामंदिरातील हस्तलिखित हे मला उपलब्ध झालेल्या शिळामुद्रिताची मागाहून केलेली प्रत असावी, असे दिसते; कारण ६२ व ६३ पृष्ठे तिथेही कोरीच ठेवली आहेत. कर्त्याविषयी वाचक गोंधळात पडू नये याच हेतूने वरील हस्ताक्षरविषयक उल्लेख नकलकाराने तारतम्य राखून गाळलेले दिसतात.

कर्ता व चरित्रनायक यांचे जिव्हाळ्याचे संबंध

शिळापुस्तिकेत प्रारंभीच लेखक बळवंतराव मल्हारराव चिटणीस स्वतःचा स्पष्ट नामनिर्देश करतो. मराठ्यांच्या इतिहासात जी घराणी राष्ट्रकार्यासाठी प्राणपणाने झटली, त्यात चिटणीस घराण्याची प्रामुख्याने गणना होते. बाळाजी आवजी, खंडो बल्लाळ यांची कामगिरी सुविख्यातच आहे. पेशवाई व आंग्लाई यांच्या संधिकाळात होऊन गेलेला या घराण्यातला थोर पुरुष म्हणजे सुप्रसिद्ध बखरकार मल्हारराव रामराव चिटणीस. याचाच सुपुत्र प्रस्तुत पुस्तिकेचा कर्ता बळवंतराव होय. बाळाजी आवजी–खंडो बल्लाळ–जिवाजी खंडोजी–रामराव शिवाजी–मल्हार रामराव (मृ. १८२३)–बळवंत ऊर्फ नरहर मल्हार अशी या

कुळाची पुरुषपरंपरा 'चित्रे कुलवंशवृक्ष' या पुस्तिकेत आढळते.[६] या पुस्तिकेत अभिमुख चित्र (Frontis Piece) म्हणून बळवंतरावाचेच चित्र छापलेले असून त्याखाली 'पंडित सुमंत चिटणीस छत्रपती प्रतापसिंह महाराज, मृत्यु–सन १८४३' असा उल्लेख आहे. ग्रँट डफने आपला सुप्रसिद्ध मराठ्यांचा इतिहास मुख्यत्वेकरून चिटणिसांच्या बखरीवरून रचिला होता.[७] हा इतिहास रचताना सर्व प्रकारची माहिती ग्रँट डफला बळवंतराव चिटणिसांनी पुरवावी, अशी प्रतापसिंहाची आज्ञा होती व याविषयी राजाने त्याला पुढील कानमंत्रही दिला होता : 'जे पुसतील माहितगारी ते बखर दिल्ही या आधारावरच धरून बोलावे. जे पूर्वीपासून माहीत आहे ते असे आहे. मग तुमचे लिहिले असेल ते खरे म्हणावे. आग्रह करून कामाचा नाही व आग्रह करून सिद्ध करून फल होते असे नाही. होणार ते होईल.'[८] ग्रँट डफच्या इतिहासरचनेच्या पूर्वतयारीच्या काळात बळवंतराव चिटणीस व ग्रँट डफ यांच्यात झालेली कित्येक संभाषणे पेशवेदप्तरात पाहावयास सापडतात. आपल्या पूर्वजांप्रमाणेच बळवंतराव यांनी भोसलेघराण्याची चाकरी इमानेइतबारे बजावली. प्रतापसिंहाच्या कारकीर्दीत कायस्थांच्या बाबतीत जे कुप्रसिद्ध ग्रामण्य-प्रकरण उद्भवले, ते बळवंतराव चिटणिसांकडे झालेल्या पाद्यपूजेच्या व हव्यकव्याच्या संदर्भातच उद्भवले होते.[९] प्रतापसिंहावर इंग्रजांची खपामर्जी झाल्यावर स्वामिनिष्ठ बळवंतरावाची व त्याची सर्वप्रथम ताटातूट करण्यात आलेली होती.[१०] प्रतापसिंहाच्या अत्यंत विश्वासातील व्यक्तींपैकी बळवंतराव हा होता, यात शंका नाही. बळवंतरावाला उद्देशून लिहिलेल्या खुद्द प्रतापसिंहाच्या स्वदस्तुरच्या एका पत्रात बळवंतरावाच्या कामगिरीवर नेमका प्रकाश टाकलेला आहे. ते पत्र मुळातून उद्धृत करणेच योग्य ठरेल :–

गौरीनाथ वर प्राप्त शाहूराजात्मजन्मनः ।
मुद्रा प्रतापसिंहस्य भद्रा सर्वत्र राजते ॥

स्वस्ति श्री राज्यभिषेक शके १५३ व्ययनाम संवत्सरे जेष्ठ व॥ तृतीया गुरुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा प्रतापसिंह छत्रपति स्वामी याणी समस्त-राजकार्यलेखनधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री बळवंतराव मल्हार चिटणवीस यांसी आज्ञा केली ऐसीजे, तुमचे वडिलांनी कैलासवासी थोरले शिवाजी महाराज यांजपाशी राज्याभिवृद्धीचे कामी येऊन बहुत सेवा केली त्याजवरून तुम्हास अष्टप्रधानातील दरख देतो म्हटले असता चिटणीसी दरख आहे, हा व कारखानीसी व जमेनिसी तिन्ही धंदे वंशपरंपरेने वतनी करून दिल्हे. व कैलासवासी संभाजी-महाराज व राजारामसाहेब याजपाशी बहुत राजकारणी उपयोगी कामी येऊन जिवाभ्य श्रम केले व कैलासवासी थोरले शाहू महाराज यांजपाशी अनुकूल होऊन आज्ञेबरहुकूम सेवा केली व तुम्ही आमचे तीर्थरूप कैलासवासी शाहू महाराज

यांजपासी सेवा केली व आम्हांपाशी एकनिष्ठेने बाजीराव याची अडचण असता सरकारकडे लक्ष ठेवून इंग्रजाशी एक राजकारण करण्याची आज्ञा जहाली त्याजवरून राजकारण केले ते व बाजीराव इंग्रज यांची लढाई झाली तेव्हा खासा स्वारी लढाईत असता गर्दी समयी बाजीराव सोडोन उधळोन गेले. खासा स्वारी उभे राहिली. इंग्रजाकडील तुर्काची वगैरे गर्दी फार जाहली ते समयी तुम्ही जवळ असोन घोड्यावरून उडी टाकोन तुर्कांतील सरदार साहेबलोक धावून येत होते, त्याजकडे पुढे धाऊन जाऊन खासा स्वारी आहे हे नाव कळवून गर्दी करू नये असे केले. गर्दी फेर मना होऊन साहेब वगैरे यांच्या भेटी जाहल्या. ऐसी बहुत सक्तीची चाकरी स्वामी नजरेसमोर केलीत त्याजवरून स्वामी कृपाळू होऊन पूर्ववत प्रो. वंशपरंपरेने तिन्ही धंदे व चिटणिवीस अष्टप्रधानाचे बरोबरीचा रुतबाबचादर सुद्धा असा हे निशाण करार करून देऊन हे आज्ञापत्र सादर केले असे. तरी तुम्ही पूर्वीपासून चालत आल्याप्रमाणे तिन्ही धंदे अनुभवून चिटणीसी संबंधे इनाम आहे ते घेऊन सेवा करून सुखरूप असणे जाणिजेप्रमाणे करार असे. बहुत काय लिहिणे तरी सुज्ञ असा.

मोर्तब खुद्द.[११]

बळवंतरावाचे आणि प्रतापसिंहाचे संबंध कसे घनिष्ठ होते हे यावरून समजून येईल. अत्यंत महत्त्वाच्या प्रसंगी प्रतापसिंहाने बळवंतरावाचा सल्ला मानला व तो रावबाजीला न मिळता इंग्रजांना मिळाला. एवंच प्रतापसिंहाच्या निकटवर्तीय व्यक्तीकडून हे शब्दचित्र रेखाटले गेले आहे. 'आपणास लेखणी वरदी पुरुष व धणी याणी दिल्ही. या कर्माचे चितारी आपण. तेव्हा सर्व येकवच्छत् द्रिष्टीस येईल आसी तसवीर करावी ये विसी बुध्धिदाता खावंदाचे पाय.' अशी आपली प्रेरणा त्याने प्रारंभी अत्यंत भाविकपणे नोंदविली आहे.

पुस्तिकेचे अंतरंग

या पुस्तिकेला ऐतिहासिक, सामाजिक व भाषिक असे त्रिविध महत्त्व आहे. ही पुस्तिका प्रतापसिंहाच्या कारकीर्दीतील राजकीय घटनांची माहिती विशेष देत नाही. प्रतापसिंहाच्या अंगचे धैर्य सांगताना आष्टीवाळकीच्या लढाईचा उल्लेख येतो व न्यायदानातील सूक्ष्म बावी वगळून बाकीच्या आप्पासाहेबमहाराजांवर सोपविल्या होत्या असाही एक उल्लेख येतो. परंतु यात आलेल्या राजनैतिक घटना अत्यल्पच आहेत. हे काही प्रतापसिंहाचे चरित्र नव्हे. मात्र त्याच्या रूपगुणाची, न्यायी राज्यपद्धतीची, स्वभाववैशिष्ट्यांची नेमकी कल्पना देणारा हा दस्तैवजी पुरावा आहे. त्याची दिनचर्या तपशीलवार दिलेली असल्याने तत्कालीन राज-पुरुषांच्या कुलाचाराची व जीवनक्रमाचीही उत्तम माहिती या पुस्तिकेवरून होते.

शिवाय एकोणिसाव्या शतकाच्या प्रथमपादातील चिटणिशी लपेटीचा व मराठी गद्यशैलीचा एक नमुना म्हणूनही या पुस्तिकेला महत्त्व आहे.

लेखनहेतू : स्वामिनिष्ठा

या पुस्तिकेच्या लेखनाला व्यापून राहणारी, तीत ओतप्रोत भरून राहिलेली भावना म्हणजे स्वामिनिष्ठा ! राजा हा विष्णूचा अवतार, तो सेवकाला कदापी अंतर देत नाही, त्याचे गुणसंकीर्तन हा पापनिष्कृतीचा उपाय, अशी तत्कालीन राजनिष्ठांची धारणा होती. तत्कालीन सेव्यसेवकसंबंधात या निष्ठेचे मोल सर्वाधिक होते. या पुस्तिकेच्या रचनेमागील प्रेरणा स्वामिनिष्ठा हीच आहे. सेवकजन स्वामीची तसवीर चिताऱ्याकडून करवून जवळ बाळगतात, पण चित्र वा तसवीर ही एकपक्षी,–ती फक्त बाह्यरूप हुबेहूब दाखवते, तीमधून गुणदर्शन होत नाही, अशी चित्राची उणीव लेखकाने प्रारंभीच नमूद केली असून स्वतःसाठी व वंशजांसाठी स्वामीचे शब्दचित्र रेखाटणे हे स्वामीच्या पदरच्या सेवकजनाचे कर्तव्यच होय, असे स्पष्ट म्हटले आहे. सारांश, प्रतापसिंह हा ईश्वराची अपर प्रतिमा आणि लेखद्वारे त्याचे स्मरण हा स्वामिभक्तीचा आविष्कार हीच भावना या लेखनामागे आहे.

तेव्हा आत्यंतिक स्वामिनिष्ठेच्या खुणा या लेखनात सर्वत्र आढळतात यात नवल कसले ? उदाहरणार्थ, लेखकाने शरीरवर्णनाचा प्रारंभ पायापासून केलेला आहे. कारण स्वामीच्या 'पायासिवाय सेवकास दुसरे आश्रयस्थान नाही.' गुणांचे वर्णन करताना 'गुणसमुद्रच आहेत' असे म्हणून ज्ञानेश्वरांच्या काळापासून वहिवाटलेले सूर्य–काडवात, मक्षिका–गरुड, शेषाची वाणी यांचे ठरीव दाखले देऊन कविविनय प्रगट केला आहे व पुढे सवाल केला आहे, 'गुणसमुद्र आहे या भयाने उगे राहिल्यास पातकाची निष्कृती कशी होईल ?' राजाच्या अंगी सत्त्व–रज–तम हे त्रैगुण्य हवे. प्रतापसिंहाच्या ठायी ब्रह्मा–विष्णु–महेशांचे निर्मिती, पोषण आणि नाश करणारे त्रैगुण्य पुरेपूर एकवटले होते अशी लेखकाची ग्वाही आहे. मात्र 'ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी' असे जे पक्षपाती लिखाण आढळते त्याने निवेदनाचा तोल ढळतो. प्रतापसिंह हा कितीही गुणी, प्रजाहितदक्ष आणि न्यायी राजा असला, तरी त्याची शिवाजीमहाराजांशी कदापीही तुलना होण्याजोगी नाही. सह्याद्रीत स्वतंत्र वज्रवृत्तीने विहार करणाऱ्या वाघाची आणि परक्यांच्या ताटाखालच्या अगतिक मांजराची कधीतरी बरोबरी होईल काय ? शिवाजी महाराज अवतारी खरे, पण त्यांना 'कार्यसाधनकर्तेपणाची आस्था' पुरी करता आली नाही, ध्येय गाठता आले नाही. ते अपुरे ध्येय पूर्ण करण्यासाठी '२७ पिढ्यांचा वर्दी पुरुष' प्रतापसिंह अवतरला आहे, अशी लेखक जी प्रशंसा करतो ती स्वामिनिष्ठेच्या अंधत्वाचीच द्योतक म्हटली पाहिजे. सामान्यतः गेलेले राज्य

परत मिळत नाही, मोडलेली राजधानी पुन्हा वैभवाने वसत नाही; पण पेशव्यांकडे गेलेली राजसत्ता आणि शाहूनगरीचे गतवैभव पुन्हा प्रस्थापित झाले, त्यात लेखकाने कृतकृत्यता मानली आहे. एवढेच नव्हे, तर प्रतापसिंह हा अलौकिक दैववान आणि अवतारी होता हे त्याचे कारण होय, असे लेखकाने म्हटले आहे.

तरीही यथातथ्यतेकडे कल

रूपवर्णनात वास्तवाची बूज राखण्याचा प्रयत्न दिसतो, तिचेही बीज स्वामिभक्तीतच गवसणारे आहे. या वर्णनातील अवयवविषयक शब्द संस्कृत आहेत, तसेच वृषभ–वशंडाप्रमाणे स्कंध व नेत्रातील आरक्त रेषा यांचा खास राजचिन्हे म्हणून उल्लेखही संस्कृत धर्तीवरच आहे. तरीपण या वर्णनात सांकेतिकते-पेक्षा सत्यचित्रणाचीच दृष्टी आहे. प्रतापसिंहाचा ठेंगूपणा ' वामनमूर्ती ' म्हणून सांगितला आहे, मुखावरील देवीचे वणसुद्धा उल्लेखिलेले आहेत. त्याच्या पायातले व्यंग तर तपशीलवार सांगितले आहे. अशा तऱ्हेचे वारकाव्याचे वर्णन निकटची व्यक्तीच करू शकेल. ग्रँट डफ आणि बळवंतराव यांच्यांत इतिहासलेखनाच्या पूर्वतयारीच्या निमित्ताने ज्या भेटी झाल्या त्यांपैकी एकीत प्रतापसिंहाला झालेल्या अपघातासंबंधी विषय निघालेला होता. ग्रँट डफने बळवंतरावाला विनोदाने पुढील आशयाचा प्रश्न विचारला, ' प्रतापसिंहाच्या पूर्वजांचा घोडा पडला तो तुमच्या पूर्वजाने ओढून काढला होता, तसा या अपघाताच्या वेळी तुम्ही का काढला नाही ?' त्यावर बळवंतरावांनी उत्तर दिले, ' आम्ही जवळ नव्हतो. ' संभाषण प्रतापसिंहाच्या रोजनिशीत ७–७–१८१९ या तारखेवर नोंदलेले असून त्याखाली ' या संभाषणाच्याआधी पंधरा दिवसांपूर्वी प्रतापसिंह महाराजांचा घोडा पडल्यामुळे त्यांचा पाय दुखावला होता त्याला अनुलक्षून हा विनोद केला आहे ' अशी टीप आहे.[१२] एकंदरीत रूपवर्णनात यथातथ्यतेकडेच कल दिसून येतो.

ऐतिहासिक घटितांचे तुरळक निर्देश

प्रतापसिंहाच्या ठायी विद्या, शास्त्रज्ञान असावे अशी स्थिती नव्हती; पण तो ' आवतारी ' असल्याने त्याच्या ' पूर्वजन्मीचा विद्यागुण फळास येऊन उभा राहिला ' अशी लेखकाची समजूत आहे. रावबाजीने विद्याभ्यास न व्हावा असेच वातावरण मुद्दाम ठेवले होते, असे जे लेखक म्हणतो त्याला ऐतिहासिक आधार मिळतो. ' महाराज लिहितात की नाही ?' या ग्रँट डफच्या प्रश्नावर विठोबाने उत्तर दिले होते, ' लिहितात, परंतु कारकुनासारखे आत्ताच आज कसे होईल ? कारण बाजीराव यानी काही एक विद्या सिको दिली नाही.'[१३] औदार्य आणि दानधर्म या बाबतीत हात आखडता असण्याविषयी प्रतापसिंहाचा बभ्रा असावा. त्याचे निराकरण आणि त्याच्या तद्विषयक धोरणाचे योग्य समर्थन लेखकाने युक्तिसंगत रीतीने केले

आहे. मऊ सापडले की कोपरापासून खणण्याची याचकांची पूर्वापार वृत्ती सांगून कर्णादी दानशूर औदार्यातिरेकाने कसे गोत्यात आले, ते त्याने चांगले स्पष्ट केले आहे. बहुधा पेशवाईतील ग्रामण्यप्रकरणांमुळे पेशवाई कारभारावर कायस्थमंडळींचा रास्त राग असतो. ब्राह्मण पेशव्यांच्या कारकीर्दीत 'राजनीत' सुटली, इत्यादी अभिप्रायात त्याचा पडसाद उमटलेला दिसतो. खुद्द लेखकाचे वरेच वतन रावबाजीने खालसा केलेले होते. रावबाजीच्या चारित्र्यहीनतेचे तसेच अनागोंदी, अपात्री दानाचे विरोधी चित्र लेखकाने नेमके उभे केलेले आहे. तो म्हणतो, 'भोजनदानविधी तोही आपरमित. त्यात ब्राह्मण गलबल; कोणाचे कुटुंब कोणी आपले म्हणाले हा विचार दंपत्यभोजनात राहिला नाही.' हे बारकाव्याचे वर्णन लेखकाच्या मार्मिक दृष्टीचे आणि त्यांच्या माहितगारीचे निदर्शक आहे. प्रतापसिंहाच्या दानविषयक मितव्ययाचे कारणही त्याने नेटकेपणाने सांगितले आहे. 'कर्जभरी होऊन राज्य थोडे आहे ते पुन्हा गलथीत न यावे हा विचार मनी आणून क्रम चालला. परंतु ईश्वर इच्छा! सर्व ठिकाणे मोठी संवस्थाने जाऊन येथील नाव मात्र या जाभ्याचे राहिले. यात सर्वास सर्व संगोपन कसे होईल? एकटा कोठवर पुरेल?' या बावतीत इतिहासज्ञांचा निर्वाळा लेखकाच्या अभिप्रायाशी मिळताजुळता आहे. डॉ. चोक्सी यांनी म्हटले आहे–

'So well did the Raja take to Administration, in spite of his very limited experience, that for the next thirty years the state was never involved in any pecuniary difficulties. In the famine of 1824 the Prince set an example of personal economy... His revenue settlement compared favourably when all others failed elsewhere.'[१४] प्रतापसिंहाला व्यसन कसलेच नव्हते, फक्त 'घोड्याविसी ईष्क व छंद' असे लेखकाने सांगितले आहे, हे सत्यकथनच आहे. आपल्या राज्यात चांगल्या जातीच्या घोड्यांची पैदास व्हावी, असे प्रतापसिंहाचे प्रयत्न असत. एतत्संबंधीचा एक जाहीरनामाही उपलब्ध झालेला आहे.[१५] आष्टी–वाळकीच्या लढाईचा प्रसंग (२२ फेब्रु. १८१८) प्रतापसिंहाच्या शूरपणाचे उदाहरण म्हणून लेखकाने दिला आहे. वर जे प्रतापसिंहाचे पत्र उद्धृत केले आहे, त्यातला यासंबंधीचा उल्लेख स्पष्टच आहे. मातुश्रीची अप्रतिष्ठा टाळण्यासाठी प्रतापसिंह तिला मारण्यास उद्युक्त होतो, हा प्रसंग प्रतापसिंहाचा रजपूतपद्धतीचा बाणेदारपणा दर्शवितो. श्रीमंत आप्पामहाराज हयांच्याकडे 'बंदीवान, चोर, खुनी अगर गैरशिस्त' यांच्या चौकशीचे काम होते, हा उल्लेख इतिहासाला धरून आहे. जॉन ब्रिग्जने सातारा सोडताना १–१–१८२७ रोजी जे प्रतिवृत्त लिहिलेले आहे, त्यात अशाच स्वरूपाचा उल्लेख आढळतो.[१६] शाहू महाराजाच्या हस्ताक्षरातली एक 'रुक्मिणी

स्वयंवरा'ची पोथी प्रतापसिंहाच्या देवघरात असल्याची माहिती मिळते. सेवकाने चांगली कामगिरी बजावल्यास बोरमाळ, ताडपत्री, पासोडी अशी बक्षिसे देण्याची पूर्वी प्रथा होती, हे कळून येते.

'माणूस हीच दौलत' मानणाऱ्या प्रतापसिंहाची लोकसंग्रहाची खास पद्धत होती. माणसे तयार करणे, तयार झालेली माणसे राखणे, दुरावलेली जोडून घेणे या बाबतीतले त्याचे धोरण लेखकाने डौलदार शैलीत कथन केले आहे :

'कारण समजुतीत की माणूस लौकर बनत नाही. बनण्यास फार श्रम व श्रमानी बनविले तरी त्याचे पूर्वजन्मांतर व या जन्मकाळचा गुण व काही ग्रह उत्तम असावे तेव्हा बनते. माणूस हीच दौलत. कोणत्या प्रसंगी कसा उपयोग पडतो व राजकर्त्यास प्रसंग नाही असे कदापि व्हावयाचे नाही. वेर्थ कारणी मनुष्य खर्चू नये. समयपरत्वे खर्च केल्यास उपयोग काहीतरी बनून येईल. कारणप्रसंगी त्याची आठवण होईल. मनुष्य हे उगेच बाजारचा जिनस नव्हे. हा मिळावयाचा नाही व बाजारि जिनसाचा उपयोग पडत नाही. सबब दीर्घद्रिष्ट देऊन राखण राखितात, हा मोठा समज राजगुणाचा आहे व मनुशास परस्परे स्पर्धा आहे वगैरे हे न कळू देता सख्यत्वाची तजवीज ठेऊन वाघ व बकरी येके ठिकाणी पाणी पाजणे हा गुण या राज्यात आहे तो किती लिहावा !'

चिटणीशी शैलीचे विशेष

मनातले इंगित नेमके व्यक्त करण्यास चिटणीशी शैली उणी पडत नाही, हे अशा उताऱ्यावरून उघड दिसेल. विशेषतः 'व्यक्तिचित्र' या लेखनप्रकारासाठी 'लेखी तसबीर' प्रथमतःच योजिलेली शब्दसंहती अन्वर्थक वाटावी. अवश्य तो, बहुश्रुतपणाचा ढंगही त्या शैलीत आहे. या छोटयाशा प्रकरणात 'ददामि बुद्धियोगं तं' 'स चिंतयत्' इत्यादी पाच संस्कृत वचने आलेली आहेत व संस्कृत ग्रंथातले शेष, कर्ण, परशुराम, वामन इत्यादींचे दाखले आलेले आहेत. पण बहुश्रुतपणाने मुद्याचा विस्तार करताना अपेक्षित शृंखलाबद्धता व सयुक्तिकता नेहमीच आढळेल असे नाही. समर्थनार्थ योजलेली सुभाषिते व दाखले यांचा प्रतिपाद्य विषयाशी वादरायणसंबंधाहून किंचित् अधिक संबंध येथे असतो, इतकेच ! शरीराचा 'वर्ण' सांगायचा असतो, तेव्हा 'वर्ण' शब्दाचे दोन अर्थ ध्यानात घेऊन लेखक म्हणतो, 'मुख्य ज्ञातिवर्ण तो क्षत्रियकुलावतंस. शरीरवर्ण तो गौर आहे.' एक प्रकारे हे हरदासी तऱ्हेचे कोटित्व आहे. अशी पौराणिक पद्धतीने विषय-विस्तार करण्याची पद्धत हे चिटणीशी शैलीचे वैशिष्टयच म्हणता येईल. लेखकाला शरीरवर्णन करायचे आहे. तेव्हा पायापासूनच प्रारंभ का करावा, हे सांगताना पाय या शरीरावयवावरून त्याला इमारतीचा पाया आठवतो. मग

'स चिंतयत् भगवतश्चरणारविंदं' हे संस्कृत वचन येते. दुर्योधन–अर्जुन हे कृष्णाच्या अनुक्रमे उशा–पायथ्याशी बसले व पायाकडे बसलेल्या अर्जुनाचे काम साधले, ही भारतातील कथा येते. गंगा विष्णूच्या चरणी वास करते हेही सांगितले जाते. हे सारे चरणमाहात्म्य स्वामिनिष्ठेतून कथन केले गेले, तरी ते औचित्याच्या दृष्टीने चपखल व युक्तिसंगत आहेच असे नाही. 'गुणसमुद्रच आहे' असे म्हणून 'सागरः सर्व तीर्थाणि' 'ना विष्णुः पृथ्वीपती' ही संस्कृत सुभाषिते, शेषाचा दाखला, सूर्य–काडवात, गरुड–मशक यांचे दृष्टान्त यांनी गुणांची अवर्णनीयता ठसविणारे जे निरूपण केले आहे, त्याची तऱ्हासुद्धा बखरींना वाट पुसणारी पौराणिक पठडीतलीच आहे, तेथे अनौचित्याचा भाग मात्र एकूण कमी आहे. शरीरावयवांचे शब्द ग्रीवा, मुख, नासिक असे तत्सम आहेत. त्याच्या वर्णनात सिंहकटिवत्, गजशुंडवत्, वृषभवर्शिडाप्रमाणे, कमलनेत्रवत्, शुकवत्, असे संस्कृतप्रचुर उपमानशब्द आले आहेत. आग्रसुद्धा (टोकसुद्धा), वालाग्र न सोसणे, उरू यथास्थित, केश (केस) कमी, कारणीक (कामाचे), शरीरपाटव्य, ऋतुदेशकाल, विविक्षा–विचार–प्रश्न–उत्तर, रंग–संग–ढंग, असे संस्कृताच्या अंगाने जाणारे वाक्प्रयोग भाषेला प्रौढी आणताना दिसतात. संस्कृत, फारशी आणि मराठी शब्द मांडीला मांडी लावून बसताना एका वाक्यातही आढळतात. उदा.–

१. संभूति न हूति येविशी फार अंदेशा आहे.

२. डोळे मोठे जबरा कमळनेत्रवत् आहेत.

३. हरएक कसबी कामात नजर मोठी स्वल्पात होऊन.....

केवळ संस्कृत शब्दांची दाटीवाटीही कधी कधी विचित्र वाटते. उदा.–'पीत शुभ्र मिश्रित नाही, आरक्त शुभ्र मिश्रित आहे' 'एकत्र,' एकाच वेळी' या अर्थी–दोनदा योजलेला 'येकवळत्' हा शब्दप्रयोग 'एकसमयावच्छेदेकरून' व 'एकछत्रवत्' या दोन वाक्प्रचारांच्या घोटाळ्यातून निर्माण झालेला दिसतो. राज्यकारभारविषयक शब्द तत्कालीन गद्यात फारशीमयच आढळतात.

पूर्वीच्या काळी पद्धतशीर शिक्षण फक्त संस्कृत भाषेचे होत असे. मराठी लेखन परंपरेने नि सवयीने अंगवळणी पडत असे. तभ्दव शब्दांच्या लेखनात एकविधतेपेक्षा धरसोड अधिक. मोडी लेखनात अनुस्वारांना प्रायः फाटा दिलेला असतो. तोही प्रकार या लेखनात दिसतो. चिटणिशी शैलीचा ठळक विशेष म्हणजे क्रियापदांना दिलेली छाट. यामुळे सुटसुटीतपणा येतोच; पण बहुधा अर्थगर्भ शब्दाला अती मोहोरबंद केल्याने विधानार्थ ठाशीवपणे बिंबतो. उदा.(१) या कर्माचे चितारी आपण. (२) बुद्धिदाता खावंदाचे पाय. (३) जिद्दी प्रकृत (४) ते हे बोबडे बोल. (५) कोणी आला तरी मुक्त द्वार. (६) हे मनात आणणे ती वेळ मुष्किलीची. (७) इमारत रचणे तरी पाया मजबूत व मसलत तरी पाया खंबीर. (८) शेषाची

मती कुंठीत. एकंदरीत एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात चिटणिशी लपेट कशी डौलदार होती, त्याचे प्रत्यंतर या छोटेखानी पुस्तिकेवरूनही पटते.

तिहेरी महत्त्व

राजा प्रतापसिंहाची ही 'लेखी तसबीर' किंवा आजच्या भाषेत व्यक्तिचित्र आहे. त्यात त्याच्या चेहऱ्याचे, एकंदर शारीरिक ठेवणीचे बारकाईचे वर्णन आहे. शिवाय त्यात लेखनवाचनादी अभ्यास, अश्वपरीक्षा, अश्वारोहण, गायनवादन, रोगपरीक्षा, शौर्य, आतिथ्य, राज्यकारभारकौशल्य, न्यायप्रियता, निर्व्यसनीपणा, माणसाची पारख इ. प्रतापसिंहाच्या अंगच्या गुणांचे सविस्तर वर्णन आहे. येथवर या सर्व वर्णनातील काही बारकावे तसेच ऐतिहासिक स्वरूपाची विविध अंगे आपण पाहिली. वाङ्मयीन गुणांपेक्षा ऐतिहासिक अधिकृततेमुळे या पुस्तिकेचे मोल मोठे आहे. दोन पृष्ठांची उणीव सोडली, तर प्रत्यंतर–पुराव्याच्या कसोटीवर पूर्ण उतरणारे असे हे लेखन आहे. स्थल–काल–कर्ता इ. निर्देशावावत संदिग्धतेला येथे वाव नाही. मोडी लेखन सुवाच्य व सफाईदार असल्याने थोडाशा प्रयत्नाने त्याचे नागरीकरण करता आले. वाचनात फटी राहिलेल्या नाहीत. लेखनकाल तर शक, शिवशक, फारशीशक व इंग्रजी सन असा चतुर्विध दिलेला आहे. बखरीसारखा येथे सांगोवांगीचा प्रकार नाही. शब्दचित्राचा नायक आणि लेखक यांचा सेव्यसेवकसंबंध साक्षात होता. बखरकार घराण्यातील पिढीजाद लेखक असल्याने याची निवेदन-शैली व भाषाविशेष यांचे नाते जुन्या बखरींच्या भाषेशी जुळते. अशी शैली पौराणिक वा हरदासी पद्धतीने अघळपघळ विषयविस्तार करणारी असते. तरीसुद्धा या आटोपशीर शब्दचित्रात मुद्देसूदपणा आहे. स्वामिनिष्ठा हाच लेखनहेतू असल्यामुळे चरित्रनायकाच्या माहात्म्यवर्णनाकडे कल आहे. सांकेतिकतेच्या आहारी जाऊन तारतम्य सुटले, असा प्रकार क्वचित झालेला असला, तरी स्वामिनिष्ठेपोटीच मूळ मूर्तीला धका न लावण्याची कर्तव्यभावनाही जागृत राहिलेली आहे. प्रारंभी म्हटल्याप्रमाणे या पुस्तिकेचे महत्त्व तिहेरी आहे. तिच्यामुळे ऐतिहासिक माहिती मिळते, ही एक गोष्ट; १९ व्या शतकाच्या प्रथमपादातील मराठी भाषेची ठेवण कळण्याला हा गद्याचा नमुना उपयुक्त ठरणारा आहे, ही दुसरी गोष्ट, आणि व्यक्तिचित्ररेखाटनाचा जुना प्रयत्न म्हणूनही त्याला एक खास महत्त्व आहे.

संदर्भ

१. **प्रभाकर**, पुस्तक ६ कागद २ मुंबई, रविवार ता. ३१ वी अक्टोंबर १८४७ पृ. २५०२–०३.

२. गो. रा. गोगटे, 'बोरगावचे चिटणीस घराणे', **रामदास आणि रामदासी**, व. २५, अं. २९४ (कार्तिक शु. १३ श. १८६८), पृ. ८.

३. 'भोसल्यांचे कुलाचार', संपा. द. ब. पारसनीस, **इतिहाससंग्रह**, अं. ७–९ (फेब्रु.–एप्रिल १९१५), पृ. ८.

४. **पेशवे दप्तरातून निवडलेले कागद** (पेद.), खं. ४२, संपा. गो. स. सरदेसाई, मुंबई १९३४, पृ. ५२.

५. के. सी. ठाकरे, **प्रतापसिंह व रंगो बापूजी**, मुंबई १९४८, पृ. ८०–८३.

६. वा. स. कुलकर्णी, **चित्रे-कुल-वंशवृक्ष,** मुंबई १९२६, पृं. ४०–४२.

७. अ. रा. कुलकर्णी, **जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ,** पुणे १९७१ पृ. १२८.

८. **पेद**. खं. ४२, पृ. २६.

९. **ऐतिहासिक जुने लेख, पु.** ३, संपा. वा. स. कुलकर्णी, मुंबई १९२०, पृ. १६–४७.

१०. बी. डी. बसू, **स्टोरी ऑफ सातारा**, कलकत्ता १९२२, पृ. १२७.

११. वा. स. कुलकर्णी, **पूर्वोक्त**, पृ. २४–२५.

१२. **पेद, खं. ४२ पृ.** १७.

१३. **तत्रैव**, पृ. १०–११.

१४. आर. डी. चोक्सी, 'प्रीफेस', **राजा प्रतापसिंह ऑफ सातारा,** १८१८–१८३९, पुणे १९७०, पृ. ४.

१५. **इतिहाससंग्रह**, अं. ४–६, (नोव्हेंबर १९१५) पृ. ३५–३६.

१६. आर. डी. चोक्सी, **पूर्वोक्त**, पृ. ११८.

३. गुजराती–मराठी संबंध

इंग्रजपूर्व काळात भारतात राष्ट्रीय एकता कितपत नांदत होती, हा प्रश्न जरी थोडा वादग्रस्त असला, तरी सांस्कृतिक एकतेचा भारतीय वारसा तसा खूपच प्राचीन आहे. 'गंगे च यमुने चैव गोदावरी सरस्वती' इ. आपले नित्याचे लोकमातांचे प्रातःस्मरण शतकानुशतके घरोघर घुमत आलेले आहे. भारताच्या सांस्कृतिक एकतेचे ते जणू एक प्रतीकच मानता येईल. आता भाषावार प्रांतरचना झालेली असली, तरी हे एकात्मतेचे सांस्कृतिक अंतःसूत्र जोवर अतूट आहे, तोवर भारतीय ऐक्य अभंगच राहील, अशी आशा करावयास हरकत नाही.

त्यातल्या त्यात गुजरात आणि महाराष्ट्र या दोन प्रदेशांना तर नैसर्गिक स्नेहरज्जूंनीच बांधून ठेवलेले आहे. या उभय प्रदेशांत भूविषयक सलगता आहेच; शिवाय एकाच समुद्रवसनानेही त्यांना वेढिलेले आहे. तसे पाहिले तर या प्रदेशातील समाजमनांचा स्वाभाविक कल भिन्न आहे. गुजराती लोकांची प्रवृत्ती व्यापाराकडे, तर मराठी लोक प्रायः नोकरपेशे आहेत. असा स्वभावभेद असूनही उभय समाजांच्या या भिन्न प्रवृत्ती परस्परपूरकच ठरलेल्या दिसतात. त्यामुळे व्यापाराचे बाळकडू प्यालेली साहसी पण इतरांशी जमवून घेण्यात चतुर असणारी गुजराती जमात महाराष्ट्राच्या अंतर्भागात, अगदी खेड्यापाड्यांपर्यंत पोहोचलेली

आहे. रायगडच्या परिसरात जुन्या काळी स्थायिक झालेली गुजराती मंडळी अगदी महाराष्ट्रमय झालेली दिसून येते. महाराष्ट्रीयांचा गुजरातेत प्रवेश झाला, तो मुसलमानी आक्रमकांना तोंड देण्याच्या निमित्ताने. इंग्रजांनी सुरतेत वखार घातल्यानंतर (स. १६००) मुंबईत इंग्रजी शिकून तयार झालेले कारकुनी व शिक्षकी पेशाचे महाराष्ट्रीय गुजरातेत स्थायिक झालेले आढळतात. अहमदाबादला कापडाच्या गिरण्या निघाल्यावर तेथे गेलेला मराठी कामगारवर्ग असाच स्थायिक झालेला दिसेल.

सतराव्या शतकात पश्चिम भारताची व्यापारी उतारपेठच मुळी सुरत होती; मुंबई नव्हती. इ. स. १८२९ सालच्या एका पाठ्यपुस्तकात सुरतेची लोकसंख्या तीन लाख, तर मुंबईची दोन लाख चाळीस हजार असल्याची नोंद आढळते.[१] तेथे काही काळ मराठ्यांचा वकील केसोराम म्हणून होता; पण त्याच्या जागी स. १६७६ मध्ये सुंदरजी परभूची नेमणूक झाली. तेव्हापासून तेथील व्यापारी पेढ्यांवरील कारकून म्हणून बहुधा मुंबईत इंग्रजी भाषा शिकून तयार झालेले पाठारे प्रभू तिकडे गेले आणि स्थायिक झाले. मराठी प्रसिद्ध व्याकरणकार दादोबा पांडुरंग हे १८४२ साली सुरतेच्या इंग्रजी शाळेचे प्रभारी मुख्यशिक्षक म्हणून बदली होऊन गेले, तेव्हा त्यांना तेथे स्थायिक झालेली पाठारे प्रभू मंडळी आढळून आली. दादोबांनी म्हटले आहे, 'एथें नवी इंग्रेजी झाली तेव्हापासून या शहरात मुंबईचे काही परभु वस्ती करून राहिले आहेत. पूर्वी ते त्या वेळच्या इंग्रजी अमलांत बरेच अधिकारी होते व त्यांहीं बराच पैका गोळा केला होता. त्यांची, मी गेलों तेव्हां, सुरतेंत दहाबारा घरें होती. त्यांची एथें जन्मभाषा बदलून गुजराथी भाषा झाली आहे. घरीं बायकापोरांसुद्धां गुजराथीत बोलतात. कित्येकांस मराठी येतच नाहीं.'[२]

श्रीचक्रधरांचे मराठी-प्रेम

या उभय प्रदेशांतील सांस्कृतिक आदानप्रदान खरोखरच लक्षणीय ठरण्याजोगे आहे. मराठी भाषेचा साहित्यसंसार सामान्यतः महानुभाव पंथाच्या साहित्यनिर्मितीपासून चालतानांदता झाला. या महानुभाव पंथाचे संस्थापक श्रीचक्रधरस्वामी यांची जन्मभूमी गुजरात; पण कर्मभूमी महाराष्ट्र. ते जन्माने गुजराती; पण मनाने महाराष्ट्राशी समरस झालेले, 'महाराष्ट्री असावे'[३] असे म्हणणारे. जनसामान्यांच्या मराठी भाषेविषयी त्यांना अभिमान होता. त्यांच्या शिष्यप्रशिष्यांपैकी एक प्रमुख कवी केसोवास यांनी 'रत्नमाला' स्तोत्र संस्कृतात रचल्यावर 'उद्धरण' हेही संस्कृतात रचण्याची मनीषा धरली होती, तेव्हा चक्रधरस्वामींची आज्ञा ध्यानात घेऊन त्यांचे चक्रधरशिष्य नागदेवाचार्य यांनी केसोवासांच्या बेतात मोडता घालताना सांगितले, 'नको गा केशवदेया : येणें माझिया म्हांतारिया

नागवतिल :'[४] एकदा केसोबासांनी नागदेवांना संस्कृतात प्रश्न केला, त्या वेळी ते म्हणाले, 'पंडिता : केशवदेया : तुमचा 'अस्मात् कस्मात्' मी नेणें गा : मज श्रीचक्रधरे निरूपिली मन्हाटीं : तियाचि पुसा...'[५]

बडोदे : संगमाचे स्थान

नामवंत मराठी संतकवींनी गुजराती भाषेत केलेली रचना उपलब्ध नसली, तरी नामदेवाने गुर्जर संतकवी नरसी मेहता यांचे चरित्र गायिलेले आहे.[६] नामदेवादी संतांच्या धर्तीवर गुजरातचे सर्वश्रेष्ठ संतकवी नरसी मेहता (१४१४–१४८१) यांनी गुजरातीत अभंगरचना केलेली असून त्यांच्या कवनांत 'विठ्ठल' व 'विठोबा' हे नामाभिधान 'कृष्णा' ऐवजी योजलेले आढळून येते.[७] बडोदा संस्थानच्या आसपासचा टापू मराठ्यांच्या छत्राखाली आल्यानंतर गुजराती भाषेशी मराठी लोकांचा विशेष संबंध आला. डभोईचा सुप्रसिद्ध गुर्जरकवी दयाराम (१८३३–१९०८) याच्या काव्यसंग्रहात तीनचार मराठी पदे व एक लावणी आढळते.[८] दयाराम 'दक्षिणी मिजलसोमां मराटी पदो बनावीने गाता.'–विशेषतः दयारामची 'पाहावें भाग्य नरसी मेहतांचें' आणि 'श्रीकृष्ण गोविंद म्हणा मिळोनी वैष्णववृंदें...' यांसारखी पदे मराठी भजनी मंडळीत विशेष लोकप्रिय झालेली असावी.[९] अवधूतनाथ नामक एका साधूची मराठी शिष्या राधाबाई हिची हिंदी, गुजराती आणि मराठी अशी त्रिविध रचना उपलब्ध होते. श्रीकृष्ण, दत्त, गणेश, शंकर या दैवतांची व ज्ञानेश्वर–तुकारामादी संतांची स्तुतिस्तोत्रे तिने गुजरातीत रचली आहेत. कृष्णबाललीला, कृष्णविवाह, कंसवध, मुचकुंदमोक्ष, मीरामाहात्म्य अशी तिची दीर्घ काव्ये आहेत; तसेच तिने गुजराती गर्बेही अनेक रचलेले असून ते बडोद्याच्या परिसरात आवडीने गायिले जातात. ती आपल्या रचनेत गुरूंचे–अवधूतनाथांचे–नाव गोवते. तिच्या गुजराती कवनात मराठी व हिंदी शब्दांचे मोठ्या प्रमाणात मिश्रण आहे. स. १८९५ च्या सुमारास या कवयित्रीचे निधन झाले असावे.[१०] बापूसाहेब गायकवाड (१७७९–१८४३) यांची गुजराती रचना उपलब्ध होते. या मराठी कवीला धीरा आणि निरांत यांचा उपदेश लाभलेला होता. पदे, गर्बे, राजिया अशी विपुल गुजराती रचना त्यांनी केलेली आहे, रचनेचा मुख्य विषय ब्रह्मानुभव आणि वैराग्योपदेश हा आहे. 'विष्णु विस्मिल्लामां भेद नथी भाव्यो अल्ला अलख अकेलाहीए रे' अशा त्यांच्या शिकवणीवरून कबीरवाणीची स्मृती व्हावी. मराठी असूनही त्यांनी गुजराती लोकबोलीत शुद्ध रचना केलेली आहे, असा निर्वाळा गुजराती साहित्येतिहासकार देतात.[११] एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस आणि विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात श्रीमंत सयाजीरावांच्या राजवटीत गुजराती आणि मराठी या उभय भाषांच्या अभिवृद्धीसाठी जे लक्षणीय प्रयत्न झाले, ते प्रसिद्धच आहेत.

उभय जमातींची स्वभावभिन्नता

सतराव्या शतकाच्या पूर्वार्धात अस्मानी सुलतानीच्या फेऱ्यामुळे सुरतेचे गुजराती आणि पार्शी व्यापारी स्थलांतर करून हळूहळू मुंबईला येऊ लागले. पोर्तुगीजांकडून आंदण म्हणून मुंबई इंग्रजांकडे आल्यावर तिची प्रगती होऊ लागली होती. स. १६७७ मध्ये आँजियर या मुंबईच्या गव्हर्नराने धर्मस्वातंत्र्याचे धोरण जाहीर केल्यामुळे मुस्लिम राज्यकर्त्यांच्या जुलमाला कंटाळलेले बनिये मुंबईत आले. मुंबई ही व्यापारदृष्ट्याच नव्हे, तर सर्वच दृष्टींनी सुरतेच्या कानामागून येऊन तिखट बनली. मुंबई नगरीची भाषा प्रामुख्याने मराठी होती; शिवाय स. १८१८ मध्ये पेशवाई संपुष्टात येताच इंग्रजांच्या छत्राखाली आलेल्या फार विस्तृत मराठी भाषिक प्रदेशातून तेथे आणखीही मराठी लोक मोठ्या प्रमाणात आले. एल्फिन्स्टन-साहेबाने सार्वत्रिक शिक्षणाचा उपक्रम सुरू केला. नेटिव एज्युकेशन सोसायटी, तसेच 'हैंद शाळा शाळापुस्तक मंडळी' (१८२२) या संस्था स्थापन झाल्या. मराठी, गुजराती, उर्दू, इंग्रजी या चार भाषांच्या माध्यमांतून राजाश्रयाखाली नवी शिक्षण-व्यवस्था अस्तित्वात आली. प्रारंभीच्या काळात गुजराती, पार्शी जमातीने इंग्रजी शिक्षणाचा विशेष लाभ उठविला; त्या मानाने गुजराती हिंदू बनिये शिक्षणाबाबत उदासीन असत. कामचलाऊ लेखनवाचन, हिशेबठिशेब करता आले की त्यांचे व्यावहारिक काम भागे. १८५५ साली प्रो. रीड यांनी मुंबईच्या शिक्षणक्षेत्राची सांख्यिकी पाहणी केली होती.[१२] तीमध्ये एल्फिन्स्टन इन्स्टिटचूटमधून शिकून तयार झालेल्या हिंदू गुजराती लोकांची संख्या जवळजवळ नव्हतीच. रीडसाहेबाने याचे कारण असे दिले होते की, गुजराती हिंदू व्यापारी मुंबईत सहकुटुंब राहात नाहीत, त्यामुळे शाळांतून त्यांच्या मुलांची संख्या कमी असते; मुलींची संख्या तर अगदी अत्यल्प असते. 'गुजराती लोक आणि मराठी लोक यांची तुलना' या विषयावर त्या काळी एक लेख प्रसिद्ध झाला होता; तो या उभय जमातींच्या वृत्तिप्रवृत्तींवर प्रकाश टाकणारा असून आजही बहुतांशी यथार्थ वाटावा. गुजरात्यांचा व्यापाऱ्याकडे आणि मराठ्यांचा नोकरीकडे कल असतो, असे सांगून त्यात म्हटले होते : 'सरासरीच्या मानाने पाहिले असतां सांप्रत मराठे लोकांपेक्षां गुजराथी लोक अधिक सुखी व संपत्तिमान् आहेत...स्वभावतःच ह्या लोकांचा व्यापाराकडे जितका ओढा असतो, तितका दुसऱ्या कोणत्याही हिंदूचा दिसत नाही. सरकारी नोकऱ्या करणारे लोक त्यांच्यामध्ये फारच थोडे आढळतात...हे शहर (मुंबई) वस्तुतः पाहिले असता महाराष्ट्र देशांतले आहे व तेथील मूलभाषा म्हटली म्हणजे शुद्ध अथवा विकार पावलेली मराठी ही होय. असे असून ह्या शहरास हिंदु ज्ञातीच्या संबंधाने मराठीपणापेक्षा गुजरातीपणाचा देखावा अधिक आहे...आमच्या पाहण्यांत असे पुष्कळ लोक (महाराष्ट्रीय) आले आहेत की जे दाहा रुपयांच्या कार-

कुनीच्या जाग्याकरितां प्राण टाकतील परंतु ज्यांत वीस रुपयांची किफायत आहे असा एखादा व्यापार करणार नाहीत...मराठ्यांपेक्षा गुजराती लोक फार भाविक आहेत...महाराज (गुजराथ्यांचे गुरू) आपल्या देवभोळी भक्तांस इतके वेडें करून टाकतात की ते...आपले तन, मन, धन, सर्व महाराजास अर्पण करून त्यांचे बंदे चाकर होऊन राहातात.'[१३] पार्शी, खोजे, गुजराती बनिये ह्यांच्या हाती मुंबईचा व्यापार होता, त्यांची व्यवहारभाषा गुजराती होती व पेढ्यांवर कारकून म्हणून चाकऱ्या मिळविण्याच्या दृष्टीने त्या काळाचे मराठी तरुण गुजराती शाळांत शिकत असत.

क्रमिक पुस्तकांबाबत सहभाग

हिंदू गुजराती बनिया समाज व्यापारातच लक्ष घालणारा असल्याने प्रारंभकाळी तरी शैक्षणिक स्वरूपाच्या उपक्रमात पार्शी आणि महाराष्ट्रीय मंडळीच अग्रेसर असे. सुरतेला इंग्रजी शाळा सुरू करावी म्हणून मागणी करणारांत पार्शी पुढे होते; तर अहमदाबादेतून असाच अर्ज गेला, त्यावरील बहुसंख्य स्वाक्षऱ्या महाराष्ट्रीयांच्या होत्या.[१४] 'हैंद शाळा शाळापुस्तक मंडळीं'चे कार्य सुरू झाले तेव्हा पाठ्यपुस्तके रचण्यात महाराष्ट्रीयच आघाडीवर होते. स. का छत्रे यांच्या 'बाळमित्रा'सारख्या नीतिकथांची पुस्तकेच नव्हेत, तर इतर क्रमिक पुस्तकेही मराठीतून गुजरातीत पुष्कळच भाषांतरित झाली. फार काय, स. १८४० साली प्रकाशित झालेले गुजराती भाषेचे व्याकरणसुद्धा गंगाधरशास्त्री फडक्यांच्या मराठी व्याकरणाची सहीसही नक्कल होती. अशी पहिलीवहिली गुजराती क्रमिक पुस्तके अतिशय सदोष उतरली असल्याची तक्रार केल्याचे आढळून येते.[१५] श्री. रणछोडदास गिरधर (१८०३–१८७३) हे तयार झाल्यावर गुजराती क्रमिक पुस्तकांचे गाडे रुळावर आले.

गुजरातीतून मराठीत आलेल्या लक्षणीय ग्रंथांत करसनदास मूळजीकृत 'इंग्लंडचा प्रवास' या ग्रंथाचे भास्कर हरी भागवतांनी केलेले भाषांवर आरंभीचे प्रवासवृत्त ठरते. १९९२ साली 'विविधज्ञानविस्तारा'तून क्रमशः प्रसिद्ध झालेली व ग. भि. गुंजीकरांनी भाषांतरित केलेली 'करण वाघेला' ही कादंबरी व गोवर्धनराम त्रिपाठीकृत 'सरस्वतीचंद्र, भाग १'चे वै. वि. धामणकरांचे भाषांतर यांचा खास उल्लेख करता येईल. 'फार्बस गुजराती सभा' ही वाङ्मयीन संस्था १८६५ मध्ये मुंबईत स्थापन झाली. तिच्या पहिल्या कार्यकारिणीत डॉ. भाऊ दाजी आणि रा. सा. वि. ना. मंडलिक होते. नाना शंकरशेट व डॉ. भाऊ देणगीदारांपैकी होते.[१६] डॉ. भाऊंना प्राच्यविद्यासंशोधनात खूपच गती होती. श्रेष्ठ संशोधक म्हणून चमकलेले डॉ. भगवानलाल इंद्रजी यांना भाऊंनीच मार्गदर्शन करून पुढे आणले. कवी नर्मद हे भाऊंना वडील बंधू मानीत. त्यांनी 'नर्मगद्य' हा

संग्रह भाऊंना अर्पण केला आहे. जगन्नाथ शंकरशेट आणि भाऊ दाजी यांनी गुजराती समाजाचा एवढा विश्वास संपादन केला होता की त्यांचे गुणवर्णन करणारी गुजराती कवने आढळून येतात.[१७]

स्त्रीशिक्षणाची समस्या

मुंबईत नवीन शिक्षणाचे संस्कार झालेल्या पिढीला आपण समाजाचे काही देणे लागतो असे वाटू लागले, तेव्हा 'एल्फिन्स्टन इन्स्टिटचूट' मधून तयार झालेल्या मराठी व पार्शी विद्यार्थ्यांनी प्रो. पॅटन आणि प्रो. रीड या प्राध्यापक-द्वयाच्या उत्तेजनाने 'स्टूडंट्स लिटररी ॲन्ड सायन्टिफिक सोसायटी' या नावाची संस्था १३ जून १८४८ रोजी स्थापन केली. मराठी, गुजराती आणि इंग्रजी या भाषांतून निबंध व व्याख्याने घडवून आणून सर्वसामान्य लोकांत नव्या उपयुक्त ज्ञानाचा प्रसार करणे हा या संस्थेचा प्रारंभीचा उद्देश होता. गुजराती व मराठी समाजांना सांस्कृतिक क्षेत्रात एकत्र आणणारा दुवा म्हणून या संस्थेचे महत्त्व विशेष आहे. प्रथम ही संस्था तांत्रिक दृष्ट्या राजकीय विषय वर्ज्य मानीत असली, तरी या संस्थेच्या कार्यात सहभागी झालेल्या मंडळींनीच पुढे 'बॉम्बे असोसिएशन' सारखी पश्चिम भारतातील पहिली राजकीय संस्था काढली. शासन आणि प्रजा यांच्यात सामंजस्य निर्माण करण्याचेच कार्य या संस्थेने प्रारंभी केले. 'स्टूडंट्स लिटररी' या संस्थेने 'मराठी ज्ञानप्रसारक सभा' व 'गुजराती ज्ञानप्रसारक सभा' अशा शाखाही काढल्या. दादोबा पांडुरंग आणि दादाभाई नवरोजी हे अनुक्रमे या शाखांच्या प्रमुखपदी होते. स्टूडंट्स लिटररीच्या उत्साही तरुणांनी जगन्नाथ शंकरशेट आणि भाऊ दाजी यांच्या सक्रिय प्रोत्साहनाने स्त्रीशिक्षणाचा प्रश्न स्वयंसेवी वृत्तीने हाती घेतला. २१ ऑक्टोबर १८४९ रोजी मराठी मुलींच्या तीन व पार्शी-गुजराती मुलींच्या चार अशा सात शाळा उघडल्या व स. १८५१ मध्ये हिंदू-गुजराती मुलींचीही एक शाळा निघाली. पुढे स. १८५४ पासून सर मंगळदास नथ्थुभाई यांनी या शाळेची जबाबदारी जवळजवळ स्वशिरावर घेतली आणि स. १८५७ पासून 'पार्शी गर्ल्स असोसिएशन' या स्वतंत्र संस्थेने पार्शी मुलींच्या शाळा चालवा-वयास घेतल्या.[१८] मुंबईत स्त्रियांतून शिक्षिका तयार व्हाव्यात म्हणून स्वतंत्र 'नार्मल स्कूल' स्थापन करण्याची चळवळ पुढे सर मंगळदासांच्या नेतृत्वाखालीच यशस्वी झाली स. १८५१ साली महात्मा फुले यांनी पुण्यात स्त्रियांसाठी शाळा काढली, ही गोष्ट महशूर आहे.[१९] पुढे पं. रमाबाईंच्या 'शारदासदना'चा उपक्रम एतद्देशीय हिंदूंच्या दृष्टीने फसल्यानंतर त्या उपक्रमापासून प्रेरणा आणि बोध घेऊन महर्षी कर्व्यांनी स्त्रीशिक्षणाच्या समस्येची सोडवणूक उत्तम प्रकारे केली. विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात सर विठ्ठलदास ठाकरसीसारखा उदार गुजराती दाता भेटून महर्षींचे स्वतंत्र महिला विद्यापीठाचे स्वप्नही साकार झाले.

सुरतेची मानवधर्मसभा

शिवाजीमहाराजांनी सुरतेच्या व्यापाऱ्यांच्या वखारी लुटल्या आणि तेथे भरलेली मवाळ काँग्रेस जहालपंथीय टिळकानुयायांनी मोडली, यासाठीच प्रायः सुरत शहर मराठी लोकांना माहीत असते; पण एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात पश्चिम भारतातील सामाजिक सुधारणेबरोबर राजकीय सुधारणेची मुहूर्तमेढ या सुरत शहरातच रोवली गेली होती, ही गोष्ट तशी अल्पज्ञातच आहे. स. १८४२ साली सुरतेच्या इंग्रजी शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक म्हणून दादोबा पांडुरंगांची नेमणूक सुरतेस झाल्याचा उल्लेख मागे आलाच आहे. तेथील गुजराती शाळेचे मुख्याध्यापक दुर्गाराम मनसाराम मेहता (१८०९–१८७६) हे मुंबईस शिकून तयार झालेले एक कर्ते सुधारक होते. त्यांनी दादोबांच्या साहाय्याने सुरतेस 'मानवधर्मसभा' नावाची संस्था २२ जून १८४४ रोजी स्थापन करुन सर्वांगीण सुधारणेचा झेंडाच फडकावला. या 'मानवधर्मसभे' ची तात्त्विक भूमिका दादोबांच्या 'धर्मविवेचन' या ग्रंथात पाहावयास मिळते. हा ग्रंथ पुढे स. १८६६ मध्ये प्रकाशित झाला असला, तरी त्याचे हस्तलिखित स. १८४३ मध्ये सुरतेतच तयार झालेले होते.[२०] या मानवधर्मसभेने समाजात बोकाळलेल्या अंधश्रद्धेविरुद्ध जोरदार मोहीम आरंभिली. बडोदा येथील वज्याराम ऊर्फ लालजी भडाक या जादूगाराचे प्रस्थ फार वाढले होते. सुरतेतील मोठ्या मंदिराचे गुरू ब्रिजरतनजी महाराज यांनी त्याला तेथे बोलावले, तेव्हा जाहीर आव्हान देऊन दुर्गारामांनी त्याचा दंभस्फोट कसा केला, याची सविस्तर हकीगत प्रामुख्याने १८४५–४७ च्या दरम्यान भाऊ महाजनांच्या 'प्रभाकर' पत्रात येत असे.,[२१] ती बहुधा दादोबांच्या प्रेरणेनेच प्रकाशात आलेली असावी. सुरतेत दादोबांच्या हाताखाली तयार झालेल्या विद्यार्थ्यांमधून महिपतराम रूपराम, नानाभाई हरिदास, मोहनलाल गिरधर, रमणलाल नीलकंठ यांसारखे कर्ते तरुण भावी काळात सार्वजनिक क्षेत्रात चमकले. तेव्हा महिपतराम रूपराम यांनी आपले दुर्गाराम मेहतांचे चरित्र दादोबांना अर्पण करताना 'Leader of the Band of Reformers' अशी जी बिरुदावली दादोबांच्या नावामागे जोडली आहे, ती यथार्थच म्हटली पाहिजे.

राजकीय जाणिवा

सामाजिक वा धार्मिक चळवळीप्रमाणेच ब्रिटिशांविरुद्ध झालेल्या लढ्याचा पहिला परिस्फोट सुरतेतच झाला. ईस्ट इंडिया कंपनीचे अव्वल इंग्रजी काळातील प्रारंभीचे एल्फिन्स्टनसारखे अधिकारी रयतेचा कल ओळखून कारभार करणारे होते. तसेच सार्वजनिक शिक्षण, सुरक्षा आणि भौतिक सुधारणा अशा ज्या उपयुक्त गोष्टी नव्या राजवटीबरोबर आल्या, त्याचे सामान्यतः प्रथम स्वागतच झाले. पण या सत्तांतराने पूर्वीची आर्थिक घडी विस्कटून गेली होती, घरगुती उद्योगधंदे पार

बुडत होते, रयत दुष्काळ आणि दारिद्र्य यांनी गांजली जात होती, वरिष्ठ नोकऱ्यांबाबत काळागोरा हा भेद सर्रास होत होता. दादोबा पांडुरंगाचे बंधू भास्कर पांडुरंग यांनी 'ए हिंदू' या टोपणनावाने 'द बॉम्बे गॅझेट' या पत्रात १८४१ सालीच सडेतोड लेख लिहून नव्या राजवटीच्या या काळचा बाजूवर झगझगीत प्रकाश टाकला होता.[२२] 'हिंदुस्थानची प्राचीन व सांप्रतची स्थिती व पुढे काय होणार याविषयीं विचार' या लांबलचक शीर्षकाच्या स. १८४३ च्या आपल्या ग्रंथात रामकृष्ण विश्वनाथ यांनी असे म्हटले आहे की, पूर्वीचे मुसलमानादी राज्यकर्ते बाटवाबाटवी करीत, संचित धन लुटीत, पण या गोष्टी प्रासंगिक तशाच उघड उघड जुलमाच्या असत. पण इंग्रजी राज्यामधील जुलूम हा डोळ्यात न भरणारा आणि पद्धतशीर असा आहे. इंग्रजांनी हिंदुस्थानच्या मालाच्या उतारपेठाच बंद केल्या आहेत व प्रजेची नागवणूक चालविली आहे. 'हिंदुस्थानात राज्य नव्हे. लष्करी जुलूम आहे' हे एडमंड बर्कचे वचन स्वमताच्या पुष्टयर्थ उद्धृत करून इंग्रजी राजनीतीचे त्यांनी वाभाडे काढले आहेत.[२३] येथे दुर्गाराम मेहतांच्या जीवनचरित्रातील एक प्रसंग सांगण्यासारखा आहे : ८ सप्टेंबर १८४४ च्या बैठकीत गोवर्धनदास गोपाळदास यांनी दादोबा आणि दुर्गाराम मेहता यांना प्रश्न केला, "इंग्रजांचे राज्य आपल्या देशात आहे, त्यामुळें प्रजा सुखी आहे की दुःखी ?" दोघे म्हणाले, "काही बाबतींत इंग्रजी राज्य चांगले आहे., पण राजा परदेशी आहे, त्यामुळे स्वतःच्या देशबाधवांवर तो जेवढी प्रीती करतो, तेवढी या देशांतील लोकांवर करीत नाही." त्यावर गोवर्धनदास म्हणाले, "मी खरोखरच सांगतो की, इंग्रजी राज्यापासून प्रजा निर्धन होऊन गेली., व्यापार सर्व बुडाला. या दुःखापुढे इतर दुसरी सुखे असली तरी ती अस्त पावतात."[२४] म्हणजे ब्रिटिश राजनीतीची आर्थिक आणि व्यापारी बाजू रयतेच्या दृष्टीने सुखावह नाही, याची कल्पना व्यापारी मंडळींना प्रारंभीच येऊ लागली होती. तेवढ्यात सुरतेस या नेत्यांच्या प्रेरणेनेच एक लक्षणीय घटना स. १८४४ साली घडून आली. सरकारने लादलेल्या मिठाच्या कराविरुद्ध तीस हजार हिंदूंचा मोर्चा सरकारी कचेरीवर नेण्यात आला आणि सरकारकडून अनुकूल आश्वासन पदरात पडल्यावर चळवळ मागे घेतली गेली. 'भारतातले हे पहिले जनआंदोलन' असा त्याचा यथार्थ निर्देश करण्यात आलेला आहे.[२५] ईस्ट इंडिया कंपनीच्या राज्यकारभारातील पंक्तिप्रपंच, गुप्तपणा, न्यायदानाला लागणारा विलंब इ. उणिवांचा गवगवा पार्लमेंटपर्यंत पोचावा म्हणून नाना शंकरशेठ, भाऊ दाजी, नवरोजी फर्दुनजी, दादाभाई नौरोजी इ. मुंबईकर नेत्यांनी २६ ऑगस्ट १८५२ रोजी वर उल्लेखिलेली 'दि बॉम्बे असोसिएशन' ही संस्था स्थापन केली.[२६] हिचे कार्य पाचसहा वर्षे चांगले चालले. कंपनी सरकारने 'दत्तक वारस नामंजूर' करून संस्थाने खालसा करण्याचा जो धडाका लावला होता, त्याचा उद्रेक अखेर स. १८५७ च्या बंडात झाला. बंडाचा बीमोड करण्यासाठी

कंपनीने जे अत्याचार केले, त्यामुळे कंपनीच्या राजनीतीचे खायचे दात आणि दाखवायचे दात उघड झाले. अखेर १८५८ मध्ये कंपनीचा कारभार अस्तास जाऊन राणीचा जाहिरनामा प्रकट झाला. सार्वजनिक तसेच व्यापारी प्रश्नांची दाद लावून घेण्यासाठी १८६७ साली सर मंगळदास नथ्थूभाईंच्या नेतृत्वाखाली 'बॉम्बे असोसिएशन'चे पुनरुज्जीवन करण्यात आले.[२७] लॉर्ड मेयोच्या कारकीर्दीत झालेल्या करवाढीविरुद्ध संस्थेने जनमत जागृत करण्यात पुढाकार घेतला. पण हळूहळू या संस्थेचा जनमानसावरील प्रभाव कमी झाला आणि न्या. रानडचांच्या मार्गदर्शनाखाली कार्य करणाऱ्या पुण्याच्या सार्वजनिक सभेकडून अधिक भरीव स्वरूपाची कामगिरी घडून आली. पहिली १८८५ सालची राष्ट्रीय सभा (इंडियन नॅशनल काँग्रेस) याच सभेतर्फे पुण्यात भरावयाची होती. पण पुण्यात साथ उद्‌भवल्याने ती मुंबईत भरली. दादाभाई नौरोजी, फेरोजशहा मेहता, न्या., रानडे, न्या. तेलंग, ना. गोखले यांच्या प्रभावाखाली असलेली काँग्रेस ही प्रातिनिधिक राष्ट्रीय संस्था प्रारंभी सरकारच्या तोंडाकडे पाहात अर्ज–विनंत्याचे राजकारण करणारी होती; मात्र तिला समाजकारणाचे वावडे नव्हते. पण लो. टिळकांच्या सनातनी राष्ट्रीय पंथाचा हळूहळू जोर होऊ लागला होता. 'आधी राजकीय की आधी सामाजिक ?' या वादात 'राजकीय' ची सरशी होत होती. स. १९०८ मध्ये सुरत काँग्रेसचे अधिवेशन मोडून काँग्रेसला जनताभिमुख करण्याचा जहाल पक्षाने प्रयत्न केला, (म. गांधींनी राजकीय सामाजिकातील ही दरी बुजवून राजकारणाचा गाडा पुढे मार्गी लावला, ही गोष्ट प्रसिद्धच आहे.)

एकोणिसाव्या शतकातील मराठी–गुजराती संबंधांचे सिंहावलोकन केल्यास दादोबा पांडुरंग आणि गोपाळ हरी देशमुख उपाख्य लोकहितवादी या दोन व्यक्ती गुजरातच्या लोकजीवनाशी काही काळ तरी समरस होऊन गेलेल्या दिसून येतील. दादोबांच्या सुरतेतील कार्याचा वर उल्लेख झालाच आहे., लोकहितवादींनी अहमदाबादच्या सार्वजनिक जीवनाशी एक तपपर्यंत कशी जवळीक साधलेली होती त्याचे सविस्तर वर्णन नंदा आपटे यांच्या एका लेखात सविस्तर आलेले आहे.[२८] तसेच फॉर्बस आणि कर्टिस यांच्यानंतरचे गुजरात व्हर्नाक्युलर सोसायटीचे देशी सेक्रेटरी या नात्याने सोसायटीच्या 'बुद्धिप्रकाश' या कालिकात त्यांनी किती विपुल स्फुट निबंधलेखन केले आहे, ते प्रस्तुत लेखकाने दाखवून दिले आहे.[२९]

मिशनऱ्यांचे हल्ले

ब्रिटिश अमलात प्रारंभी अल्प काळ खिस्ती मिशनऱ्यांना मुंबईत येण्यास बंदी घालण्यात आली होती. माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनचे धोरणही सरकारी शैक्षणिक उपक्रमांतून मिशनऱ्यांना उत्तेजन देणारे नव्हते. पण या मिशनरी मंडळीची

चिकाटी अखेर बलवत्तर ठरून तिने आपल्या शैक्षणिक आणि समाजसेवाविषयक कार्याच्या बळावर आपले बस्तान बसविले आणि धर्मप्रचार सुरू केला. हिंदुधर्मातील उणिवांचा फायदा घेऊन धर्मांतरे घडवून आणण्यात ते यशस्वी झाले. या संकटाला तोंड देत असताना गुजराती आणि मराठी समाजांनी सहकार्याच्या वृत्तीचा अवलंब केलेला दिसून येतो. १८२९ साली डॉ. विल्सन (१८०४–१८७५) या विद्वान ख्रिस्ती मिशनऱ्याच्या घरी हिंदू व ख्रिस्ती यांच्यात पहिला वादविवाद घडून आला. नुकतेच धर्मांतर केलेल्या बाणकोट येथील रामचंद्रशास्त्री यांच्या साह्याने डॉ. विल्सन यांनी ख्रिस्ती धर्माचे मंडण आणि हिंदूधर्माचे खंडण केले, तर मोरभट्ट दांडेकरांनी उत्तरपक्ष म्हणून हिंदुधर्माचे मंडण केले. वादाच्या अखेरच्या टप्प्यात निर्भयराम आणि किसनदास गोकुळदास यांनी हिंदुधर्माची बाजू मांडली.[३०] पेस्तनजी माणेकजी या पार्शी गृहस्थांचा रेव्ह. जे. एम. मिचेल यांच्यावरोवर वादविवाद झाला. पेस्तनजी यांनी ख्रिस्ती धर्माचे खंडण करणारे पुस्तक प्रसिद्ध केले. या पुस्तकातील टीका 'प्रभाकर' पत्रात छापण्यात आलेली होती.[३१] १८५७ च्या जानेवारी ते मे पर्यंत 'वेदोक्तधर्मप्रकाश' ग्रंथाचे कर्ते विष्णुबावा ब्रह्मचारी यांनी मुंबईच्या चौपाटीवर वादविवादसभा भरवून मिशनऱ्यांचे हल्ले परतविण्याचा उपक्रम चालविला होता.[३२] या बावतीत भुलेश्वरच्या व्यापारीवर्गाचा विष्णुबावांना सक्रिय पाठिंबा असे. विष्णुबावांच्या 'सुखदायक राज्यप्रकरणीं निबंधा'तील विचारसरणीची भलावण प्रागजी ठाकरसी यांनी आपल्या 'प्रमाणसहस्त्री' या ग्रंथात केलेली आढळून येते.[३३]

सुरतेच्या 'मानवधर्मसभे'च्या धर्तीवर स. १८४९ सालच्या सुमारास राम बाळकृष्ण जयकर यांच्या अध्यक्षतेखाली 'परमहंस सभा' नावाची एक गुप्त मंडळी स्थापन झाली. वास्तविक समाजसुधारणेच्या उदार तत्त्वांचेच अधिष्ठान या मंडळीला होते, पण तत्कालीन गतानुगतिक समाजाच्या रोषाला भिऊन मंडळी आपला कारभार गुप्त राखीत होती. १८६० च्या सुमारास संस्थेच्या सभासदांची यादी प्रकट झाल्याचे निमित्त होऊन या संस्थेची इतिश्री झाली. याच संस्थेतील मंडळींनी बंगालमधील ब्रह्मोसमाजाच्या कार्यातून स्फूर्ती घेऊन १८६७ मध्ये सुप्रसिद्ध प्रार्थनासमाजाची स्थापना केली. डॉ. आत्माराम पांडुरंग, न्या. रानडे, डॉ. भांडारकर, सदाशिवराव केळकर, वा. आ. मोडक, न्या. चंदावरकर, महर्षी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली प्रार्थनासमाजाने समाजसुधारणेच्या कार्याला हातभार लावला आणि एका परीने तरुण नवशिक्षित वर्गाला व्यापक हिंदुधर्माच्या छत्राखाली राखण्याचे ऐतिहासिक कार्य केले. गुजराती समाजातील ज्या प्रगतिशील व्यक्ती या समाजाच्या कार्यात सहभागी झाल्या, त्यांत शेठ दामोदरदास गोवर्धनदास आणि रा. ब. लालशंकर उमियाशंकर हे प्रमुख होते.

समाजाच्या कोणत्याही उपक्रमास शेठ दामोदरदासांचे आर्थिक पाठबळ असे. पंढरपूर येथील समाजाच्या अनाथाश्रमाचे उत्पादकच लालशंकर हे होते. प्रार्थनासमाजाची शाखा भोलानाथ साराभाई यांनी अहमदाबाद येथे काढली, तेव्हा लोकहितवादींनी त्यांना सर्वतोपरी साहाय्य केले होते. काठेवाडात जन्म पावलेल्या महर्षी दयानंद सरस्वतींनी स. १८७५ साली मुंबईत आर्यसमाज स्थापन केला. आर्यसमाजाचे कार्य पंजाब आणि मध्यप्रदेश या भागांत विशेष फोफावले. पण दयानंदांच्या मुंबई, पुणे व अहमदाबाद येथील प्रारंभीच्या प्रचारकार्यात लोकहितवादींचा हातभार लागलेला होता. प्रार्थनासमाज आणि आर्यसमाज या उभय संस्थांचा मूर्तिपूजा आणि जाति-भेद यांना विरोध होता; तेव्हा या उभय समाजांत ऐक्य घडवून आणण्याचा प्रयत्नही लोकहितवादींनी केला होता; पण आर्यसमाज हा कट्टर वेदप्रामाण्यवादी असल्याने तो विफल ठरला होता.

'महाराजा लायबेल केस'

सुरतेच्या 'मानवधर्मसभे'ने नजरबंदी करणाऱ्या भोंदू बुवांचा दंभस्फोट केला, त्याहून जबरदस्त दंभस्फोट करसनदास मूळजी या निधड्या छातीच्या सुधारकाने मुंबईतील वैष्णव महाराजांचा केला. 'महाराजा लायबेल केस' (१८६२) म्हणून हे प्रकरण प्रसिद्ध आहे. वैष्णव गुरू जदुनाथजी महाराज यांना सुप्रसिद्ध कवी नर्मद यांनी विधवाविवाहाच्या वादात ओढले होते. काही बाबतीत प्रगतिशील असणाऱ्या जदुनाथजींनी त्या वादात सुधारकांची अद्वातद्वा निंदा केली; तेव्हा हे वैष्णव महाराज धर्माच्या नावाखाली आपल्या भाविक भक्तांच्या स्त्रियांशी कसे अनाचार करीत असतात, ते करसनदासांनी आपल्या 'सत्यप्रकाश' पत्रातून चवाठ्यावर मांडले. त्यातून अब्रुनुकसानीचा खटला उभा राहिला. या खटल्यात डॉ. भाऊ दाजी आणि रा. सा. विश्वनाथ नारायण मंडलिक या मराठी पंडितांच्या साक्षी (विशेषतः डॉ. भाऊंची साक्ष) प्रभावी ठरल्या होत्या व करसनदासांचा पक्ष बळकट झाला होता. सत्पक्षाला साह्य करताना आपले गुजराती श्रीमंत गिऱ्हाईक तुटणार होते, याची क्षिती डॉ. भाऊंनी बाळगिली नाही.[३४]

कन्याहत्येची चाल

अस्पृश्य आणि स्त्रिया यांची हिंदू समाजात अत्यंत दयनीय अशी उपेक्षा होत होती आणि त्याचाच नेमका फायदा परधर्मीय घेत होते. पण जातिभेद आणि अस्पृश्यता यासंबंधी काही अंशी प्रार्थनासमाज आणि म. फुले व त्यांचा सत्यशोधक समाज यांच्याखेरीज कोणी फारशी आस्था दाखविलेली आढळणार नाही. एकोणिसाव्या शतकातील सुधारणेचा प्रश्न स्त्रियांवरच–विशेषतः उच्च वर्णीय स्त्रियांवर –केंद्रित झालेला होता. वर वर्णिलेली धर्मगुरूंची बुवाबाजी, सती, बालविवाह,

हुंडयाची चाल, कन्याहत्या, स्त्रीशिक्षणबंदी, विधवाविवाहबंदी, केशवपन यांसारख्या सुधारणेच्या बहुतेक समस्या स्त्रीविषयकच होत्या.

गुजरातेतील जाडेजा जमातीत कन्याहत्येची अमानुष रूढी जारी होती. डॉ. भाऊंनी तरुण विद्यार्थी असतानाच या रूढीविषयी संशोधन करून 'स्त्री बाळहत्या विषये ग्रंथ' या नावाचे पुस्तक गुजरातीत लिहून स. १८४४ साली त्यासाठी नेमलेले सहाशे रुपयांचे पहिले पारितोषिक पटकावले होते. पुढे १८४८ मध्ये पुन्हा याच विषयावरील निबंधस्पर्धेत रुस्तुमजी कुंवरजी मोदी यांना दुसरे पारितोषिक मिळाले होते.[३५] मातेच्या स्तनाग्रांना अफू लावून ठेवीत असत आणि स्तनपानानंतर अर्भक गतप्राण होत असे. कधी मुलीची वारच तिच्या तोंडात कोंबून तिचा प्राण घेत किंवा जमिनीतील खड्डयात वा मोठ्या पातेल्यात दूध भरून तीत मुलीला बुडवून मारीत असत. अशी ही कन्याहत्येची अमानुष चाल किंवा बंगाल्यातल्या कुलीन प्रथेने भयानक स्वरूपाला पोचलेली सतीची चाल महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर होती, असे म्हणता येणार नाही; तरी पण पुनर्विवाहबंदीमुळे तरुण विधवांचे पाऊल वाकडे पडून भ्रूणहत्या मात्र महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात घडत. एका पुणे जिल्हयात पाच वर्षात हजार भ्रूणहत्या घडत असाव्यात, असा अंदाज लोकहितवादींनी सरकारकडे पाठवलेल्या अर्जात दिला होता.[३६] इंग्रजी राज्य होण्यापूर्वी असे गुन्हे ग्रामपंचायतीत वा जातपंचायतीत तुटत; तुलनेने प्रायश्चित्तादी सौम्य शिक्षा होत. पण या बाबतीत इंग्रजी कायदा कठोर होता. १८८१ साली सुरतेनजीक उडपाड गावच्या विजयालक्ष्मी नामक तरुणीचा खटला विशेष गाजलेला होता. खालच्या न्यायालयात तिला फाशीचीच शिक्षा झाली होती; पण टीका झाल्यावर ती जन्मठेपेवर आली. पण पुण्याच्या सार्वजनिक सभेने लोकमत जागृत करण्याच्या दृष्टीने या प्रकरणाचा पिच्छा पुरविला आणि अखेर शिक्षा पाच वर्षे सक्तमजुरीवर आली ![३७]

विधवाविवाहाची चळवळ

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात विधवाविवाहाच्या चळवळीला मुंबईत तोंड लागले. भाऊ दाजी, दादोबा पांडुरंग, लोकहितवादी, डॉ. आत्माराम पांडुरंग, न्या. रानडे, बाळाजी पांडुरंग भालेराव, वासुदेवराव नवरंगे, सदाशिवराव केळकर, विष्णुशास्त्री पंडित, करसनदास मूळजी, दादाभाई नौरोजी, नर्मदाशंकर लालशंकर, लालशंकर उमियाशंकर, माधवदास रघुनाथदास यांच्यासारख्या उभय समाजांतील नेत्यांनी खांद्याला खांदा लावून या बाबतीत कार्य केले. विष्णुशास्त्री पंडितांनी प्रसिद्ध बंगाली सुधारक ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या 'मॅरेज ऑफ विडोज' या ग्रंथाचे मराठीत भाषांतर केले (स. १८६५) व त्याचेच रूपांतर पुढे गुजरातीत लालशंकर उमियाशंकर यांनी केले. विष्णुशास्त्र्यांनी जसा 'इंदुप्रकाश'मधून

विधवाविवाहाच्या कार्याचा अविरत प्रचार चालविला होता, तद्वतच दादाभाई नौरोजी, करसनदास मूळजी, कवी नर्मद यांनी 'रास्तगोफ्तार', 'सत्यप्रकाश' यांसारख्या पत्रांतून प्रचार केला. पंडितांनी सरदार विचुरकरांच्या अध्यक्षतेखाली स. १८६५ मध्ये सुप्रसिद्ध 'पुनर्विवाहोत्तेजक मंडळी'ची स्थापना केली. लोकहितवादी, मोरोबा कान्होबा, बाळाजी पांडुरंग भालेराव, मामा परमानंद, का. त्र्यं. तेलंग, म. गो. रानडे, ज. स. गाडगीळ, शांताराम नारायण, भा. ह. भागवत, राम बाळकृष्ण आदी तत्कालीन बहुतेक नवशिक्षित कर्ते तरुण या मंडळीचे पदाधिकारी वा सदस्य होते.

स. १८७२ मध्ये याच धर्तीवर करसनदास मूळजींच्या पुढाकाराने 'गुजराती हिंदू स्त्री–दुःखनिवारण मंडळी' स्थापन झाली. जुने आणि जाणते म्हणून दादोबांचे मार्गदर्शनपर भाषण त्यावेळी झाले होते आणि विष्णुशास्त्री पंडित २५ रुपये वर्गणी भरून या संस्थेचे आजीव सदस्य झाले होते.[३८] विधवाविवाहाच्या कार्यात महर्षी कर्व्यांपूर्वीच्या काळात विष्णुशास्त्री पंडित आणि शेठ माधवदास रघुनाथदास यांनी जे कार्य केले, ते समाजसुधारणेच्या इतिहासात संस्मरणीय ठरले आहे.

एकमेकां साह्य करू

भारतीय एकात्मतेच्या घोषणा आपण नेहमीच उच्चरवाने देत असतो. गतशतकाचा विचार केल्यास मराठी आणि गुजराती समाजात 'एकमेकां साह्य करू, अवघे धरू सुपंथ' ही प्रवृत्ती प्राधान्याने दिसते. शैक्षणिक, धार्मिक, राजकीय व सामाजिक बाबतीत ही प्रवृत्ती कशी कार्यरत होती, याचे हे दिग्दर्शन खचितच स्पृहणीय वाटावे.

संदर्भ

१. **खगोळ, भूगोळ इत्यादिक**, २ री आ; मुंबई १८२९, पृ. ४.

२. अ. का. प्रियोळकर, **रा. ब. दादोबा पांडुरंग**, मुंबई १९४७, पृ. १९३.

३. **श्रीचक्रधरोक्त सूत्रपाठ**, ३ आ; संपा. ह. ना नेने, नागपूर १९४२, पृ. १०.

४. **स्मृतिस्थळ**, संपा. शं. गो. तुळपुळे, पुणे १९६९, पृ. ५

५. **तत्रैव**, पृ. १८.

६. **श्रीसकलसंतगाथा**, २ आ. 'श्री नामदेवांचे अभंग', संपा. का. अ. जोशी, पुणे १९६७, पृ. ४१८–१९.

७. केशवराम काशीराम शास्त्री, **नरसी मेहता : एक अध्ययन**, अहमदाबाद १९७१, पृ. १४१.

८. **दयाराम काव्यसुधा,** संपा. प्रा. वै. व्यास, मुंबई १९१६ पृ. २५७–६०,

९. मू. तु. तेलीवाला व जे. गो. शहा, **भक्तकवि श्रीदयाराम भाईनुं आंतर-जीवन अथवा दिव्य अक्षरदेह,** मुंबई १९३१, पृ. २३९–४०.

१०. कुलीन व्होरा, **आपणा स्त्री कविओ,** मुंबई १९६०, पृ. २१–२५ व अनंतराय रावळ, **गुजराती साहित्य,** भा. १, तृ. आ. मुंबई १९६८. पृ. २२९–३०.

११. **तत्रैव**, पृ. २१३–१५.

१२. **स्टूडंट्स लिटररी अँड सायंटिफिक सोसायटी** (१८४७–४९ ते १९४७–४८) [स्टूडंट्स–], एम. जी. राव, मुंबई १९५०, पृ. ४५.

१३. **मराठी ज्ञानप्रसारक**, पु. १७, अं. ५ (मे १८६६), पृ. १३१–१३७ : हा निबंध मुळात नारायण दीनानाथजी यांनी १८४८–५१ च्या दरम्यान 'मराठी ज्ञानप्रसारक सभे'पुढे वाचला होता. पाहा : **स्टूडंट्स–**, पृ. ४३.

१४. अ. का. प्रियोळकर, 'मुंबईतील मराठी आणि गुजराती', **विविधवृत्त,** दिवाळी अंक १९४७, पृ. ११७.

१५. कृष्णलाल मो. जव्हेरी, **फर्दर माइलस्टोन्स इन गुजराती लिटरेचर,** मुंबई १९२४, पृ. ५–६.

१६. अ. का. प्रियोळकर, **डॉ. भाऊ दाजी,** मुंबई १९७०, पृ. १८१.

१७. **नाटकगायणसंग्रह**, मुंबई १८७४, पृ. १३४–३५, १३७ व ५०१. ही कवने इथे मराठीचिये नगरीत (व १, अं. २–मे १९७३) प्रसिद्ध झालेली आहेत.

१८. **स्टूडंट्स–**, पृ. ५, ८ व १२.

१९. धनंजय कीर, **महात्मा जोतीराव फुले**, मुंबई १९६८, पृ. ३५.

२०. अ. का. प्रियोळकर, **रा. ब. दादोबा पांडुरंग**, पूर्वोक्त, पृ. ४३.

२१. **प्रभाकर**, पु. ४, का. ११ (५–१–१८४५) पृ. ५, अं. ९, ११ व १८ (२१–१२–१८४५, ४–१–१८४६, २१–२–१८४७).

२२. अ. का. प्रियोळकर, **पूर्वोक्त**, पृ. ३८५–९३.

२३. **चार जुने अर्थशास्त्रीय ग्रंथ**, संपा. दि. के. बेडेकर, पुणे १९६९, पृ. ७.

२४. महिपतराम रूपराम, **मेहेताजी दुर्गाराम मंछाराम चरित्र,** अहमदाबाद १८७९, पृ. १०१.

२५. वसंत नगरकर, 'वाघिणीचे दूध', **महाराष्ट्र टाइम्स**, २१–१२–१९७५.

२६. **बाँबे असोसिएशन नावाचे पहिले वार्षिक सभेच्या हकीकतीचे टिपण,** मुंबई १८५४, पृ. ७.

२७. **नेटिव्ह ओपीनियन**, ८ मे १८७०.

२८. नंदा आपटे, 'लोकहितवादी आणि अहमदावाद,' **एस्. एन्. डी. टी. रिसर्च जर्नल**, खं. ७ (१९७९), पृ. ९०–१०५.

२९. स. गं. मालशे, 'लोकहितवादींचे 'बुद्धिप्रकाश' मधील गुजराती लेख', **मराठी संशोधनपत्रिका**, व. २६, अं. १ (ऑक्टो–डिसें. १९७८), पृ. ५२–६५.

३०. जॉन विल्सन, **ए मेम्वार ऑफ मिसेस मार्गारेट विल्सन,** एडिंबरो १८३७, पृ. २७७.

३१. **प्रभाकर**, व. ४, अं. ५० (५–१०–१८४५).

३२. **समुद्रकिनारींचा वादविवाद**, आ. २, 'प्रस्तावना', मुंबई १८८५, पृ. १–३.

३३. प्रयागजी ठाकरसी मूळजी, **प्रमाणसहस्त्री**, आ. ६, मुंबई १९१८, पृ. ११७–११९.

३४. बी. एन. मोतीवाला, **कर्सनदास मूळजी**, मुंबई १९३५, पृ. १२३.

३५. **ज्ञानोदय**, १५ मार्च १८४८ व १ मे १८५०.

३६. स. गं. मालशे व नंदा आपटे, **विधवाविवाह चळवळ** (१८००–१९००) मुंबई १९७८, 'परिशिष्ट १ ले', पृ. १३३.

३७. **पुणे सार्वजनिक सभेचे मासिक पुस्तक,** व. १, अं. १ (१८८१) पृ. ६० व ना. के. वैद्य. **पुनर्विवाह निषेधकांस चपराक,** मुंबई १८८६, पृ. १७–१८.

३८. श्री. स. पंडित, **विष्णु परशुरामशास्त्री पंडित यांचे चरित्र,** पुणे १९३६, पृ. ७५.



४. मानवधर्मसभा आणि 'लाल भडाक'चा दंभस्फोट

गुजराती आणि मराठी या उभय समाजांच्या सहकार्याचा इतिहास जुना आहे. भारतात इंग्रजी सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर त्यांची पहिली राजधानी कलकत्ता ही होती. साहजिकच नवीन मन्वंतराने जी विचारक्रांती घडून आली, तिचे पहिले प्रकाशकिरण बंगालमध्ये आधी पसरले. राजा राममोहन रॉय यांच्या नेतृत्वाखाली नवप्रबोधनाची पहिली हालचाल सुरू झाली. या मन्वंतरातून ज्या नव्या समस्या दत्त म्हणून उभ्या राहिल्या, त्यांना पश्चिम भारतातील सुशिक्षित पिढीला सामोरे जावे लागले. त्यावेळीही महाराष्ट्र आणि गुजरात या दोन प्रांतांनी या समस्यांना संयुक्तरीत्या तोंड दिलेले आढळून येते. या दोन्ही प्रांतांच्या समाजजीवनाचे केंद्र मुंबई हे होते. मुंबईत शिकून तयार झालेल्या मंडळीनेच या दोन्ही प्रांतांत नव-क्रांतीची मुहूर्तमेढ रोवलेली होती, असे दिसून येते. सुरतेच्या एका शिक्षकांनी नव-विचारांची गुढी गुजरातेत पोचविली. हे शिक्षक म्हणजे दुर्गाराम मनसाराम मेहेता. त्यांनी सुरतेत 'मानवधर्म सभा' स्थापन केली. या कार्यात मराठीचे प्रख्यात व्याकरणकार दादोबा पांडुरंग तर्खड त्यांचे महत्त्वाचे सहकारी होते.

कै. भाऊ महाजन हे 'प्रभाकर' नावाचे एक साप्ताहिक मराठी वृत्तपत्र मुंबईहून चालवीत असत. या पत्रात सन १८४५ ते १८४७ च्या दरम्यान 'मानव-

धर्मसभे'च्या कार्याविषयी काही पत्रव्यवहार प्रसिद्ध झालेला आहे. 'लालभडाक' नावाच्या ढोंगधतुरा माजविणाऱ्या वुवाचा या सभेने कसा दंभस्फोट केला, त्याची हकीगत हा या पत्रव्यवहाराचा गाभा आहे. प्रस्तुत लेखात या दंभस्फोटप्रकरणाची ओळख करून घ्यायची आहे.

'तुमचा हितचिंतक, मानवधर्मसभेत जाणारा' या नावाचे सुरतेहून २५-१२-१८४४ रोजी लिहिलेले पहिले पत्र 'प्रभाकर'त उपलब्ध होते.[१] त्या पत्रात सभेच्या उद्दिष्टांसंबंधी प्रथम माहिती दिलेली आहे ती अशी :-

'आज सुमारे साहा महिने जाहाले. येथें (सुरतेस) कित्येक विद्वान लोकांनी 'मानवधर्मसभा' या नावें एक सभा काढली आहे. ती प्रत्येक रविवारी भरत असते, त्यांत बहुधा क्रोधी तंटेखोरांखेरीजकरून वरकड सर्व लोकांस येण्याची परवानगी आहे. या सभेंत जे मुख्य सभासद आहेत, त्यांतील जो दुर्गाराम मनछाराम नामे करून एक नागर आहे, तो चांगले सत्यवाद प्रमाणानुरूप व्याख्यान करित असतो व दुसरे सर्व ऐकत असतात, ही सभा मिळण्याचा हेतू हाच की, हिंदू, मुसलमान व ख्रिस्तीयन इत्यादि प्रकारचे जे धर्म या पृथ्वीवर प्रवृत्त आहेत, त्यातून जे सत्य असेल ते ग्रहण करून वरकड भटजीबाबा व सैयद मुजावर व पाद्री इत्यादिकांनी आपली पोटे आयासावांचून भरण्याकरतां जे खोटे पाल्हाळ व ढोंगें ग्रंथांत लिहून लोकांस ठकविण्याचा उद्योग मांडला आहे, ती सर्व उघडकीस यावी आणि ज्या आज्ञानेंकरून सर्व मनुष्यांचा (च्या) मनात असलेल्या गोष्टी ईश्वरोक्त जाणून दृढ जाहाल्या आहेत त्याचा लोप व्हावा.'

सदर पत्रलेखक बहुतकरून दादोबा पांडुरंग हेच असावे. वरील उताऱ्यावरून दुर्गाराम मनसाराम हे मानवधर्मसभेचे प्रमुख असून त्यांच्या नेतृत्वाखाली व्याख्याने वा वादविवाद होत असत व धर्माच्या नावाखाली ज्या मूर्ख रूढी व अनाचार समाजात प्रचलित होते, त्यांच्याविरुद्ध सभेने आघाडी उघडलेली होती, या गोष्टी स्पष्ट होतात. तसेच ही सभा पत्राच्या दिनांकापूर्वी ६ महिने अगोदर म्हणजे १८४४ सालच्या मे किंवा जून महिन्यात स्थापन झालेली दिसते. २२ जून १८४४ रोजी मानवधर्मसभा स्थापन झाली, असा उल्लेख 'दुर्गारामचरित्रा'त येतो.[२]

त्याकाळी सुरत शहरातील सनातनी पक्षाचे अध्वर्यू मोठ्या देवळाचे प्रमुख गुरू ब्रीजरतनजी महाराज हे होते. त्यांचा मंत्रतंत्र, जादूटोणा यांवर विश्वास होता. दुर्गाराम मनसाराम प्रभृती सुधारकांशी त्यांचे वादविवाद होत. मानवधर्मसभा स्थापन झाल्यावर तिच्या चालकांनी भित्तिपत्रके लावून सनातनी मंडळींना आव्हान दिले की, त्यांनी मंत्रतंत्र, जादूटोणा यांची सत्यता जाहीर रीतीने पटवून द्यावी. ही भित्तिपत्रके फडकताच ब्रीजरतनजी महाराज यांनी जादूगारांनी व मांत्रिकांनी आपल्या शक्तीची प्रचीती जाहीर रीतीने पटवून द्यावी, असे जाहीरनामे सर्वत्र

लावले. सुरतेत अशी प्रचीती देणारा माणूस मिळेना. पण बडोद्याचा 'वज्याराम भडाक' (अथवा लालजी भडाक) या माणसाने ते आव्हान स्वीकारले. लाल भडाकची अशी प्रसिद्धी होती की, तो देवीचा परम भक्त असून अनेक चमत्कार करून दाखवितो, लोकांच्या इच्छा पूर्ण करतो.

लालजीला दिवसाला पाच रुपये द्यायचे, असा करार करून ब्रीजरतनजी महाराजांनी त्याला सुरतेला बोलावून घेतले.

ब्रीजरतनजींच्या इच्छेनुसार लाल भडाक बडोद्याहून सुरतेस आला. त्याच्या मंत्रसामर्थ्याचे प्रयोग दुर्गाराम मेहेतांच्या उपस्थितीत व्हावयाचे ठरले. 'प्रभाकरा'त वरील पत्रानंतर एक वर्षाने प्रसिद्ध झालेल्या 'एक परभू'च्या पत्रात या जाहीर प्रयोगाची तपशीलवार हकीगत आढळते.[3] या पत्रानुसार हा प्रयोग २३ नोव्हेंबर (१८४५) रोजी झाला. सभेला ४ हजार लोक जमले होते. लालभडाक याने जायफळ, सुपारी यांसारख्या छोट्या वस्तू घेऊन त्या नाहीशा करणे व पुन्हा उत्पन्न करणे यांसारखे प्रयोग करून दाखविले. पत्रलेखकाने या प्रसंगीचा नेमका संवादही दिला आहे. लालजीचा प्रयोग न डगमगता न्याहाळणारे मेहेताजी लालजीस म्हणाले,

'ही तुमची हातचलाखी आहे. दुसरे काही नाही. तुम्ही तुमच्या हातांत सुपारी घेऊन मंत्रानंतर ती माझ्या हातांत द्या. मग तुमच्या मंत्रबळाने ती माझ्यापासून उडवा. मात्र प्रथम आपण स्वत:पाशी कोणतीच वस्तू ठेवलेली नाही हे दाखवा. आपल्या हातांनी कसलीही गडबड करू नका.'

अशा रीतीने मेहेताजीने लालजीस कब्जात घेतला. त्या वेळेस तो लाचार होत्साता मेहेताजींच्या कानांत सांगू लागला,

'मी तुम्हास शरण आहे. माझी अबरू घेऊं नका. मला महाराजांचे (ब्रीजरतनजींचे) घरांतून बहुत पैका मिळावयाचा आहे. तो सर्व खोटा होईल. म्हणोन तुम्ही मजला साह्य करा.'

मेहेताजी म्हणाला की,

'मी मानवधर्मसभेचे काम चालविणारा आहे. ह्मणोन माझ्याने अनृत बोलवणार नाहीं, आणि या सृष्टींत अनृत बोलणें मोठें पाप आहे. सबब ह्या कामांत तुह्मांस मजकडून साह्य होणें कठीण.'

तिथे दिनमणीशास्त्री होते. त्यांनी लोकांस जाहीर केले की, ज्या कारणास्तव मेहेताजीस येथे बोलाविले आहे, ते लालजी भडाक सिद्ध करू शकला नाही.

यावर लालजी भडाक म्हणाला की, 'मला देवीचे साधन करावयाचे आहे. ते मी तीन दिवसपर्यंत करीन. मग तुम्हास चमत्कार दाखवीन.'

परंतु त्याला कसलेच चमत्कार दाखविता आले नाहीत. तेव्हा मेहेताजींनी चार दिवस वाट पाहून खडर्चावर एक 'जाहीर खबर' तयार केली आणि तिच्या नकला शहरातील दारांवर लावल्या. या 'खबरखडर्चा 'चे सार असे :

'गोपीपुऱ्यात बडोद्याहून आलेला लालजी भडाक हा हातचलाखी करतो. जादूमंत्र जाणत नाही. तेव्हा त्याच्या नादीं लोकांनी लागू नये.'

या खडर्चाखाली सही होती : 'दुरगाराम मन्छाराम, मानवधर्मसभेचा दप्तरदार.'

हा पत्रलेखक पुढे लिहितो, 'किती एक लोकांचे म्हणण्यावरून आम्ही असे ऐकिलें होतें कीं, येथील सरकारी कारकुनादि लोकांनी लालजी भडाकास अशी विनंती केली कीं 'तुम्ही आपल्या मंत्रसामर्थ्यें मेहेताजीचे नाक, कान, हात, पाय यांतून कोणतेही अवयवास कांहीं चिन्ह कराल तर आम्ही तुम्हास टीप (वर्गणी) करून पुष्कळ रुपये जमा करून देऊं.'

लालजी भडाक म्हणाला की, 'ज्या रोजी मी येथून जाईन त्या रोजी मी आपल्या घरांत लिंबू कापीन, तेणेंकरून मेहेताजींचे नाक कापेल.'

कितिएकांस तो असे म्हणत असे की, 'मेहेताजीस मी एक लंबपुच्छ करीन व एथून उडवून कलकत्त्यांत टाकीन.'

'...हा लालजी भडाक मुंबईस जाऊन दहा रोज जाहाले परंतु मेहेताजीस तर काहीच जाहालें नाही.'

दुर्गाराम मेहेता आणि लालजी यांच्या तीन-चार खाजगी भेटीही झाल्या होत्या. अशा एका भेटीत लालजी मेहेताजीस म्हणाला, 'मी हातचलाखी चार वेळ करितों. परंतु ढोरासारखी अज्ञानी मनुष्यें माझे येथें येऊन मला रुपये देतात.' ह्या खाजगी भेटीच्या वेळीही आपण उपस्थित होतो असे पत्रलेखकाने नमूद केले आहे.

लालजी मुंबईस गेला, हे कळल्यावर मुंबईच्या हिंदू व पारशी लोकांना आधी जागे करण्यासाठी हे पत्र लिहिलेले होते. पत्रात शेवटी म्हटले आहे, 'जितक्या उतावळीने हें पत्र छापवेल तितक्या त्वरेनें प्रसिद्ध करावें. कारण विलंब जाहाला असतां बहुतेक लोकांचे पैक्याचा नाश होईल.'

सुरतेहून चार-पाच हजार रुपये तरी उकळण्याची लालजीची इच्छा होती, पण ती सफल न होता त्याला सुमारे तीनशे रुपये मिळाले असावे.

वर उल्लेखिलेली दोन्ही पत्रें विस्तृत आहेत. या दोन पत्रांच्या दरम्यान लालजीच्या लीला सांगणारे बोलके पत्र 'प्रभाकरा'त प्रसिद्ध झाले आहे, ते असे :–

प्रभाकर कर्त्ते यांस

विनंती विशेष. सुरत मजकुरीं लाल भडाक नामें एक ढोंगी मनुष्य येऊन लोकांस फार ठकवीत आहे. लोकांत असे त्याणें प्रसिद्ध केलें आहे कीं मला वेंचराजी माता प्रसन्न आहे. जर गाढवें गूळ हगतीं तर कैकाडी भीक मागते ना. असो. अवांतर कोणास प्रसन्न होत नाहीं ही गोष्ट खरीच. परंतु सदर ढोंगी मनुष्यापाशीं जादूदेखील नाहीं. दोन-चार मनुष्यें जवळ आहेत. ते कोणी गृहस्थ आला म्हणजे बाहेरचे बाहेर हकिकत विचारून घेऊन खुणेने त्या ढोंगी मनुष्यास वर जाऊन खबर देतात. हातचलाखींने सुपारी फुलें वगैरे काडितो असा धौर्त्याने नेटींव लोकांस ठकवीत आहे. हाय, हाय, विस्मयाची केवढी गोष्ट आहे पाहा! हे नेटींव लोक किती अज्ञानी आहेत बरें. आपले मूर्ख मनुष्य भजनी लागून व त्यास आश्रय देऊन आपल्या अज्ञानपणास उघडकीस आणितात आणि आमच्या बायकांस त्याजकडे जाण्यास मुभा देतात. एका दिवशीं कोणी एक दक्षणी स्त्री त्याचे घरीं गेली आणि सांगितले, मला मूल होत नाहीं. तेव्हा त्याणे तिजपासोन नारळ घेऊन तिला सांगितले की तूं तुळशीतली माती व तुळशीची पाने व डाव्या पायाचें नख व रुपये पाच घेऊन अमूक वेळेस माझे घरीं ये. असे सांगून डोळ्यांची खूण केल्यानंतर ती उठोन गेली. त्याचे घरी बहुधा जनानी जत्रा फार. येका दिवशीं एक गुजराथीण मुल मागण्याचे इत्सेने आली असतां तिजला सांगितलें कीं एक रुप्याचा वाडगा आणि फुलें, सुर्ती रुपये अकरा व गाईचें तूप ३ सेर आणि गहू अदमण असे घेऊन अमूक वेळेस ये. अशी माझे देखतां स्पष्ट न सांगतां नजरेने खूण केली. आतां या सदरहू आचरणावरून या मनुष्यापाशीं काय इलम आहे, तो उघडच दिसतो. असे असतां हे नेटींव लोक अशेले मनुष्याचे नादीं लागतात तेव्हां यांचा अज्ञानपणाची शिमा जाली. स्त्रियांनीं असले मनुष्याचे नादीं लागल्यानें मोठे अनर्थ व अपकीर्ती होत्ये, हे नेटीव लोक समजत नाहींत, हे विनंती.[४]

या लाल भडाक प्रकरणाचे पडसाद मिशनरी मंडळीने चालविलेल्या 'ज्ञानोदय' पत्रातही उमटलेले दिसतात. वर उल्लेखिलेले 'एक परभू'चे पत्र त्या पत्रात समग्र उद्धृत करण्यात आले होते.[५] मात्र या जागृतीचा फार मोठा परिणाम झाला, असे दिसत नाही. कारण 'माहितगार हिंदू' या सहीचे एक पत्र या प्रकरणी ज्ञानोदयात पुढे प्रसिद्ध झालेले होते. त्याचा आशय असा होता : सुरतेतील लाल भडाक हा मांत्रिक सांप्रत मुंबईस आलेला आहे. तो बाहेर कोटात (फोर्टमध्ये) राहतो; परंतु सारी मुंबई व्यापून राहिला आहे. केवळ भोरप्यासारखा खेळ आहे, तेव्हा लोकांनी त्याच्या ठकबाजीला भुलू नये, असा इशारा शेवटी दिलेला आहे.[६]

वर ज्याप्रमाणे दुर्गाराम मेहेता यांनी लाल भडाक याची भोंदूगिरी उघड केली, त्याच धर्तीवर 'ज्ञानोदया'च्या त्या वेळच्या संपादकांनीही त्याची प्रत्यक्ष

मुलाखत घेऊन त्याला लटका ठरविला होता. या बाबतीत 'ज्ञानोदया 'वरून 'प्रभाकरा 'त उद्धृत केलेला काही मजकूर असा–

'थोडचा दिवसांमागें आम्ही ठाण्यास असतां ऐकण्यात आलें कीं लालजी भडाक पोटासाठी ढोंग माजवून लोकांस फसवीत असतो आणि ज्यांणी त्याचीं कृत्यें पाहिलीं त्यांतील कित्येकांची खात्री झाली कीं याचें अमानुष कर्म आहे. तो त्या लोकांशीं बोलला कीं म्या कित्येक साहेबलोकांची देखील खात्री केली आहे आणि माझ्याशीं कोणी एतद्देशीय लोक इंग्लिश भाषा बोलतो, तर ती मला समजत नाही खरी; परंतु कोणी साहेब लोक बोलतो तर साफ समजतो. काहीं एक लोकांनी मला सांगितले कीं तुम्ही त्याची भेट घेऊन परीक्षा करा.'[७]

लोकांच्या म्हणण्याप्रमाणे या संपादकांनी लाल भडाक याची भेट घेण्याचे ठरविले. तो मंत्रतंत्र करून दाखवितो, त्या ठिकाणी मुळातच चोरून तयारी करून ठेवीत असेल, असे वाटून संपादकांनी लालजीला आपल्या बंगल्यावर बोलाविले. पण तो येण्यास तयार झाला नाही. शेवटी तेच स्वतः लालजीच्या बिऱ्हाडी गेले. त्याची भेट घेतली. 'तो अंगाने धष्टपुष्ट आणि रंगेला गुजराथी ब्राह्मण सुमारे चाळीस वर्षांचा आहे.' असे वर्णन संपादकमहाशयांनी केलेले आहे. तो पडद्याचा गाभारा करून बसला होता. तीन बाजू पडद्यांनी बंद केल्या होत्या. त्याला इंग्रजीत प्रश्न केले, तेव्हा हात व मान हलवून 'भाषा येत नाही' असे त्याने सुचविले. 'आपण महासामर्थ्यवान आहां. इंग्लिश भाषा आपणांस मंत्रोपायाने यायला हरकत नाही' असे म्हणताच 'मंत्र व्यर्थ आहे' असे तो म्हणाला. त्याने पुढे सांगितले :

'माझी देवी आहे आणि जे समजलें पाहिजे तें तो मला कळवित्ये आणि तिच्या साह्यतेनें मी चमत्कार करितों.' हें ऐकताच संपादकांनी प्रश्न केला, 'तुमच्या देवीस इंग्लिश समजण्याची शक्ती नाही काय?' परंतु याचे उत्तर त्याने बरोबर दिले नाही.

तेव्हा लालजी आपणास इंग्रजांनी बोललेली इंग्रजी भाषा कळते, अशी जी फुशारकी मारीत होता, ती भ्रामक आहे, हे उघड झाले. पुढे संपादकांनी विचारले, 'अंध, पंगू यांना बरे करण्याविषयी तुमचा काही यत्न आहे?' लालजीने उत्तर दिले, 'ही शक्ती मला कोठची?'

वस्त्रातून सुपाऱ्या काढणे यांसारखे नेहमीचे चमत्कार करून दाखविण्यास तो तयार होता. परंतु त्याहून वेगळे कोणी फर्मावले तर मात्र 'जमणार नाही,' असे म्हणे. 'पडद्यांच्या मखराबाहेर येऊन खुर्चीवर बसून जादू दाखवा' असे सांगितल्यावर 'लांकडी खुर्चीवर बसले असतां देवी सहाय होत नाही' असे त्याने उत्तर दिले. 'झांकलेल्या मुठीतली आंगठी मी दुसऱ्याच्या अंगावर पडेल असे करतो'

असे त्याने म्हटल्यावरून एकाने बोट पुढे केले. पण हेही त्याला जमले नाही. तेव्हां तो ठक आहे, हे सर्वांना कळून चुकले. त्याला अधिक छेडल्यावर तो म्हणाला, 'असे करण्याची शक्ती मजमध्ये असती तर मग पोटासाठी कशाला फिरतो ? पाहिजे तितके सरकारी भांडारांतून रुपयेच आणविले नसते काय ?'

सूज्ञांनी याचे स्तोम माजवू नये, अशी विनंती करून हा मजकूर पूर्ण होतो. त्या काळी 'ज्ञानोदया' चे संपादक रे. आर. डब्ल्यू. हचूम हे होते. कारण '१८४४ पासून ते आजदिवसपर्यन्त हे साहेब (हचूम) ज्ञानोदयाचे कर्ते होते' असा उल्लेख ज्ञानोदयाच्या २–१०–१८५४ च्या अंकात आलेला आहे.[८]

यानंतर १८४७ च्या 'प्रभाकरा'त 'तुमचा मित्र ढोंगाचा त्रासक' याचे पत्र आले आहे. त्यात या प्रकरणी पुढील मजकूर आढळतो :

'सुमारे दीड वर्षावर सुरतेला लाल भडाक नावाचा एक ढोंगी मला देवी प्रसन्न आहे म्हणून बलगना करीत असे. त्याने सुरतेतून रुपये ४००० चार–सहा महिन्यांत लुटले आणि कित्येक स्त्रियांस भ्रष्ट केलें ...तो काहीं दिवस आणखी सुरतेस राहिला असता तर किती लोकांचे संसार धुळीस मिळाले असते.'[९]

अशा ढोंगी लोकांचा सरकारने बंदोबस्त करावा असे सांगताना या पत्रात म्हटले आहे, 'इंग्रज सरकार रयतेस कोणतेही रीतीनें दगा होऊं नये व घात होऊं नये म्हणून फार मेहेनत घेते. ती अशी की ठक लोक व बालकन्यावध करणारे लोक यांजपासून तीं साहसें घडूं नयेत म्हणून जागोजाग चौकशी होऊन ती साहसकृत्य बंदच करीत आहे. हिंदूशास्त्राप्रमाणें सती जाणें हें जाणून प्राणहत्या करणे नीट नाहीं म्हणून ते साहस आपले अमलांतून बंद केलें आहे, पण परराज्यांतही (संस्थाने वगैरे कंपनी सरकारच्या ताब्यात नसलेल्या मुलुखात) चालेल तितका उपाय चालवून बद करीत आहे. सबब आह्मास सरकारांत रडगाणें सांगावयास मोठी आशा आहे. ती अशी कीं, ज्याप्रमाणें सरकार सदरहू अन्वये करीत आहे, त्याप्रमाणें हे जादुगार वगैरे जे ढोंगी लोक अज्ञान लोकांस सर्वस्वी नागवितात; किंबहुना त्यांचे जीवही घेतात अशा लोकांविषयीं बंदोबस्त केला पाहिजे''[१०]

यानंतर या लाल भडाक प्रकरणाचे पडसाद वृत्तपत्रातून तरी उमटलेले पाहण्यात आले नाहीत. गेल्या शतकाच्या पूर्वार्धात समाजधुरीणांनी बुवाबाजीची समस्या सोडविण्यासाठी जनजागृतीचे कसे प्रयत्न केले हे या प्रकरणावरून दिसून येते. बुवाबाजीची समस्या आपल्या समाजात पुनःपुन्हा डोके वर काढीत असते. जागृत पत्रकार आपापल्या परीने तिचा समाचार घेत असतात, तरीही बुवाबाजी बोकाळते. एकोणिसाव्या शतकांत परके साहेब आणि मिशनरी लोक, मतलबीपणे का होईना, या प्रकारांचा निषेध करीत असत. पण आजकाल अमेरिकन तरुणतरुणीही

'हरे राम, हरे कृष्ण' अशी भजने म्हणत या ढोंगधत्तुऱ्यात सामील होताना दिसत आहेत. भोंदूंनी फसवावे आणि दुधखुळ्यांनी फसावे, हा प्रकार असाच जगाच्या अंतापर्यन्त चालत राहणार काय ?

संदर्भ

१. **प्रभाकर,** पुस्तक ४, कागद ११ (५ जाने. १८४५).

२. महीपतराम रूपराम, **मेहेताजी दुर्गाराम मंछाराम चरित्र,** अहमदाबाद १८७९, पृ. २५.

३. **प्रभाकर,** पु. ५, का. ११, (४–१–१८४६),

४. **तत्रैव**, पु. ५, का. ९ (२१–१२–१८४५).

५. **ज्ञानोदय,** पु. ५, अं. २ (१५–१–१८४६).

६. **तत्रैव,** पु. ५, अं. ४ (१६–२–१८४६).

७. **प्रभाकर,** पु. ५, का. १८ (२१–२–१८४७)

८. **ज्ञानोदयाचीं पहिलीं शंभर वर्षे,** संपा. भा. पां. हिवाळे, मुंबई १९४२, पृ. ५१.

९. **प्रभाकर,** पु. ५, का. ४२ (८–८–१८४७).

१०. **तत्रैव,**

५. परदेशपर्यटन आणि प्रायश्चित्ते

'काशीस जावे; नित्य वदावे' अशी म्हण पूर्वी प्रचलित होती. कारण हे जाणे घडेल तेव्हा घडेल, अशी स्थिती होती ! त्या काळी दळणवळणाची साधने फार कमी होती. वाटेत चोरलुटारूंचे भयही असायचे. त्यामुळे काशीयात्रा करून माणसे हातीपायी सुखरूप घरी आली की, मावंदे घालायची, गावजेवणं घालायची. आजकाल काशीच काय; पण अमेरिकाही कठीण राहिलेली नाही. एखाद्या मुंबईच्या शेटचाकडे लग्नकार्य झाले तर आजचे जोडपे मधुचंद्रासाठीसुद्धा सहज परदेशाची वारी करून येते.

धर्म बुडेल !

पण एकोणिसाव्या शतकात परदेशवारी जशी अपूर्वाईची तशीच कठीणाईचीही होती. परंतु त्याचे कारण दळणवळणाची साधने सुकर नव्हती, एवढेच केवळ नव्हे; तर त्या काळी धार्मिक आणि सामाजिक निर्बंध मोठे कडक होते. अटकबंदी होती अटकेपलीकडे माणूस गेला की तो बाटला असे समजत. जातीजातींच्या व्यवहारात धार्मिक बंधनांचे प्रस्थ होते. सोवळचाओवळचाचे बंड विशेषच होते. माणूस परदेशातून आला तर त्याला शिवत नसत, घरात घेत नसत; मग पंक्तीला घेऊन

जेवणखाण करण्याची गोष्टच सोडा! यथासांग प्रायश्चित्त घेऊन जातभाईंना भोजन घालीपर्यंत माणूस बहिष्कृतच मानला जाई. प्रायश्चित्त न घेतलेल्या व्यक्तीवरोबर साधे चहापान घडले, तरी त्याही माणसाला अपांक्त करीत. अशा स्थितीत परदेश–गमनाची सुसंधी आयती चालून आली तरी तिचा फायदा घ्यायला माणसे कचरत असत. हिंदुधर्माच्या नावाखाली स्वतःवर घालून घेतलेली ही अटकबंदी स्वतःच्याच पायावर धोंडा पाडून घेण्यासारखी होती. एकोणिसाव्या शतकातील मराठी वृत्त–पत्रांच्या संचिका चाळताना या बाबतीतली एकेक प्रकरणे वाचायला मिळतात. भल्याभल्यांना या अटकबंदीचा जो अनन्वित जाच सहन करावा लागला तो पाहिला की एकीकडे विस्मय वाटतो, तर दुसरीकडे प्रगती खुंटवणाऱ्या आणि कधी कधी वृथाच जिवलगांची तुटी करणाऱ्या या रूढीची चीडही येते.

धर्म बुडेल या समजुतीखातर ज्यांनी विलायतचो वारी करण्याचे टाळले, त्यांत अग्रगण्य म्हणून आपले सातारचे छत्रपतीही मोडतील. इंग्रज सरकारने पुढे ज्यांना अन्यायाने पदच्युत केले, त्या प्रतापसिंह महाराजांना विलायतेत जाण्याची सूचना करण्यात आलेली असावी. त्यांच्या १५–११–१८३० या तारखेच्या रोज–निशीतील नोंदीचा आशय असा आहे : विलायतेत जाऊ नये असे नाही, पण पैका नाही, शिवाय धर्मास अवघड ! (**पेशवेदप्तर**, क्र. ४२, पृ. ५९). एक सधन हिंदू गृहस्थ सहकुटुंब, नोकराचाकरांसह विलायतेस जाणार होता; पण आपल्याला चालणारे अन्नपदार्थ आणि अन्य सोयी तिथे असणार नाहीत, म्हणून त्याचे जाणे रहित झाले, असा उल्लेख 'मराठी ज्ञानप्रसारका' तील एका लेखात करण्यात आलेला आहे (जुलै १८५१, पृ. १२८). यापूर्वी सामळदास देसाभाई हा नडियादचा भाटिया गृहस्थ इंलंडला गेला होता, तो 'ट्रायंफ' या गलबताने परत आला. तिकडील चित्तचक्षु चमत्कारिक माहिती त्याच्या मुखाने ऐकण्यासाठी बरीच मंडळी त्याच्या घरी गेली होती, हे सांगताना दर्पणकर्त्याने म्हटले होते, 'सदर गृहस्थ जातीचा अभिमान सोडून व समुद्राचे भय न बाळगून' तिकडे गेला. (**दर्पण**, ४ जुलै १८३४).

विष्णुदास भावे यांचा नकार

स. १८५३ साली मुंबईस विष्णुदास भाव्यांच्या नाटचप्रयोगानंतर बडीबडी जी मंडळी डॉ. भाऊ दाजींबरोबर रंगपटात आली. त्यांत गव्हर्नरसाहेबांचे युरोपियन सेक्रेटरीही होते. ते खूष होऊन विष्णुदासांना म्हणाले, 'हा खेळ घेऊन तुम्ही विलायतेस जाल, तर तुम्हांस फायदाही बराच होऊन कीर्ती होईल.' पण धर्म बुडेल या कारणास्तव विष्णुदासांनी नकार दिला होता. (**नाट्यकवितासंग्रह**,

१८८५– 'प्रस्तावना', पृ. ८).

लोकहितवादींपुढील पेच

विलायतच्या वारीच्या संदर्भात गोपाळराव हरी देशमुख ऊर्फ लोकहितवादी यांची अगदी विचित्र कुचंबणा झाली. १८७३ च्या फेब्रुवारीत पार्लमेंटची फायनान्स कमिटी बसणार होती. तिच्यापुढे साक्ष देण्यासाठी विलायतेस जाण्यास तयार आहात का, अशी विचारणा लोकहितवादींनीना मुंबई सरकारने केली. ही विचारणा झाली त्याच्या आधी लोकहितवादींचे चिरंजीव कृष्णराव विलायतेतून आले होते आणि प्रायश्चित्तपूर्वक पावन होईतो त्यांना काही महिने दूरही ठेवावे लागले होते, पण यात आणखीही गोम होती : विलायतेत शिक्षणासाठी निघाल्यावर बोटीतून वा नंतर आपल्या पत्रामधून कृष्णराव स्वधर्मनिष्ठेची ग्वाही देत असत. उदाहरणार्थ, १८६९ सालच्या जुलैमध्ये त्यांचे आपल्या आईला लिहिलेले पत्र 'इंदुप्रकाश' मध्ये प्रसिद्ध झाले होते. त्यात त्यांनी आगबोटीवर स्नानसंध्या, गीतापाठ, भोजन वगैरे बाबतीत आपण ब्राम्हणधर्म यथासांग पाळतो, असे म्हटले होते. पण हे म्हणणे सत्यापलाप करणारे आहे, असे मत ख्रिस्ती पत्रकर्त्याने व्यक्त केले होते (**ज्ञानोदय,** १५–७–१८६९). पुढे इंग्लंडात गेल्यावर कृष्णराव बहकले. भारतात आधीच विवाह होऊन मूल झालेले असताही ते एक गोरी मडुम परत येताना घेऊन आले. मेरी कार्पेन्टरबाईच्या मध्यस्थीने तिची सालंकृत बोळवण करावी लागली आणि पुन्हा प्रायश्चित्ताचाही जबर भुर्दंड सोसावा लागला. अशा विचित्र स्थितीत असणा-या लोकहितवादींना सरकारी विचारणा आली होती. प्रायश्चित्ताशिवाय पंक्तिपावन करून घेण्यासंबंधीच्या परिपत्रकावर पन्नास जणांच्या सह्या मिळाव्या अशी खटपट त्यांनी पुण्याच्या सार्वजनिक सभेमार्फत करून पाहिली (**ज्ञानोदय,** १–१–१८७२); पण एकूण ती यशस्वी ठरली नाही. नकार कळविताना त्यांनी सरकारला जे उत्तर दिले, त्याचा सारांश असा होता–

मुलगा कृष्णराव हा नुकताच विलायतेतून आला, तेव्हा अहमदाबादच्या व बडोद्याच्या ब्राह्मणांनी त्रास दिला. ८ नोव्हेंबरला बडोदेकर विद्वान ब्राह्मणांची सभा झाली. त्यांनी संमती दिली नाही. श्रीमंत रघुनाथराव विंचुरकर यांच्या मार्फत नाशिककर ब्राह्मणांची अनुमती मिळवण्याचा प्रयत्न केला, पण ती मिळाली नाही. पुणे सार्वजनिक सभेकडूनही काही आश्वासन मिळाले नाही; तेव्हा 'माझ्याने जाववत नाही' (**नेटिव ओपीनियन,** १६–९–१८७३). लोकहितवादींच्या या पडखाऊपणाबद्दल अर्थातच सुधारकांनी त्यांना दोष दिला. 'बॉम्बे गार्डियन' या पत्राने सरकारला चेतावणी दिली होती : ' Men that are cast–ridden to this extent are not the best men for judgeships.' गार्डियन पत्राच्या या

कुटिल चेतावणीवर पुण्याच्या 'दंभहारका' ने टीका केली होती. (२५–१–१८७४).

दादाभाई बाटतील !

पुढे ज्यांनी दीर्घकाळ विलायतेत ठाण मांडून भारतीय स्वातंत्र्यासाठी खूपच जागृती केली, त्या दादाभाई नौरोजींच्या विलायतवारीला पहिल्या वेळी तरी मोडताच घातला गेला होता. दादाभाईच्या हुशारीवर तत्कालीन विद्याखात्याचे प्रमुख सर अस्किन पेरी हे खूष होते. दादाभाईनी बॅरिस्टरीच्या अभ्यासासाठी विलायतेस जावे, अशी खटपट या उदारमनस्क साहेबाने केली; पण त्याच वेळी दोन पार्शी तरुण बाटून ख्रिस्ती झाले. मोठा गवगवा झाला. सर जमशेटजी जिजीभाई–सारख्यानी त्याचा धसका घेतला. दादाभाईसुद्धा विलायतेत जाऊन बाटतील, म्हणून त्यांनी दादाभाईना काहीच सक्रिय उत्तेजन दिले नाही आणि दादाभाईंचा बेत रद्द झाला. (रं. मो. महाजनकृत **दादाभाई**...चरित्र, १८९२, पृ. ९–१०). पुढे याबाबतीत काही सुधारणा घडत गेली. मि. ठक्कर यांच्याबरोबर विष्णु गोविंद हा ब्राह्मणाचा मुलगा गेला व विद्यासंपन्न होऊन आला. त्या संदर्भात 'ज्ञानोदय'ने म्हटले होते की, नेटिव मुलांचा मेंदू विद्याग्रहणाच्या दृष्टीने कमी आहे, असा जो काहीं जुनाट इंग्रजांचा ग्रह आहे तो बदलेल ! (**ज्ञानोदय**, २–५–१८५९).

परदेशगमनाच्या तथाकथित पापामुळे कौटुंबिक लग्नकार्यात नसती विघ्ने उभी राहतात. बाबा पदमनजी हे जातीने सोनार. त्यांचे आडनाव मुळे असे होते. ख्रिस्ती होण्यापूर्वी त्यांचा जो पहिला हिंदू विवाह झाला, त्या वेळी अचानक एक अडचण उपस्थित झाली. त्यांचे वडील एडनला सर्व्हे खात्यात नोकरीला होते. त्यांनी तेथे अरबांच्या हातचे पाणी घेतले असणार, तेव्हा एक मोठे खेकटेच उभे राहिले. अखेर एडनला त्यांची सरबराई करणारी चाकरमाणसे स्वजातीयच होती, याची खातरजमा सरकारी कागदपत्रांच्या पुराव्यानिशी पटवली गेली आणि मगच बाबांच्या लग्नाची जेवणावळ पार पडली ! (**अरुणोदय**, पृ. ५६). ब्राह्मण जातीतल्या एका इंजिनियरला एडनला जाण्याचा सरकारी हुकूम झाला. त्याने शास्त्री-पंडितांनी स्थापन केलेल्या पुण्याच्या कल्याणोन्नायक मंडळीकडे असा प्रवास धर्मविरोधी कृत्य ठरेल काय, अशी विचारणा केली. त्र्यंबकशास्त्री शाळिग्राम यांनी तो जातिभ्रष्ट होईल, असे मत दिले; तर मोरशास्त्री साठे यांनी त्यांच्याविरुद्ध अभिप्राय व्यक्त केला. पंडितांमध्ये दुफळी होऊन धड निर्णय न होताच सभा मोडली. (**ज्ञानोदय**, १६ डिसें. १८५०)

श्रीपाद बाबाजी ठाकूर हे मराठी शाळांचे तपासनीस १८६८ साली विलायतेला सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेसाठी गेले. ते परतून काही काळ प्रायश्चित्ता-

१८८५– 'प्रस्तावना', पृ. ८).

लोकहितवादींपुढील पेच

विलायतच्या वारीच्या संदर्भात गोपाळराव हरी देशमुख ऊर्फ लोकहितवादी यांची अगदी विचित्र कुचंबणा झाली. १८७३ च्या फेब्रुवारीत पार्लमेंटची फायनान्स कमिटी बसणार होती. तिच्यापुढे साक्ष देण्यासाठी विलायतेस जाण्यास तयार आहात का, अशी विचारणा लोकहितवादींनीना मुंबई सरकारने केली. ही विचारणा झाली त्याच्या आधी लोकहितवादींचे चिरंजीव कृष्णराव विलायतेतून आले होते आणि प्रायश्चित्तपूर्वक पावन होईतो त्यांना काही महिने दूरही ठेवावे लागले होते, पण यात आणखीही गोम होती : विलायतेत शिक्षणासाठी निघाल्यावर बोटीतून वा नंतर आपल्या पत्रामधून कृष्णराव स्वधर्मनिष्ठेची ग्वाही देत असत. उदाहरणार्थ, १८६९ सालच्या जुलैमध्ये त्यांचे आपल्या आईला लिहिलेले पत्र 'इंदुप्रकाश' मध्ये प्रसिद्ध झाले होते. त्यात त्यांनी आगबोटीवर स्नानसंध्या, गीतापाठ, भोजन वगैरे बाबतीत आपण ब्राम्हणधर्म यथासांग पाळतो, असे म्हटले होते. पण हे म्हणणे सत्यापलाप करणारे आहे, असे मत ख्रिस्ती पत्रकर्त्याने व्यक्त केले होते (**ज्ञानोदय,** १५–७–१८६९). पुढे इंग्लंडात गेल्यावर कृष्णराव बहकले. भारतात आधीच विवाह होऊन मूल झालेले असताही ते एक गोरी मडुम परत येताना घेऊन आले. मेरी कार्पेन्टरबाईच्या मध्यस्थीने तिची सालंकृत बोळवण करावी लागली आणि पुन्हा प्रायश्चित्ताचाही जबर भुर्दड सोसावा लागला. अशा विचित्र स्थितीत असणा-या लोकहितवादींना सरकारी विचारणा आली होती. प्रायश्चित्ताशिवाय पंक्तिपावन करून घेण्यासंबंधीच्या परिपत्रकावर पन्नास जणांच्या सह्या मिळाव्या अशी खटपट त्यांनी पुण्याच्या सार्वजनिक सभेमार्फत करून पाहिली (**ज्ञानोदय,** १–१–१८७२); पण एकूण ती यशस्वी ठरली नाही. नकार कळविताना त्यांनी सरकारला जे उत्तर दिले, त्याचा सारांश असा होता–

मुलगा कृष्णराव हा नुकताच विलायतेतून आला, तेव्हा अहमदाबच्या व बडोद्याच्या ब्राह्मणांनी त्रास दिला. ८ नोव्हेंबरला बडोदेकर विद्वान ब्राह्मणांची सभा झाली. त्यांनी संमती दिली नाही. श्रीमंत रघुनाथराव विंचुरकर यांच्या मार्फत नाशिककर ब्राह्मणांची अनुमती मिळवण्याचा प्रयत्न केला, पण ती मिळाली नाही. पुणे सार्वजनिक सभेकडूनही काही आश्वासन मिळाले नाही; तेव्हा 'माझ्याने जाववत नाही' (**नेटिव ओपीनियन,** १६–९–१८७३). लोकहितवादींच्या या पडखाऊपणाबद्दल अर्थातच सुधारकांनी त्यांना दोष दिला. 'बॉम्बे गार्डियन' या पत्राने सरकारला चेतावणी दिली होती : ' Men that are cast–ridden to this extent are not the best men for judgeships.' गार्डियन पत्राच्या या

कुटिल चेतावणीवर पुण्याच्या 'दंभहारका' ने टीका केली होती. (२५-१-१८७४).

दादाभाई बाटतील !

पुढे ज्यांनी दीर्घकाळ विलायतेत ठाण मांडून भारतीय स्वातंत्र्यासाठी खूपच जागृती केली, त्या दादाभाई नौरोजींच्या विलायतवारीला पहिल्या वेळी तरी मोडताच घातला गेला होता. दादाभाईंच्या हुशारीवर तत्कालीन विद्याखात्याचे प्रमुख सर अर्स्किन पेरी हे खूष होते. दादाभाईंनी बॅरिस्टरीच्या अभ्यासासाठी विलायतेस जावे, अशी खटपट या उदारमनस्क साहेबाने केली; पण त्याच वेळी दोन पार्शी तरुण बाटून ख्रिस्ती झाले. मोठा गवगवा झाला. सर जमशेटजी जिजीभाई-सारख्यानी त्याचा धसका घेतला. दादाभाईसुद्धा विलायतेत जाऊन बाटतील, म्हणून त्यांनी दादाभाईंना काहीच सक्रिय उत्तेजन दिले नाही आणि दादाभाईंचा बेत रद्द झाला. (रं. मो. महाजनकृत **दादाभाई**...चरित्र, १८९२, पृ. ९-१०). पुढे याबाबतीत काही सुधारणा घडत गेली. मि. ठक्कर यांच्याबरोबर विष्णु गोविंद हा ब्राह्मणाचा मुलगा गेला व विद्यासंपन्न होऊन आला. त्या संदर्भात 'ज्ञानोदय'ने म्हटले होते की, नेटिव मुलांचा मेंदू विद्याग्रहणाच्या दृष्टीने कमी आहे, असा जो काहीं जुनाट इंग्रजांचा ग्रह आहे तो बदलेल ! (**ज्ञानोदय**, २-५-१८५९).

परदेशगमनाच्या तथाकथित पापामुळे कौटुंबिक लग्नकार्यात नसती विघ्ने उभी राहतात. बाबा पदमनजी हे जातीने सोनार. त्यांचे आडनाव मुळे असे होते. ख्रिस्ती होण्यापूर्वी त्यांचा जो पहिला हिंदू विवाह झाला, त्या वेळी अचानक एक अडचण उपस्थित झाली. त्यांचे वडील एडनला सर्व्हे खात्यात नोकरीला होते. त्यांनी तेथे अरबांच्या हातचे पाणी घेतले असणार, तेव्हा एक मोठे खेकटेच उभे राहिले. अखेर एडनला त्यांची सरबराई करणारी चाकरमाणसे स्वजातीयच होती, याची खातरजमा सरकारी कागदपत्रांच्या पुराव्यानिशी पटवली गेली आणि मगच बाबांच्या लग्नाची जेवणावळ पार पडली ! (**अरुणोदय**, पृ. ५६). ब्राह्मण जातीतल्या एका इंजिनियरला एडनला जाण्याचा सरकारी हुकूम झाला. त्याने शास्त्री-पंडितांनी स्थापन केलेल्या पुण्याच्या कल्याणोन्नायक मंडळीकडे असा प्रवास धर्मविरोधी कृत्य ठरेल काय, अशी विचारणा केली. त्र्यंबकशास्त्री शाळिग्राम यांनी तो जातिभ्रष्ट होईल, असे मत दिले; तर मोरशास्त्री साठे यांनी त्यांच्याविरुद्ध अभिप्राय व्यक्त केला. पंडितांमध्ये दुफळी होऊन धड निर्णय न होताच सभा मोडली. (**ज्ञानोदय**, १६ डिसें. १८५०)

श्रीपाद बाबाजी ठाकूर हे मराठी शाळांचे तपासनीस १८६८ साली विलायतेला सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेसाठी गेले. ते परतून काही काळ प्रायश्चित्ता-

शिवाय राहिले; पण पुढे त्यांना स्वतःलाच दुसरे लग्न करण्याची वेळ आली व शिवाय आपले बंधू बाळाजी बाबाजी ठाकूर यांच्या मुलामुलींची लग्ने, मुंजी यांना आप्तेष्टांकडून आडकाठी येण्याची चिन्हे दिसू लागली. त्यांनी शृंगेरी मठाचे शंकराचार्य विद्यानरसिंह भारती यांच्याकडून करमाळे येथे ब्राह्मणभोजनपूर्वक प्रायश्चित्त घेतले. (**नेटिव ओपीनियन**, १४–५–१८७८)

केवळ हिंदूंसाठी सोवळी बोट ?

करसनदास मूळजी हे कपोल वाणी सुधारक इंग्लंडला गेले होते. त्यांनी आपल्या प्रवासाचे वर्णनही लिहून ठेवले आहे. त्यांतला त्यांचा एक अनुभव बोलका आहे : एडगला आगबोटीवर सात वाणी चढले. पिण्याचे पाणी डेकवर असे त्या पाण्याला इंग्रज प्रवासी मुद्दाम शिवत. मग ते पाणी त्या वाण्यांना चालत नसे जेवायला बसतानाही ते वाणी डोक्यावरून वस्त्र घेत. इंग्रज खलाशी ते वस्त्र काढीत. शिवाशिव झाल्याने त्यांची पंचाईत होई. (**इंग्लडचा प्रवास**, पृ. १३–१४). या या दृष्टीने १८५१ मध्ये 'मराठी ज्ञानप्रसारका'त एक निबंध आला होता. त्यांत लंडन शहरात एतद्देशीय लोकांसाठी विस्तीर्ण अंगणे व विहिरी असणारी धर्मशाळा बांधण्यात यावी, अशी सूचना करण्यात आली होती ! या सूचनेची थट्टा करताना ज्ञानोदयकर्त्याने खवचटपणे लिहिले होते : सोवळचा लोकांकरता सोवळी आगबोट बांधावी, सोवळे सेलर चाकरीस ठेवावे. इंग्लंडात धर्मशाळा बांधाल तेथे शेण, गोमूत्र, माती वगैरे पवित्र पदार्थ येथून रवाना करावे. नाहीपेक्षा 'बुद्धिवर्धक सभे' ने (मराठी ज्ञानप्रसारक सभेचे गुजराती भावंड) 'देशाटनविषये' नामक जे पुस्तक छापले आहे, ते लवकरच गांधींच्या (औषधविक्रेत्यांच्या) दुकानी पुडचा बांधण्यास पाठवावे लागेल (**ज्ञानोदय**, १–३–१८५४). पण ही थट्टा पुढे खरोखरच गंभीरपणे कृतीत उतरण्यासारखी घटना घडली ! रोहिलखंडातील बाबू गिरिधारीलाल यांनी २३ मे १८७१ च्या 'टाइम्स ऑफ इंडिया' मध्ये जाहिरात दिली होती. तिचा आशय असा होता : हिंदूखेरीज कोणीही उतारू घेतला जाणार नाही, अशी खास बोट सोडण्यात येणार होती. हिंदुधर्मानुसार लागणाऱ्या साऱ्या सोयी तीत होणार होत्या. विशेषतः स्वतंत्र स्वयंपाकघर व देवघर असणार होते. गोमांस, चरबी, कातडी, शिंगे सांसारखे जिन्नस घेण्यास बोटीवर मनाई करण्यात आली होती, शक्यतो खलाशीही हिंदू घेण्यात येणार होते. 'युरोपात प्रवासाची उत्तम संधी' असा मथळा देऊन नेटिव ओपीनियनकारांनी 'हिंदूंनी ही संधी वाया दवडू नये,' अशी भलावण केली होती (**नेटिव ओपीनियन**, २८–५–१८७१).

श्राद्धपक्षासाठी कावळे !

तत्कालीन धर्मभोळेपणा कशा विलक्षण कोटीतला होता, याची कल्पना

द्यायची तर बाबा पदमनजींच्या 'अरुणोदया'तील दोन कावळचांची हकीकत सांगण्यासारखी आहे. 'आदनात (एडनमध्ये) असताना केवळ दोनच कावळे माझ्या नजरेस पडत, ते तेथील हिंदू लोकांनी आपल्या पितरांच्या श्राद्धपक्षाकरिता मुंबईहून आणून सोडलेले होते. त्यांस राहावयास झाडचा नसल्याने ते बिचारे रस्त्यावर बसून कावकाव करीत. त्यांची स्थिती पाहून मला दया येई (१९५५, पृ. ६०).

भारतीय संस्थानिकांच्या लवाजम्यातून कित्येक ब्राम्हण आणि इतर आश्रित मंडळी यांना विलायतची वारी घडे. त्यांच्या प्रायश्चित्तांची प्रकरणे उभी राहात. खुद्द संस्थानिकांपाशी पैसा असे. इंदूर, बडोदे येथील सरकारी मंडळी किंवा खुद्द संस्थानिक परदेशी जात व आल्यावर प्रायश्चित्ताप्रीत्यर्थ पंचवीस–पंचवीस, तीस–तीस हजार खर्च करीत. होळकरांबरोबर गेलेले गणेश सीतारामशास्त्री गोळवलकर यांना परत आल्यावर संकेश्वर मठाच्या शंकराचार्यांकडून शुद्धिपत्र मिळवावे लागले होते व शिवाय पुणे, इंदूर, कोल्हापूर, वाई, सातारा, सांगली, कराड इत्यादी ठिकाणच्या ब्राह्मणांची संमती मिळवावी लागली होती. पुढील काळात अशा मंडळींना सुकरतेने प्रायश्चित्त द्यावे, म्हणून रा. सा. विश्वनाथ नारायण मंडलिक यांनी विशेष खटपट केली होती.

सयाजीरावांची पहिली वारी !

बडोद्याचे सयाजीराव महाराज हे सर्वांत प्रगतिशील नरेश म्हणून पुढे ख्याती पावले. आपल्या वासष्ट वर्षाच्या प्रदीर्घ राजवटीत त्यांनी, थोडेथोडके नव्हे, युरोपचे चौवीस दौरे केले. १८८७ साली ते प्रथम विलायतेत गेले. त्या काळच्या त्यांच्या सोवळचा कल्पना आणि तदनुसार त्यांनी केलेली कडेकोट तयारी वाचून आज आपल्याला हसूच येईल. दूधदुभत्याची केलेली सिद्धता उदाहरणार्थ सांगितली तरी पुरे ! युरोपातले दूध काही झाले तरी अपवित्र; तेव्हा त्यांनी बोटीत चार म्हशी बरोबर घेतल्या होत्या. त्यांना बोटीवरचे हवामान मानवले नाही. बिचाऱ्या एडन येईपर्यंत गतप्राण झाल्या. महाराजांबरोबर जी मंडळी गेली, त्या लोकांना स्वतंत्र घरे बांधून देण्याची तरतूदही आधी करावी लागली. महाराजांची दौरेबाजी इंग्रजांना रुचत नव्हती. पं. श्यामजी कृष्णवर्मा, मादाम कामा, वीर सावरकर प्रभृती क्रांतिकारकांशी संबंध असल्याच्या संशयामुळे इंग्रज सरकारचा महाराजांनी रोषही ओढवून घेतला होता. (व्ही. के. चावडा, **सयाजीराव गायकवाड द थर्ड**, १९७२, पृ. ७५–७६).

गायकवाड सरकारबरोबर रियासतकार सरदेसाई विलायतेस गेले होते. त्यांना कोकणातील गावी जाऊन सक्षौर प्रायश्चित्त घ्यावे लागले होते. सरदेसायांच्या आत्मचरित्रात याची इत्यंभूत हकीगत वाचावयास मिळते. सरदेसायांच्या प्राय-

श्चित्ताच्या संदर्भात 'प्रायश्चित्त न घेता खुशाल समाजात राहिलेले लोक आहेत, तेव्हा यात सुधारणा ती काय?' असा सवाल सुधारककारांनी विचारला होता (**सुधारक**, १०–६–१८९३). स. १८८६ साली डॉ. रा. गो. भांडारकर हे व्हिए–न्नाला प्राच्यविद्यापरिषदेला गेले होते. त्यांनी परत आल्यावर प्रायश्चित घेतले नव्हते. हरिश्चंद्र चिंतामण हे मुंबईचे फोटोग्राफर इंदूरकरांबरोबर विलायतेत गेले होते. परत आल्यावर त्यांची सोनार जात काही दिवस स्वस्थ होती; पण पुढे उलटसुलट चर्चा वृत्तपत्रांतून सुरू झाल्या. विनायक जगन्नाथ शंकरशेट हे ज्ञातीचे पुढारी होते. त्यांच्या नेतृत्वाखाली ज्ञातीची सभा झाली व निर्णयच झाला नाही. तेव्हा 'विनायकरावांचे तीर्थरूपांप्रमाणे (नाना शंकरशेटप्रमाणे) ज्ञातीय वजन नाही' असा शेरा वृत्तपत्रांनी मारला होता. (**ज्ञानोदय**, १५–३–१८७२). पुढे हरिश्चंद्र चिंतामण हे पत्नी आणि दोन मुले यांच्यासह इंग्लंडला गेले होते. सर जमशेटजी जीजीभाई हे विलायतेची वारी करून आले. त्यांचा लवाजमा अर्थातच मोठा होता. त्यात एक न्हावी होता. तो स्वदेशी परतताच त्याच्या ज्ञातीने त्याला वाळीत टाकले. तेव्हा सर जमशेटजींच्या साहाय्याने त्याने ज्ञातीला बुंदीच्या लाडवांचे भोजन घातले. यावर 'प्रभोदय'काराने म्हटले होते, 'त्या हजामाचा वाट लागलीच उतरला. केवढा हा बुंदीचा जोर. बुंदी वाटास हटविती!'(**प्रभोदय**, १८–५–१८६१). अगदी पहिल्या काळी सातारच्या पदच्युत राजाची–प्रताप–सिंहाची वाजू मांडण्यासाठी गेलेले विख्यात रंगो बापूजी यांनी प्रवासात यथासांग हिंदुधर्म पाळला होता, परंतु परत आल्यावर काही महिने प्रायश्चित्ताच्या घोळाने त्यांचे हाल केले. पुढे प्रायश्चित्त देऊन त्यांना ब्राह्मणांनी पंक्तिपावन करून घेतले; पण त्यांना प्रायश्चित्त देणाऱ्या ब्राह्मणांवरच बहिष्कार पडला!

महात्मा फुले यांची स्वतंत्र दृष्टी

एकोणिसाव्या शतकात विलायतेची वारी करणारांत (१) संस्थानिक व त्यांचे आश्रित (२) व्यापारी (३) सिव्हिल सर्व्हिस परीक्षेच्या, बॅरिस्टरीच्या, वैद्यकीय पदवीच्या अभ्यासासाठी जाणारे प्रौढ विद्यार्थी यांचाच भरणा प्रामुख्याने असे. तत्कालीन सार्वजनिक संस्था, एतद्देशीयांना वरचे हुद्दे दिले जात नाहीत म्हणून तक्रार करीत. रोमेशचंद्र दत्त यांच्या 'इंग्लंड ॲन्ड इंडिया' (लंडन, १८९७) या ग्रंथात त्यांनी म्हटले आहे, 'It is impossible to say that an honest endeavour has been made within the last sixty years to give to the people of India a fair share of higher appointments.' (पृ. १५२). दत्तांनी या संदर्भात आंकडेवारीही दिलेली आहे. पांढरपेशांच्या परदेशगमनामागे प्रायः सरकारी उच्च अधिकारपदे मिळविणे हाच हेतू असे. या ध्येयवादाहून वेगळा व द्रष्टेपणाचा ध्येयवाद म. फुले यांच्या लेखनात आढळेल. त्यांनी 'शेतकऱ्याचा असूड'

मध्ये अटकबंदीचा तीव्र निषेध केलाच आहे; पण पुढे त्यांनी असेही म्हटले आहे, 'शेतकऱ्यांच्या मुलांनी उत्तम शेती केली व लोहारी व सुतारी कामात परीक्षा दिल्यास त्यांस सरकारी खर्चाने विलायतेत शेतकीच्या शाळांत पाठवीत गेल्याने इकडील शेतकरी तावडतोब शेतकीची सुधारणा करून सुखी होतील." (**महात्मा फुले समग्र वाङ्मय,** १९६९, पृ. २६३). उच्च सरकारी अधिकारपदांच्या ध्येयवादाहून वेगळी असणारी ही फुल्यांची दृष्टी विरोधाने उठून दिसते.

व्यापारीवर्गातसुद्धा प्रारंभी तरी हिंदू गुजराती धार्मिक अडचणीमुळे मागेच पाय घेत; त्या बाबतीत पार्शी जमातच आघाडीवर होती. दर्पण, ज्ञानोदय, प्रभाकर, ज्ञानप्रकाश यांसारख्या तत्कालीन वृत्तपत्रांतून याबाबतीत उलटसुलट चर्चा येई. तीमध्ये हिंदूंच्या आत्मघातकी सोवळेपणाची निर्भर्त्सना आणि पारशांच्या उपक्रमशीलतेची भलावण सदैव केली जाई. (**ज्ञानप्रकाश**, १४–५–१८६०). हिंदूंचे काळे सैन्य परदेशात जाऊन लढते, त्याबाबतही भवति न भवति 'ज्ञानप्रकाशात' आलेली आहे (**ज्ञानप्रकाश,** १८–५–१८५७). 'सत्कले' नामक अहिंदू गृहस्थाचे पत्र 'प्रभाकर' मध्ये आले होते. त्यात म्हटले होते : 'हिंदू लोक अन्नावाचून हिंदुस्तानात तळमळतील, परमुलखात जाणार नाहीत. इंग्रज व मुसलमानांनी यांचे राज्य घेतले; पण पारशांनी तर काही घेतलेले नाही. मुंबईतील सर्व इस्टेट त्यांची आहे. काळबादेवीच्या रस्त्यावरून चालले, तर एकावर एक पारशी लोकांच्या हजारो गाड्या चाललेल्या असतात. ते वगीच्यात मौज मारतात, तर हिंदू बिचारे 'बगलमें छत्री आणि दिनवाणी मुखे' असे सिनॉरसाहेबाने दंड केला वा पगार कमी केला म्हणून धापा टाकीत चालत असतात. त्यांना विचारले, 'तुम्ही असे का ?' तर उत्तर पडते की 'सांप्रत त्या लोकांची सद्दी आहे.' पण 'त्यांची सद्दी वाढली व तुमची उतरली, हे कसे ?' शेवटी पत्रलेखक निष्कर्ष एवढाच काढतो की, हिंदू लोक परदेशगमनाला धार्मिक बंधनामुळे भितात. 'लोकाहितेच्छू' ने या पत्राला पाठिंबा देताना म्हटले होते : पारशी लोकांत संपत्ती वाढली त्याची कारणे दोन : (१) परदेशास जाण्यास मोकळीक (२) अनेक प्रकारचे उद्योग करण्याची मुभा आणि तयारी. हिंदू लोक वंशपरंपरागत एकच धंदा करतात. पारशी हे इंग्रजांप्रमाणे कोणताही धंदा करण्यात कमीपणा मानीत नाहीत. (**प्रभाकर,** ९–१०–१८४२).

पार्श्यांचा आदर्श

काही अंशी पारशी लोकांचा आदर्श पुढे ठेवून तत्कालीन पाठारे प्रभू मंडळी परदेशगमनाचा बाऊ करीत नसे. सांपत्तिकदृष्ट्याही मुम्बईकर पाठारे प्रभू सुस्थितीत होते. पाश्चात्त्य विद्येचे संस्कार पार्श्यांप्रमाणे त्यांनीच प्रथम पचविले. दादोबा देवजी हा पाठारे परभू स्वतःच्या बडतर्फीची आणि सांगलीकरांच्या एका प्रकरणाची दाद लावून घेण्यासाठी १८६० च्या सुमारास विलायतेत गेला होता. (**ज्ञानोदय,**

१५–१–१८६२). १८६४ साली परमहंससभेचे अध्यक्ष राम बाळकृष्ण जयकर आणि मोरेश्वर आत्माराम हे विलायतेस गेले होते. राजा राममोहन रॉय यांच्या इंग्लंडातील सहवासात मिस् मेरी कार्पेंटर या बाई भारताकडे आकर्षित झाल्या होत्या. राम बाळकृष्णांनी इंग्लंडमध्ये गेल्यावर त्यांची भेट घेतली आणि हिंदुस्थानातील स्त्रीवर्गाविषयी त्यांच्याशी चर्चा केली, ही गोष्ट कार्पेंटरबाईंच्या प्रवासवृत्तांतात खास नमूद करण्यात आलेली आहे (**सिक्स् मंथस् इन इंडिया खंड १ ला,** लाँगमन्स-ग्रीन, लंडन, १८६८, पृ. १७–१८). १८७४ साली मुम्बईच्या उच्च न्यायालयातील भाषांतरकार सर्वोत्तम सखाराम मानकर हे बॅरिस्टरीच्या परीक्षेसाठी जेव्हा विलायतेला गेले, तेव्हा पाठारे प्रभू ज्ञातीची प्रगतिशीलता वाखाणताना इंग्लंडला जाऊन आलेल्या आठ प्रतिष्ठित पाठारे प्रभूंचा नामोल्लेख गौरवपूर्वक केलेला आढळून येतो (**ज्ञानोदय,** १६–५–१८६४). पार्शी लोकांप्रमाणे हिंदू लोक परदेशगमन करीत नाहीत व म्हणून ते मागे पडले आहेत, हे सांगताना 'ज्ञानप्रकाश' ने इंग्लंडात गेलेल्या लोकांची ज्ञातिनिहाय व प्रांतनिहाय संख्याच दिली होती. ती वाचकांना उद्‌बोधक वाटावी.

एतद्देशीय लोकांची इंग्लंडमधील संख्या

	संभावित	चाकर	एकूण
पारशी	४५	१५	६०
हिंदू	२०	८	२८
मुसलमान	९	३	१२
			१००

हे कोणकोणत्या ठिकाणचे आहेत:– मुम्बई ८०, पंजाब ८, कलकत्ता ८, मद्रास ३, लंका १=१०० एकूण २८ हिंदूंपैकी ४ खिरस्ती झालेले आहेत.

(ज्ञानप्रकाशवरून–**ज्ञानोदय** १५–१२–१८६३).

संस्थानिकादी बडद्या मंडळींव्यतिरिक्त केवळ आजारानंतरच्या हवा पालटासाठी गेलेले एकच उदाहरण वृत्तपत्रात आढळले. राजकुमार कॉलेजचे उपप्राचार्य मोरेश्वर आत्माराम तर्खडकर हे स. १८७७ साली हवापालटाच्या निमित्ताने विलायतेत गेले होते. तर्खडकर यांचे हे उदाहरण पहिलेच आहे, असे म्हणून 'इंदुप्रकाशने' इशारा दिला होता : 'त्यांनी शरीरारोग्यतेकरिता पुन्हा त्या देशास जाण्याची आवश्यकता पडण्याची सवय ठेवू नये.' या खोचक इशाऱ्याला ज्ञानोदयानेही पाठिंबा दिलेला होता (**ज्ञानोदय,** २६–४–१८७७).

म. गांधींनाही प्रायश्चित्त

गुजराती समाजापैकी पहिल्या पिढीतील विद्वान महिपतराम रूपराम आणि करसनदास मूळजी यांच्या इंग्लंडच्या वाऱ्या खूपच गाजण्या. महिपतराम रूपराम यांना विद्याखात्याने विलायतेत पाठविले होते. १८६१ च्या एप्रिलात ते परत आले. प्रथम त्यांना सुरतेच्या ब्राह्मणांनी पंचगव्यपूर्वक प्रायश्चित्त देऊन पावन केले; पण अहमदाबादच्या ब्राह्मणांना ते काही मानवले नाही. 'ते सांप्रत त्रिशंकू राजाप्रमाणे मध्यंतरी लोंबकळत आहेत' असे वर्णन ख्रिस्ती 'सत्यदीपिके'ने केले होते. (**सत्यदीपिका**, डिसें. १८६७, पृ. १९१). करसदास मूळजी यांना राजकोटच्या वाण्यांनी पंक्तीत घेतले; पण मुंबईच्या व अन्य ठिकाणच्या कपोल वाणी मंडळींनी त्यांच्यावर कडक बहिष्कार टाकला; पण त्या निधडचा छातीच्या सुधारकाने त्यांची पर्वा केली नाही. मात्र त्यांच्या मृत्यूनंतर सनातनी लोकांनी उचल खाल्ली. त्यांच्या विधवा पत्नीने मुलांसह काशीस जाऊन प्रायश्चित्त घ्यावे आणि एक देवालय बांधण्यासाठी पाचशे रुपये द्यावे, असा त्यांनी लकडा लावला (**ज्ञानोदय,** २४–५–१८७४). अखेरीस त्या करारी करसनदास मूळजीच्या बायकोमुलांचे हाल थांबवावे, म्हणून शेठ बंगाली व शेठ डोसाभाई फ्रामजी यांनी खटपट केली आणि त्यांना नाशिक येथे प्रायश्चित्त देवविले (बी. एन्. मोतीवाला, **करसनदास मूळजी** (इंग्रजी), १९३५, पृ. ४३). गुजराती मंडळींच्या या हकीकतीबरोबर 'इंदुप्रकाशातील' एक वार्ता सांगणे उचित ठरावे : मोहनदास करमचंद गांधी (नंतरचे महात्मा गांधी) हे बॅरिस्टरीची परीक्षा देऊन विलायतेहून आले; तेव्हा परदेशगमनाच्या पापक्षालनार्थ त्यांना ब्राह्मण भोजन घालून पंक्तिपावन करून घेण्यात आले होते. (**इंदुप्रकाश**, २० जुलै १८९१)

बायकोही बरोबर असावी !

नेपाळचे महाराज दुलीपसिंघ यांची आई राणी राजकुंवर ही विलायतेत मरण पावली. तिजबरोबर गेलेल्या स्त्रिया परत आल्यावर लोक त्यांना जातिबहिष्कृत करू लागले; पण सर जंगबहादुर यांनी पोक्त विचाराने बखेडा सोडवला. धर्मांतर झाले वा मांसाहार घडला, तर माणसाला जातिबहिष्कृत करा, नुसत्या विलायतेस जाण्याने काही बाट लागत नाही, असे त्यांनी सांगितले व लोकांनी त्यांच्या मताचा मान राखला. (**ज्ञानोदय,** १–७–१८६५). परदेशी विद्याहरण करण्यासाठी गेलेली मंडळी कधी कधी मदिरा आणि मदिराक्षीच्या पाशात गुंतत. दुसरा पाश तर विशेष गुंतागुंतीचा ठरे. याचे प्रतिबिंब हरिभाऊ, गडकरी, फडके प्रभृती मराठी लेखकांच्या ललितकृतींतही पडलेले आहे. शेठ द्वारकानाथ गोपाळजी हा व्यापारी पत्नीसह मस्कतला राहून आला. तावडतोब ज्ञातिबांधवांनी गिल्ला

केला. बहिष्कार पुकारून त्या दांपत्याला नकोसे केल; पण २२ एप्रिल १८७९ रोजी मुंबईत ज्ञातिबांधवांची सभा झाली. तीत बराच खल झाला. सारासार विचार होऊन त्या दांपत्याला तर दोषमुक्त करण्यात आलेच; पण नवऱ्याबरोबर 'बायको'ही परदेशात जाईल तर फार चांगले होईल, असा सूज्ञपणाचा ठरावही पसार झाला.

मेल्यावरही अडचणी !

विलायतेच्या वारीच्या संदर्भात कित्येकदा अनपेक्षित अडचणी उपस्थित होत. दादोबा देवजी हा परभू गृहस्थ विलायतेस गेल्याचा उल्लेख वर आलाच आहे. तो कर्मधर्मसंयोगाने तेथेच मरण पावला. त्यापूर्वी असे उदाहरण घडले होते, ते म्हणजे सुप्रसिद्ध राजा राममोहन रॉय यांचे. या सुधारकाग्रणीचे निधन तेथे झाले; पण त्यांची विचारसरणी ख्रिस्ती लोकांसारखीच होती, असे म्हणून त्यांना ख्रिस्त्यांच्या कबरस्तानात पुरण्यात आले. दादोबा देवजी पडला एकनिष्ठ हिंदू ! त्याच्या दहनविधीची सिद्धताही झाली; पण त्याला मनाई करण्यात आली. त्याचे शव पेटीत भरून ते दोघा हिंदूंकरवी पुरण्यात आले. हिंदू मंडळी प्रेत उकरून दहन करतील म्हणून चांगली शवगर्ता करून त्यावर थडगे उभारले व त्याचे नाव कोरण्यात आले. यावर ज्ञानोदयकारांनी परदेशात जातिधर्माप्रमाणे सर्व गोष्टी यथासांग करता येत नाहीत, हे पुन्हा एकदा बजावले व म्हटले, 'प्राचीन हिंदुधर्म आता मरून गेला आहे व वेदरूप कबर मात्र आता राहिली आहे...लोकांना जिवंतपणी तर धर्माची अडचण होतेच; पण मेल्यावरही होते. (**ज्ञानोदय,** २५–१–१८६२)

विलायतेत जाण्याविषयी पहिल्या काळात जो कडाक्याचा विधिनिषेध पाळला जात होता, तो पुढे कमी झाला. डॉ. आनंदीबाई जोशी, डॉ. रखमाबाई यांसारख्या महाराष्ट्रीय स्त्रियाही एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरपादात परदेशगमन करून आल्या. पण प्रारंभीचा काळ मोठा बाका होता. खानपानाच्या, जातीपातीच्या निर्बंधामुळे विलायतेत हिंदू गृहस्थांची खूपच कुचंबणा होई. त्यातही भारतीय संस्कृती आणि इंग्रजी संस्कृती यांतील आचारविषयक अंतरही जाचक ठरत असे. ज्ञानोदयकाराने फार पूर्वी इशारा दिला होता की, हिंदू लोक परदेशात गेल्याने नेहमीच त्यांच्या ज्ञानाचा उपयोग देशसुधारणेसाठी करतील असे नाही. त्याने पुढे आणखीही म्हटले होते : 'यांपैकी काही ढोंगी बनतात, काही भित्रे होऊन येतात, कोणी लग्नाच्या बायकोचा त्याग करणारे होतात, **कोणाच्या मनातून स्वदेशाची प्रीती नाहीशी होते व त्यांना मायदेशी परत यावेसे वाटत नाही,' (ज्ञानोदय, १–७–१८६९).**

ज्ञानोदयातील हा उतारा म्हणजे आजच्या पांढरपेशांच्या परदेशगमनाबाबतसुद्धा एक लखलखीत आरसाच ठरत नाही का ?

६. दोन दुर्मिळ पुनर्विवाह प्रकरणे : प्रस्तावना

महाराष्ट्रात कै. बाळशास्त्री जांभेकरांच्या 'दर्पण' (स. १८३२) पत्रामधून पुनर्विवाहाच्या प्रश्नाची प्रथम प्रकटपणे चर्चा सुरू झाली. तदनंतर भाऊ महाजनांच्या 'प्रभाकर'मध्ये स. १८४८ च्या सुमारास लोकहितवादींनी 'शतपत्रे' प्रसिद्ध केली, त्यांतही या प्रश्नाला वाचा फोडली. पुढे विष्णुशास्त्री पंडित आणि महर्षी कर्वे यांनी संस्था काढून या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी भगीरथ प्रयत्न केले. सामान्यतः या सर्व गोष्टींची माहिती जाणकारांना तरी असते. परंतु एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात, 'दर्पण' आणि 'प्रभाकर' यांच्या दरम्यान या प्रश्नाची चर्चा करणारी दोन पुनर्विवाहप्रकरणे मराठीत प्रसिद्ध झालेली होती, ही गोष्ट काहीशी अल्पज्ञात आहे. त्यांपैकी १८३७ मधील प्रकरण तर अतिदुर्मिळच म्हणावे लागेल. पुण्याच्या विश्रामबागवाड्यामधील शासकीय ग्रंथालयातील दातेसंग्रहात त्याची शिळामुद्रित प्रत उपलब्ध झाली. १८४१ सालचे प्रकरण मुं. म. ग्रंथसंग्रहालयाच्या दोलामुद्रितविभागातील आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी इंग्रजी राज्याबरोबर नवे विचार आणि नवी संस्कृती आली व नवशिक्षित वर्गात आपल्या सामाजिक चालीरीतींकडे अंतर्मुख दृष्टीने पाहण्याची जी वृत्ती निर्माण झाली, तीतून अबलोन्नतीच्या समस्यांकडे लक्ष वेधले गेले. प्राचीन आर्य संस्कृतीत स्त्रियांना पुष्कळच स्वातंत्र्य असावे. गार्गीमैत्रेयीसारख्या पंडिता त्या काळी होऊन गेल्या, स्वयंवराचा प्रघात त्या काळी होता, तेव्हा स्त्रीशिक्षणाला त्या काळी बंदी नव्हती, तसेच स्त्रीला वराच्या

निवडीचे स्वातंत्र्य असावे आणि विवाहसुद्धा प्रौढ वयात होत असावे, हे स्पष्ट होते. परंतु कालांतराने अन्य संस्कृतींशी संबंध येऊन कित्येक अनिष्ट चाली हिंदू समाजात रूढ झाल्या. सती, स्त्रीशिक्षणबंदी, बालविवाह, विधवाविवाहबंदी, विषमविवाह, बहुपत्नीकत्व, केशवपन अशा अनिष्ट गोष्टी समाजात जारी झाल्या आणि स्त्रीच्या जीवनावर अनेक जाचक निर्बंध येत गेले.

बालकन्याहत्या महाराष्ट्रात प्रचलित नव्हती. सतीची चालही सर्रास नव्हती. मात्र बालविवाह हा नुसता रूढच नव्हे, शास्त्रसंमत होता. इतर सर्व प्रांतांप्रमाणे पुत्रजन्म हा आनंदाचा आणि कन्येचा जन्म हे मात्र महासंकट, अशी भावना येथेही होती. पण कन्याहत्या विशेष घडत नसत. विधवांचे पाऊल वाकडे पडल्याने भ्रूणहत्या मात्र मोठ्या प्रमाणात घडत असत. कन्या ऋतुस्नात होण्यापूर्वी तिचे लग्न झालेच पाहिजे, असा दंडक होता. दहा वर्षांहून अधिक वयाची एखादी मुलगी कुमारिका राहिल्यास प्रायः सामाजिक टीकेला तोंड द्यावे लागे. त्यामुळे बालवयातच मुलीचे लग्न उरकण्याची घाई केली जाई. सातआठ वर्षांचा नवरदेव आणि दीडदोन वर्षांची नवरी मिरवत नेल्याच्या वार्ता तत्कालीन वृत्तपत्रात सर्रास वाचावयास मिळत. १८७३ मध्ये पुण्यात तीन आठवड्यांत साडेसातशे विवाह झाले, त्यांत बहुतेक वधूंचे वय आठ वर्षांच्या आसपास होते.[१] शिवाय वैद्यकीय सुविधांचा अभाव आणि प्लेगासारख्या साथीचे रोग यांमुळे त्या काळी बालमृत्यूंचे प्रमाण अधिक होते. साहजिकच अगदी लहान वयात मुलींना वैधव्य येई. तसेच गरीब भिक्षुकांच्या मुली पैशाच्या लोभाने श्रीमंत वृद्ध वरांना दिल्या जात. अशा मुलीही अल्प काळातच विधवा होत. बालविवाहाचे दुष्परिणाम ध्यानात येऊन त्या बाबतीत काहीतरी सुधारणा व्हावी, असे विचारी लोकांना वाटू लागले असले, तरी बालविधवांच्या पुनर्विवाहाला मात्र समाजाचा कट्टर विरोध असे. उच्चवर्णीयांमध्ये 'गुरुचरित्रा'सारख्या ग्रंथामधून विधवांच्या जीवनाचे जे आदर्श घालून दिलेले होते, ते त्यांनी कटाक्षाने पाळले पाहिजेत, अशी समाजाची अपेक्षा असे. केशवपनासारख्या दुष्ट रूढींची सक्ती होत असे आणि एकंदरीत विधवांचे जिणे अगदी दयनीय असे. आपल्या घरामागे विहीर कशासाठी, याचे उत्तर राम गणेश गडकरी देत असत की, विधवांना जीव देण्यासाठी ! तत्कालीन एकत्र कुटुंबात अशा विधवांची संख्या बरीच असे. लोकहितवादींनी म्हटले आहे, 'पानशे हे तोफखान्यावरील सरदार होते. त्यांचे घरी सत्तावन बोडक्या होत्या.'[२]

नव्या इंग्रजी राज्याबरोबर राज्यकारभाराची तऱ्हाही बदलली होती. नवे शिक्षण मिळालेला नवा मध्यम वर्ग तयार होत होता. हा नवा मध्यम वर्ग तसेच सैन्यात नोकरी करणारे लोक यांच्या बदल्या होऊ लागल्या. नोकरीच्या निमित्ताने त्यांना सपत्नीक परप्रांती बिऱ्हाड करून राहणे भाग पडू लागले. आपली धर्मपत्नी

थोडीफार शिकलेली असावी, असे या नोकरदार वर्गाला वाटणे साहजिक होते. मग मुलींना प्राथमिक शिक्षण दिले जाऊ लागले. हळूहळू त्यांचे विवाहाचे वय वाढू लागले. एकत्र कुटुंबपद्धतीला थोडाफार हादरा बसू लागला. नवविचारांबरोबर ह्या बदलत्या परिस्थितीच्या रेटचानेही स्त्रियांवरील निर्बंधांचा फेरविचार करण्याची गरज भासू लागली. हिंदुधर्मातील अस्पृश्यता आणि स्त्रियांविषयीचा अनुदार दृष्टिकोन यांवर मिशनरी मंडळीची टीका चालूच होती. मुंबईत कै. बाळशास्त्री जांभेकरांच्या 'दर्पण'पासून या प्रश्नाची चर्चा सुरू झाली. स. १८३७ मधील पहिल्या पुस्तिकेमागेही 'दर्पण'पत्राचेच निमित्त आहे. १८३७ मध्ये 'दर्पणा'त प्रसिद्ध झालेल्या एका पत्रात बालविधवांच्या दुराचाराची कारणमीमांसा करताना स्त्रीशिक्षण व विधवाविवाह या गोष्टींवरील बंदी अनिष्ट आहे, असे मत मांडण्यात आलेले होते. हे पत्र वाचून तसेच सरदार बाळासाहेब नातू व एक कायस्थ गृहस्थ (हे गृहस्थ सुप्रसिद्ध रंगो बापूजी असतील काय?) यांचा पुनर्विवाहास पाठिंबा आहे, हे पाहिल्यावर धीर येऊन 'भूपाल' (भोपाळ) येथील 'तैलंग ब्राह्मणाने' त्यासंबंधी 'दर्पणा'त एक लेख लिहिला. या लेखाखाली 'तैलंग ब्राह्मणा'चा लेखक म्हणून उल्लेख नसला, तरी 'परशुरामक्षेत्रस्थ ब्राह्मणा'च्या दुसऱ्या लेखाच्या प्रारंभीच्या मजकुरात तसा स्पष्ट उल्लेख आहे. या लेखाचा पाठपुरावा करणारा 'परशुरामक्षेत्रस्थ ब्राह्मणा'चा दुसरा लेख 'दर्पणा'तच आला व त्या दोन्ही लेखांचे संकलन १८३७ सालच्या पुनर्विवाहप्रकरणात करण्यात आले. सदर पुस्तक पुण्यातील शासकीय ग्रंथालयात 'दातेसंग्रहा'त उपलब्ध होत असले, तरी सुप्रसिद्ध 'दातेसूची'त त्याचा उल्लेख नाही. अर्थात् 'दातेसूची' पूर्ण झाल्यावरच बहुधा ते कै. शंकरराव दात्यांना उपलब्ध झालेले असावे, असे अनुमान निघते. या पुस्तकाची पृष्ठसंख्या ६७ असून आकार ११·६×१६ सें. मी. आहे. पृष्ठातील प्रत्यक्ष मुद्रित मजकुराचा आकार ७·५×१० सें. मी आहे. दर ओळीत सरासरी सहा शब्द बसावेत, असे ठळक अक्षरांचे शिळाछाप मुद्रण आहे.

या पुस्तकाच्या शिळछाप मुद्रणाचे एक वैशिष्ट्य लक्षणीय आहे. मराठीत च्, ज्, झ् या व्यंजनांचे काही शब्दांत तालव्य (उदा० चार), तर काहींत दन्ततालव्य (उदा. चव) असे दोन प्रकारचे उच्चार होतात. दन्ततालव्यासाठी शिरोरेषेच्या आधी जादा बिंदू देऊन या पुस्तिकेत तो भेद दर्शविलेला दिसून येतो (उदा. चव, चांगला इ०). १८२५ सालच्या पंडितत्रयाच्या व्याकरणात हीच पद्धती अवलंबिलेली होती. दादोबांनी आपल्या व्याकरणाच्या पहिल्या (स. १८३६) व सातव्या (१८७९) आवृत्तीत या पद्धतीचा उल्लेख केल्याबद्दलची नोंद प्रा. प्रियोळकरांनी केलेली आहे.[3] म्हणजे ही पद्धत पंडितत्रयाच्या व्याकरणानंतर पन्नाससाठ वर्षे फुटकळ रीतीने शिळामुद्रणात चालू असावी.

या पुस्तकातील भोपाळकर तैलंग ब्राह्मणाच्या पहिल्या लेखात ऐतिहासिक दृष्टचा अत्यंत महत्त्वाचा असा पुढील उल्लेख येतो : 'विसां वर्षांमागें व्यंकटराम-शास्त्री तैलंग गोदातीरसमीपस्थ यांनी ही सर्वत्र दुराचार पाहून प्राचीन शास्त्राप्रमाणे पुनर्विवाहाची आज्ञा व्हावी म्हणून तो कोणाकोणाजवळ विचार करून यत्न करूं लागला, तेव्हां सारे लोकांनी मिळून त्यालाच वेडा केला...तेव्हां त्याणें ती गोष्ट बिलकुल सोडली. ही पाहिलेली गोष्ट आहे.' (पृ. १). याचा स्पष्ट अर्थ असा आहे की, बहुधा नासिकत्र्यंबकच्या कोणा व्यंकटरामशास्त्री तैलंगाने १८१८ साली ब्रिटिश राज्य येण्यापूर्वीच बहुधा या विषयाला हात घालण्याचे धाडस केलेले होते; पण एकंदर गतानुगतिक परिस्थितीत त्याला अनुकूल वातावरण लाभले नव्हते. हा भोपाळकर ब्राह्मण पुढे लिहितो : 'बहुतां दिवसां मागें जयसिंग राजा याणें पुनर्विवाहाचा यत्न केला, तेव्हां सारे लोकांनीं राजाचे आईजवळ अर्ज केला कीं, हें कसें तरी मोडून टाकावें. मग तिणें पुत्राला बोलावून म्हटलें कीं, ही तजवीज त्वां चांगली केलीस, मला संतोष झाला. आतां मला ही एक नवरा करून दे, असें बोलली. त्या गोष्टीवरून कायल होऊन त्याणे ती गोष्ट सोडली...' (पृ. १). राजा जयसिंगाच्या या प्रयत्नाच्या संदर्भात इतिहासज्ञांनी अधिक शोध घेण्यासारखा आहे. 'परशुरामक्षेत्रस्था 'च्या लेखांत पेशवाईत घडलेल्या खुद्द महाराष्ट्रातील अशा प्रकरणाची माहिती येते : 'या देशीं परशुरामभाऊ पटवर्धन यांची कन्या चार वर्षांची विधवा झाली त्या काळीं पुण्यांत काशीपासून रामेश्वरपर्यंत पंडितांचीं संमतें आणवून रामशास्त्रीप्रभृति सर्वांच्या विचारें ठरविलें. त्यावरून पुनर्विवाह निश्चय झाला. परंतु तो कांही कारणवशात् राहिला' (पृ. १५). हा बेत रहित होण्याचे कारण लोकहितवादींच्या लेखनात दोन स्थळी दोन प्रकारे दिलेले आढळून येते : (१) '...परंतु राज्यांत नाना फडणीस मोठे शहाणे होते. त्यांनीं त्यास विघ्न केलें आणि सांगितलें कीं तुम्ही असें करूं नका. कारण एकानें केलें म्हणजे सर्व करतील. तेव्हां तें सिद्धीस गेलें नाहीं.'[४] (२) 'त्याणीं (नाना फडणिसांनी) सांगितलें कीं, कोंकणांत आपले ज्ञातींत विचारून चवकशी करून नंतर विवाह करावा. त्यापुढे काशीहून शास्त्रार्थ आणिले. पुढें विवाह होणार तों इतक्यांत पर्शरामभाऊ करवीरास मारले गेले.'[५]

परशुरामभाऊंचे पहिले चरित्रकार हकीगत देतात ती अशी : 'भाऊंची वडील कन्या बयाबाई ही बारामतीकर जोशी यांचे घरी दिली होती. लग्न झाल्या-नंतर पंधरा दिवसाच्या आंतच हिचा पति निवर्तला. त्या वेळीं हिचें वय सात-आठ वर्षांचें होतें. पुण्यांत एकदां प्रसिद्ध रामशास्त्री यांस आपल्या वाड्यांत आणून या अल्पवयस्क मुलीची स्थिती त्यांना कळविली, तेव्हां ती पाहून शास्त्रीबोवांचें मन द्रवलें आणि या अर्भकाचा पुनर्विवाह व्हावयास कांहीं प्रत्यवाय नाहीं असें त्यांनीं

सांगितलें. नंतर भाऊंनी श्रीक्षेत्र काशीहून शास्त्रार्थ आणविले, त्या सर्वांनी पुनर्विवाहाविषयीं आपली संमति दिली. तथापि फार दिवस प्रचारांत नाहीं, ती गोष्ट आपणच करून लोकांचीं मनें दुखवावीं, हें प्रशस्त नव्हे, असें कित्येकांनी सुचविल्यावरून भाऊंनीं तो बेत रहित केला.'[६] १८३७ सालचे पुस्तक आणि हे चरित्र यांत उल्लेखिलेल्या मुलीच्या वयांत विसंगती निर्माण होते, हे वाचकांच्या ध्यानात आले असेल. सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक वासुदेवशास्त्री खरे यांनी 'अधिकारयोग' म्हणून नाना फडणिसांचे जे अधिकृत चरित्र लिहिले आहे, त्यात या घटनेला ऐतिहासिक आधार मिळत नाही, असे म्हटले आहे. या ग्रंथातील मताचा आशय असा : परशुरामभाऊंच्या बयाबाई या कन्येचा जन्म स. १७६१ मध्ये झाला, स. १७६८ साली बापूजी नाईकांच्या पुत्राशी तिचा विवाह झाला आणि त्याच वर्षी तो निवर्तला, या गोष्टींना पटवर्धनी दप्तरांतून ऐतिहासिक पुरावे मिळतात. पण (१) रामशास्त्री प्रभुण्यांकडे अनुज्ञा विचारली (२) त्यांनी ती दिली व (३) काशीहून शास्त्रार्थ आणविला, याचा मागमूसही त्या दप्तरात कोठेही लागत नाही. 'यावरून या गोष्टी निराधार आहेत असे सिद्ध होते...सदरहू गोष्टी १७९० त घडल्या असें कोणीं लिहिलेलें आहे, तें अगदींच बाष्कळ आहे. त्या वेळीं बयाबाई एकूणतीस वर्षांची होती व तिचें लग्न होऊन बावीस वर्षें झालीं होतीं.'[७] मध्यंतरी रानडे यांच्या नारायणराव पेशव्यावरील वादग्रस्त ग्रंथात परशुरामभाऊंनी शंकराचार्यांचा मठ लुटला, याचे संभाव्य कारण सांगताना बयाबाईच्या पुनर्विवाहास त्यांनी संमती दिली नसावी, असा तर्क लढविण्यात आलेला आहे.[८] परशुरामभाऊंचे अलीकडील चरित्रकार सहस्रबुद्धे यांनी, पेशवाईत अशा प्रकरणी निर्णय करण्याचा अधिकार शंकराचार्यांकडे कधीच नसे; अशा धार्मिक निर्णयासाठी शास्त्रीपंडितांची सभा भरविली जाई, असे प्रतिपादन करून रानड्यांच्या निराधार तर्काचे खंडण केले आहे आणि खरेशास्त्री यांच्या मताला पुष्टी दिलेली आहे.[९] एकंदरीत हे प्रकरण दंतकथेच्या स्वरूपाचेच ठरते. तरीपण हेसुद्धा खरें की, दंतकथेच्या धुराच्या बुडाशी काही ना काही सत्यांशाची ठिणगी असू शकते. १८३७ मध्ये ही दंतकथा महाराष्ट्रात निश्चितपणे प्रचलित होती. बालविवाहाची कर्मठ रूढी, सरदार घराण्यांतील तरुणांची लढायांतून होणारी अकाली निधने, बालविधवा कन्येविषयी पित्याला वाटणारी सहजानुकंपा आणि प्रस्तुत प्रसंगीचे परशुरामभाऊ पटवर्धनांसारखे कर्तबगार व्यक्तिमत्त्व या गोष्टींचा एकत्र विचार केल्यास अशी काही हालचाल अजिबात झालेलीच नसेल, असे म्हणवत नाही. तरीपण 'अधिकारयोगा'त खरेशास्त्री यांनी दिलेली अधिकृत माहिती आणि त्यांचा एतद्विषयक अधिकार मान्य करून या प्रकरणी अस्सल प्रत्यंतर पुरावा मिळत नाही, ही गोष्ट स्वीकारणे भाग आहे.

या आनुषंगिक पण ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या घटनेचा उलगडा केल्यानंतर आता स. १८३७ सालच्या या पुस्तकातील प्रमुख प्रतिपाद्याकडे वळू. तैलंग ब्राह्मणाच्या पहिल्या लेखात विधवांच्या दुराचरणाची कारणमीमांसा तसेच स्त्रीशिक्षणापासून होणाऱ्या लाभांचा विचार प्रथम आलेला आहे. ' नात्रा ' किंवा पुनर्विवाह ब्राह्मणादी उच्च जातीतून वर्ज्य केला, याचे कारण सांगताना म्हटले आहे : ' स्त्री जी आहे ती जेथें जातिनियम आहे, तेथें मातीचे घागरीसारखी आहे, म्हणून विटाळली म्हणजे कामास येत नाहीं, तर इतर जातींत नात्रा कसा होतो म्हणाल, तर त्या जातींत (जसे ब्राह्मणांत असते, तसे) यज्ञदेवार्चनादिक कर्म नाहीं. म्हणोन बनतें (पृ. ३).[१०] शिवाय विधवाविवाहावर बंदी घालण्याचे आणखी एक कारण असे सांगितले आहे की, अशी मुभा मिळाल्यास स्त्रिया नावडत्या पतीला विष घालून मारतील व अन्य आवडत्या पुरुषाबरोबर लग्न लावतील ! (पृ. ९). पण लेखकास हे म्हणणे ' थोड्या (म्ह. कोत्या) नजरे'चे वाटते. एकंदरीत अनाचार होऊ नये म्हणून विधवाविवाहावर बंदी घालण्यात आली; पण हा उपायच पुढे अपाय ठरला. अनाचार वाढले, भ्रूणहत्या घडू लागल्या. तेव्हा विवक्षित परिस्थितीत तरी विधवाविवाहास मोकळीक दिली जावी, असे लेखकाचे म्हणणे आहे. पुरुषसंगविरहित विधवाविवाहास शास्त्राची कसलीही आडकाठी नाही, हे निदर्शनास आणून लेखक शेवटी म्हणतो की, चालू काळात एवढे तरी कार्यवाहीत आणावे; पुढे एखादा भावी आचार्य यातील कमतरता दूर करण्याच्या दृष्टीने गर्भोत्पत्तीपर्यंत विधवाविवाहास मोकळीक असावी, असा नियम घालून देईल.

' परशुरामक्षेत्रस्थ ब्राह्मणा ' च्या दुसऱ्या लेखात ' तैलंग ब्राह्मणा ' च्या मताला पाठिंबाच दिलेला आहे. कलियुगात विधवाविवाह अगदी वर्ज्य म्हणून सांगितला आहे, या गोष्टीचा त्यात खल केलेला आहे. कलिवर्ज्य म्हणून ठरविलेल्या कित्येक गोष्टी सध्या समाजात कशा आचरल्या जात असतात पण त्यांची कोणी दखल कशी घेत नाही, हे दाखवून देण्यावर त्यात भर आहे. उदा. ब्राह्मणाने नावेत बसून समुद्रप्रवास करणे हे कलिवर्ज्यात मोडते; पण शेवडो ब्राह्मण कच्छभुज, द्वारका इ. ठिकाणी गलबतांतून महिन्यामहिन्याच्या सफरीवर जातात, त्याचे काय ? ब्राह्मणांना वैश्यवृत्ती वर्ज्य म्हणून सांगितली आहे; मग ते व्यापार कसा करतात ? शास्त्रा-विरुद्ध होणाऱ्या कित्येक आचारांविषयी असे प्रश्न उपस्थित करून लेखकाने पुन-र्विवाहाचे कलिवर्ज्यही मोडावयास प्रत्यवाय नसावा, असे सुचविले आहे. या प्रश्नासंबंधी लेखकाने तीन पक्ष पुढे मांडले आहेत :

१) पुरुषसंगापूर्वी रजोदर्शनात्प्राक् बालविधवांचा विवाह करावा.

२) पुरुषसंगयोग्य होईपर्यंत कन्येचा विवाहच केला जाऊ नये.

३) लहानपणी कन्येचे वाग्दान करावे; पुरुषसंगयोग्य झाल्यावर मग प्रत्यक्ष पाणिग्रहणसंस्कार व्हावा.

– लेखकाला अर्थातच तिसरा पर्याय अधिक संमत आहे.

महाराष्ट्रातील पुनर्विवाहाचे आद्यप्रचारक म्हणून विष्णुशास्त्री बापटांचे नाव अनेकदा उल्लेखिले गेलेले आहे. तेव्हा या पुनर्विवाहप्रकरणातील दुसऱ्या लेखाचे कर्ते 'परशुरामक्षेत्रस्थ ब्राह्मण' म्हणजे विष्णुशास्त्री बापटच असावे, असा तर्क करावासा वाटतो.

येथे संकलित केलेल्या दोन पुस्तकांच्या प्रकाशनकालाच्या दरम्यान या प्रश्नासंबंधी जी भवति न भवति झाली, तीविषयी १८४१ सालच्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत माहिती मिळते, ती अशी : १८३७ सालच्या पुस्तकांतील लेखांवर आक्षेप घेणारे प्रतिकूल लेखन 'धर्मशास्त्री' या नावाखाली एका गृहस्थाने 'दर्पण' मध्ये केले होते. त्यावर 'परशुरामक्षेत्रस्था' ने चिडून कडवट लेख लिहिला. तेव्हा भोपाळच्या तैलंग ब्राह्मणाने त्या दोघांची समजावणी करणारा लेख लिहिला. तदनंतर अक्षतयोनी विधवेच्या पुनर्विवाहास मोकळीक असावी, असे प्रतिपादन करणारा एक दीर्घ लेख कोणा 'मध्यस्था' ने 'दर्पण' कडे पाठविला. पण स्थलाभावी तो 'दर्पण' मध्ये प्रसिद्ध झाला नाही. मात्र त्या लेखाच्या प्रती करण्यात येऊन धर्मशास्त्रीप्रभृतींस पाठविण्यात आल्या होत्या. त्यानंतर कोणी प्रतिकूल लिहिले नाही. या प्रस्तावनेत 'या सालात (स. १८४१) मुंबई अखबारमध्ये पुनर्विवाह करण्याविषयीं सरकार चित्त पुरवित आहे, यास्तव हिंदुस्थानांतील नेटीव लोकांही बालविधवांस कामोत्पत्तीच न व्हावी अशा मात्रा करून ठेवाव्या, असें थट्टेप्रमाणें लिहिले होतें. परंतु त्यांत पंडित लोकांनी पाहाण्याजोगी हांसल गोष्ट एकही न होती." असाही एक उल्लेख येतो. पुढे आणखी एका हस्तलिखित पुस्तकाबद्दल म्हटले आहे, "सांप्रत नागपुरीं एक भरंवशीक गृहस्थाचे पदरचा पंडित यानेंही हा दुराचार पाहून अनुतापाने एक किताब लिहिली. त्यांत ग्रंथस्थ वचनें व युक्तिप्रयुक्ति चांगल्या लिहिल्या आहेत. ती किताब पुण्यास छापणार आहेत." (पण हे पुस्तक उपलब्ध झाले नाही.)

१८४१ चे पुस्तक

स. १८४१ सालच्या प्रस्तुत पुस्तकाची नोंद दातेसूचीत असून ते पोथीसारखे आडवे शिळाछापावर छापलेले आहे. त्यात प्रस्तावनेखेरीज एकूण चार प्रकरणे आहेत : (१) पुनर्विवाहप्रकरण (पृ. १–१९). (२) लघुपाराशरीय तृतीय अध्याय (पृ. १–४), (३) लघुपाराशरीवरील माधवी टीका (पृ. १–५). (४) स्त्रीविद्या-

भ्यासप्रकरण (पृ. १ ते २). यांपैकी प्रस्तावना, पुनर्विवाह प्रकरण, स्त्रीविद्याभ्यास–प्रकरण ही मराठीत आहेत. दुसरे प्रकरण संस्कृतात तर तिसऱ्यात प्रथम संस्कृत श्लोक व नंतर मराठी इत्यर्थ दिलेला आहे. हे प्रकरण विष्णुशास्त्री बापटांचे म्हणूनही उल्लेख आढळतात. पण ते गंगाधरशास्त्री फडके यांचे असावे. डॉ. भाऊदाजीवगैरेंच्या विधवाविवाहविषयक उपक्रमाची माहिती देताना 'टेलिग्राफ' या पत्रात त्यांना या बाबतीत अग्रेसरत्वाचा मान दिला गेलेला होता. पण त्यावर आक्षेप घेऊन प्रभाकर–कर्त्याने म्हटले होते : "आपले जुने नगरशेट जगन्नाथ शंकरशेटजी आणि नागांव-निवासी गंगाधरशास्त्री फडके यांस आपण कां विसरावें ? फडके यांनीं सर्वांच्या आघाडीस शेटजीच्या संमतानें आणि आश्रयानें पुनर्विवाहप्रकरणीं ग्रंथ करून गणपत कृष्णाजीच्या छापखान्यांत छापिला. त्या ग्रंथाच्या प्रती शेटजींच्या घरांतही अजून कदाचित् असतील." [११] पुढे मात्र गंगाधरशास्त्री यांची मते पालटली होती. प्रभाकरकर्त्यानेच त्यांच्या 'हिंदुधर्मतत्त्व' (स. १८५२) या पुस्तकातील सनातनी मतांवर जेव्हा टीका केलेली होती, तेव्हा फडके यांनी पुनर्विवाहविषयक मजकूर आपला नव्हता, असा खुलासा केलेला होता. पण लोकमताला भिऊन केलेला पगडी फिरविण्याचाच तो एक प्रकार दिसतो.

ब्राह्मणादी जातींत विधवाविवाह बंद झाल्याने जे अनर्थ होतात, त्यांची मीमांसा १८४१ च्या या पुस्तकात केलेली आहे. हे अनर्थ म्हणजे : (१) विधवेचे मृतवत् जीवन (२) व्यभिचार (३) गर्भपात व भ्रूणहत्या (४) मातापित्यांच्या मनात सतत शल्य (५) इतर स्त्रिया त्यांच्या नादाने व्यभिचारिणी बनणे. मुहूर्त-मार्तंड, लघुपाराशर इत्यादींच्या आधारे जसे पुनर्विवाहाचे समर्थन केले आहे. तसेच कालमानाचा विचार केल्यास महत्त्वाची गोष्ट म्हणजे ईश्वरासमोर स्त्रीपुरुष समान असतात, या तत्त्वावरही त्याचे समर्थन केले आहे. पुरुषांना बहुपत्नीकत्वाची मोकळीक, मग स्त्रियांना मात्र बहुपतित्वाला बंदी का, असा तर्कशुद्ध प्रश्न उपस्थित करून त्या बाबतीत पांडवांचा समर्पक दाखलाही देण्यात आलेला आहे (पृ. ६). बालविवाह बंद व्हावे, ऋतुप्राप्तीपूर्वी बालविधवांच्या विवाहाला प्रतिबंध नसावा, तसेच 'नष्टे मृते–' इ. सुप्रसिद्ध स्मृतिवचनात सांगितल्याप्रमाणे आपत्ती उद्भवल्यास प्रौढेचाही पुनर्विवाह व्हावा, असे स्पष्ट मत मांडण्यात आले आहे. कालानुरूप एक मात्र मर्यादा जाणवते, ती अशी : हे पुनर्विवाह स्वजातीमध्येच घडून यावे, असे पुढे म्हटले आहे (पृ. ८). सवाई जयसिंगाच्या बाबतीतला लेखकाचा युक्तिवाद खास उल्लेखनीय आहे. त्याच्या मते सवाई जयसिंगाने आपल्या मातेस सांगावयास हवे होते की, जर पुत्रवतीला विवाह निषिद्ध या नियमाचीच आडकाठी असेल, तर तू मला ठार करून दुसरा पती करू शकतेस. या तिढ्याने माता निरुत्तर होऊन त्याची अडवणूक टळली असती (पृ. ५–६). तरुण विधवांना कामेच्छापूर्ती करावीशी

वाटणे कसे नैसर्गिक आहे, हे पटवून देताना एका विरही व्यभिचारिणीची सांगितलेली गोष्ट व तिच्या तोंडचा कर्णकंडू आणि काडीचा दाखला मार्मिक आहे (पृ. ८). विधवांचा सक्तीचा संन्यास ही घाशीराम कोतवालाने केली तशी, अन्याय्य आणि जवर शिक्षा होय, असे लेखक म्हणतो. 'कलिधर्मवक्ता पाराशर' असल्याने कलियुगात त्याचे वचन ग्राह्य मानले पाहिजे (पृ. १२) व पुनर्विवाहास प्रतिबंध करता कामा नये. पहिल्या व तिसऱ्या भागाच्या शेवटी 'पृथ्वीपती, सार्वभौम व फार नीतिज्ञ विद्वज्जन संग्रह करणारे' (पृ. ८) व 'समुद्रवलयांकित पृथ्वीस निर्भय राजमार्ग करणारे' (पृ. १२) अशी इंग्रज सरकारला विशेषणे योजून त्यांनीच हा नवा पायंडा पाडावा, अशी अपेक्षा लेखकाने व्यक्त केलेली आहे.

शेवटच्या 'स्त्रीविद्याभ्यासप्रकरणा'त स्त्रीशिक्षणाला वेदांचा विरोध असला, तरी स्मृतींचा व शास्त्रांचा नाही. काशीकडे तसेच नागर ब्राह्मणांत स्त्रियांना विद्या शिकवितात, आपल्याकडे चुकून काकतालीयन्यायाने घडलेल्या एखाद्या घटनेच्या आधारे स्त्रिया शिकल्या की त्यांचा पती मरतो, अशा भलभलत्या समजुती प्रचलित आहेत; पण स्त्रीशिक्षण हे प्रपंच आणि परमार्थ या दोहोंस साधक आहे, असे प्रतिपादन केलेले आहे. प्रौढ ब्राह्मण विधवांना 'द्रव्यलोभ दाखवून' (आजच्या भाषेत शिष्यवृत्त्या देऊन) त्यांच्यांतून शिक्षिका तयार कराव्या, अशी एक व्यावहारिक सूचनाही केलेली आहे (पृ. १४). एका मान्यवर धर्ममार्तंडाने स्त्रीशिक्षणाला दिलेली मान्यता, यादृष्टीने तिचे महत्त्व मोठे आहे.

पुढे स. १८७० मध्येसुद्धा शंकराचार्यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यात झालेल्या प्रसिद्ध वादविवादात त्रैवर्णिकांत पुनर्विवाह अशास्त्र ठरला, तसेच समाजाचा स्त्रीशिक्षणास असणारा विरोध अगदी १९ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत मावळला नव्हता, हे ध्यानात घेतल्यास एकोणिसाव्या शतकाच्या चौथ्या दशकात व्यक्त झालेली वरील मते खरोखरच पुरोगामी म्हटली पाहिजेत. या दोन्ही प्रकरणांचे कर्ते शास्त्रीमंडळीपैकी आहेत. त्यांच्या सुधारणाविषयक दृष्टिकोनाला अवश्यमेव मर्यादा आहे. तरीसुद्धा देशकालपरिस्थितीनुसार विधवाविवाहाच्या कलिवर्ज्यालाही फाटा द्यावा, ही गोष्ट मांडली गेलेली आहे. समर्थनार्थ स्त्रीपुरुष समानतेच्या तत्त्वाचा उल्लेख व्हावा, ही गोष्ट तर विशेषच उल्लेखनीय आहे.

संदर्भ

१. **ज्ञानोदय,** १८–१२–१८७३.

२. **लोकहितवादीकृत निबंधसंग्रह,** संपा. अ. का. प्रियोळकर, मुंबई, १९६७, पृ. ३२.

३. **महाराष्ट्र भाषेचे व्याकरण,** संपा. अ. का. प्रियोळकर, मुंबई, १९५४, पृ. १३–१४.

४. **तत्रैव,** पृ. ३२.

५. गो. ह. देशमुख, **ऐतिहासिक गोष्टी,** भा. १ ला, पुणे, १८८४, पृ. १०.

६. भि. धों. निगुडकर, **परशुरामभाऊ पटवर्धन यांचे चरित्र,** पुणे, १८८२, पृ. १३१–३२.

७. वा. वा. खरे, **अधिकारयोग,** पुणे, १९०८, पृ. १०६, 'टीप.'

८. पां. गो. रानडे, **नारायणराव पेशवे यांचा खून की आत्महत्या ?,** खं. २, बेळगाव, १९४४, पृ. ६८६.

९. स. अ. सहस्रबुद्धे, **सरदार परशुरामभाऊ पटवर्धन,** रत्नागिरी, १९५७, पृ. ४२७–२८.

१०. येथे 'नात्रा' आणि 'स्त्री...मातीचे घागरीसारखी' हे जे वाक्प्रयोग येतात, त्यांचे थोडे स्पष्टीकरण करावेसे वाटते. 'नात्रा' हा शब्द आज मराठीत रूढ नाही, गुजरातीत तो 'पुनर्विवाह' या अर्थी रूढ आहे. तेथे त्या शब्दाचे 'नातरूं' हे लघुत्वदर्शक रूप अधिक प्रचलित आहे. 'नाते = सोयरिक' या शब्दाचा तो अर्थविस्तार आहे. (पहा : **सार्थ जोडणी कोश,** अहमदाबाद, १९५७ पृ. ४८३). 'स्त्री ही मातीच्या घागरीसारखी' हा वाक्प्रयोग हिंदू समाजाच्या स्त्रीजातिविषयक परंपरागत अधिक्षेपी दृष्टिकोनाचा निदर्शक आहे. स्त्रीविषयी असे उल्लेख पेशवे-दप्तरात आढळतात. पुरुषसत्तान्यायाची ही निशाणीच होय.

११. **ज्ञानोदय,** १ एप्रिल १८५१.

७. एका मराठी पुनर्विवाहाची शोकान्तिका

पाठारे प्रभू हे खास मुंबईकर. आडनावाच्या बाबतीत ही ज्ञाती भलतीच भाग्यवान. अजिंक्य, नवलकर, जयकर, विजयकर, धैर्यवान, धुरंधर अशी क्षत्रियत्व-सूचक छान छान आडनावे दुसऱ्या कोणत्याही जमातीत अढळणार नाहीत. ही जमात फार जुन्या काळापासून मुंबईत स्थायिक झालेली आहे; त्यामुळे अठराव्या शतकात म्हणजे पेशवाईच्या अस्तापूर्वीच तिचा इंग्रजांशी संपर्क आला. इतरांच्या आधी त्यांनी इंग्रजी भाषा आत्मसात केली. युरोपियन, पार्शी आणि गुजराती व्यापारी कंपन्यांतील नोकऱ्या ही या जमातीची मिरास होती. काही मंडळी सरकारी अधिकारीही असत. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात जसजसा मुंबईचा विकास होत गेला, तसतशी या जमातीची आर्थिक भरभराट होत गेली. मुंबईत ठाकुरद्वार–नवीवाडी भागांत त्यांची मालकीची घरे व वाडचा असत. आणि आठवडचाच्या शेवटी मजा करण्यासाठी, दीड दिवस चैनीत राहण्यासाठी खार-संताक्रूझ भागात बंगले असत. स्थावरजंगम मुबलक मालमत्ता आणि सुवत्ता असल्याने ही जमात खानदानी आणि खर्चिक म्हणूनही प्रसिद्ध होती. दिवाळीत गल्लीच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत फटाक्यांचा कोट लावणारी, पाश्चात्त्य पद्धतीचा छानछोकीचा जामानिमा करणारी, खाण्या–'पिण्या'त पैसा खर्च करणारी रसिक, विलासी आणि गुलहौशी अशी ही जात होती. 'सोकरजी' हे व्यक्तिनाम या जातीत फार लोकप्रिय. या नावाचा 'पोक'शी (= चैनीशी) साम्याभास करून बहुधा 'सोकाजी' हे नाव या लोकांना अजूनही लोक गमतीने लावताना आढळतात.

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी इंग्रजांबरोबर नवे ज्ञान, नवे शिक्षण व

पाश्चात्त्य रीतीरिवाज आले. पाठारे प्रभू ज्ञातीने त्यांचे प्रायः स्वागतच केले. धर्म-भ्रष्ट मानल्या गेलेल्या पण गुप्तपणे क्रांतिकारक धर्मसुधारणा अमलात आणणाऱ्या 'परमहंस सभे'चे अध्यक्ष राम बाळकृष्ण जयकर हे पाठारे प्रभूच होते. या राम बाळकृष्णांच्या बरोबरीने या जमातीमधील दुसरे प्रसिद्ध सुधारक म्हणजे 'घाशीराम कोतवाल' या कादंबरीचे लेखक मोरोबा कान्होबा विजयकर (१८१३–१८७१).

मुंबईत स्थापन झालेल्या 'सोसैटी'च्या शाळेत स. १८३० च्या सुमारास शिक्षण पुरे होऊन मोरोबा कान्होबांचा प्रवेश सरकारी नोकरीत झाला. तत्कालीन मंत्रालयातील भाषांतरविभागातून त्यांची बदली साताऱ्याच्या रेसिडेन्सीत झाली. १८३८ ते ४० या दरम्यान ते तेथे 'नेटिव्ह एजेंट' होते. पुढे स. १८४२ मध्ये मुंबईच्या न्यायखात्यात नोकरीस होते. त्यांच्या हुशारीमुळे पदोन्नती होऊन नंतर काही काळ ते अहमदनगर, मुंबई इ. ठिकाणी स्मॉल कॉज कोर्टाचे न्यायाधीश होते. त्यांचा पगार दरमहा ७०० रु. होता. हळूहळू सरकारदरबारी मोरोबांची प्रतिष्ठा वाढत गेली. सरकारने त्यांना जे. पी. चा हुद्दा दिला आणि रावबहादुर ही पदवी बहाल केली. ते कायदेकानूंत इतके निष्णात होते की, त्यांची वकिलीची परीक्षा प्रत्यक्ष उतरलेली नसता न्यायखात्यातील नोकरी सोडल्यावर त्यांना वकिली करण्याची परवानगी होती.

मोरोबांच्या पाठारे प्रभू ज्ञातीत पूर्वी विधवाविवाहाला परवानगी असावी. 'विधवाविवाहाविषयी' नामक एक व्याख्यानाची पुस्तिका मोरोबांनीच १८७० मध्ये प्रसिद्ध केलेली आहे. त्यांनी तीत कयास केला आहेः आपल्या ज्ञातीत पूर्वी पुनर्विवाह होत असत. परंतु नानासाहेब पेशव्यांच्या राजवटीत विधवाविवाहाची चाल बंद झाली. दादाजी जानोजी याचा चुलता धाकजी हा ज्ञातीचा पुढारी होता. त्याने वसई, साष्टी आणि मुंबई या टापूत राहणाऱ्या जातिबांधवांची सभा भरवून विधवाविवाहासारख्या शूद्रांस शोभणाऱ्या चालीरीती बंद केल्या. दादाजीची विधवा सून सुंदर होती व तिचा पुनर्विवाह होऊ नये अशी त्याची इच्छा होती, म्हणून त्याने हा नियम करून घेतला असावा.

एकंदरीत ब्राह्मणांच्या अनुकरणाने ज्ञातिश्रेष्ठत्वाच्या कल्पनांना बळी पडून पाठारे प्रभू ज्ञातीतील पुनर्विवाहाची चाल बंद झालेली दिसते. ही चाल पुन्हा सुरू व्हावी, असा ध्यास मोरोबांना होता व त्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रचार केला आणि अखेर त्यासाठीच देह ठेवला, असेही म्हणावे लागेल.

इंग्रजी राज्य सुरू झाल्यावर इ. स. १८३८ च्या सुमारास विधवाविवाहा-संबंधी प्रतिष्ठितांचे मत अजमावण्याचे सरकारकडून प्रयत्न झालेले होते. त्या वेळी मोरोबा सातारच्या रेसिडेन्सीत नोकरीला होते. सरकारच्या विचारणेला छत्रपती प्रतापसिंहांनी जे मराठीत उत्तर तयार केले होते, त्याचे इंग्रजी भाषांतर मोरोबांनीच

केले होते, व मग ते वर रवाना झाले होते. १८५६ साली सरकारने विधवा-विवाहाचा कायदा केला. या सुधारणेचा प्रचार करताना मोरोबांचा युक्तिवाद मात्र मासलेवाईक असे : पूर्वी शंकराचार्यांना लोक देवासमान मानीत व त्यांच्या आज्ञेनुसार चालत. हिंदुधर्माप्रमाणे राजा हा विष्णूचा अवतार असतो. सध्याची व्हिक्टोरिया राणी हीही देवाचा अवतारच होय. तेव्हा तिने केलेला पुनर्विवाहाचा कायदा पाळणे हे प्रत्येक हिंदूचे परमपवित्र कर्तव्य ठरते; तदनुसार जे वर्तणार नाहीत, ते पशू होत !

अहमदनगरला स्मॉल कॉज कोर्टाचे न्यायाधीश असता इ. स. १८६३ साली मोरोबांनी 'घाशीराम कोतवाल' या नावाची एक तथाकथित ऐतिहासिक कादंबरी लिहिली. रंगभूमीवर नुकत्याच गाजून गेलेल्या 'घाशीराम कोतवाल' या विजय तेंडुलकरांच्या नाटकाचे कथाबीज याच कांदबरीत असावे; कारण कादंबरीच्या 'ग्रंथप्रवेश' मथळ्याच्या प्रास्ताविकात प्रारंभीच म्हटले आहे : 'घाशीराम सावळ-दास या नावाचा कनोजा ब्राह्मण, हिंदुस्थानचा राहणारा, पेशवाईत पुणे शहरात रोजगाराकरिता येऊन राहिला..... त्याची कन्या सुस्वरूप होती. तिजवर बाळाजी जनार्दन भानू ऊर्फ नाना फडणवीस यांचा मोठा लोभ झाल्याचे योगाने घाशीराम याजला शहराची कोतवाली प्राप्त झाली.'

या कादंबरीचा उल्लेख 'तथाकथित ऐतिहासिक कादंबरी' असा वर केला आहे; कारण ती खरोखर 'ऐतिहासिक'ही नाही आणि 'कादंबरी'ही नाही. 'घाशीराम कोतवाल' या नावावरून कोणालाही वाटेल की तीत पेशवाईतील या कुप्रसिद्ध कोतवालाची क्रूरकर्मेच प्रामुख्याने आलेली असतील. प्रारंभी या कोतवालाविषयी काही आख्यायिका आल्या आहेत. परंतु कादंबरीचा गाभा वेगळा आहे. समाजसुधारणा, इतिहास, विद्या, कला व हिंदू लोकांच्या काही निरर्थक रूढींविषयी चर्चा अशी विविध प्रकारची माहिती कल्पित पात्रांच्या संवादांच्या रूपाने तीत दिलेली आहे. इंग्रज राजवटीबरोबर सुरू झालेल्या सुधारणांचे स्वागत करण्याचा व आपले पूर्वीचे रीतीरिवाज मूर्खपणाचे होते, हे दाखविण्याचा लेखकाचा एकंदरीत सूर आहे. मालाकार चिपळूणकरांनी 'इतिहास' या निबंधात या कादं-बरीवर सणसणीत शेरेताशेरे झाडून तिला 'कादंबरी' हे नाव केवळ 'मुर्वतीस्तव'च द्यावयाचे, असे म्हटले आहे, ते सर्वस्वी खरे आहे. कादंबरीच्या प्रारंभी मुंबईचे तत्कालीन गव्हर्नर फ्रियरसाहेब यांचे छायाचित्र दिलेले आहे. त्याशिवाय ताजमहाल, जामा मशीद, गोलघुमट, मुलूखमैदान तोफ, पांपीचा स्तंभ, सेंट पॉल चर्च, सागरा-वरील तुफान, ज्वालामुखी यांची उत्कृष्ट चित्रे अधूनमधून छापलेली आहेत. दोनशे पानांच्या 'कादंबरी' म्हणून म्हटलेल्या या पुस्तकात काय आहे, हे विचारण्यापेक्षा काय नाही, हे विचारणेच योग्य होईल.

मोरोबा हे सुधारणेचे कडवे कैवारी होते. तेव्हा तो विषय या एवंगुणविशिष्ट

कादंबरीत न येता तरच नवल! कादंबरीचे सोळावे प्रकरण या विषयालाच वाहिलेले आहे. त्यात एक शास्त्री, एक काझी, एक पाद्री आणि एक पार्शी दस्तुर या चौघांमध्ये या विषयावर वादविवाद घडवून आणला आहे. चर्चेच्या ओघात पुनर्विवाहाचा प्रश्न निघतो. शास्त्रीबुवा आमच्या धर्मात असा भ्रष्टाचार नाही, अशी शेखी मिरवतात; पण अवेस्ता आणि वेद यांच्या भाषेतील साम्य लगामी लावून मोरोबांनी पार्शी दस्तुराला जणू वेदशास्त्रसंपन्नच बनविले आहे. प्राचीन काळी विधवाविवाहावर शास्त्रात बंदी नव्हती; ती मतलबी ब्राह्मणांनी दुष्टपणाने घुसडली, हे दाखवून देताना, तो पार्शी दस्तुर याज्ञवल्क्य, मनू इत्यादी स्मृतींची वचने सांगतो, भारतातील नळांदिकांचे दाखले देऊन पुनर्विवाहाचे मंडण करतो; फार काय, पाराशरस्मृतीतले 'नष्टे मृते प्रव्रजिते क्लीबे च पतिते पतौ।' हे वचन धडाधड म्हणून शास्त्रीबुवांना अगदी चाट करतो. पुनर्विवाहविषयक मोरोबांची आस्था एवढी होती की, ते सूक्तासूक्त विचार न करता तिचा असा अस्थानीही प्रचार करीत.

सामाजिक सुधारणेच्या दिशेने संघटित हालचाल करण्यात पाठारे प्रभू ज्ञाती पुढे होती. १८५३ साली द्वारकानाथ जगन्नाथजी यांच्या अध्यक्षतेखाली 'परभू बेनिवोलंट इन्स्टीट्यूशन' म्हणून एक 'पंचसभा' स्थापन झाली होती. ज्ञातीतील गरीब गरजू विधवांसाठी तिने निधी जमविला होता. १८६३ मध्ये 'पाठारे रिफॉर्म असोसिएशन' म्हणून जी दुसरी एक महत्त्वाची संस्था पुण्यास सदाशिव मोरोजी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झाली, तिच्या चिटणीसपदी मोरोबा कान्होबा होते. सुधारणांचा व विशेषतः विधवाविवाहाचा प्रचार करण्यासाठी त्यांनी इंग्रजी व मराठी पुस्तिका प्रसिद्ध केल्या होत्या. या पुस्तिकांतून विधवाविवाहाच्या सशास्त्रतेचे मंडण करण्यात आलेले होते. तसेच १८५६ साली पास झालेल्या पुनर्विवाहाच्या कायद्याची माहितीही दिलेली होती. पुनर्विवाहित जोडपी आणि त्यांचे आप्त यांच्याबरोबर आपण अन्नव्यवहार करू, अशा प्रतिज्ञापत्रकावर त्या सभेने सहचा घेतल्या. उपस्थितांपैकी ज्या आठांनी सहचा केल्या, त्यांत पहिली सही मोरोबा कान्होबांची आहे. १८६५ साली मुंबईस विष्णुशास्त्री पंडितांच्या पुढाकाराने आंग्रेवाडीत माधवराव विठ्ठल विचूरकर यांच्या अध्यक्षतेखाली पुनर्विवाहोत्तेजक मंडळी स्थापन झाली. रा. ब. गो. ह. देशमुख तथा लोकहितवादींच्या बरोबरीने उपाध्यक्षपदी रा. ब्र. मोरोबा कान्होबांचे नाव आढळून येते.

पुनर्विवाहोत्तेजक मंडळीचे प्रमुख आधारस्तंभ कै. विष्णुशास्त्री पंडित हे होते; पण त्यांच्या खालोखाल मंडळीच्या कार्यात मोरोबा कान्होबा उत्साहाने भाग घेत. या मंडळीने फारसा गाजावाजा न करता नारायण जगन्नाथ ऊर्फ नाना भिडे यांचा पुनर्विवाह वांद्रे येथे लावला. परंतु तो पुनर्विवाह 'सांदीकोंदी'तील झाला. तेव्हा पुनर्विवाह पक्षाची मंडळी एकंदरीत भित्रीच आहेत, असा आक्षेप सनातनी विरुद्ध

पक्षाने घेतला. तेव्हा त्यानंतरचा पुनर्विवाह निमंत्रणपत्रिका काढून थाटामाटाने साजरा करावयाचा, असे पंडितप्रभृतींनी ठरविले. दरम्यान खानदेशातील एक शिक्षक श्री. करमरकर यांनी 'नेटिव ओपीनियन' मध्ये पुनर्विवाहाचा बेत जाहीर केला व त्याला प्रतिसाद म्हणून पुनर्विवाहोत्तेजक मंडळीकडे वेणूबाईने आपला रूकार कळविला. करमरकर–वेणूबाई यांचा हा विवाह जाहीर रीतीने साजरा करावा, असे मंडळीने ठरविले. विवाहप्रसंगी वधूपक्षाने आपला जानवसा मोरोबा कान्होबा यांच्या बंगल्यात ठेवला व विवाह १५ जून १८६९ रोजी त्यांच्या बंगल्यातच लागला. या समारंभप्रसंगी मोरोबांनी पुढच्या व मागच्या अंगणात, मजलशीच्या जागेत व इतरत्रही 'हंडचा, झुंबरे, ग्लासे, वगैरे लावून अत्युत्कृष्ट रोषणाई करून चकचकाट केला होता. या वधूवरांची थाटात वरातही निघाली.' या विवाहात उत्साहाने भाग घेण्याची धर्मभ्रष्टता केल्याबद्दल प्रभू ज्ञातीतील सनातनी मंडळींचा मोरोबांवर कोप झाला; पण मोरोबांनी त्याची पर्वा केली नाही.

पूर्वी कित्येक प्रतिष्ठित सुधारकांचा खाक्या सुधारणा या सर्वसामान्य गरीब लोकांकरवी घडवून आणावयाच्या, स्वतःशी आले की हटकून कचखाऊपणा करावयाचा असा होता. सनातन्यांच्या विरोधापेक्षा सुधारकांच्या अवसानघातकीपणाने सुधारणेचे अधिक नुकसान झालेले आहे. पण मोरोबांची त्या बाबतीतली आस्था बावन्न कशी होती. मोरोबा हे बोलल्याप्रमाणे चालणारे होते. मोरोबांची कन्या दुर्दैवाने वैधव्यदशेत होती. तिने पुनर्विवाह करावा अशी त्यांची अतीव इच्छा होती. परंतु तो काळच असा होता की, ज्या विधवांच्या उद्धारासाठी आटापिटा चालला होता, त्यांची मनेच त्या काळी सुधारणांना अनुकूल नव्हती. मोरोबांनी मुलीची पाठ घेतली होती की 'तू पुनर्विवाह कर'; पण मुलीच्या आजीला म्हणजे मोरोबांच्या विधवा आईला ते पसंत नव्हते. तिने मोरोबांची विनवणी केली की, असा भ्रष्टाचार मांडून कुळाला बट्टा लावू नका. आजीबरोबर घरातल्या इतर आयाबायाही त्या बिचाऱ्या गतभर्तृकेला कानीकपाळी ऐकवीत राहिल्या, 'बघ, तुझा धर्मभ्रष्ट बाप मर्जीविरुद्ध तुझा पुनर्विवाह लावणार. सांभाळ!' एकीकडे वडिलांचा हट्टाग्रह आणि दुसरीकडे बायांची दटावणी! या कात्रीत सापडून बिचारीला अगदी इकडे आड आणि तिकडे विहीर असे झाले आणि अखेर आपली दुर्दशा चुकविण्यासाठी तिने विहीरच जवळ केली!

पण मोरोबांच्या स्वतःच्या संसाराचा दैवदुर्विलास याहून दारुण आहे. मोरोबांच्या पहिल्या पत्नीने आत्महत्या केल्यानंतर काही वर्षे ते विधुरावस्थेत होते. वयाची साठी जवळ आली होती. कर्ते सुधारक या नात्याने वृद्धपणाचीही क्षिती न बाळगता त्यांनी गतभर्तृकेशीच विवाह करण्याचा बेत ठरविला. 'बॉम्बे टाइम्स', 'नेटीव ओपीनियन', 'इंदुप्रकाश' आदी पत्रांतून 'वधू पाहिजे' अशा आशयाची

जाहीर विनंती प्रसिद्ध केली.

' मी, मोरोबा कान्होबा बाळाजी, आडनाव विजयकर, मुंबई येथील रहिवासी, जात पाठारे क्षत्री ज्यास पाठारे प्रभू असेही म्हणतात, मुंबई येथील स्मॉल कॉजेस कोर्टाचा जज्ज, आज पुष्कळ वर्षे विधुर आहे. हिंदुधर्मशास्त्राप्रमाणे परभू विधवेशी लग्न करण्यास तयार आहे. याजकरिता कोणी विधवा, त्यांचे आईवाप अगर पालक यांनी पत्रव्यवहार करावा. वधूचे वय २० ते ३५ असावे. वधूस अपत्य नसावे. चालू लग्नसराई संपण्यापूर्वी अर्ज यावेत. नामंजूर अर्जांची परिस्फुटता होणार नाही. माझ्या पश्चात् भावी भार्येस दरमहा ५० रु. तहहयात मिळण्याची व्यवस्था होईल. वैवाहिक संस्कार शास्त्रास धरून होतील.

हिंदुधर्मशास्त्राप्रमाणे विधवांना पुनर्विवाहाचा हक्क आहे. आणि तो सन १८५६ च्या १५ व्या कायद्याने सरकारने मान्य केला आहे. आमच्या जातीत असे पुनर्विवाह पूर्वकाली होत असत, असा पुरावा सन १७४३ मधील पेशवेदप्तरात मिळतो. असे अनेक उतारे ' मॅरेज ऑफ हिंदू विडोज् ' या माझ्या पुस्तकात मी प्रसिद्ध केलेले आहेत.' या विनंतीची थट्टा ' पिशाच ' या टोपण नावाने झाली होती.

मोरोबांच्या या जाहीर विनंतीला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. त्यांनी आपल्या अटी सैल केल्या, तेव्हा त्यांच्या पहिल्या पतीपासून झालेले एक पूर्वीचे अपत्य असणारी एक ज्ञातीतील गतभर्तृका लग्नास तयार झाली. ही बाई भवानीशंकर राघवानंद सौमित्र यांची कन्या आणि वासुदेव रघुनाथ दादाजी यांची पत्नी होती. तिचे वय २१ वर्षांचे असून तीन वर्षांपूर्वीच तिला वैधव्य आले होते. तिचे तेव्हाचे नाव सुमित्रा होते. नानीबाई व भुलीबाई अशी तिची दोन टोपणनावे पुढे रूढ झालेली दिसतात. ही विधवा वधू मोरोबांस पसंत पडून त्यांनी आपला पुनर्विवाहाचा बेत वृत्तपत्रांमधून जाहीर केला. पुढे शनिवार २६–३–१८७० रोजी त्यांचा विवाह सकाळी ११ वा. यथासांग झाला. सुधारकांनी मोरोबाच्या धैर्याची प्रशंसा केली; मात्र त्यांच्या आप्तांचा व सग्यासोयऱ्यांचा या विवाहास कसून विरोध होता. पाठारे प्रभू लोकांतील सनातनी मंडळींनी आपल्या राजगुरूंकडे २५ आणि २९ मार्च १८७० रोजी दोन बैठकी घेतल्या, खूप भवति न भवति झाली आणि वधूवरांवर तसेच कन्यादान करणाऱ्या पित्यावर जातीने बहिष्कार टाकला. मोरोबांकडे नाना मोरोजी यांच्यासारख्या सुधारकाखेरीज कोणीही अन्नव्यवहार करीत नसत. दरम्यान २८ मार्च ते ५ एप्रिल १८७० या काळात पुणे येथे विधवा-विवाहाच्या सशास्त्रतेचा कडाक्याचा वाद झाला. त्यात सनातन्यांचा विजय होऊन त्रैवर्णिकांत विधवाविवाह निषिद्ध ठरविण्यात आला. मोरोबांविरुद्ध पुकारलेल्या बहिष्कारावर त्यामुळे शिक्कामोर्तब झाल्यागत झाले. आपल्या ज्ञातिबांधवांच्या धमकावणीस वा बहिष्कारास भीक न घालता मोरोबा गवालिया टँकवरील आपल्या

बंगल्यात सुखाने कालक्रमणा करू लागले.

परंतु द्वितीय संसाराचे विवाहसुख मोरोबांना फार काळ लाभावयाचे नव्हते. १८ फेब्रुवारी १८७१ रोजी पहाटे गळचाशी गळा बांधलेल्या अवस्थेत मोरोबा व त्यांची पत्नी यांची प्रेते बंगल्याच्या आवारातील विहिरीत तरंगताना आढळून आली. कोणा दावेदाराने मोरोबांना घातपाताच्या धमक्या दिल्या होत्या; त्याने त्या खऱ्या केल्या, अशी लोकसमजूत होती; तर त्यांच्या वारसांनीच त्यांच्या धर्मभ्रष्टतेबद्दल त्यांचा असा काटा काढला, अशीही अफवा ज्ञातीत पसरली होती. जूरीने मात्र 'आत्महत्या' असा निर्णय दिला. मोरोबांचे क्रियाकर्मांतर करण्यास त्यांचे ज्ञातिबांधव मोठचा मिनतवारीने तयार झाले; पण त्यांच्या सौभाग्यवतीला अग्नी देण्यास कोणी पुढे येईना. अखेर रा. ब. नाना मोरोजी यांनी तिची उत्तरक्रिया केली. 'टाइम्स'मध्ये ही वार्ता प्रसिद्ध करताना मोरोबांबद्दल म्हटले होते : Moroba's former wife had committed suicide. He was of violent temper. His son, Khanderao Morojee was not on good terms with father. (**टाइम्स ऑफ इंडिया**, २० फेब्रु. १८०१) माधवदास रघुनाथदास हे कपोल वाणी कर्ते सुधारक होते. त्यांनी जेव्हा पुनर्विवाह केला, तेव्हा लोक मोरोबांच्या दुर्दैवी पुनर्विवाहाचा दाखला देत. ते म्हणत की, मोरोबांसारख्या न्यायालयातील वरिष्ठ अधिकाऱ्याची ही दुर्दशा झाली, तर यःकश्चित माधवदासाची ती कथा काय ! अत्युत्साही पुनर्विवाहित दांपत्याची अशी दारुण शोकान्तिका आकस्मिक रीतीने घडून आली होती ! या घटनेमुळे समाजात किती विलक्षण खळबळ माजली असेल आणि सुधारणेचे थेर करणाऱ्यांचा शेवट हा असा होतो, अशी अपशकुनी कांक्षा तत्कालीन अंधश्रद्धाळू जनमानसात कशी दीर्घकाळ घर करून राहिली असेल, याची कल्पनाच करणे बरे ! राजकीय चळवळीत हौतात्म्य वा आत्मबलिदान यांचे तांडव सुरू होण्यापूर्वीच सामाजिक चळवळीच्या वेदीवर झालेले हे हौतात्म्य वा आत्मबलिदान विलक्षण चित्तथरारक होते, यात शंकाच नाही.

८. एका गुजराती पुनर्विवाहाची सुखान्तिका

भारतीय प्रबोधनाच्या चळवळीत एकोणिसाव्या शतकाचे खास महत्त्व आहे. या शतकाच्या प्रारंभी पाश्चात्त्य संस्कृतीशी आपला संपर्क आला. ती विज्ञाननिष्ठेकडे झुकणारी होती; तर आपली संस्कृती गतानुगतिक होती. या उभय संस्कृतींत निर्माण झालेल्या तणावातून कालचक्रालाच गती मिळाली. मुंबईसारख्या शहरात प्रथमच नवविचारांचे वारे वाहू लागले. आधुनिकतेच्या दिशेने समाजाची वाटचाल हळूहळू सुरू झाली. नवशिक्षितांना आपल्या आचारविचारांचे आत्मपरीक्षण करावेसे वाटू लागले. त्यांना सर्वांत प्रकर्षाने जाण आली ती स्त्रीवर्गाच्या दुःस्थितीची. विशेषतः विधवांची दयनीय परिस्थिती पालटली पाहिजे, असे त्यांना मनोमन वाटू लागले. विधवाविवाह ही या शतकातील सुशिक्षितांच्या सुधारणेच्या चळवळीची एक केंद्रवर्ती समस्या होऊन राहिली.

या समस्येच्या सोडवणुकीसाठी गुजराती आणि महाराष्ट्रीय समाजसुधारकांनी 'एकमेकां साह्य करू' असे समंजस धोरण ठेवल्याचे दिसून येते. पुढे कै. विष्णुशास्त्री पंडितांनी (१८२७–१८७६) विधवाविवाहाचे कार्य संघटितरीत्या चालवण्यासाठी पुनर्विवाहोत्तेजक मंडळी १८६५ साली मुंबईत स्थापन केली. गुजराती समाजात शेठ माधवदास रघुनाथदास (१८३०–१८९६) या गृहस्थांच्या रूपाने

पंडितांना एक समानधर्माचं भेटला. या दोघांनी परस्परसहकार्याने या क्षेत्रात जे बहुमोल कार्य केले, ते सुधारणेच्या चळवळीच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्याजोगे आहे. त्यातही विशेष गोष्ट अशी की, पंडित आणि माधवदास हे बोल-घेवडे सुधारक नव्हते. त्यांनी जे उपदेशिले ते स्वतः आचरून दाखवले. केशवचंद्र सेन, दुर्गाराम मेहेता, रानडे, तेलंग, लोकहितवादी, भा. दा. पाळंदे त्यांच्यासारख्य मातब्बर सुधारकांनी प्रत्यक्ष कृतीच्या वेळी कचखाऊपणा केलेला होता. या पार्श्व-भूमीवर या दोघांचे वर्तन 'बोले तैसा चाले' या कोटीतले म्हणून खचितच उठून दिसते. कर्मधर्मसंयोगाने या उभयतांवर प्रसंग पडला, तेव्हा त्यांनी गतभर्तृकेशी विवाह केला; जातिबहिष्काराची पर्वा केली नाही. शेठ माधवदास यांनी आपल्या पुनर्विवाहाची हकीकत गुजरातीत आणि इंग्रजीत प्रसिद्ध केलेली आहे. तिचे मराठी भाषांतर सुधारकाग्रणी गो. ग. आगरकर आणि त्यांचे सहकारी सी. ग. देवधर यांनी इंग्रजी आवृत्तीवरून केलेले असावे (कारण गुजराती आवृत्तीत काही अधिक भर आहे) सन १८९२ साली 'एका विधवाविवाहाची गोष्ट' या मथळ्याखाली ते 'सुधारक' पत्रात प्रसिद्ध झाले होते.

पुढे इ. स. १९०८ मध्ये गो. चि. भाटे यांनी रानडे स्मारकमालेचे तृतीय पुष्प म्हणून 'आत्मलिखित पुनर्विवाहचरित्र' या नावाने ते प्रसिद्ध केले. या आत्मलिखितात शेठजींनी जी हकीकत सांगितली आहे, ती जशी चटकदार तशीच चटका लावणारी आहे. भाषांतरित स्वरूपात वाचीत असतानाही या आत्मपर कहाणीत एका अतीव प्रांजळ आणि पारदर्शक व्यक्तिमत्त्वाचा घनस्पर्श जाणवल्या-वाचून राहत नाही.

कर्तृत्वशाली थोर व्यक्तींचे आत्मपर लेखनसुद्धा एक प्रकारच्या अपरिहार्य कात्रीत सापडत असते. स्वकर्तृत्वाचे वास्तव कथन केले, तरी त्याला आत्मप्रौढीचा वास येतो आणि ऊनोक्तीचा आश्रय केल्यास खोट्या विनयाचा आळ येतो. आत्मपर लेखनाची ही तारेवरची कसरत भल्याभल्यांना साधलेली नाही. विशेषतः ज्यांना लेखणी वश झालेली आहे, अशा साहित्यिकांची आत्मचरित्रे वाचायला रोचक वाटली, तरी पुष्कळदा ती सत्यापलापाने शवलित झालेली आढळून येतात. आपण कसे आहो यापेक्षा वाचकांना आपण कसे दिसू, असा पवित्रा ते जाणीवपूर्वक घेतात. पण अशा जाणिवेची बाधा शेठ माधवदासांच्या आत्मलिखिताला सुतराम झालेली नाही. स्वतःवर ओढवलेल्या प्रसंगांचे वर्णन असो, विरोधकांच्या वर्तनावरील प्रतिक्रिया असो, वैयक्तिक मतांचा आविष्कार असो वा समकालीन समाजस्थिती-वरील टीपाटिप्पणी असो, त्यांच्या शब्दाशब्दांतून जाणवतो तो अंतर्बाह्य प्रांजळपणा! आणि अंतर्बाह्य प्रांजळपणा हाच शेवटी आत्मपर लेखनाचा प्रमुख निकष असतो.

माधवदास हे कपोल वाणी. त्यांचा जन्म मुंबईत स. १८३० साली झाला. त्यांचे वडील रघुनाथदास यांचा चीनशी व्यापार होता. माधवदास हे रेशमी कापडाचे व्यापारी म्हणून नावाजलेले होते. ते गर्भश्रीमंत होते. पण अशी गर्भश्रीमंत आणि प्रतिष्ठित माणसे त्या काळी तरी बहुधा सुधारणांच्या कार्याला बोलकी सहानुभूती दाखवीत; प्रत्यक्ष कृती करून जातगंगेचा कोप ओढवून घ्यायला मात्र कोणी सिद्ध नसत. शेठजींनी ते मनोधैर्य दाखविले. इतकेच नव्हे, तर तनमनधनाने विधवाविवाहाच्या कार्याला साहाय्य केले.

'महाराजा लायबेल खटला' ज्यांनी हिरीरीने लढवला, ते करसनदास मूळजी (१८३८-१८७१) माधवदासांचे परममित्र व स्फूर्तिदाते होते. त्यांच्या 'विलायतचा प्रवास' या ग्रंथाने प्रभावित होऊन ते सुधारणेचे कैवारी बनले होते. तसेच त्यांच्या 'सत्यप्रकाश' या सुधारणावादी पत्रात शेठजी अबलोन्नतीच्या विविध प्रश्नांवर गुजरातीमधून लेखन करीत असत. 'आत्मलिखित पुनर्विवाह-चरित्रा'त शेटजींनी आपल्या पुनर्विवाहाच्या हकीगतीबरोबर समाजसुधारणेच्या प्रश्नावर जी मते मांडली आहेत, तीही लक्षणीय आहेत.

शेठ माधवदासांचा पहिला विवाह त्या काळच्या रीतीप्रमाणे १८ व्या वर्षी झालेला होता. त्यानंतर पत्नीनिधनाचे प्रसंग त्यांच्यावर एकामागून एक येत गेले. वयाच्या बाविसाव्या वर्षी दुसरा व तेविसाव्या वर्षी तिसरा विवाह होऊन पुन्हा एकेचाळिसाव्या वर्षी ते विधुर झाले. तीन वर्षे वयाच्या छोटच्या कन्येखेरीज त्यांची अपत्येही जगली नव्हती. या साऱ्या कौटुंबिक आघातांमुळे शेटजींच्या मनावर उदासीनतेचा पगडा बसला होता. आपल्या भाळी संसारसुख ही गोष्टच विधात्याने लिहिलेली नाही, अशी त्यांची बालंबाल खात्री झाली होती. तरी पण घरची सुस्थिती असल्याने जातीतील प्रतिष्ठित घराण्यातल्या मुली सांगून येऊ लागल्या. शेठजींनी साऱ्यांना नकार दिला; कारण त्यांना सारे सुखोपभोग अगदी निस्सार होऊन गेले होते.

पण कालांतराने त्यांनी जेव्हा विवाह करण्याचे ठरवले, तेव्हा मात्र ते तत्त्वाला जागले. त्यांनी जातीतल्या गतभर्तृकेशी विवाह करण्याचा निश्चय केला. सन १८७१ च्या एप्रिल महिन्यात 'रास्त गोफ्तार' या गुजराती पत्रात त्यांनी जाहिरात दिली : 'विधवाविवाहास तयार असणाऱ्या एका अब्रुदार कपोल वाणी गृहस्थासाठी त्याच जातीच्या कुलीन विधवेचे मन वळवून विवाहयोग जुळवून आणणारास पाचशे रुपयांचे बक्षिस दिले जाईल.' ही मोघम स्वरूपाची जाहिरात प्रसिद्ध होताच कपोल वाणी समाजात एकच अनामिक खळबळ माजली. पण त्या जातीतील जाणकारांनी ओळखले की, हे माधवदासाखेरीज दुसऱ्या कोणाचेच काम नाही. ही जाहिरात म्हणजे माधवदासांची एक टूम आहे; स्वतःच्या सुधारकी

मतांची टिमकी वाजवण्याचा तो एक प्रयत्न आहे; त्याच्या हातून प्रत्यक्ष कृती घडणे शक्य नाही. इतर सुधारकांनी कच खाल्ली, तशीच हाही खाणार!

कपोल वाणी जातीत त्या काळी शेठ वरजीवनदास माधवदास म्हणून एक बडे प्रस्थ होते. त्यांची पुतणी धनकुंवर म्हणून होती. तिचे लग्न अगदी बाळपणी होऊन लगोलग विचारीला वैधव्य आलेले होते. आईजवळ राहून ती आपले जिणे व्रतस्थपणे कंठीत असे. ऐन तारुण्यातील तिचे खडतर जीवन आणि दयनीय स्थिती पाहून माधवदासांनाही तिच्याविषयी कळवळा वाटत असे. मात्र तिच्याशी आपला पुनर्विवाह होईल किंवा तसा प्रयत्न कोणाकडून केला जाईल, असे त्यांच्या मनातही नव्हते.

पण मथुरदास खेत्सी या गृहस्थांनी 'रास्त गोफ्तार' मधील जाहिरात धनकुंवरबाईच्या नजरेस आणली. तोपर्यंत धनकुंवरबाईच्या मनाला पुनर्विवाहाचा विचार कधी शिवला नव्हता. मात्र तिला जीव नकोसा झालेला होता. ती आत्महत्येचे विचारही बोलून दाखवीत असे व तिचे हितचिंतक तिला परावृत्त करीत असत. 'रास्त गोफ्तार' मधील जाहिरात माधवदासाची असावी हे जाणकारांस माहीत होते, तसे तिलाही माहीत झाले. तिला शेठ माधवदासांविषयी आदर होता. पण जातीचे कडक नियम मोडण्याचे धाडस कसे करावे, असा तिला पेच पडला. तिने आपल्या हितचिंतक आयाबायांशी विषय काढून खडा टाकून पाहिला. विधवांना विवाह करता येत नाही, ही गोष्ट अमानुष आहे, असे साऱ्यांनाच वाटे. पण त्या पोक्तपणे शेवटी म्हणत, 'इतर कनिष्ठ दर्जाच्या जातींना जे शोभेल, ते वाणी वा ब्राह्मण अशा वरिष्ठ जातींना शोभणार नाही, हिताचे ठरणार नाही.' ('जे वात अरगे ते अरगे कोई वाणीआ भ्राह्मण गरगे!') माधवदासांशी पुनर्विवाह करकरण्याने आपण माहेराला आणि विशेषतः आपल्या प्रेमळ व वृद्ध मातेला कायमच्या अंतरू, या विचाराने धनकुंवरचे मन गलबलले. पण अखेर तिने जिवाचा धडा करून माधवदासांना रुकार कळवला.

पुनर्विवाहाची वार्ता षट्कर्णी झाल्यास जातवाले हजार विघ्ने आणतील, हे ठरलेलेच होते. म्हणून माधवदासांनी विश्वासातील मित्रांशिवाय कोणालाही सुगावा लागू नये, अशी शक्यतो काळजी घेतली. पोलीस कमिशनर फ्रांक सूटर यांना भेटून गुप्त पोलीसांचे संरक्षण मिळवले. नाना मोरोजी आणि महादेव गोविंद रानडे या महाराष्ट्रीय मॅजिस्ट्रेटांना उपस्थित राहण्याची विनंती केली व ती त्यांनी संतोषाने मान्य केली. चिंचपोकळी येथे एक निवान्त बंगला विवाहसमारंभासाठी भाड्याने घेतला. वधूच्या घरालगत असलेल्या लखमीदास खिमजी यांच्या बंगल्यासमोर तल्लख घोड्यांच्या तीन गाड्या ठरवलेल्या वेळी तत्पर ठेवण्याची मित्राकरवी व्यवस्था केली. मित्रांना पाठवलेल्या समारंभाच्या लग्नचिठ्याही मोघम होत्या. अमुक

दिवशी, अमुक मूहूर्तावर अमुक स्थळी एक विधवाविवाह होणार आहे, तो पाहण्यास आपण अगत्य यावे, अशा आशयाचा मजकूर त्यांत होता. वधुवरांचे नावगाव दिलेले नव्हते. एवढी काळजी घेतलेली असली, तरी वधुवरांच्या जिवाची धाकधूक थांबत नव्हती. विवाहाच्या आदल्या रात्री त्यांना झोप आली नाही. धनकुंवर भल्या पहाटे उठली. घरात एकान्तस्थळी जाऊन तिथे तिने आपल्या मातेसाठी एक अत्यंत हृदयस्पर्शी पत्र लिहून ठेवले. ते वाचताना काळजाला पीळ पडतो. पत्र असे होते :

' अपत्यवत्सल लाडके आई,

वैधव्याच्या दुःसह यातना साहण्यास असमर्थ होऊन मी सर्व प्रकारचे अन्न सोडले आणि एवढ्याशा द्रव्यावर चरितार्थ करू लागले हे तुला ठाऊक आहेच. याचा परिणाम असा झाला की, मी पराकाष्ठेची क्षीण झाले; पण मरण यावे ही जी माझी इच्छा, ती पूर्ण झाली नाही. मृत्यू तर आलाच नाही; पण त्याऐवजी मला फेफरे येऊ लागले आणि वारंवार दातखिळी बसू लागली. लाडके आई, तू जिवंत आहेस तोपर्यंत मला कशाचीही भीती नाही; परंतु तुझ्या पाठीमागे भावाच्या आणि भावजयीच्या घरी माझ्याच्याने एक दिवसदेखील निघणार नाही, असे मला वाटते. तू गेल्यावर मी उघडी पडेन व माझे रक्षण करण्यास कोणीही राहणार नाही. तुझ्या पश्चात माझी अशी अवस्था व्हावी हे मला बरे न वाटून, जो मार्ग मला अत्यंत प्रशस्त वाटला तो मी अनुसरत आहे. लाडके आई, याउपर तुझी माझी भेट होण्याचा संभव नाही. म्हणून मला मृत्यूने तुजपासून दूर केले आहे असे समज. तथापि तू खुशाल आहेस असे कोणाच्याही तोंडून जेव्हा जेव्हा माझ्या कानी येईल तेव्हा तेव्हा मला पराकाष्ठेचा आनंद होणार आहे. मी जे वर्तन करण्यास प्रवर्तले आहे, ते करण्यास माझी कोणी मनवळणी केलेली नाही. ते मी अगदी आपण होऊन करीत आहे. तेव्हा त्याबद्दल कोणालाही दोष देऊ नको. मी तुझ्या घरातून काहीएक घेऊन गेले नाही. यासंबंधाने कृपा करून तू चांगली चौकशी कर आणि आपली खातरी करून घे. देवांची पूजा जो भक्तिपूर्वक नित्य करील अशा एखाद्या मनुष्याला ठाकोरजीचे दागिने देऊन टाक. काकापाशी मी आपली हेमसळी विकण्यास दिली आहे. तिची जी किंमत येईल ती पुनः उभयता वाटून घ्या व जी माझी वापरण्याची वस्त्रे मी मागे ठेवून जात आहे, ती माझ्या बहिणीस आणि भावाच्या मुलीस विभागून द्या. आता तुम्हा सर्वांस नमस्कार करून तुमची आज्ञा घेते.

तुमची लाडकी हतभागी कन्या,

धनकुंअर.

(आत्मलिखित पुनर्विवाहचरित्र पृ. २३–२४)

धनकुंवरने आईला लिहिलेले पत्र एका पेटीत ठेवून दिले. मथुरदास खेतसी घरापुढील रस्त्यावर उभे राहतील तेव्हा त्यांच्याबरोबर निघायचे, असा निरोप माधवदासांनी दिलेला होता. डोळ्यांत प्राण आणून खिडकीशी येऊन धनकुंवर त्यांची वाट पाहात उभी राहिली. संकेताप्रमाणे मथुरदास आले. आपल्या भावजईस भेटावयास जाते, असे सांगून धनकुंवर मथुरदासांबरोबर लखमीदासांच्या बंगल्यापर्यंत आली. तिथे उभ्या घोड्यांच्या तीन गाड्या सज्जच होत्या. एका गाडीत माधवदास, त्यांची छोटी कन्या गोमी आणि भावी वधू धनकुंवर बसली. दुसरीत त्यांचे स्नेही करसनदास मूळजी व मथुरदास बसले. तिसरीत संरक्षणार्थ बोलावलेले शिपाई बसले. गाड्या सुरू झाल्या. माधवदासांपलीकडे बसलेल्या धनकुंवरचा सारा देह थरथर कापत होता. न जाणो, नातेवाइकांपैकी कोणाला सुगावा लागला नि त्यांनी बळजबरीने परत नेले – पराचा कावळा होईल; नसत्या कंड्या पिकतील; बेअब्रूला पारावार राहणार नाही – अशा नाना विचारांनी धनकुंवरचे मन धास्तावलेले होते. गाड्या निघाल्या नि 'प्रथमग्रासे मक्षिकापातः' म्हणतात तसे झाले. समोरचे एक वाकण अरुंद होते. गाडी वळवताना घोडा उधळला नि गाडीचा पोलच मोडून पडला. वधुवरांची हृदये भयकंपित होऊन धडधडली. पण मोडलेला भाग बळकट दोरखंडांनी सांधण्यात आला. मग गाडी भरधाव चिंचपोकळीच्या बंगल्यात येऊन थडकली आणि वधुवरांचा जीव भांड्यात पडला.

दुपारनंतर विवाहविधीचे साहित्य घेऊन विष्णुशास्त्री पंडित आले आणि दोन मे अठराशे एकाहत्तर रोजी सायंकाळी हा पुनर्विवाह मोठ्या उत्साहाने साजरा झाला. पत्नीच्या भावी आयुष्याची तरतूद म्हणून विवाहसमारंभापूर्वी तिच्या नावे आठ हजार रुपये ठेवण्याचे एक करारपत्र करण्यात आले. त्यावर नाना मोरोजी आणि म. गो. रानडे या मॅजिस्ट्रेटांच्या, तसेच वधूवर आणि साक्षीदार यांच्या स्वाक्षऱ्या झाल्या. समारंभासाठी जमलेल्या दोनशे प्रतिष्ठित मंडळींसमोर त्या करारपत्राचे वाचन झाले. पुनर्विवाहाचे पौरोहित्य अर्थातच विष्णुशास्त्री पंडितांनी केले; तर कन्यादान करसनदास मूळजी यांनी केले. करसनदासांनी वधूस सोन्याच्या चार बांगड्यांचा अहेर केला. उपस्थितांमध्ये लखमीदास खिमजी, धीरजराम दलपतराम, भाईशंकर नानाभाई, के. एन. काब्राजी, माणिकजी बरजोरजी ('मुंबई समाचार'चे तत्कालीन संपादक), नानाभाई आर. राणिया, थाकरसी नरोंजी, लीलाधर उद्धवजी, मरवानजी आर. मर्झबान, मूळजी ठाकरसी, मथुरदास खेतसी या पार्शी व गुजराती वजनदार स्नेह्यांबरोबरच नाना मोरोजी, म. गो. रानडे, बाळ मंगेश वागळे, डॉ. आत्माराम पांडुरंग, दादोबा पांडुरंग, जनार्दन सखाराम गाडगीळ, मामा परमानंद, भास्कर हरी भागवत, रा. गो. भांडारकर, वासुदेवराव नवरंगे यांसारखी प्रतिष्ठित महाराष्ट्रीय मंडळीही होती, 'मुंबई समाचार' वगैरे पत्रांनी

पुनर्विवाहाची हकीकत सविस्तर देऊन या प्रसंगी मुद्दाम रचलेल्या कविता व पदे तसेच शेठजींना आलेली अभिनंदनपर पत्रेही प्रसिद्ध केली. पुढे त्या पदांची व गाण्यांची 'पुनर्लग्न गायणसंग्रह' सारखी पुस्तकेही निघाली. 'धन्य धन्य धनकोर, ते सारी चाल पाडी' अशी गाणी त्या काळी लोकांच्या तोंडी प्रचलित होती.

इकडे धनकुंवरच्या माहेरी मंडळी हवालदिल झाली; कारण संध्याकाळपर्यंत धनकुंवर परत आलेली नव्हती. सर्व नातेवाइकांकडे चौकशी झाली. तिने जीववीव तर दिला नाही ना, अशी शंका येऊन जवळची माणसे शोक करू लागली. रात्र झाली होती. मशाली पेटवून विहिरी, तळी, समुद्रकिनारा सर्वत्र शोधाशोध चालू झाली. धनकुंवरचा भाऊ लक्ष्मीदास शोध करीत वाळकेश्वर पोलिसठाण्याजवळ आला. तेव्हा त्याला वाटेत थाकरसी नोरोंजी भेटले. त्यांनी माधवदासांशी धनकुंवरचा पुनर्विवाह झाला, आपण तिकडूनच येत आहो, असे सांगितले. भावाने विचारले की, 'ती कुठे आहे ?' थाकरसी म्हणाले, 'ती सुस्थळी आहे. पण कुठे ते सांगणार नाही. जरा दम धरा. सकाळच्या वृत्तपत्रांतून तुम्हाला इत्थंभूत हकीगत वाचायला मिळेलच.'

शोध थांबवून लक्ष्मीदास रडतरडतच घरी आला. घरी खूप माणसे गोळा झाली होती. त्यांना वाटले, म्हटल्याप्रमाणे धनकुंवरने नक्कीच जीव दिला. बायामाणसांनी ऊर बडवायला प्रारंभ केला. रडण्याचा उमाळा ओसरल्यावर भावाने माधवदासाशी तिने पुनर्विवाह केल्याचे सांगितले. पोरीने कुळाला बट्टा लावला म्हणून पुन्हा साऱ्यांना दुःखाचे कढावर कढ आले. रडारड ओसरल्यावर धनकुंवरची चिठ्ठीही मिळाली. ती वाचून सर्वांना पुन्हा दुःखाचा उभाडा आला. ती सबंध रात्र धनकुंवरच्या माहेरी एकच हलकल्लोळ माजून राहिला होता.

माधवदासांच्या या पुनर्विवाहामुळे कपोल वाणी ज्ञातीत क्षोभ उसळणार हे ठरलेलेच होते. कांदेवाडीतील गोपाळदास माधवदास यांच्या वाडीत ज्ञातीची सभा भरून पुनर्विवाहित दांपत्य आणि त्यांचे साहाय्यक यांच्याशी कोणीही रोटीबेटीव्यवहार करू नये, असा ठराव सर्वानुमते संमत झाला. वरजीवनदास माधवदास प्रभृती बडचा प्रस्थांनी शेठजींची व्यापारातील, सरकारदरबारातील पत खाली यावी असे प्रयत्न केले. सर मंगळदास नथूभाई हे माधवदासांचे आश्रयदाते आणि एके काळचे हितचिंतक. त्यांनी शेठजींना बहिष्कार पुकारणाऱ्या ज्ञातींतील पुढाऱ्यांवर खटला भरण्याचा सल्ला दिला आणि आयत्या वेळी त्यांना तोंडघशी पाडले. माधवदासांचे स्नेही करसनदास मूळजी यांच्यावर शेठजींच्या दावेदारांनी मारेकरी घालण्यास कमी केले नाही; पण आधीच दक्षता घेतलेली असल्याने ते मोठ्या शर्थीने निभावले. शेठजींना स्वसंरक्षणासाठी चार काबुली पठाण बरेच दिवस बाळगावे लागले होते.

हा पुनर्विवाह झाल्यावर वर्षभरात शेठजी आजारी पडले आणि हवापालटा-साठी राहते घर सोडून महालक्ष्मीला जाऊन राहिले. या स्थलांतरावरून हितशत्रूंनी अशी कंडी पिकवली की, शेठजी मयत झाले. त्यांच्या अंत्यसंस्काराच्या वेळी माणसे मिळेनात, तेव्हा पाचपाच रुपये देऊन भुलेश्वरहून बैरागी भाड्याने आणून क्रिया उरकावी लागली. शेठजींपाशी जिंदगीही विशेष नव्हती; त्यांचे मृत्युपत्रही त्यांनी अमुकअमुक प्रकारे करून ठेवले आहे. आपल्या आत्मलिखितात शेठजी यासंबंधी म्हणतात, 'या सर्व वार्तेचे जनकत्व स्वेच्छेकडेच असल्यामुळे त्यांनी मला मारले, जाळले व ते माझे मृत्युपत्रही करण्यास विसरले नाहीत!'

पण या साऱ्या कारवायांना पुरून उरणाऱ्या शेठजींच्या हातून अनेक गतभर्तृकांचे कल्याण व्हायचे होते; अनेक कन्यादानांचे पुण्य त्यांच्या पदरी पडायचे होते. त्यांच्या आत्मलिखिताच्या काळापर्यंत त्यांच्या साहाय्याने वीसएक पुनर्विवाह घडून आलेले होते.

सुधारणेच्या कार्यात सरकारचा पाठिंबा घेतला पाहिजे, असे माधवदासांचे मत होते. पण राजकीय सुधारणेसाठी लोक त्याग करतात, तसा समाजसुधारणे-साठी करीत नाहीत, याची त्यांना खंत वाटे. ढोंगी सनातन्यांइतकाच निव्वळ बोलक्या सुधारकांविषयी त्यांना राग होता. सभ्य म्हणवणारा सनातनी समाज विधवांच्या पापाचरणाबाबत कसा 'झूट पण नीट' वागत असे, त्याचे नेमके चित्र त्यांनी आपल्या आत्मलिखितात रेखाटले आहे. ते आत्मलिखितात म्हणतात, 'ज्या तरुण विधवेचे पाऊल कुमार्गाने पडते ती गर्भपात करते, किंवा तो न झाल्यास तिची मातापितरे गाव सोडून तीर्थयात्रेस जातात आणि परदेशात आपल्या पतित अपत्या-कडून घडलेल्या पापाचे कसेतरी प्रक्षालन करवितात. अशा प्रकारे तरुण गतभर्तृकेस बरोबर घेऊन यात्रेस निघण्याचे खरे कारण सामान्य गृहस्थास न समजले, तरी ते जवळच्या आप्तांस पक्के ठाऊक असते. पण असला प्रसंग मागेपुढे सर्वांवरच गुदरण्याचा संभव असल्यामुळे त्याचा कोणी बोभाटा करीत नाही.' (पृ. १०.)

निराधार विधवांना शेठजींचे घर म्हणजे एक आश्रयस्थान वाटत असे. आश्रयास आलेल्या दक्षिणी वा गुजराती विधवेच्या विवाहाची खटपट पदराला खार लावून ते करीत. भावनगरला कपोल वाणी जातीची एक विधवा गरोदर झाली. पूर्वी अशाच स्थितीत एका विधवेला तिच्या जातभाईंनी जगातून नाहीशी केली होती; म्हणून आपल्या एका मित्राच्या मदतीने ती मुंबईस आली. पण जातभाईंना या गोष्टीचा सुगावा लागला. त्यांनी तिच्या मित्राला बेदम चोपले, सुइणीकरवी तिचा गर्भपात करविला आणि तिला भावनगरास धाडून दिले. तिथले लोक कोणत्या ना कोणत्या मार्गाने तिला समाजातून उठवणार किंवा जगातून कायमची नाहीशी करणार हे ठरलेलेच होते. तेव्हा आपणास आत्महत्या करण्यावाचून आता दुसरा

मार्ग नाही, असे तिने आपल्या मुंबईच्या मित्राला पत्राने कळवले. हा मित्र माधवदासांचा सल्ला मागण्यासाठी गेला. माधवदासांनी या अनाथ अबलेची सुटका करण्यासाठी मथुरदास खेतसी याच्यावरोबर काबुली पठाण व एक माणूस देऊन त्यांना भावनगरला रवाना केले. प्रथम कोणी त्या बाईचा थांगपत्ता लागू देईना. अखेर एका गाडीवानाकडून पत्ता मिळाला व ते तिला घेऊन मुंबईस आले. आपण ज्याच्याबरोबर प्रथम मुंबईस आलो त्या गृहस्थाशी लग्न करण्याची आपली इच्छा आहे, असे बाईने सांगितले. उभयतांची त्या गोष्टीला मान्यता आहे याची खात्री झाल्यावर माधवदासांनी त्यांचा विवाह घडवून आणला. १८८७ साली गंगाबाई ही कऱ्हाडा ब्राह्मण विधवा केशवपनाच्या जुलमाला कंटाळून माधवदासांकडे आश्रयास आली. शेठजींच्या प्रयत्नाने तिचा विवाह वनमाळी लाधा मोदी या पत्रकाराशी झाला. या मिश्र पुनर्विवाहाच्या प्रसंगी प्रार्थनासमाजाचे पुढारी वामन आवाजी मोडक यांनी पौरोहित्य केले आणि डॉ. आत्माराम पांडुरंग यांनी शेठजींना सर्वतोपरी मदत केली. अहमदनगर येथील पार्वतीबाई नामक चित्तपावन तरुण विधवेने केशवपनाच्या भीतीने शेठजींच्या घरी आश्रय शोधला होता. विधवांना स्वतःच्या पायांवर उभे राहता यावे, म्हणून त्यांना हस्तव्यवसायाचे शिक्षण देणारे एक उद्योगालयसुद्धा त्यांनी चालविले होते. (**गृहिणी**, ऑगस्ट १८८७, पृ. ७९). आपल्या कपोल वाणी जातीतील जे तरुण विधवेशी विवाह करण्याच धाडस दाखवीत, त्यांना प्रत्येकी शंभर रुपयांचे पारितोषिक देऊन शेठजी सक्रिय उत्तेजन देत असत. विधवाविवाह साजरे करण्यासाठी १८८८ साली त्यांनी 'पुनर्विवाहमंदिर' (Hindu Widows Marriage Hall) स्वखर्चाने बांधून दिले. द्वारकानाथ राघोबा तर्खडकर, वि. कृ. श्रीखंडे आणि कृष्णराव माधवराव चोनकर यांचे पुनर्विवाह याच मंदिरात लागले होते.

करसनदास मूळजी हे शेठजींचे जीवश्च कंठश्च स्नेही, किंबहुना काही बाबतींत त्यांचे आदर्श किंवा गुरूच. त्यांचा अकाल मृत्यू आणि त्यांच्या पश्चात् सनातनी समाजाने त्यांच्या अज्ञ कुटुंबियांवर उगविलेला प्रायश्चित्ताचा सूड यांविषयी शेठजींनी अगदी पोटतिडकेने लिहिले आहे. आपल्या पुनर्विवाहाची कहाणी लिहून काढण्याची प्रेरणा शेठजींना करसनदासांच्या विलायतच्या प्रवासवर्णनानेच दिलेली होती. शेठजींचा पुनर्विवाह २ मे १८७१ रोजी साजरा झाला. म्हणजे त्यांनी ही कहाणी जवळ जवळ वीस वर्षांनी सांगितली आहे. काही सनसनाटी लेखन करून पैसे कमावणे हा या कहाणीच्या लेखनामागील उद्देश नव्हता. आपल्या पुस्तकाच्या आवृत्तीवर त्यांनी मूल्य घातले नव्हते. सत्पात्र व्यक्तींना भेट देण्यासाठीच त्यांनी ती प्रकाशित केली होती. ही कहाणी प्रथम इंग्रजीत लिहून मग तिचे गुजरातीत भाषांतर करण्यात आले, असे इंग्रजी आवृत्तीच्या प्रस्तावनेत श्री. काव्राजी यांनी

म्हटले आहे; पण ते वरोबर नाही. गुजरातीवरूनच ती इंग्रजीत, अगदी तंतोतंत नसली तरी, भाषांतरित झालेली आहे.

माधवदासांची मते आणि वर्तणूक सुधारकी बाण्याची असली, तरी सुधारक लोकांची एक वेगळी जात व्हावी, अशा मताचे ते नव्हते. जातीत राहून किंबहुना जातीचा जाच सहन करून सुधारणेचा पायंडा पाडला जावा, अशा मताचे ते दिसतात. या दृष्टीने तत्कालीन कट्टर प्रार्थनासमाजी मते आणि कार्यपद्धती त्यांना तितकीशी संमत नसावी, असे दिसते. विष्णुशास्त्री पंडितांचे धोरणही त्यांच्या-सारखेच होते. पुढे महर्षी धोंडो केशव कर्व्यांनी विष्णुशास्त्री पंडितांचा वारसा चालविण्यासाठी संस्था काढली, त्यामागील धारणाही अशाच प्रकारची होती. 'प. वा. स. पां. केळकरांसारखे सत्पुरुष ब्रह्मसमाजाला वाहिलेले असल्याने अलग पडतात...अनुष्ठानिक ब्रह्मो म्हणजे ब्रह्मसमाजाची मते आचरणात आणणारे असल्यामुळे जुन्या पद्धतीने कार्याचा विस्तार करण्यास तितके योग्य नव्हते,' हा कर्व्यांचा अभिप्राय या बाबतीत पुरेसा बोलका आहे. काही प्रार्थनासमाजी पुढाऱ्यांनी बोलल्याप्रमाणे कृती केली असली, तरी अन्य बोलघेवड्या सुधारकांप्रमाणे प्रार्थना-समाजी पुढाऱ्यांवर, विशेषत: रानडे–लोकहितवादींसारख्या नेत्यांवर अवसान-घातकीपणाचे रास्त आक्षेप घेतले गेले होते. डॉ. रा. गो. भांडारकर यांच्या शांता या ज्येष्ठ कन्येचा विवाह डॉ. भाऊदाजींच्या द्वारकानाथ या धाकटया मुलाशी झाला होता. हा मुलगा १८७५ मध्ये वारला. तदनंतर काही वर्षे गेली तरी त्यांनी आपल्या विधवा कन्येच्या पुनर्विवाहाचा विचार केला नाही, तेव्हा 'माधवदासांच्या पत्नी धनकुंवरबाई याही डॉ. भांडारकरांस अनुलक्षून नेहमी म्हणत की पुनर्विवाह गरिबांकरिता केलेला आहे, श्रीमंतांकरिता नाही.' प्रार्थनासमाजी नेत्यांच्या पाठिंब्याने पं. रमाबाईचे 'शारदासदन' ११ मार्च १८८९ रोजी स्थापन झाले, तेव्हा त्याविषयी शेठ माधवदासांनी साशंकताच प्रकट केलेली आहे : 'निराश्रित विधवांची संख्या फार थोडी असते...रमाबाईंनी मांडलेल्या अवडंबराची काहीही गरज नाही.' यावर 'चमत्कार आहे !' असा शेरा 'इंदुप्रकाश'कारांनी मारला होता. संमतिवयाच्या चळवळीच्या काळात दादाजी–रखमाबाई–प्रकरण उद्‌भवले. प्राचार्य वर्डस्वर्थ यांच्या अध्यक्षतेखाली रखमाबाईंना साह्य करण्यासाठी एक निधी प्रार्थनासमाजी पुढाऱ्यांनी उभारला होता; तद्वतच दादाजींच्या पक्षाला साह्य करण्यासाठी शेठ माधवदासांच्या पुढारीपणाखाली एक मंडळ स्थापन करण्याचा अयशस्वी प्रयत्न झालेला होता. तेव्हा माधवदास हे सुधारक म्हणून गाजलेले असले, तरी त्यांची मते प्रार्थनासमाजी मंडळीशी मिळतीजुळती होती, असे मात्र दिसत नाही. पुनर्विवाह केल्यावर सुखाने नांदता येईल एवढी सुधारक विचाराच्या लोकांची संख्या त्या काळी होती; पण आमच्या सुशिक्षितांची मजल पुनर्विवाहाची स्तोत्रे गाण्यापुरतीच असे, प्रत्यक्ष कृतीच्या बाबतीत ते भेकडपणाच दाखवीत.

पाहुण्याकडून परस्पर विंचू मारविण्याऱ्या या वाचाळ सुधारकांविषयी तीव्र नापसंती व्यक्त करताना शेठजी म्हणतात, '...वस्तुस्थिती पाहता तसे (प्रत्यक्ष आचरण) करणारे सुशिक्षित नसून ज्यास लोक जुन्या समजुतीचे म्हणतात व ज्यांची स्वधर्मावर विशेष श्रद्धा आहे अशा अशिक्षित लोकांतूनच पुनर्विवाह करण्यास लोक पुढे सरसावले आहेत.' लोक कायद्याचा बडगा आला की घाबरतात, हे शेठजींनी ओळखलेले होते व म्हणून विधवाविवाहाची समाजसुधारणा घडून येण्यासाठी सरकारी कायद्याचे पाठबळ असले पाहिजे, असे शेठजींनी प्रतिपादन केलेले आहे आणि राजकीय सुधारणेला अग्रमान देणाऱ्या सनातनी राष्ट्रीय वृत्तीच्या लोकांवर टीका केलेली आहे. शेठजींची मते अशी स्वतंत्र होती. एखाद्या तत्कालीन विशिष्ट पक्षाची बांधिलकी त्यांनी मानलेली दिसत नाही. त्यांची ही मते अनुभवाधिष्ठित होती; पुस्तकी पांडित्यातून स्फुरलेली नव्हती.

आगळ्या कन्यादानांचे पुण्य

'आपल्या घरामागे विहीर कशासाठी असते?' या प्रश्नाचे उत्तर कै. राम गणेश गडकरी 'आमच्या विधवांना जीव देण्यासाठी!' असे देत. मोरोबा कान्होबा विजयकर या अत्यंत उत्साही समाजसुधारकांच्या विधवा मुलीने अगतिकतेने अशी विहीरच जवळ केली होती. पुढे खुद्द मोरोबांच्या पुनर्विवाहानंतर एका वर्षाच्या आत ते आणि त्यांची पुनर्विवाहित पत्नी यांची प्रेते घरामागील विहिरीतच आढळून आली होती! मोरोबांच्या पुनर्विवाहाची शोकान्तिका ध्यानात घेऊन शेठ माधवदासांचे हितशत्रू म्हणत : 'मोरोबांसारख्या न्यायालयीन वरिष्ठ अधिकाऱ्याची ही दशा झाली, तर यःकश्चित् माधवदासाची दुसरी काय होणार?' माधवदासांच्या पुनर्विवाहाचे असे झाले नाही. माधवदासांच्या मृत्यूची आणि मृत्युपत्राची वार्ता पिकविली गेली, त्याबद्दल त्यांनी म्हटले होते, 'या सर्व वार्तेचे जनकत्व स्वेच्छेकडेच असल्यामुळे त्यांनी मला मारले, जाळले व ते माझे मृत्युपत्र करावयास विसरले नाहीत!' पण शेठजींच्या पुनर्विवाहाची मुळी सुखान्तिकाच व्हावयाची होती. अनेक गतभर्तृकांच्या कन्यादानांचे पुण्य शेठजींच्या पदरी पडावयाचे होते.

माधवदासांच्या विधवाविवाहविषयक अजोड कार्याबद्दल त्यांचा जाहीर सन्मान करावा, अशी सूचना करताना 'वयस्य' नामक पत्रलेखकाने २८-७-१८८९ च्या 'सुधारका'त म्हटले होते : 'प्रसिद्ध माधवदास या गृहस्थांनी आजपर्यंत सोळा पुनर्विवाह लावले व आपल्याजवळचे १०,००० रुपये खर्च केले!!! आमच्या इकडील १००० बोलक्या सुधारकांच्या अनेक व्याख्यानांनी जे झाले नसते, ते एकट्या शेठ माधवदासने केले! शाबास! धन्य माधवदास...'. सन १८९१ पर्यंत माधवदास विधवाविवाहाच्या कार्यात जातीने भाग घेत असत. त्यांनी जवळजवळ

पन्नासांहून अधिक विधवाविवाह घडवून आणले. आणि १८९६ साली कृतार्थ मनाने आपला देह ठेवला.

' उत्तम व्यवहारे ' धन मिळवून त्यांनी ' उदास विचारे ' वेच केली. विहीर जवळ करावी लागली असती, अशा खरोखर रंजलेल्या–गांजलेल्यांना आपुलकीने जवळ केले. तसे करताना गुजराती वा मराठी असा पंक्तिप्रपंच कधीच केला नाही. आज सुशिक्षित महाराष्ट्रीय समाजात विधवाविवाहाची समस्या जर का गतार्थ झालेली असेल, तर त्याचे मोठे श्रेय कै. विष्णुशास्त्री पंडित, महर्षी कर्वे यांच्याप्रमाणेच तिच्या सोडवणुकीसाठी तनमनधनाने झटलेल्या माधवदास रघुनाथदासांच्या कृतार्थ जीवनाला आहे.

९. पश्चिम भारतातील पहिली राजकीय संस्थाः धी बॉम्बे असोसिएशन

भारतीय स्वातंत्र्याची चळवळ अर्जविनंत्यांपासून तो 'छोडो भारत' पर्यंत निरनिराळ्या अवस्थांमधून गेलेली आहे. इंग्रजी राजवट पश्चिम भारतात स्थिरस्थावर झाली, तेव्हा शांतता, शिक्षण, सुखसोयी, न्यायाची व्यवस्था यांची नवलाई वाटून सर्वसामान्यतः या नव्या स्थित्यंतराविषयी आदराचीच भावना एतद्देशीयांमध्ये होती. पण नव्या शिक्षणाबरोबर नव्या जाणिवा आल्या; आणि या राजवटीची दुसरी बाजू हळूहळू दृग्गोचर होऊ लागली. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यास राज्यकर्त्याविषयीच्या नवशिक्षित वर्गाच्या अपेक्षा वाढू लागल्या. राज्यकारभारात काळा आणि गोरा असा केला जाणारा भेदभाव त्यांना विशेष सलू लागला. या नव्या जाणिवांना वाट करून देण्यासाठी एक संघटित राजकीय संस्था १८५२ साली मुंबईत स्थापन झाली. तीच बॉम्बे असोसिएशन.

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या दोलामृद्रित विभागात एक दुर्मिळ ग्रंथ आहे. त्यात 'बॉम्बे असोसिएशन' सभेने प्रसिद्ध केलेल्या व गणपत कृष्णाजींच्या छापखान्यात छापलेल्या पुढील चार पुस्तिका एकत्र बांधलेल्या आहेत :

१) **बांबे असोसिएशन या नांवाच्या सभेंतील सभासदांही पार्लमेंट सभेस केलेली अर्जी,** मुंबई, १८५२, (पृष्ठे २७)

२) **बांबे असोसिएशन या नांवाच्या सभेंतील सभासदांहीं पार्लमेंट सभेस केलेली दुसरी अर्जी,** मुंबई, १८५३, (पृष्ठे २४)

३) **बांबे असोसिएशन नांवाचे पहिले वार्षिक सभेच्या हकीकतीचें टिपण,** मुंबई, १८५४, (पृष्ठे ५२).

४) **बांबे असोसिएशन या नांवाच्या मंडळीच्या दुसऱ्या साधारण वार्षिक सभेच्या हकीकतीचें टिपण,...रपोट आणि पुरवण्या,** मुंबई, १८५५, (पृष्ठे ७८),

या दुर्मिळ पुस्तिकांवरून, तसेच वृत्तपत्रीय वार्तांवरून या संस्थेच्या कार्याविषयी उपलब्ध होणारी माहिती या लेखात दिली आहे.

सन १८१८ मध्ये पेशवाईचा अस्त झाला आणि आंग्लाई आली. ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता बंगाल, मद्रास आणि मुंबई या प्रांतांत हळूहळू स्थिरस्थावर होऊ लागली. कंपनी केवळ व्यापारी मंडळी न राहता शासनकर्ती संस्था बनली: तिचे एल्फिन्स्टनसारखे पहिले राज्यकर्ते रयतेचा कल पाहून कारभाराचे धोरण आखणारे होते. तसेच नव्या राजवटीवरोवर सार्वत्रिक शिक्षण, सुरक्षितता आणि भौतिक सुधारणांचे विचार आले. एकीकडे हे नवे सत्तांवर स्वागतार्ह वाटत असताही जुने उद्योगधंदे बसून, प्रजा दारिद्र्य आणि दुष्काळ यांनी गांजली आहे, तसेच या नव्या राज्यकारभारात युरोपियन आणि हिंदी यांच्यात पंक्तिप्रपंच केला जात असतो, या गोष्टी विचारी लोकांना डाचू लागल्या. दादोबा पांडुरंग यांचे बंधू भास्कर पांडुरंग यांनी ' ए हिंदू ' या नावाने ' द बॉम्बे गॅझेट ' या पत्रात १८४१ मध्ये ग्रेट ब्रिटनच्या जुलमी साम्राज्यवादाचा प्रथम परिस्फोट केला.[१] ' हिंदुस्थानची प्राचीन व सांप्रतची स्थिती व पुढे काय होणार, याविषयी विचार ' या नावाच्या १८४३ साली प्रसिद्ध झालेल्या आपल्या ग्रंथात रामकृष्ण विश्वनाथ यांनी ' हिंदुस्थानात राज्य नव्हे, लष्करी जुलूम आहे ' हे एडमंड बर्कचे प्रसिद्ध वाक्य उद्धृत करून इंग्रजांच्या मतलबी राजनीतीवर विदारक प्रकाश टाकला. पूर्वीचे मुसलमानादी राज्यकर्ते बाटवाबाटवीसाठी व संचित धन लुटण्यासाठी जुलूम करीत, पण इंग्रजी कारभाराचा जुलूम हा अधिक पद्धतशीर असून त्यांनी आपल्या संपत्तीचे शोषण फार मोठ्या प्रमाणावर चालविले आहे, असा स्पष्ट इशारा देऊन लेखकाने म्हटले आहे, ' जर इंग्लंड देशाने दुष्टपणाने हिंदुस्थानचे सर्व जिनसांचा मक्ता घेऊन त्या लोकांची उमेद खचविली नसती आणि हिंदुस्थानचा जिन्नस दुसऱ्या कोणत्या मुलखात जाऊ नये असा प्रतिबंध केला नसता, तर इथे मजुरी कमी, तेणेकरून त्या लोकांही आपण केलेला जिन्नस सर्व पृथ्वीवर पुरविला असता.'[२]

वृत्तपत्रे ही जनजागृतीचे महत्त्वाचे साधन आहे, या जाणिवेतून मराठीत 'दर्पण' (१८३२), प्रभाकर (१८४१), ज्ञानप्रकाश (१८४९) यांसारखी वृत्तपत्रे निघाली व ती लोकांच्या तक्रारी व गाऱ्हाणी वेशीवर टांगू लागली. १८४८ पासून लोकहितवादींनी 'प्रभाकर' मधून आपली 'शतपत्रां'ची माला सुरू करून जुन्या समजुतींचा खरपूस समाचार घेतला व काही अंशी राजकीय आकांक्षांचेही दिग्दर्शन केले. १८४४ साली सुरतेत एक मोठी लक्षणीय घटना घडली. सरकारने मिठावर केलेल्या करवाढीविरुद्ध तेथील नागरिकांनी सरकारी कचेरीवर मोर्चा नेला आणि त्याबाबत आश्वासन मिळविले.[३] 'भारतातले पहिले जन-आंदोलन' असे या घटनेचे रास्त वर्णन करण्यात आले आहे.[४] नव्या स्थित्यंतराचे परिणाम मुंबई-सारख्या पश्चिम हिंदुस्थानातल्या केंद्रवर्ती शहरात विशेष जाणवावे, हे साहजिक होते. शासनाने लोकांच्या आशाआकांक्षा ध्यानात घेऊन राज्यकारभार केला पाहिजे, ही कल्पना या शहरातील नवविचारांशी परिचित झालेल्या प्रतिष्ठित नागरिकांना येत चालली होती. कंपनीच्या राज्यकारभारात वरिष्ठ हुद्द्यांच्या बाबतीत गोरा-काळा असा केला जाणारा भेद त्यांना विशेष बोचू लागला होता. १८५३ साली ईस्ट-इंडिया कंपनीला पार्लमेंटकडून नवी सनद मिळणार होती. सन १७७४ साली झालेला रेग्युलेटिंग ॲक्ट थोडचा फेरफारांनिशी सन १८७४ पर्यंत कायम करावा, असाही ठराव निघाला होता.[५] अशा स्थितीत कंपनीच्या कारभारातील दोष दाखवून येथील जनतेच्या अडचणींचे गाऱ्हाणे पार्लमेंटपर्यंत पोचविण्याची आवश्यकता निकडीने भासू लागली. या वातावरणाने 'बॉम्बे असोसिएशन' या पहिल्या राजकीय संस्थेला जन्म दिला. जगन्नाथ शंकरशेट यांच्या अध्यक्षतेखाली एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूटमध्ये २६ ऑगस्ट १८५२ रोजी भरलेल्या मुंबईतील सर्व जातिधर्मांच्या प्रतिष्ठित नागरिकांच्या बैठकीमध्ये या संस्थेचे उद्देश पुढीलप्रमाणे ठरविण्यात आले :

'या इलाक्याच्या सरकारचे अमलाखाली जे एतद्देशीय राहतात, त्यांच्या अनुपपत्तींची चौकशी करून या देशांची सुधारणूक करण्यास व येथील लोकांची कल्याणवृद्धि करण्यास कोणते उपाय अवश्य आहेत, ते सरकारास नेहमी कळविणे...'

तिचे पहिले कार्यकारी मंडळ पुढीलप्रमाणे होते :

'प्रतिष्ठित' अध्यक्ष

सर जमशेठजी जीजीभाई

अध्यक्ष

जगन्नाथ शंकरशेठ

उपाध्यक्ष

बमनजी होरमसजी आणि खरशेटजी जमशेटजी

सभासद

रामलाल ठाकुरसीदास	माणकजी खरशेटजी
महमद इनसुफ	दाउद ससून
माणकजी लिमजी	आरदेसर खरशेटजी
माणकजी नसरवानजी	भास्करजी सुंदरजी
कासवजी जाहांगिरजी	ब्रांझ फरनान्डिज
खरशेटजी नसरवानजी	जोजेफ मारी दिगा
रुस्तुमजी जमशेटजी	नारायण दीनानाथजी
फ्रामजी नसरवानजी	नौरोजी फरदुनजी
वरजीवनदास माधवदास	वापू जगन्नाथ जोशी
महमद आमीन रोगे	लक्ष्मण हरिश्चंद्रजी
धनजीभाई खरसेटजी	सखाराम लक्ष्मणजी.
महमद इब्राहिम मखवा	

चिटणीस

भाऊ दाजी, आणि विनायकराव जगन्नाथजी.

यांपैकी सर जमशेटजी जीजीभाई, खरसेटजी जमशेटजी, रामलाल ठाकुरसीदास, भास्करजी सुंदरजी, महमद अमीन रोगे, रुस्तमजी जमशेटजी, माणकजी खरसेटजी यांनी वर्ष उलटण्यापूर्वीच संस्थेची त्यागपत्रे दिली.

संस्थेच्या उद्दिष्टानुसार पार्लमेंटकडे पहिला अर्ज पाठविण्यापूर्वी संस्थेने एक प्रश्नावली तयार करून ती जाणकारांकडे पाठवून सूचना मागविल्या होत्या. कंपनीच्या राज्यात प्रजेच्या सुखसोयी वाढल्या हे मान्य करूनही एकंदरीत तिची राज्यपद्धती लोकांच्या रास्त अशा-आकांक्षा पुऱ्या करू शकत नाही, असाच या अर्जाचा तक्रारवजा सूर आहे. अर्जातील प्रमुख तक्रारी आणि सूचना यांचे स्वरूप ढोबळपणे असे होते :

(अ) **कारभार व न्याय यांतील गुप्तता आणि विलंब** : कारभार-विषयक यंत्रणेत कोर्ट ऑफ डायरेक्टर्स आणि बोर्ड ऑफ कंट्रोल अशा दोन मंडळचा असल्याने कोणत्याही प्रकरणाचा निर्णय होण्यास विलंब होतो व याच सबबीवर कोर्ट ऑफ डायरेक्टर्सचे आदेश गुंडाळून ठेवून बादशाही दिवाणाला स्वमतानुसार निर्णय घ्यायला वाव मिळतो, ही गोष्ट रास्त नाही. प्रांतिक बाबींच्या निर्णयासाठी

थेट कलकत्त्यास गव्हर्नर जनरलकडे जावे लागते व विलंब होतो. सत्तेचे हे केंद्रीकरण कमी केले पाहिजे. न्यायनिवाडे दहा दहा वर्षे चालतात, तीन वर्षांत निर्णय मिळाला, असे प्रसंग अपवादभूतच. न्यायखात्यात नेमले जाणारे वरिष्ठ हुद्देदार विलायतेतील हेलेबरी कॉलेजामधून 'सनदी' परीक्षा पास झालेले असले, तरी येथील कायदे आणि लोकरीती यांबाबत त्यांना ज्ञान नसते. कंपनीच्या कारभारात गुप्तपणा फार आहे; सरकारी अमलदारांच्या गैरकारभाराविषयी जाब मागण्याची तरतूद नाही. एकंदरीत रयतेचा पैसा आणि बळ खर्च होऊन न्याय पदरात पडण्यास फार विलंब लागतो; अधिक सुटसुटीत यंत्रणा अस्तित्वात आणून ही परिस्थिती बदलली पाहिजे.

(आ) **कारभाराचर होणारा अवास्तव खर्च :** दिवाणी हुद्द्यांपैकी कित्येक हुद्दे असे आहेत की, तेथे काम कमी आणि पगार मात्र भरमसाट असतो. अशा हुद्द्यांचे इतर जोखमीच्या हुद्द्यांत विलीनीकरण करावे व खर्चात बचत करावी.

(इ) **लोकांच्या कल्याणवृद्धीकडे दुर्लक्ष :** या इलाख्यात व विशेषत: गुजरातेत रहदारीच्या साधनांची वाण आहे. दुष्काळात धान्याची ने-आण करणे कठिण जाते. उत्पन्न केलेला मालही पडून राहतो. हा माल बंदरापर्यंत नेण्यास बेसुमार खर्च येऊन व्यापारात तोटा होतो. तेव्हा लोखंडी सडका (रेल्वे), रस्ते, पूल, गोदामे, तळी यांसारख्या लोकोपयोगी आणि व्यापारवृद्धीला पोषक अशा गोष्टींवर अधिक खर्च केला पाहिजे. रहदारीच्या साधनांकडे सरकारने जे अक्षम्य दुर्लक्ष केलेले होते, त्याविषयी भाऊ दाजींच्या भाषणात पुढील आशयाचा उल्लेख आहे : दुष्काळामुळे १८३३ साली वीस लक्ष माणसांचा संहार झाला आणि सरकारचे आठ कोट रुपये खर्च झाले. पण या अघोरी गोष्टींबद्दल दिवाणांचे कान बधिर झालेले आहेत, म्हणून पार्लमेंटकडे अर्जात गाऱ्हाणे मांडणे भाग पडले.[६]

(ई) **विद्यापीठ स्थापनेची मागणी :** राज्यातील वसुलाच्या मानाने शिक्षणावर खर्च कमी केला जातो; उत्पन्नाच्या पाच टक्के तरी खर्च शिक्षणावर व्हावा. कामिरनसाहेबाने मांडलेली योजना कार्यवाहीत आणून प्रत्येक इलाख्यात एकेक 'विद्यालय' (युनिव्हर्सिटी) स्थापन करावी, म्हणजे सरकारी कामासाठी लायक माणसे तयार होतील.

(उ) **राज्यकारभारात एतद्देशीयांचा सहभाग :** 'जस्टिस ऑफ दी पीस' व 'ग्रँड ज्यूरर' यांसारखे वरिष्ठ हुद्दे एतद्देशीयांना मिळत नाहीत. तसेच दिवाणी खात्यातील वरिष्ठ जागांवर 'सनदी' युरोपियनच नेमले जातात. एल्फिन्स्टन, ग्रँट, पेरी यांसारख्या वजनदार आणि अनुभवी गृहस्थांच्या भलावणीप्रमाणे कारभारातील एतद्देशीयांचा सहभाग वाढला पाहिजे.

(ऊ) **कंपनीची मुदत** : ईस्ट इंडिया कंपनीच्या सनदेची मुदत वीस वर्षांवरून दहा वर्षांवर आणावी.

१८५३ मधील दुसरा अर्ज

दुसऱ्याही अर्जाचा रोख कंपनी सरकारच्या कारभारातील उणीवा दाखविण्याचाच आहे. १८५३ साली सनद देण्यापूर्वी कंपनीच्या कारभाराची चौकशी व्हावी, म्हणून पार्लमेंटने एक समिती नेमली होती. या दुसऱ्या अर्जाच्या वेळी चौकशी–समितीचे प्रतिवृत्त संस्थेसमोर होते. त्यावर अर्जात काही आक्षेप घेण्यात आले होते व इतरही मागण्या पुढे मांडण्यात आल्या होत्या :

(अ) चौकशी-समितीपुढील एकपक्षी साक्षी : चौकशी-समितीने एल्फिन्स्टनपासून प्रिन्सेपपर्यंत ज्या पंचवीस युरोपियन गृहस्थांच्या साक्षी नोंदल्या, ते एकजात कंपनीचे निवृत्त अधिकारी होते. त्यांना हिंदुस्थानची जवळून माहिती असली, तरी त्यांच्या साक्षींतून कंपनीच्या कारभाराची प्रशंसाच असणार; कारण तिच्या कारभारातील दोष दाखविणे म्हणजे त्यांनी स्वतःलाच नावे ठेवण्यासारखे होणार होते. शिवाय १८३४ च्या कायद्याने कंपनीच्या वरिष्ठ अंमलदारांच्या हाती अनिर्बंध अधिकार आलेले होते, ते मुखासुखी हातून जातील, असे फेरफार ही मंडळी सुचविणे शक्यच नव्हते. यांच्याऐवजी ज्यांचे हितसंबंध गुंतलेले नाहीत व ज्यांनी हिंदुस्थानच्या परिस्थितीवर अभ्यासपूर्ण ग्रंथ रचले आहेत, अशा युरोपियन लोकांच्या साक्षी काढायला हव्या होत्या. उदा. मद्रास प्रांतात न्यायखात्याचा कारभार कसा चालतो, त्यासंबंधी उत्तम ग्रंथ लिहिणाऱ्या बॅरिस्टर नॉर्टनसारख्या माहितगारांची साक्ष काढणे योग्य ठरले असते. (नॉर्टनच्या प्रस्तुत ग्रंथाची प्रत अर्जासोबत जोडण्यात आलेली होती.)

(आ) कंपनीच्या मुदतीविषयी फेरविचार : संस्थेच्या पहिल्या अर्जात कंपनीची मुदत वीस ऐवजी दहा वर्षांवर आणावी, असे सुचविले होते. पण कंपनीच्या कारभाराची चौकशी करण्याचा अधिकार ज्याप्रमाणे पार्लमेंटला केव्हाही असतो, त्याचप्रमाणे अशा चौकशीची मागणी करण्याचा अर्जदारांस (बॉम्बे असोसिएशनला) केव्हाही हक्क असावा.

(इ) कारभारविषयक गुप्तता : कारभारातील क्षुल्लक कृत्यांबद्दलसुद्धा गुप्तता पाळण्यात येते. सरकारी पैशाचा प्रश्न गुंतलेला नसला आणि कारभारावर ठपका येण्याजोगी बाब नसली, म्हणजे बाकीची प्रकरणे घाईघाईने कशीतरी निकालात काढली जातात. हा प्रकार 'पराकाष्ठे'च्याही खालच्या कोटीचा आहे. जमाबंदी आणि न्याय यांबाबत अज्ञ असणारा सरसेनापती (कमांडर इन चीफ्) केवळ 'सह्याजीराव' बनून आपले काम कसे चटावर झटपट उरकतो, त्याचे

मासलेवाईक चित्र अर्जात रेखाटण्यात आले आहे. अशा या कारभारामुळे शेती, उद्योगधंदे आणि व्यापार यांच्या प्रगतीला खीळ बसेल, असा इशारा देण्यात आलेला आहे.

(इ) वरिष्ठ जागांबाबत पक्षपात : वरिष्ठ हुद्दे विलायतेतील हेलेबरी कॉलेजातून 'सनदी' परीक्षा देऊन आलेल्या युरोपियनांसच दिले जातात, ही गोष्ट अन्यायय आहे. युरोपियन-नेटिव, सनदी–बेसनदी हा भेद काढून टाकावा. मुंबईतील ग्रँट मेडिकल कॉलेजमध्ये किंवा डॉ. चकरवर्त्तीप्रमाणे विलायतेत जाऊन ज्या एतद्देशीयांनी वैद्यकीय पदव्या संपादन केलेल्या असतील, त्यांस वैद्यकीय खात्यातील वरिष्ठ पदे देण्यात यावी.

(उ) धंदे–शिक्षण : धंदेशिक्षणाच्या शाळा उघडाव्या. विशेषत: नेटिवांमधून वकील तयार व्हावे यासाठी कायद्याचे विद्यालय (लॉ कॉलेज) उघडण्यात यावे.

इतिवृत्तांतील उपयुक्त माहिती

वर निर्देश केल्याप्रमाणे अनुक्रमे ९ नोव्हें. १८५३ व ५ जाने. १८५५ रोजी भरलेल्या असोसिएशनच्या दोन वार्षिक सभांची इतिवृत्ते संदर्भविभागातील. एकत्रित पुस्तकात आहेत. त्या इतिवृत्तांवरून कंपनीच्या राज्यकारभाराकडे संस्था कशी जागरुकतेने पाहात होती आणि प्रजेची गाऱ्हाणी सरकारच्या कानांवर कशी परखडपणे घालीत होती, याची उत्तम कल्पना येते. आपल्या मागण्यांचा देशात, तसेच विलायतेत प्रसार व्हावा आणि त्याचा दबाव पार्लमेंटवर पडावा, याविषयी संस्था सतत प्रयत्नशील होती. १८५२ सालच्या पहिल्या अर्जावर मुंबईप्रमाणेच ठाणे व पुणे येथील प्रतिष्ठित गृहस्थांच्या स्वाक्षऱ्या घेऊन एकंदर चार हजार सह्यांनिशी तो पार्लमेंटकडे रवाना झालेला होता. १८५४ साली असाच एक तिसरा अर्ज संस्थेकडून जावयाचा होता. पण ब्रिटन हे रशियाबरोबरच्या लढाईत गुंतलेले असल्याने तो बेत स्थगित करण्यात आला. इतिवृत्तातून देण्यात आलेली जगन्नाथ शंकरशेट, डॉ. भाऊ दाजी आदींची भाषणे, विशेषत: डॉ. भाऊंची भाषणे तर बरीच जहाल ठरावीत, अशी आहेत. स्वत:च्या वैद्यकीय व्यवसायाचा व्याप वाढून त्याकडे अधिक लक्ष पुरवावे लागल्यामुळे आणि बहुधा कर्सेटजीने केलेल्या चारित्र्यहननाच्या प्रयत्नामुळे[५] भाऊ दाजींनी एक वर्षाने संस्थेचे कार्यवाहपद सोडले असले, तरी संस्थेने प्रारंभी जे भरीव कार्य केले, त्यात त्यांचा सिंहाचा वाटा असावा. पहिल्या अर्जाला सर्वत्र अनुकूल प्रसिद्धी मिळून जी जागृती झाली आणि त्यातल्या ज्या अल्पस्वल्प मागण्या मान्य झाल्या, तो सुधारणांचा 'पहिला हप्ता' असून 'आपणांत नवीन शकाला प्रारंभ झाला आहे.' असे मोठे आत्मविश्वासाचे उद्‌गार डॉ. भाऊ दाजींनी संस्थेच्या एका वार्षिक सभेत काढले होते.

इंग्लंडात पद्धतशीर प्रचारकार्य व्हावे, म्हणून संस्थेने जॉन चॅपमन या गृहस्थाला तेथील आपला अडता नेमले होते. या गृहस्थाने 'प्रिन्सिपल्स ऑफ इंडिया रिफॉर्म' या नावाचा एक माहितीपूर्ण ग्रंथ रचला होता. याशिवाय येथील परिस्थितीसंबंधी कर्नल कॉटन, जॉन सलिवन, मॅके, डिकिन्सन, कामिरन, रॉबिन्सन आणि मद्रासमध्ये बॅरिस्टरी करणारा नॉर्टन या युरोपियन लोकांनी उपयुक्त ग्रंथरचना केलेली होती. डॉ. भाऊ दाजींनंतर कार्यवाहपदी आलेल्या नौरोजी फर्दुनजी यांनी १८५३ मध्ये मुंबई इलाख्यातील दिवाणी कारभारासंबंधी एक माहितीपूर्ण ग्रंथ प्रसिद्ध केला होता. या ग्रंथाच्या प्रती मुद्दाम खरेदी करून देशात व विलायतेत प्रसारित करण्यात आल्या. त्यासाठी मुख्यतः भाऊ दाजींच्या खटपटीने दहा हजार रुपये जमविण्यात येऊन विलायतेत पाठविण्यात आलेले होते.

कलकत्ता आणि मद्रास येथे ज्या समानशील राजकीय संस्था स्थापन झालेल्या होत्या, त्यांच्याशी संस्थेने संपर्क ठेवला होता. तसेच संस्थेच्या मागण्या विलायतेत उचलून धरण्यासाठी 'इंडिया रिफॉर्म सोसायटी' नामक एक संस्था १८५३ च्या मार्चमध्ये स्थापन करण्यात आली होती. पार्लमेंटचे सभासद डानबी सैमूर हे तिचे अध्यक्ष असून डिकिन्सन हे कार्यवाह होते. हिंदुस्थानच्या प्रजेविषयी निःस्वार्थ बुद्धीने कळकळ बाळगणारे प्रतिष्ठित युरोपियन या संस्थेत एकत्र आलेले होते. या सोसायटीचा अध्यक्ष डानबी सैमूर हा कंपनीच्या कारभाराची प्रत्यक्ष माहिती करून घेण्याच्या हेतूने हिंदुस्थानात आला होता. असोसिएशनच्या सभासदांनी त्याच्याबरोबर बातचीत करण्यासाठी १३ फेब्रुवारी १८५४ रोजी श्रीमंत नाना शंकरशेठ यांच्या घरी एक खास बैठक भरविली होती.

संस्थेच्या पहिल्या अर्जाचा देशात व विलायतेत चांगलाच गाजावाजा झाला. एतत्संबंधी काही वृत्तपत्रीय उतारे पहिल्या प्रतिवृत्तातील पुरवणीत दिलेले आहेत. हा अर्ज लॉर्डांच्या सभेत लॉर्ड मॉंटिग्रल यांनी, तर कॉमन्स सभेत ल्यूसन गोवर यांनी मांडला. मॉंटिग्रल यांच्या भाषणाचे मराठी भाषांतर पुरवणीत दिलेले आहे.

या दोन अर्जांनंतरही संस्थेने आणखी काही प्रयत्न केलेले या इतिवृत्तांवरून दिसून येतात :

१) कंपनीच्या कारभाराची चौकशी करणाऱ्या पार्लमेंटरी समितीने एकतर्फी साक्षी घेतल्यामुळे ज्या युरोपियन गृहस्थांनी कंपनीच्या नोकरीचे मध्येच राजीनामे दिलेले होते, अशांच्या साक्षी घेऊन कारभारातील उणीवांचे दिग्दर्शन करणारा एक अर्ज २३ ऑक्टोबर १८५३ रोजी संस्थेने धाडला होता.

२) पहिल्या अर्जातील २२ व्या कलमात कंपनीच्या न्यायदानपद्धतीतील विलंब, द्रव्याचा अपव्यय आणि न्यायाधीशांचे अज्ञान यांविषयी जी तक्रार केलेली होती, ती सरकाला झोंबली होती. त्याविषयी न्यायखात्याने उत्तर दिले की, प्रस्तु-

तची तक्रार वस्तुस्थितीला सोडून आहे. त्यावर येथील न्यायनिवाड्यांची माहिती प्रयत्नपूर्वक गोळा करून संस्थेने अगदी पत्त्यामुद्द्यांनिशी एक प्रत्युत्तर सरकारकडे पाठविले होते.

३) अल्पस्वल्प दावे आणि कर्जवाम (स्मॉल् कॉझेस्) यांसाठी उपनगरांतून न्यायालये उघडावी, अशी संस्थेची मागणी होती, ती सरकारने पुरी केली. पण तत्संबंधी जो कायदा केला, त्यात संस्थेने काही दुरुस्त्या सुचविल्या होत्या.

४) पेटी–सेशन कोर्टात एक बॅरिस्टर असेसरच्या हुद्द्यावर असे व तो कायदाविषयक सल्लागार म्हणून उपयुक्त कार्य करीत असे. १८५३ च्या ऑक्टोबरमधील गॅझेटमध्ये हा हुद्दा रद्द केल्याचे प्रसिद्ध होताच, त्याविषयी नापसंती व्यक्त करणारा अर्ज संस्थेने १८ फेब्रुवारी १८५४ रोजी केलेला होता.

५) नव्या स्मॉल् कॉझ् कोर्टाच्या कायद्यानुसार कोर्ट फी फार जबर होती, ती कमी करण्याविषयीचा, तसेच कर्जदारावर फिर्याद करण्याची मुदत दोन वर्षांऐवजी वहिवाटीप्रमाणे सहा वर्षांची असावी, अशी मागणी करणारा अर्ज ९ ऑगस्ट १८५४ रोजी पाठविण्यात आला होता. आपल्या भूमिकेच्या पुष्टचर्थ सुप्रसिद्ध बेंथॅम याच्या 'कायदा आणि राजनीती' या ग्रंथातील सिद्धान्तही उद्धृत केलेले होते. तरीपण एकंदरीत या अर्जात कर्जदारांपेक्षा सावकारांचे हितसंबंध संस्थेसमोर असावे, असे दिसते.

६) हिंदुस्थानातील लेजि. कौन्सिलचे गुप्तपणे चालणारे कार्य उघडपणे चालावे, असा ठराव सरकारने केल्यावद्दल संस्थेने संतोष व्यक्त केला होता.

७) आपल्या उद्दिष्टपूर्तीच्या दृष्टीने जी एखादी प्रगतिकारक घटना घडेल, तिचे सभेने स्वागत केलेले आढळते. उदा. कॉमन्स सभेत सर अस्किन पेरी हा भारताचा हितचिंतक निवडून आला, त्याबद्दल त्याचे अभिनंदन करण्यात आले होते.

८) हिंदुस्थानात बंगाल हा प्रांत ब्रिटिश अमलाखाली अगोदर येऊन तेथे नव्या सुधारणेचा प्रभाव आधी दिसू लागला. कलकत्त्याचे बाबू प्रसन्नकुमार टागोर यांची लेजि. कौन्सिलच्या डेप्युटी क्लार्कच्या हुद्द्यावर नेमणूक झाली, तसेच दोन बंगाली तरुण पदरचा पैसा खर्च करून विलायतेतील सनदी परीक्षेस युरोपियनांबरोबर स्पर्धेत उतरले, त्याबद्दल संतोष व्यक्त करण्यात आला होता.

९) **मिशनरी शाळांचे अनुदान :** सामान्यतः 'बॉम्बे असोसिएशन' ही 'आधी राजकीय' या धोरणाने चालताना दिसते. धार्मिक वा सामाजिक सुधारणांच्या प्रश्नांपासून ती अलिप्त राहिली. विविध जातीजमातींचा बुजबुजाट असणाऱ्या समाजाला राजकीय उद्दिष्टांसाठी एकत्र आणताना ही काळजी घेणे त्या जुन्या काळी आवश्यकच असावे. कारण 'स्टुडंटस् लिटररी अॅन्ड सायंटिफिक सोसायटी' या संस्थेच्या छत्राखाली स्त्रीशिक्षणादी सुधारणांचे प्रश्न प्रायः हीच

मंडळी हाताळीत होती. तरीसुद्धा 'धार्मिक' म्हणावी अशा एका समस्येबाबत संस्थेच्या विचार करावाच लागला. वूड यांनी पार्लमेंटमध्ये स्पष्ट केलेल्या शैक्षणिक योजनेला संस्थेचा सामान्यतः पाठिंबा होता. पण हिंदुस्थानात मिशनरी संस्थांनी चालविलेल्या शाळांना सरकारी साहाय्य मिळण्यास मात्र तिचा सक्त विरोध होता व दुसऱ्या वार्षिक सभेतील भाषणात डॉ. भाऊ दाजींनी तो स्पष्टपणे मांडला होता. संस्थेच्या इतिवृत्तात एतद्विषयक तीव्र प्रतिक्रिया व्यक्त झालेली आहे :

' इंग्लंडातील अधिकाऱ्यांनी या देशाकरिता विद्यावृद्धचर्थ जी उत्तम तजवीज योजिली आहे, तिचा जो एक भाग आपल्या देशच्या लोकांच्या हितास नाशकारक घडून येण्यासारिखा आहे, म्हणून त्याजवर आपली कमिटी दोष देत आहे. तो हा आहे की, एतद्देशीय लोकांस बाटवून ख्रिस्ती धर्मांत आणावे, व या देशाचे लोक जे निरनिराळे धर्म पाळीत आहेत, ते बुडवून टाकावे याच उघड उद्देशाने पाद्री लोकांनी हिंदुस्थानात ज्या शाळा घातल्या आहेत, त्या शाळांसही सरकारने पैक्याची मदत करीत जावी, असे फर्माविलेले आहे. ख्रिस्ती पाद्री लोक किंवा दुसऱ्या कोणत्या मताचे लोक यांजला, आपल्या धर्मांत या देशच्या लोकांस आणण्याकरिता टीप वगैरे करून जो पैका जमविला असेल, त्या पैक्याचे खर्चाने ते काम चालवू देण्यास हरकत घेण्याला जरी या देशच्या लोकांस अगदी अधिकार नाही, तथापि आपल्या कमीटीचे असे म्हणणे आहे की, या देशचे सरकार, जे धर्मप्रकरणी अगदी तिराहीतपणा दाखवीत आहे, व आपली रयत जे धर्म पाळीत आहेत, त्यांपैकी कोणत्येही धर्माशी हरएक प्रकारे दखलगिरी ठेवण्याचे प्रसंग चुकवीत आहे, त्या सरकाराने लोकांस विद्या शिकविण्याचे मिषाने परंतु सरशेवटास ते ख्रिस्ती होत, असे करण्याच्ये उद्देशाने या लोकांपासून उत्पन्न जाहालेल्ये वसूलातून अशा धर्म शिकविण्याच्या कार्यास कसीही पैक्याची मदत करावी हे रास्त, व योग्य आहे असे कोणीही सूज्ञ राजकार्यधुरंधर पुरुष एक क्षणही मनात आणणार नाही.'[८]

पारशी समाजातील दोन तरुणांचे धर्मांतर (१८४३) व श्रीपद शेषाद्रीचे प्रकरण (१८४३) यांमुळे या प्रश्नाचा गवगवा पूर्वीच झालेला होता. ही समस्या पुढेही काही काळ विचारवंतांना सतावीत राहिली. संस्थेच्या इतिवृत्तांत कार्यकर्ते व हितचिंतक यांच्या ज्या याद्या जोडलेल्या आहेत, त्यांत तर सर्व जाती–जमातींचे लोक आहेत. मराठी–गुजराती, हिंदू, पारशी, मुसलमान, उत्तर भारतीय हिंदू यांच्याबरोबर त्यात ख्रिस्ती नावेही आढळतात. पण मुंबईच्या अन्य सांस्कृतिक क्षेत्रांतून पुढाकार घेणारे डॉ. विल्सनप्रभृती मिशनरी मात्र त्यांत अभावानेच तळपताना दिसतात. त्या काळी राजकीय जागृतीचे लोण वरच्या स्तरापर्यंतच पोचलेले असल्याने संस्थेचे हे कार्यकर्ते एकंदरीत प्रतिष्ठित उच्च वर्गीय होते, हे साहजिकच होते.



काही वृत्तपत्रीय कार्योल्लेख व अस्त

१८५७ च्या मार्च महिन्यात संस्थेने पार्लमेंटकडे एक अर्ज पाठविला होता, त्यात न्यायखात्यात कोणत्या सुधारणा इष्ट आहेत, याची चौकशी करण्यासाठी पार्लमेंटने एक कमिशनर हिंदुस्थानात पाठवावा, अशी मागणी करण्यात आलेली होती. प्रस्तुत अर्ज 'ज्ञानप्रकाश' मध्ये प्रसिद्ध झालेला आहे.[९] या वर्षीच्या डिसेंबरात पार्लमेंटचे सभासद मि. लेपेर यांच्याबरोबर नाना शंकरशेठ यांच्या घरी संस्थेच्या सभासदांनी चर्चा केल्याची वार्ता याच पत्रात आलेली आहे.[१०] १८६३ नंतर संस्थेचे कार्य बरेच थंडावलेले दिसते. 'Political Inactivity in Bombay : Its Probable Causes' या मथळ्याखाली 'रास्त गोफ्तार' च्या संपादकांनी संस्थेसंबंधी म्हटले होते. 'The Institution was well-planned, with the best intentions of course. There was a lucky mixture of wealth and education, and the institution worked well for a time; but its haleyon days were not of long duration... members like Dr. Bhau Dajee and Mr. Nowrojee Furdoonjee resigned the Association in sheer disgust... It exists in name only.'[११]

यावरून नौरोजी फर्दुनजीसुद्धा मतभेदांना विटलेले दिसतात. तत्कालीन सुशिक्षित महाराष्ट्रीयांचे एक प्रतिनिधी कै. गो. ना. माडगावकर यांचेही सभेविषयीचे मत वरील प्रकारचेच होते. त्यांनीही आरंभशूरत्वाबद्दल आणि खऱ्या ऐक्यभावनेच्या अभावाबद्दल ठपका ठेवून सभेला रयतेची खरीखुरी दुःखे समजलीच नाहीत आणि तिच्या हातून म्हणण्यासारखे कार्य पुढे घडून आले नाही, अशा आशयाचा परखड अभिप्राय व्यक्त केलेला आहे.[१२] दरम्यान संस्थेचे छत्रच असणारे नाना शंकरशेठही १८६५ मध्ये कैलासवासी झाले होते.

मुंबईतील तत्कालीन उदयोन्मुख तरुण वकील वि. ना. मंडलीक यांनी संस्थेच्या निष्क्रियतेवर टीका करून तिचे पुनरुज्जीवन करावे, असे आवाहन केले.[१३] तदनुसार विनायकराव जगन्नाथजी यांनी सभा बोलाविली. १४ डिसें. १८६७ रोजी ना. मंगळदास नथुभाई यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेचे पुनरुज्जीवन झाले. नौरोजी फर्दुनजी हे कार्यवाह म्हणून पुन्हा निवडले गेले. भाऊ दाजी कार्यकारिणीचे एक सभासद होते. सभेची कचेरी कोटात टाऊन हॉलजवळ जाऊन तिच्या मासिक खर्चासाठी शंभर रुपये आणि कार्यवाहांचा पगार साडेतीनशे रुपये नेमून देण्यात आला.[१४] या वर्षाच्या मार्चमध्ये सिव्हिल व मेडिकल खात्यांतील सनदी जागांवर एतद्देशीय लायक लोकांची नेमणूक करण्याबद्दलची मागणी करणारा अर्ज सरकारकडे करण्यात आला.[१५] १८७० साली संस्थेमध्ये पुन्हा चैतन्य दिसू लागले. लॉर्ड मेयो यांच्या कारकीर्दीत लायसन्स कराची कक्षा वाढविण्यात आली,

मुंबई व मद्रास प्रांतांतील मिठावरील कर वाढविण्यात आला आणि इन्कमटॅक्सचा दर वाढविण्यात आला. मराठी व गुजराती वृत्तपत्रांतून याबद्दल कडक प्रतिक्रिया व्यक्त झाल्या. नौरोजी फर्दुनजी यांनी दोन हजार लोकांची सभा घेऊन 'सेक्रेटरी ऑफ स्टेट'कडे पाठविण्याचे एक निवेदन पास करून घेतले व चार हजार लोकांच्या सह्या घेऊन १८७० च्या मे महिन्यात ते रवाना केले.[१६] स्वत: विलायतेत जाऊन प्रचार केला. युरोपियन अंमलदारांनी जिल्ह्यातील प्रजेस त्रास दिल्यास त्यांचा न्यायनिवाडा जिल्हाधिकाऱ्यांच्या अखत्यारात नसे. ही स्थिती अन्याय्य असून त्यांचा न्यायनिवाडा जिल्हाधिकाऱ्याकडे सोपविला जावा, अशी मागणी सभेने १८७२ साली सरकारकडे केली.[१७] १८७५ साली मंगळदास नथूभाई आणि नौरोजी फर्दुनजी संस्थेतून बाहेर पडले व डी. एन. पेटिट हे गिरणीमालक अध्यक्ष झाले. परंतु त्यांच्या नेतृत्वामुळेही संस्थेच्या कार्याला विशेष जोम प्राप्त झाला नाही. कॉटन फ्रॉड बिल, फॉरेस्ट बिल यांसारखे शेटजींचे प्रश्न, तर आय. सी. एस्. परीक्षेसारखा उच्च शिक्षितांचा प्रश्न असोसिएशनने हाताळला. मात्र लिटन-शाहीत आलेल्या वृत्तपत्रांवरील निर्बंधाविरुद्ध कसलीही हालचाल केली नाही.

दरम्यान १८६६ मध्ये दादाभाई नौरोजींनी विलायतेत 'ईस्ट इंडिया असोसिएशन' ही संस्था स्थापन केली होती. तिची शाखा डॉ. भाऊ दाजींच्या अध्यक्षतेखाली २३ मे १८६९ रोजी मुंबईस निघाली. वेडरबर्न, फेरोझशहा मेहेता, वि. ना. मंडलीक, म. गो. रानडे, रा. गो. भांडारकर यांसारखी मंडळी तिच्याभोवती गोळा झाली. विनायकराव जगन्नाथ यांनी 'असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडिया' नावाची वेगळी संस्था स्थापन केली होती. पण तिचा फारसा प्रभाव पडलेला दिसत नाही. एकंदरीत पुनरुज्जीवित बॉम्बे असोसिएशनकडून फाटाफुटीमुळे फारशी कामगिरी घडली नाही. उत्तरोत्तर तिच्यातील दुहीच्या व तज्जन्य हळहळीच्या वार्ताच वृत्तपत्रांतून पाहावयास मिळतात.[१८]

स. १८७२ साली लिटनशाही जोरावर होती. युरोपियन लोकांचे खटले हिंदी सनदी अधिकाऱ्यांपुढे चालवू नयेत, असा कायदा करण्यात आला. त्याविरुद्ध 'इल्बर्ट बिल' आणण्यात आले. युरोपियन लोकांनी कांगावखोरपणे 'अँग्लो इंडियन असोसिएशन' स्थापून बिलाविरुद्ध चळवळ चालवली. तेव्हा सुरेंद्रनाथ बानर्जींनी भारतभर झंझावाती प्रचार करून आणि दादाभाई नौरोजींनी इंग्लंडात लोकमत जागृत करून इंग्रजी राज्याचा पक्षपातीपणा वेशीवर टांगला. अखेर युरोपियनांच्या बाजूने कौल दिला गेला. इंग्रजांचा न्यायीपणाचा दावा उघडा पडला !

मध्यंतरी दादाभाईंनी 'ईस्ट इंडिया असोसिएशन' सोडली आणि त्यांच्या मुंबईकर मित्रांनी 'बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन' नामक संस्था स्थापन केली आणि तिच्यातूनच ब्रिटिश सरकारशी सतत साठ वर्षे झगडून देशाला स्वातंत्र्य

मिळवून देणारी ' इंडियन नॅशनल काँग्रेस ' १८८५ साली उदय पावली.

एकंदरीत बॉम्बे असोसिएशन ही संस्था जवळ जवळ वीस वर्षे रुटुखुटू जिवंत होती. पहिली सहा–सात वर्षे तिने अतिशय धडाडीने कार्य केलेले दिसते. पण पुढे मात्र ती व्यापारी लोकांचे हातचे खेळणे बनली. या संस्थेच्या निष्क्रियतेची कारण-मीमांसा करताना मंडलिकांचे चरित्रकार म्हणतात :

' या संस्थेचे चालकत्व पुष्कळ अंशी स्वार्थैकदक्ष मुंबईच्या व्यापाऱ्यांकडे होते. खिशाला चट्टा बसे तेव्हाच व तेवढ्या बाबतीत ते चळवळ करीत. रयतेची खरी गाऱ्हाणी सरकारच्या कानावर घालण्याच्या कामास खरा आरंभच झाला नव्हता...' हा अभिप्राय कटू वाटला तरी सत्य होता.

पहिल्या सहा–सात वर्षांनंतर ' बॉम्बे असोसिएशन ' चा प्रभाव उत्तरोत्तर मावळत गेला असला, तिच्यामध्ये शेठजींचा आणि उच्च वर्गातील नवशिक्षितांचाच भरणा असला आणि तिचे राजकारण एकंदरीत अर्जविनंत्यांपुरतेच सीमित असले, तरी प्रबोधनाच्या प्रारंभकाळी पश्चिम भारतात राजकीय जागृतीची मुहूर्तमेढ रोवण्याचे तिचे कार्य आपल्या स्वातंत्र्यचळवळीच्या इतिहासात संस्मरणीय ठरणारे आहे.

संदर्भ

१. अ. का. प्रियोळकर, **रा. ब. दादोबा पांडुरंग,** मुंबई, १९४७, पृ. ३८५–३९३.

२. **चार जुने मराठी अर्थशास्त्रीय ग्रंथ,** संपा. दि. के. बेडेकर, पुणे, १९६९, पृ. ७.

३. अ. का. प्रियोळकर, **पूर्वोक्त,** पृ. ३७८–३७९.

४. वसंत नगरकर, ' वाघिणीचे दूध,' महाराष्ट्र टाइम्स, २१–१२–१९७५.

५. **पहिल्या वार्षिक सभेचे टिपण,** पृ. ७.

६. **तत्रैव,** पृ. १०.

७. अ. का. प्रियोळकर, **डॉ. भाऊ दाजी,** मुंबई, १९७१, पृ. १०७–११७.

८. **दुसऱ्या वार्षिक सभेचे टिपण,** पृ. १९–२०.

९. **ज्ञानप्रकाश,** २०–४–१८५७.

१०. **तत्रैव,** ७–१२–१८५७.

११. **रास्त गोफ्तार,** २७–१२–१८६३ (अ. का. प्रियोळकर, **डॉ. भाऊ दाजी, पूर्वोक्त,** पृ. १०२–१०३ वरून उद्धृत).

१२. गो. ना. माडगावकर, **मुंबईचे वर्णन,** मुंबई, १८६३, २८७–८८.

१३. ग. रा. हवलदार, **वि. ना. मंडलीक यांचे चरित्र, भाग १,** मुंबई, १९२७, पृ. २३८–४०.

१४. **नेटिव ओपीनियन,** १२ जाने. १८६८.

१५. **ज्ञानोदय,** १६ मार्च १८६८.

१६. **नेटिव ओपीनियन,** ८ मे १८७०.

१७. **ज्ञानचक्षु,** ४ फेब्रुवारी १८७२.

१८. **नेटिव ओपीनियन,** १३ एप्रिल १८७३ व अरुणोदय २७ एप्रिल १८७३.

१९. ग. रा. हवलदार, **पूर्वोक्त,** पृ. २३७–२३८.

१०. सत्तावनी समकालीन कात्रणे : प्रस्तावना

भारतीय स्वातंत्र्येतिहासाच्या महागाथ्याचे एक रोमहर्षक पर्व म्हणजे सत्तावनचे बंड ! या पुस्तिकेत त्यासंबंधी बहुतांशी वृत्तपत्रीय कात्रणे एकत्रित करण्यात येत आहेत. ठाकरसी महिला विद्यापीठाच्या यू. जी. सी.–पुरस्कृत अशा एका प्रकल्पासाठी ती गोळा करण्यात आली होती. ती नकलून घेण्यात माझ्याबरोबर माझ्या संशोधनसाहाय्यक कु. नंदा आपटे यांचाही वाटा आहे. कात्रणे कधी मुळानुसार तर कधी संक्षेपाने दिलेली आहेत, हे चिन्हांवरून वाचकांच्या ध्यानात येईल.

या उठावाचे वर्णन करणारी अनेक भाषांतून अनेक पुस्तके तयार झालेली आहेत; पण मराठीतील समकालीन साधनांचा उपयोग करून तयार झालेली पुस्तके अत्यल्प आढळतील. येथे अशी कात्रणे देऊन इतिहासकारांना कच्चे साधन पुरविले आहे. या उठावाला 'बंड' म्हणावे, 'स्वातंत्र्यसमर' म्हणावे की 'शिपाई गर्दी' म्हणावी, यासंबंधी इतिहासज्ञांत एकमत नाही. 'उठाव यशस्वी झाला म्हणजे त्याला क्रांती म्हणावयाचे, अयशस्वी झाला म्हणजे त्याला बंड म्हणावयाचे एवढेच.'[1] असे जे डॉ. वि. गो. खोबरेकर म्हणतात, ते खोटे नाही.

ईस्ट इंडिया कंपनीने आपली सत्ता पश्चिम भारतात १८१८ मध्ये प्रस्थापित

केली; पण ती पूर्णतया निष्कंटक होती, असे नाही. डॉ. खोबरेकरांच्या पुस्तकावरून याचा प्रत्यय यावा. १८४६ पर्यंत खानदेशातील भिल्लांनी चारपाचदा सशस्त्र उठाव केले होते. १८३९ मध्ये सातारच्या प्रतापसिंहाला पदच्युत केले, तेव्हा कऱ्हाडच्या धारराव[२] पवाराने बंड उभारले होते, त्यात नरसिंगराव पेटकर याचा विशेष हात होता. त्याने हजाराहून अधिक सैनिक जमा करून वदामीचा किल्ला घेतला, पण पुढे बेळगाव-धारवाड येथील कंपनीच्या सैन्याने त्याचा मोड केला.[३] १८४४ मध्ये कोल्हापूरचा कारभारी दाजीबा पंडित याने संस्थानातील पांचशे सैनिक जमवून समानगड घेतला व सतरा दिवस किल्ला लढवून अखेर शरणागती पत्करली.[४]

असे किरकोळ उठाव झाले असले, तरी सत्तावनच्या उठावानेच ब्रिटिश सत्तेला खराखुरा हादरा बसला. कारण या उठावात दोन तसेच सामर्थ्यवान घटक एकत्र येऊन, शस्त्र धारण करून इंग्रजांसमोर ठाकले होते. त्यांच्या ऐक्यामागील असंतुष्टतेची जी भिन्न कारणे होती, त्यावर या कात्रणांमधून नेमका प्रकाश पडतो. १८३४ साली कंपनीच्या डायरेक्टरांनी गव्हर्नर जनरलला दत्तक वारस अभान्य करण्यात यावा, असा आदेश दिलेला होता. तदनुसार एतद्देशीय संस्थानिकांची राज्ये खालसा करण्याचा सपाटा सरकारने चालविला. सातारा, झाशी ही राज्ये अशी घशात घातली. तर काही संस्थाने गैरकारभाराचे निमित्त करून संपुष्टात आणली गेली. अयोध्येचे राज्य या तऱ्हेने गिळंकृत केले गेले. नानासाहेब पेशवा हा रावबाजीचा औरस पुत्र नसून दत्तक पुत्र होता, म्हणून त्याचे पेन्शन बंद झाले. आपली कैफियत विलायतेत मांडण्यासाठी सातारच्या राजाने रंगो बापूजींना आणि नानासाहेबाने अझिमुल्लाला आपला वकील म्हणून पाठविले होते; पण त्यांच्या खटपटींना वाटाण्याच्या अक्षताच लागल्या. प्रसिद्ध राजा राममोहन रॉय हे दिल्लीच्या बादशाहाचे वकील म्हणून गेलेले होते. पण साऱ्यांचे प्रयत्न निष्फळ ठरलेले होते. अर्थात् यातून संस्थानिकांचा वर्ग असंतुष्ट होणे साहजिक होते.

महाराष्ट्रात इनामकमिशनखात्याच्या जुलमी चौकशीचा अंमल १८५२ साली सुरू झाला. या चौकशीचा एकूण रागरंग असंतोषात भर टाकणाराच दिसून येतो. सरकारी कारभाराच्या संदर्भात म्हटले गेले आहे, 'या देशांत सर्व सरकारी काम गुप्त चालतें व अंमलदाराची भाषा भिन्न यामुळें या लोकांस साहेब लोक काय लिहून पाठवितात व विलायतेंतून मुख्य सरकार त्यावर जबाब काय देतात, हे काहींच कळत नाही.'[५]

मुंबईतील नवजागृत एतद्देशीय मंडळीने स्थापन केलेल्या 'बॉम्बे असोसिएशन'ने आपल्या पहिल्या १८५२ सालच्या अर्जात असेच म्हटले होते : 'या सरकारच्या कारभारांत सर्व गोष्टींचा फार गुप्तपणा आहे, व मर्जीस वाटेल त्याप्रमाणें जुलुमाच्या गोष्टी घडून येतात.'[६] इनामकमिशनच्या बाबतीत वरील पुस्तकात पुढे

म्हटले आहे, ' १८५२ पासून तर हचा हकदार वगैरे लोकांची मनें उदास व भयभीत झाली आणि त्यांचे ठाई विचार व उद्‌गार नाना तऱ्हेचे येऊं लागले; कारण एकतर वडिलोपार्जित चालत आलेलें उत्पन्न, त्यांत बहुत वर्षांचा भोगवटा आणि त्यावर राज्यक्रांति झाल्यावर सरकारचें पुरें आश्वासन इतकी खंबिरी असतां एकाएकीं आपणावर सरकारची वक्र व कृपणदृष्टि झाली आहे. त्यापेक्षां आपलीं उत्पन्नें बुडविण्याचें आपल्या सरकारचे मनांतून आहे, असें वाटूं लागतें.'[७] दत्तकप्रकरणी सदर पुस्तकात आणखी म्हटले आहे, ' पाहा, या लोकांत (हिंदूंत) वंश नष्ट होऊं लागला असतां दत्तक घेण्याची चाल अनादिसिद्ध असून व जाहागिरदार वगैरे लोकांनी सरकार–परवानगीशिवाय दत्तक घेऊं नये, व कोणी परवानगीशिवाय घेतल्यास तें उत्पन्न त्या दत्तकाकडे चालणार नाही, म्हणून सरकारनें हुकूम फर्मावला आहे; व वहिवाटही सन्न १८३६ सालापासून सुरू आहेच. आलिकडे या खात्यांतून बहुत उदाहरणें, व त्या उदाहरणांची योजना दत्तकमनाईंवर झाली...'[८] इनामकमिशनच्या ' गैरइन्साफा ' ची चर्चा करून त्यात पुढे सूचक उद्‌गार असे काढले आहेत, ' हजार वळसे आणि एकच गांठ, परजन्यानें भिजविलें व वाहून नेलें, अग्निनें पोळलें अगर दहन केलें, व राजानें मारले अगर लुटून नेलें, याची फिर्याद कोण ऐकणारा समर्थ आहे, असा विवेक करून लोक विवंचनेंत निमग्न आहेत ' [९] संस्थानिक, सरंजामदार मनांतून विथरलेले का होते, हे यावरून समजून येते. इंग्रजी राज्यामुळे शूद्रातिशूद्रांच्या मानेवरचे ब्राह्मणी वर्चस्वाचे जोखड निघत असल्यामुळे महात्मा फुले इंग्रजी राज्याचे स्वागत करीत होते; तसेच मुंबईचे काही सुधारलेले लोक नव्या सुधारणांमुळे त्याचे गुणगान करीत होते, हे खरे असले; तरी ब्राह्मणवर्गाला इंग्रजी राज्याविषयी मनोमन आपुलकी कधीच नसावी. बंडाचा मोड होऊन चारपाच वर्षे लोटली नाही, तोच पुढाऱ्यांच्या हौतात्म्याचा गौरव करणारी सोंगे तमाशातून सजविली जाऊ लागली (कात्रण ७६). एल्फिन्स्टन-माल्कम, जार्विस यांसारखे प्रारंभीचे सन्माननीय अपवाद वगळल्यास एकंदर इंग्रज अधिकारी एतद्देशीयांकडे तुच्छतेने पाहात व त्यांच्यांत मिसळत नसत (का. १०२). ही गोष्टही जनसामान्यांना या राज्याविषयी दुरावा वाटायला लावणारी होती. तेव्हा इंग्रजी राज्य सुरू झाल्यानंतर सर्वत्र लोक संतुष्ट होते असे नाही. माडगावकरांनी म्हटले आहे, ' या दिवशी (बंडानंतरच्या प्रार्थनेच्या दिवशी) मुसलमान लोकांनी विशेष केलें नाहीं तरी ते तुर्कस्थान व विलायत अगदीं विसरले होते असें नाहीं '[१०] माडगावकरांनी मुसलमानांना थोडे सावरून घेतले असले, तरी राज्य गेल्याची खंत त्यांना असणार, यात शंका नाही.

या बंडात हिंदू आणि मुसलमान या उभय जमातींचे शिपाई एकत्र झाले, त्याचे कारण सरकार आपला धर्म बुडवू पाहत आहे, अशी त्यांची भावना होती. याच्याशी अगदी समान असा शिपायांचा उद्रेक पूर्वी छोटया प्रमाणावर

घडून आलेला होता. १८०६ साली वेलोरच्या शिपायांच्या गंध, भिकबाळचा आणि दाढी यांवर बंदी घातली गेली, तेव्हा धर्मभावना दुखवल्या जाऊन हिंदू-मुसलमान शिपायांनी बंड केले होते, हे इतिहासज्ञास सांगायला नको. १८५७ च्या बंडाचा उठाव झाला तेव्हा बंगाल, मद्रास, मुंबई अशा तीन सेना होत्या. बंगालसेनेत दीड लाख सैनिक होते, त्यांमध्ये अयोध्येकडील ब्राह्मणांचा भरणा अधिक होता. अयोध्येचे राज्य खालसा केल्यामुळे हे सैनिक आधीच असंतुष्ट होते, त्यात आगीत तेल पडावे तसे झाले ! १८५६ च्या अखेरीस बंगालसेनेला नव्या बंदुका देण्यात आल्या. त्या बंदुकांच्या काडतुसांची वेष्टने डुकराच्या व गायीच्या चरबीपासून बनविलेली होती, ही कुणकुण पसरताच सरकार आपणास लबाडीने बाटवून ख्रिस्ती बनवू पाहात आहे, असा संशय बंगालसेनेत फैलावला. सैन्यांतील असंतुष्टतेचा फायदा दुखावलेल्या संस्थानिकांनी घेतला. दिल्लीच्या बहादुरशहाला बंडाचे नेतृत्व बहाल केले गेले. नानासाहेब, झांशीची राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे, अयोध्येची बेगम, शहाजादा फिरोज हे बंडखोर सैनिकांचे पुढारी बनले. बहादुरशहाचे राज्य 'औट' महिनेच टिकले, हे खरे; पण काही काळ तरी ब्रिटिशांना 'दे माय धरणी ठाय' झाले. तसेच बंडवाल्यांना ब्रिटिश सैन्याच्या हालचाली कळत, पण उत्तर भारतात सरकारला बंडवाल्यांच्या मात्र कळत नसत, यावरून तिकडे तरी सर्वसाधारण जनतेत त्यांना सहानुभूती असली पाहिजे, हे नक्की. काही असले तरी ब्रिटिश परसत्तेबरोबरचा हा आपला पहिला जबरदस्त संघर्ष होता. काही महिने तरी उत्तर भारतातील काही प्रांतात ब्रिटिश सत्ता राहते की जाते, अशी भावना निर्माण झाली होती. या संघर्षात आपण हरलो असलो, तरी भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनात या घटनेला खास महत्त्व आहे. भारतीय मनाला या उठावाच्या वार्ता म्हणजे स्फूर्तीचा जिवंत झराच वाटत आलेल्या आहेत.

कात्रणांपैकी काही जशीच्या तशी तर काही विस्तारभयास्तव संक्षेपित वा संपादित करून घेतली आहेत. आपला 'ज्ञानप्रकाश' आणि ख्रिस्ती 'ज्ञानोदय' यांतील वार्तांची बारकाव्याने तुलना केल्यास दृष्टिकोनांतील भेद स्पष्ट होईल. आपल्या वृत्तपत्रांतून निषेधच आढळला, तरी त्यात सुप्त हळहळीची छटाही दिसून येईल. 'राज्यक्रांती कराव्या अशी उत्कंठा असेल त्यांणी वर्तमानकाळीं असे विचार न करावे, हेंच ठीक आहे,' असा सावध आणि पोक्त सल्ला 'ज्ञानप्रकाश'ने दिलेला दिसेल; उलटपक्षी दुसऱ्याने सिंह-कोल्ह्याचे दाखले देऊन पराभूत बंडवाल्यांना हिणविलेले दिसेल.

या राज्यक्रांतीचे प्रमुख क्षेत्र उत्तर भारतापुरते सीमित असले, तरी तिची झळ दक्षिणी प्रांतांनाही लागलीच. सातारा, कोल्हापूर, हैद्राबाद, औरंगाबाद इ. ठिकाणी कारस्थाने आणि छोटे उद्रेकही झाले. नानासाहेब पेशवे, झाशीची

लक्ष्मीबाई, तात्या टोपे यांसारखी मंडळी उठावाचे पुढारीपण करीत होती, त्यामुळे मराठी मुलुखात उठावाविषयी विशेष कुतूहल असणे साहाजिकच होते. या संघर्षाच्या निमित्ताने इंग्रजांविरुद्ध हिंदू-मुसलमान एक झाले होते. फार काय, हे ऐक्य टिकविण्यासाठी गोवधबंदीचे आश्वासन मुस्लिम पुढारी देऊ पाहात होते, ही गोष्ट लक्षणीय वाटेल. इंग्रजी राज्याने आपल्यावरोवर ज्या सुधारणा आणल्या, त्यांच्या प्रगतीला खीळ बसेल, या विचाराने एतद्देशीय सुशिक्षित वर्ग चिंताग्रस्त झाल्याचे आढळेल. पराभूत बंडवाल्याचे नेपाळशी संधान असावे आणि नानासाहेब पेशवा अखेरपर्यंत इंग्रजांच्या हाती मिळाला नसावा, या तर्काला या कात्रणांतून बळकटीच मिळते. विलायतेतील वकिली संपल्यावर अझिमुल्लाने रशिया व इराणशी संधान जमविण्याचा प्रयत्न केलेला होता, त्याचेही पडसाद कात्रणांत दिसतील. स्वामिनिष्ठेच्या बाह्यात्कारी रिवाजाची तत्कालीन कल्पना एक-दोन कात्रणांवरून येईल. उदा० कुचविहारच्या राजाने बाळासाहेब पेशव्यास पकडताना त्याच्या पायी खास रुप्याच्या बेड्या घातल्या (का. ७४), तसेच पेशव्यांना पकडतानाही शिद्यांनी आधी त्यांना मानवंदना दिली (का. ९७). उत्तरकालीन वार्ता व प्रतिक्रियाही या कात्रणांतून आहेत. अर्थात् 'केसरी' सारख्या सहजोपलब्ध पत्रातील कात्रणे त्यांत नाहीत. सर्व प्रमुख घटनांना गवसणी घालण्याइतकी पर्याप्तता त्यांना नाही. तरीपण महाराष्ट्रीय दृष्टिकोनांची विविधता त्यांतून अवश्य प्रतीत व्हावी. इतिहासज्ञांना त्यांचे मोल स्वयंसिद्धच आहे; पण सर्वसामान्य वाचकांनाही ती रोचक वाटावीत. हा संघर्ष नुसता संसदीय नव्हता, बंदुकीशी बंदूक भिडलेली, असा उत्तान होता. युद्धाच्या वार्तांची सनातन रम्यता या वार्तांना आहे. कित्येक प्रतिक्रिया अगदी ताज्याच आहेत. झाडावरून नुकत्याच तोडलेल्या अर्धकच्च्या फळांची खाटीमिठी रुची या सुट्या कात्रणांना आहे; वाचकांना ती चविष्ट वाटतील असा भरवसा आहे.

संदर्भ

१. वि. गो. खोबरेकर, **इंग्रजी सत्तेविरुद्ध महाराष्ट्रातील सशस्त्र उठाव, १८१८-१८६०**, पॉप्युलर, मुंबई, पृ. १४.

२. 'मोठा धारराव लागून गेलास की नाही !' यातील वाक्प्रयोग यावरून तर पडला नसेल ना ? तीच गोष्ट 'फोणसांवत' ची असावी.

३. **सोर्स मटीरियल फॉर हिस्ट्री ऑफ फ्रीडम मुव्हमेंट इन इंडिया,** (१८१८–१८८५), महाराष्ट्र शासन, मुंबई, १९५७, पृ. ५५–५६.

४. **ज्ञानसिंधु,** २६ ऑक्टो. १८४४.

५. **मुंबई इलाख्यांतील इनाम कमिशनखात्यातील गैरइन्साफ,** पुणे, १८५९, पृ. १२५.

६. **बाँबे असोसिएशनचे दोन अर्ज,** संपा. स. गं. मालशे, मुं. म. ग्रंथ-संग्रहालय, मुंबई, १९७६, पृ. ४.

७. **मुंबई इलाख्यांतील... गैरइन्साफ, पूर्वोक्त,** 'प्रस्तावना,' पृ. ५.

८. **तत्रैव,** पृ. ८२–८३.

९. **तत्रैव,** पृ. १२३.

१०. गोविंद नारायण (माडगावकर), **मुंबईचे वर्णन,** मुंबई, १८६३, पृ. १५७.

११. झाशीवाली पुढे खेळ सादर करणारा 'सदोबा नाटकवाला' कोण ?

विष्णुभटजी गोडसे यांचे 'माझा प्रवास' हे मराठीतील एक नामांकित पुस्तक. त्या पुस्तकाची पोतदार–संपादित चवथी आवृत्ती (१९६६) ही मुळाशी बरेच इमान राखणारी अधिकृत आवृत्ती आहे. तीमध्ये झाशीच्या राणी लक्ष्मीबाईसमोर नाटक सादर करणाऱ्या एका महाराष्ट्रातील नाटकमंडळीची हकीकत येते, ती अशी :

'सिंद्याचे लष्करात कोकणची मंडळी नाटकी सुमार पन्नास येऊन नाटके सुरू जाहाली. ग्वालेरीस नाटके बहुतच जाहाली. शेवटी दोन दोन आण्याचेही तिकीट नाटक पाहण्यास लागले होते. नाटके फार चांगली करीतात म्हणोन लौकिक झांशीस गेला, तेव्हा शहरचे मंडळीस आणि सरकार पदरचे मंडळीस असे वाटले की, हे नाटक येथे आणावे; परंतु सरकारास विचारून करणे ते करावे. नंतर ढेकरे उपाध्ये याणी बाईसाहेबांचे (झाशीवाल्या लक्ष्मीबाईचे) कानावर मजकूर नाटकाविसी दोन तीनदा गोष्ट काढून घातला. तेव्हा बाईसाहेब असे बोलल्या की, आम्ही त्यांस सूचना न करीता पैसा मिळविण्याचे हेतूने येथे आल्यास नाटक एखादे करू. असे जाहल्यावर ग्रामस्थपो (पैकी) कोणी पत्र मुख्य नाटकाचा मालक सदोबा म्हणोन होता, त्यास लिहिले आणि नाटकी झाशीस येताच सरकारात वर्दी दिली. नंतर सरकारकडून

सीधा सुरू जाहाल्यावर चवथे दिवशी नाटक शहराचे वाड्याचे चौकात जाहाले. बाईसाहेब त्या नाटकास येक कलाख येऊन मध्येच स्वारी उठोन गेली आणि ते नाटक जमले नाही. कारण नाटक दक्षणी भाषेत असल्यामुळे रांगडे लोकांस समजले नाही. त्याजमुळे लोक फार बोलत होते. ते नाटक हरिश्चंद्र राजाचे होते. नाटकी याणी सरकारास असे कळविले होते की, या नाटकात येक मडके म्हणजे मातीची घागर फोडावी लागते. ती आम्ही फोडिली असता सरकारास राग तर येणार नाही ना ? त्याजवरून चौकशी होऊन त्यास मडके फोडण्याबद्दल हुकूम जाहाला होता. पुढे नाटकात हरिश्चंद्र डोंबाचे घरी राहिल्यावर ती घागर बैठकीवर फोडिली. ते समई तेथेच लोक अपशकून आहे, असे कितीक म्हणू लागले. दुसरे नाटक फक्त दक्षणी मात्र आत घेऊन उखाचित्ररेखेचे नाटक सुरू केले. त्या नाटकास बाईसाहेब तीन कलाख बसल्या होत्या. नंतर किल्ल्यात नाटक जाहाले. त्या नाटकापासून बाईसाहेब बसत होत्या. रासक्रीडा वगैरे बाणासूर ही आख्याने लाऊन फक्त पाहाण्यास दरबारची मंडळी मात्र येत असे. असीही काही नाटके जाहाली. नंतर बाईसाहेबांनी दरबारचे मंडळीच्या बायका बोलावून त्यात पाहाण्यास पुरुष कोणी नाही; किल्ल्यातील मंडळीसुद्धा पाहाण्यास येऊ नये असा हुकूम करून पिछाडीचे तिसरे मजल्याचे चौकात बेत करून आपण स्वतःसमोर बसून नाटक जाहाले याप्रो (प्रमाणे) येकंदर पंधरा नाटके झासीत जाहाली. शेवटी नाटकवाले लोकांस किल्ल्यात मेजवानी करून सदोबास शालजोडी व काही मंडळीस पागोटी व काही मंडळीस रेसिमकाठी धोत्रजोडे दिल्हे व रोख रुपये चार हजार दिल्हे व बिदागी केली.'[१]

या उताऱ्यावरून गोडसेभटजींच्या व्यक्तिमत्त्वाचे दोन पैलू प्रकट होतात. एक म्हणजे राणीविषयी त्यांना वाटणारा आदरभाव आणि दुसरा त्यांचा शकुनापशकुनांवरील विश्वास. राणीच्या उदार रसिकतेबरोबर त्यांनी झाशी संस्थानाच्या दुर्दैवी होष्यमाणाची जी वाच्यता केली आहे, ती ध्यानात घेण्यासारखी आहे. पण या उताऱ्यातून मराठी रंगभूमीच्या इतिहासातील एक गौण परंतु लक्षणीय प्रश्न उद्भवतो, त्याचाच येथे विचार करायचा आहे. तो प्रश्न म्हणजे सत्तावनी प्रक्षोभापूर्वी झाशीवालीपुढे खेळ सादर करणारा 'सदोबा नाटकवाला' कोण ?

ठोकळ निष्कर्ष

संबंधित उताऱ्यावरून सहजी निघणारे ठोकळ निष्कर्ष असे :१) ही नाटक मंडळी कोकणची होती. २) तिचा मालक 'सदोबा' (सदाशिव हे व्यक्तिनाम असणारा) होता. ३) ती हरिश्चंद्राख्यानादी भावेपद्धतीची आख्यान–नाटके सादर करी. ४) ग्वाल्हेरला तिचे बरेच खेळ झाले; झाशींत पंधरा तरी झाले. ५) तीत सुमारे पन्नास माणसांचा लवाजमा होता. ६) राणी लक्ष्मीबाईने प्रत्यक्ष खेळ पाहिले आणि मंडळीला चांगली बिदागी दिली.

या संदर्भात यापूर्वी काही तर्क मांडले गेले आहेत. एक म्हणजे झाशीवाली-समोर नाटके सादर करणारे विष्णुदास भावेच होते, हे निराधार विधान कै. बापूराव नाईक यांनी केलेले आहे.[२] परंतु ज. स. सुखठणकर यांनी 'रुपडचांची रूपकथा' या पुस्तकात त्यांचे मत निराधार असल्याचे निदर्शनास आणले आहे.[३]

परंतु सुखठणकरांनीही 'माझा प्रवास'ची अधिकृत संहिता ध्यानात घेतली आहे, असे नाही. त्यांनी अस्सल परिशिष्ट म्हणून जो उतारा छापला आहे, तो १९०७ सालच्या बरेच फेरफार असणाऱ्या आवृत्तीचाच आहे.[४] त्याच्याच आधारे त्यांनी कृ. बा. मराठे यांनी 'वडाची साल पिंपळाला' जोडून, आपल्या 'मराठी रंगभूमीचा पूर्वरंग' या पुस्तकात विष्णुदास भाव्यांच्या क्रांतिकारक राजकीय दृष्टीचा जो खोटा प्रपंच केला होता, तो खोडून काढला आहे. त्यामुळे त्यांच्या म्हणण्यातला तात्पर्यार्थ जरी बरोबर असला, तरी तपशिलाच्या दृष्टीने त्यांच्याकडून 'पिंपळाची साल वडाला' चिकटविली गेली आहे. 'माझा प्रवास'मधील मराठे यांनी उद्धृत केलेला उतारा बहुतांशी बरोबर आहे. कारण त्यांनी पोतदार–संपादित चौथ्या अधिकृत आवृत्तीवरून तो घेऊन त्याचे पृष्ठांक ७४–७५ असे नेमके नोंदले आहेत.[५] सुखठणकर मात्र फेरफार असलेल्या १९०७ च्या पहिल्या आवृत्तीवर विसंबून आपण 'परिशिष्ट–अ 'मध्ये दिलेला उताराच अस्सल असल्याच्या भ्रमात आहेत. त्यामुळे सदर उताऱ्याच्या बाबतीत मराठ्यांचा खोटेपणा पदरी बांधण्याचा त्यांचा कलमवार खटाटोप अगदी अनाठायी ठरला आहे.[६] 'माझा प्रवास'ची कोणतीही आवृत्ती घेतली, तरी तीमधील नाटकमंडळीच्या मालकाचा उल्लेख चक्क 'सदोबा' असा आहे; तेव्हा विष्णुदासांच्या पदरी बांधले गेलेले श्रेय अर्थात चुकीचे ठरते.

या प्रश्नाशी संदर्भ जोडता यावा असे एक विस्तृत पत्र[७] विष्णुदासांच्या चरित्रात तसेच त्यावरून उद्धृत केलेल्या प्रा. बनहट्टी यांच्या 'मराठी रंगभूमीचा इतिहास, खं. १' या ग्रंथात (काही खांजगी उल्लेख गाळून) दिलेले आढळून येते. हे पत्र कोकणात स्वतंत्र नाटकमंडळी चालविणाऱ्या 'सदाशिव' नावाच्या व्यक्तीचे आहे. पत्रावर दिनांक नाही, ही त्याची प्रमुख त्रुटी आहे. पण शिवाय 'सदाशिव हरि गोखले' या नटाने मुंबई–पुण्याच्या दौऱ्याचा मोबदला भरून पावल्याची एक १८५४ सालातील पावती वरील दोन्ही ग्रंथांत दिलेली आहे. 'सदाशिवा'चे मूळ पत्र पुढीलप्रमाणे आहे :–

ती. रा. रा. विष्णुपंत दादा भावे,

मु॥ सांगली वडिलांचे सेवेसी.

अपत्यें बालकें सदाशिवानें दोनी कर जोडून सि. सा. न. वि. वि. आपलें पत्र कोकणांत आलें तें पोचलें. त्या पत्रांत आपण लिहिलें कीं, दोन तीन मुलें घेऊन

निघून यावें. त्यास माझी तर मंडळी ३० असामी आहेत. ज्याप्रमाणें तुमच्या मंडळीचा तुमच्यावर भरवसा आहे, त्याचप्रमाणें माझे मंडळीचा माझ्यावर भरंवसा आहे. त्यांनी मजबरोबर महेनतही बहुत केलेली आहे. असें असोन त्यांस सोडून आपलेकडे यावें हें ठीक नाहीं. आणि माझ्यामुळे हल्लीं २५/३० असामींचा निर्वाह चालला आहे. असें असून त्यांस सोडू नये असें वाटतें. आपण सूज्ञच आहात. परंतु सूचनार्थ लिहिलें आहे. आमचे मनात असें होतें कीं (कागद फाटला आहे) आसामी ३०/४० रु. पर्यन्त (कागद फाटला आहे) लावून घ्यावी आणि आम्हासही आश्रय झाला असता. आणि आपली मंडळी या मंडळींत घ्यावी असा बेत होता. परंतु तुमचे पत्रावरून तसा बेत दिसत नाहीं. परंतु संपूर्ण आश्रय आपलाच आहे. नवीन लहान मोठी मंडळी १०/५ मला मिळाली आहे व पहिली ३० आहेत. एकंदर मिळून तालमीचा अभ्यास चालविला आहे. दसरा, दिपवाळी झाल्यावर निघून वडोद्यात जाणार, सांगलीकर म्हणजे गोविंदभट हा पुणें मुक्कामी आहे. त्याचे मक्त्याचे खेळ अठरा होते, त्याप्रमाणें ८ झाले. पुढे थिएटर मोडून हजारों रुपयांचा नाश झाला. तेही वडोद्यास येणार आहेत. परंतु श्रीमारुतीचे कृपेंकरून व आपले कृपेंकरून आमच्यावर रंग करतील असें सांगवत नाहीं. कारण की, मी आपलाच शिष्या आहे. आणि खेळाचा भरणा तर पन्नास खेळांपर्यंत ठेविला आहे. पहिलेही सामान असून हल्लीं तेथें दोन सुतार कारागीर कामास लाविले आहेत. हल्लीं मी येथून नारायणराव करंदीकर पाठविले आहेत. त्यांजबरोबर सविस्तर मजकूर लिहून पाठविला म्हणजे आम्हांस पावेल. आणि आपण चांगली नाटके कोणती, त्याप्रमाणे पाचचार आख्यानें व गणपतीचे श्लोक व बाळगोपाळाचें पद व सरस्वतीचें पद कृपाकरून पाठवून द्यावे. मीही कांहीं कविता केली आहे. परंतु सांगण्याजोगी नाहीं, आपण मंडळी घेऊन बाहेर निघण्याचा बेत असल्यास कधी निघणार ती सूचना करावी. सौ. लक्ष्मीबाई आई यांनी मी मागें कोकणांत आलो त्या वेळेस देवीजवळ पुत्रउत्छाहाकरितां सांगितलें होतें. त्याप्रमाणे श्रीमारुतींचें कृपेकरून इच्छा पूर्ण झाली. तर त्याच्या नवसाची पांच रुपयेची व पांच रुपयेचें शेलापागोटें देण्यास कबूल केलें आहे. मातोश्रीस माहीतच आहे. आपण विचारावे. याची तजवीज आपण करतीलच परंतु सूचनार्थ लिहिलें आहे. ही गोष्ट मी विसरलों होतों. परंतु आपले पत्रांत लिहिलें होतें की, मुलाचा नमस्कार लिहिला होता. त्याजवरून समजतां आलें. आपणांकडून न आल्यास तो नवस आम्हांस फेडणे प्राप्त आहे. विशेष मजकूर काय लिहिणें. लोभ ममता असावी हे विज्ञापना.

हेची पत्रीं—सौ. वहिणाबाई मातोश्रीं यांस माझा सि. सा. न. ती. रा. भाऊसाहेब यांस सि. सा. न. रा. कुंशाबा नाना यास न. प्र॥. व्हावा रा. विठोबा काका तामनकर यास सा. न. प्रविष्ट व्हावा. सौ. थोरली वहिनी यांस सि. सा. न. सौ. सुंद्राबाई व लहान मुलें यांस आशिर्वाद शे. श्रु. होय ही विज्ञापती.

(विज्ञप्ति ?)

मंडळी कोकणातली असणे, तिचा मालक सदोबा (सदाशिव) असणे, तिचा सुमारे ५० माणसांचा लवाजमा असणे आणि भावेपद्धतीचे खेळ सादर करणे यांसारख्या महत्त्वाच्या बाबतींत 'माझा प्रवास'मधील वर्णन आणि पत्रातील मजकूर या दोहोंत एकवाक्यताच दिसून येते.

सर्वस्वी उलट अर्थ

सदर पत्रावरून विष्णुदासांचे आणि 'सदाशिवा'चे परस्परसंबंध खूपच, अगदी नातेसंबंध असावा तसे, सलगीचे दिसतात. मात्र प्रा. बनहट्टींना ते तसे वाटत नाहीत. त्यांनी 'मराठी रंगभूमीच्या इतिहासा'त 'पत्राचे मनन करून' सर्वस्वी उलट अर्थ लावला आहे.[८] त्यांनी 'सदाशिवा'ची गणना विष्णुदासांपासून फुटून वेगळी नाटकमंडळी काढणाऱ्यांत केलेली आहे. प्रा. बनहट्टींच्या मताला पोषक व्हावी अशी एकच बाब पत्रात दिसते. ती म्हणजे 'सदाशिवा'ने नट म्हणून आपल्या मंडळीत पुन्हा सामील व्हावे, ही विष्णुदासांची इच्छा मान्य केलेली नसते. त्याची कारणे त्याने सांगितली आहेत : (१) विष्णुदासांनी रदबदली करून संस्थानिकांकडून तीस चाळीस रुपयांची असामी (राजाश्रय) आपणास मिळवून द्यावी ही 'सदाशिवा'ची अपेक्षा पूर्ण झाली नव्हती. (२) स्वतःच्या हिमतीवर सुरू केलेल्या नाटकमंडळीतील तीस-चाळीस माणसांचे दायित्व त्याला सहजासहजी टाळता येण्याजोगे नव्हते. परंतु या उल्लेखाच्या आधारे 'सदाशिवा'ला 'फुटीर ठरविता येईलसे मुळीच वाटत नाही. त्या उभयतांचे खाजगी तसेच व्यावसायिक संबंध जवळिकेचे ठरविता यावेत, अशा अनेक बाबी पत्रात आहेत.

खाजगी संबंध सलगीचे होते, असे ठरविणाऱ्या गोष्टी अशा : (१) पत्रात लिहिलेला 'अपत्ये बालके' सारखा मायना. (२) 'हेच पत्री' म्हणून शेवटी विष्णुदासांकडील पुरुषमंडळीलाच नव्हे, तर स्त्रीवर्गालाही नमस्कार यथाक्रम लिहिणे. (३) भावेदांपत्याने पुत्रप्राप्तीबाबत केलेल्या नवसाची फेड त्यांच्याकडून न झाल्यास, ती करणे स्वतःचे कर्तव्य समजणे. (४) आपल्या पत्रात विष्णुदासांनीही आपल्या दीडएक वर्षाच्या पुत्राचा खास नमस्कार 'सदाशिवा'ला लिहिणे.

उभयतांचे व्यावसायिक संबंधही सलगीचे होते, हे दर्शविणाऱ्या गोष्टी अशा:–

(अ) पत्रलेखक 'मी आपलाच शिष्या आहे' असे विष्णुदासांविषयी आदराने म्हणतो.

(आ) कोकणातील दोन–तीन मुले (बहुधा स्त्रीपार्टासाठी) पाठवून द्यावी, अशी विष्णुदासांनी पूर्वीच्या पत्रात विनंती केलेली असते.

(इ) विष्णुदासांनी प्रयोगक्षम आख्याने कळवावी तसेच आपली मंगलाचरणातील (नांदीतील) रचना पाठवून द्यावी, अशी पत्रलेखक अपेक्षा करतो.

(ई) आपल्या एकंदर मागणीसाठी नारायणराव करंदीकर या गृहस्थाला तो पाठविणार असतो.

एकंदरीत 'मननपूर्वक बनविलेले' प्रा. बनहट्टीचे मत ग्राह्य वाटत नाही. त्यांच्या या मताला छेद देणारा आणखी एक पुरावा पुढे करता येण्यासारखा आहे. तेरा वर्षे आपल्या तालमीत तयार झालेल्या चौदाजणांविरुद्ध विष्णुदासांनी सांगलीच्या राजेसाहेबांकडे ७ सप्टेंबर १८५५ रोजी तक्रार-अर्ज पाठविला होता, तो 'विष्णुदास चरित्रा'त उपलब्ध आहे.[९] त्या तक्रार-अर्जात पुण्याच्या मुक्कामात 'सदाशिव'शी स्पर्धा करणाऱ्या गोविंदभटाचे (गोविंदभट करमरकर) नाव पहिल आहे, पण 'सदाशिव' व्यक्तिनाम असणाऱ्या कोणाही गृहस्थाचे नाव आढळत नाही.

'सदाशिवा'च्या पत्रावरील आपल्या भाष्यात, शके १७७६ मध्ये 'वाटचाची पावती लिहून देणारा व देवपार्ट करणारा सदाशिव हरि गोखले' आणि पत्रलेखक 'सदाशिव' हे दोघे एकच होते, असा जो तर्क प्रा. बनहट्टींनी केला आहे, तो सयुक्तिक वाटतो.[१०] कारण 'सदाशिव' आद्यनाम असणारे नट त्या काळी असले, तरी नाटकमंडळीचा मालक असणारा कोणीही गृहस्थ आजवर तरी आढळात आलेला नाही.

वर मोबदल्याची पावती म्हणून जी म्हटली, तिची मिती ध्यानात घेतल्यास ती पावती ८ मे १८५४ ची ठरते.[११] तेव्हा विष्णुदासांबरोबर मुंबई-पुण्याचा हा दौरा केल्यानंतर १८५५ च्या सुमारास 'सदाशिवा'ने आपली नाटकमंडळी कोकणात स्थापन केलेली दिसते. उत्तरचा दौरा करावा, एवढे स्थैर्य तिला १८५७ च्या पूर्वी आलेले असावे. या मंडळीचे पुढचे कालमान दर्शविणारे गमक 'सदाशिवा'च्या पत्रावरून ठरविणे शक्य आहे. हे गमक म्हणजे नवसफेडीचा पत्रातील उल्लेख. 'भावे कुलवृत्तांत' (१९४०) या ग्रंथात विष्णुदासांच्या 'विठ्ठल विष्णू' या ज्येष्ठ चिरंजीवांचे जन्मवर्ष १८५५ असे दिलेले आहे.[१२] तदनंतर वर्षभरात म्हणजे १८५६ च्या दरम्यान नवसफेडीचा प्रश्न उपस्थित होणार; तेव्हा सदाशिवाने विष्णुदासांना लिहिलेले पत्र त्याच वेळचे ठरते. पत्रातील मजकुरावरून उत्तरदौऱ्यापूर्वीच गोविंदभट करमरकरांच्या नाटकमंडळीशी सामना देण्याची सिद्धता 'सदाशिव हरि गोखल्या'च्या मंडळीची झालेली दिसते. थोडक्यात निष्कर्ष सांगायचा तर विष्णुदासांचा शिष्य 'सदाशिव हरि गोखले' हाच झाशीवालीसमोर पौराणिक खेळ सादर करणारा 'सदोबा नाटकवाला' असावा, हा तर्क सयुक्तिक ठरतो.

या संबंधात अधिक माहिती मिळविण्यासाठी 'गोखले कुलवृत्तांत (२ री आ; १९७८) हा ग्रंथ चाळून पाहिला. 'सदोबा' आणि 'सदाशिव हरभट' अशा नोंदी कालमानाशी जुळतील, अशा आढळल्या; पण नोंदींपुढे नाटचव्यवसायाचीच

काय; पण कसलीच माहिती दिलेली नाही.'[13] गोखलेकुलोत्पन्नांनी अधिक शोध घेण्यासारखा आहे.

संशोधनाच्या दृष्टीने ग्रंथावृत्तीचा व्यापक प्रश्न येथे गुंतलेला आहे. वास्तविक कै. नाईक किंवा श्री. सुखठणकर यांना पोतदार-संपादित अधिकृत आवृत्ती उपलब्ध होती. पण सुखठणकरांनी वैद्यसंपादित पहिली तर नाइकांनी दुसरी आवृत्ती प्रमाण मानून उतारे घेतले. त्यामुळे संहितेच्या संदर्भात उभय संशोधकांनी घोटाळेच केले. कारण प्रा. न. र. फाटकांची प्रस्तावना असणाऱ्या द्वितीयावृत्तीतील संहिता वैद्यांच्या आवृत्तीप्रमाणेच आहे. ग्रंथाच्या विविध आवृत्तींची तुलना करून अधिकृत संहिता संशोधनार्थ निवडणे कसे अगत्याचे ठरते, ही गोष्ट यावरून उघड व्हावी.

संदर्भ

१. विष्णुंभट गोडसे, **माझा प्रवास**, ४ आ; संपा. द. वा. पोतदार. व्हीनस, पुणे १९६६, पृ. ७४–७५. (१ ली आ. संपा. चिं. वि. वैद्य, १९०७; २ री आ. चिं. वि. वैद्य, न. र. फाटक ' प्रस्तावना,' १९४८).

२. बापूराव नाईक, ' मराठी रंगभूमीचा तंत्रदृष्ट्या विकास,' **मराठी रंगभूमी : मराठी नाटक** (भालेराव स्मृतिग्रंथ), संपा. के. नारायण काळे इ., मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई, १९७१, पृ. २२५.

३. ज. स. सुखठणकर, **रूपडयांची रूपकथा**, थ्रि गोवा हिंदु असो., मुंबई, १९८३, पृ. १८.

४. **तत्रैव**, पृ. २८५–८६.

५. कृ. वा. मराठे, **मराठी रंगभूमीचा पूर्वरंग**, श्रीविद्या, पुणे १९७९, पृ. १२२.

६. ज. स. सुखठणकर, **पूर्वोक्त**, पृ. ७३–८०.

७. वा. ग. भावे, **विष्णुदास**, प्रका. वा. ग. भावे, सांगली, १९४३, पृ. १४१–४४.

८. श्री. ना. बनहट्टी, **मराठी रंगभूमीचा इतिहास**, खं. १, व्हीनस, पुणे १९५७, पृ. १८२–८५.

९. वा. ग. भावे, **पूर्वोक्त**, पृ. १४१–४२.

१०. श्री. ना. बनहट्टी, **पूर्वोक्त**, पृ. १८४.

११. वा. ग. भावे, **पूर्वोक्त**, पृ. १३९.

१२. गो. वा. भावे, **भावेकुलवृत्तांत**, गो. वा. भावे, पुणे, १९४०, पृ. १०३.

१३. **गोखले कुलवृत्तांत**, २ आ., गोखले कुलवृत्तांत कार्यकारी मंडळ, पुणे, १९७८, पृ. २०४, ६०२ व ६९६.

१२. इचलकरंजीकर नाटक मंडळीची भरीव कामगिरी

एके काळी पुणे म्हटले की विद्येचे माहेर असे त्याचे कौतुक होई, तसे आजकाल इचलकरंजी म्हटले की उद्योगाचे माहेर–'महाराष्ट्राचे मँचेस्टर' असे त्याचे कौतुक होते. इचलकरंजीच्या औद्योगिक क्षेत्रातील प्रगतीपुढे तिच्या कलाक्षेत्रातील कार्याचे विस्मरण झाल्यागत झाले आहे. नाहीतर गानविद्या आणि रंगभूमी या संदर्भात इचलकरंजीचे कार्य हेवा वाटावा अशा तोलामोलाचे आहे. कै. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांनी खडतर तपश्चर्या केली, गानविद्या आत्मसात केली. गांधर्व विद्यालयाचे संस्थापक विष्णु दिगंबर पलुसकर, अनंत मनोहर, नीळकंठबुवा जंगम, वामनबुवा चाफेकर, मिराशीबुवा, भाटेबुवा, गुंडुबुवा इंगळे, दत्तोपंत काळे, अकाली गेलेले चिरंजीव अण्णाबुवा, बाळुबुवा कासार असा शिष्यपरिवार तयार केला आणि महाराष्ट्रात उत्तर हिंदुस्थानी गायकी रुळविली. इचलकरंजीचे गायनकलेतील कार्य जसे श्रेष्ठ होते, तसेच तिचे नाटचसृष्टीतील कार्यही श्रेष्ठ होते. महाराष्ट्रातील दोन दीर्घकाळ चाललेल्या मंडळचांचे नेतृत्व इचलकरंजीकरांनी केलेले आहे. पुढे १८८० च्या सुमारास कै. अण्णासाहेब किर्लोस्करांनी संगीत रंगभूमीवर आणि कै. गणपतराव जोश्यांनी गद्य रंगभूमीवर जी क्रांती केली, तिचा मार्ग मोकळा करण्याचे कार्य राघोपंत आपटचांच्या कुशल नेतृत्वाखाली

चाललेल्या इचलकरंजीकर नाटक मंडळीकडून झाले. शिवाय बाळकृष्णबुवा इचलकरंजीकरांच्या मिराशीबुवा आणि भाटेबुवा या शिष्यद्वयाने संगीत नट आणि अध्वर्यू म्हणून नाट्यकलाप्रवर्तक नाटक मंडळीमध्ये महत्त्वाची कामगिरी बजावली.

विष्णुदासी आदर्शात सुधारणा

या उभय नाटकमंडळ्यांपैकी इचलकरंजीकर नाटकमंडळी सुमारे १८४९–५० साली चिमणभट नि नारायणभट या दोघा बापटबंधूंनी स्थापन केली. सहासात वर्षांपूर्वीच कै. विष्णुदास भावे यांनी सांगलीला मराठी रंगभूमीची मुहूर्तमेढ रोवली होती. विष्णुदासांच्या पौराणिक नाटकांचा आदर्शच प्रारंभीची दहाबारा वर्षे इचलकरंजीकर मंडळीपुढे होता. तदनुसार सूत्रधाराने पद्यरूपाने नाटकभर गायन करावयाचे आणि पात्रांनी तदनुसार मुख्यतः अभिनय आणि अगदी तोंडी लावण्यापुरते भाषण करावयाचे, अशी पद्धती असे. गणराज–सरस्वतीचे आवाहन आणि आशीर्वादार्थ आगमन झाल्यानंतर देव, राक्षस आणि स्त्रिया ही वेषधारी पात्रे प्रसंगानुसार बाहेर यावयाची. राक्षसपार्टवाल्यांनी राळफेकीसह अकाळविकाळ ओरडत प्रवेश करावयाचा. देव–राक्षस युद्ध, तलवारींची झटापट, भयंकर डरकाळ्या व किंकाळ्या, देवस्त्रियांचा नृत्ययुक्त शोक अशी कृती प्रायः दिसावयाची. सूत्रधाराखालोखाल विदूषकाला काम असे. त्याचा विनोद हरदासी स्वरूपाचा आणि पुष्कळसा बीभत्सपणाकडे झुकणारा असे. पण इचलकरंजीकर नाटक मंडळीने हळूहळू पौराणिक पद्धतीच्या नाटकांनाही वेगळे वळण दिले. प्रथम काही काळ त्यांनी विष्णुदासांची वा पुण्याच्या नाना सोनी यांची आख्यानपदे घेतली असली, तरी पुढे पांडुरंग रघुनाथ ऊर्फ बाबाजीशास्त्री दातार हे विद्वान आणि खंदे कवी त्यांना लाभले.

अक्षरशः सव्यसाची

१८६२ ते १८७९ पर्यंत बाबाजीशास्त्री दातारांनी मंडळीसाठी पन्नास तरी आख्याने-नाटके रचली. हे कवीही अक्षरशः सव्यसाची होते. राघोपंत इचलकरंजीकर या चालकांनी अमुक एका आख्यानावर नाटक रचायचे अशी इच्छा प्रदर्शित केली की, कविराजांच्या विछान्यालगतच्या भिंती सारवून उशागती खडूचे तुकडे ठेवले जात. मग बाबाजीशास्त्री पडल्यापडल्या पदे जुळवून ती रागतालांसह भिंतीवर लिहून ठेवीत. उजव्या कुशीवर पडले असता डाव्या हाताने आणि डाव्या कुशीवर पडले असता उजव्या हाताने त्यांचे लेखन चाले. दुसऱ्या दिवशी राघोपंत येत. हवी असलेली पदे उतरून घेत आणि नाटक बसविण्याच्या कामाला लागत.

बाबाजीशास्त्री यांची आख्यान-रचना विष्णुदासांच्या रचनेहून अधिक चांगली असे. कथानकातील कृतीला क्रमाक्रमाने संघर्षाप्रत नेणे त्यांना उत्तम साधे. त्यांच्या रचनेपैकी शारदास्तवनाचे पद प्रा. बनहट्टींनी उद्धृत केले आहे. त्याचे प्रारंभीचे

चरण असे आहेत:–'शारदे सर्व कामदे कमलमृदुपदे प्रजापतितनये। निज भक्त भक्ति-बुद्धिजाड्यविनाशक सदये ॥' ते कधी कधी आपल्या पात्रांना अतिमानवी पातळी-वरून मानवी पातळीवरही आणीत. उदाहरणार्थ, आपल्या 'नृसिंह' नाटकात विष्णुवधाची घोर प्रतिज्ञा हिरण्यकश्यपूने जड संस्कृत भाषेत केल्यावर आई दीती तक्रार करताना म्हणते, 'सांग पण सारी ही संस्कृत भाषा कळेल कशी। आम्ही अशा योषा। म्हणून तू देशभाषेने इतिहास कथावा बहु बरे। असे म्हणत बोलीजे, दैत्याधिप आणवी मराठी बुक दासाकरवी। ते बुक घेओनी ती दैन्य बदली देखा या इतिहासाला.'

कधी रांगडी हिंदुस्थानी तर प्रसंगानुसार कन्नड भाषाही त्यांनी योजिली आहे. 'गोपीचंदाख्याना'तील बराच भाग तर 'मत्स्येंद्राख्याना'तील सर्वच्या सर्व रचना हिंदुस्थानी भाषेत आहे. एकंदरीत वावाजीशास्त्री दातार हे जसे गाढे संस्कृत पंडित, तसेच जरुरीपुरते बहुभाषिक रचनाकारही होते. प्रारंभी बहुधा त्यांनी रामचरित्रपर आख्यान–रचना केली असावी; पण ती उपलब्ध झालेली नाही. अन्य आख्याने उपलब्ध आहेत. त्यांत प्रामुख्याने शिवचरित्रपर, विष्णुअव-तारपर आणि पांडवकथापर आख्याने बहुसंख्य आहेत. त्यांनी स्कंद, शिव, लिंग ही पुराणे तसेच महाभारत, भागवत, जैमिनी अश्वमेध यांच्या आधारे ही रचना केलेली दिसते. 'भरत' नामक नाटक बनहट्टींनी समग्र दिले आहे. त्यात एकूण पंचवीस पदे असून त्यांवर शुद्ध कल्याण, हमीर, भूप, त्रिवट, बेहाग, सोरठ, अरबी वगैरे रागांची नांवेही निर्दिष्ट केलेली आहेत. त्यावरून वाबाजीशास्त्री हे जसे संस्कृतज्ञ होते तसे ते संगीतज्ञ होते, हे दिसून येते.

राघोपंतांची कामगिरी

मंडळीचे चालकत्व जवळजवळ वीस–बावीस वर्षे राघोबा आपटे इचलकरंजी-कर यांनी अत्यंत कुशलतेने केले. हे गृहस्थ बालपणी संस्थानिकांच्या मुदपाकखान्यात ताक घुसळण्याच्या कामावर होते. पण त्यांना तेव्हापासूनच गाण्याचा नाद अनिवार होता. हा 'रघु ताक्या' तालठेक्यात दंग असताना मांजरे लोणी पळवून नेत. स्वैपाकी मारही देई. तेव्हा स्वारी काशीला पळून गेली. तेथे काही काळ एका संन्याशाच्या सेवेत गेला. संन्याशाने प्रसन्न होऊन आशीर्वादपूर्वक एक बाण प्रसादार्थ दिला. मग राघोपंत इचलकरंजीस बहुधा १८६० साली आले आणि गावातल्याच इचलकरंजीकर नाटक मंडळीत शिरले. ही मंडळी सहकारी तत्त्वावर चाले. रंगमंचा-खेरीज करावयाची कामेही नटवर्गाकडे वाटून दिलेली असत. स्वयंपाकाचे आणि पाणी भरण्याचे काम राक्षसपार्टी करीत, रंगरंगोटी, किरीटकुंडलादी वेषभूषा तसेच पानपत्रावळ ऋषिपार्टी करीत, तर चटण्याकोशिंबिरी स्त्रीपार्टी मुलांवर सोपविलेल्या असत. या नाटकमंडळींची शिस्त वाखाणण्याजोगी असे. त्यांनी एक तपशिलवार

ठरावपत्रच सिद्ध केलेले होते. त्यावरून असे दिसते की, मंडळीतील नटांनी आपल्यामधून मुखत्यार असे एक सात जणांचे पंचमंडळच निवडले होते. मंडळींत उद्भवलेल्या कोणत्याही कटकटीचा निर्णय या पंचमंडळाच्या बहुमताने ठरविला जाई.

ही मंडळी पुणे–मुंबई, कोल्हापूर–सातारा यांसारख्या शहरांप्रमाणे बडोदे–हैदराबादसारख्या संस्थानी शहरांतही दौरे करी. क्वचित काशीपासून मद्रासपर्यंत जाऊन मंडळीने तुरळक नाटचप्रयोग सादर केलेले आढळतात. एकंदरीत तत्कालीन सुशिक्षित आणि सुसंस्कृत रसिकांच्या लोकादरास मंडळी पात्र ठरली होती. असे सांगतात की राघोपंतांच्या कुशल चालकत्वाखाली मंडळी आर्थिक दृष्टचाही इतकी संपन्न झाली की, प्रत्येक नटाच्या गळचात सोन्याचे यज्ञोपवीत पडले होते !

नाटचप्रयोगांची विविधता

'शुभसूचक' पत्रावरून असे दिसते की, १८६१ पर्यंत मंडळीने जी पौराणिक आख्यान–नाटचे सादर केली, ती प्रायः अल्लूल् डुर्क पद्धतीची आक्रस्ताळी असावीत. शुभनिशुंभ, वकासुरवध, हिडिंबासुरवध ही त्यांतली काही त्यानंतरची पौराणिक नाटके. मात्र द्रौपदीस्वयंवर, प्रमिलास्वयंवर, चंद्रहास्य, दक्षप्रजापतियज्ञ, राधाविलास यांसारखी अधिक रोचक कथाभागांवर आधारलेली होती. त्यांतली प्रमिलास्वयंवर आणि राधाविलास ही नाटके अखेरपर्यंत लोकप्रिय होती.

सन १८६० च्या सुमारास मंडळीने महाराष्ट्राचे दौरे करण्यास प्रारंभ केला असावा. १८६२ च्या पुण्याच्या मुक्कामात, **नवीन छापी** 'मालतीमाधव'चे दोन अंक, लक्ष्मणशक्ति आणि गोफटिपऱ्यांसह 'रास'चा उत्तरार्ध हे खेळ करणार असल्याचा उल्लेख 'ज्ञानप्रकाश'मध्ये येतो (२२ मे १८६२). त्याच पत्राच्या २६ मे च्या अंकात 'मालतीमाधव नाटकाचा खेळ फार सरस झाला', असा अभिप्रायही वाचायला मिळतो. म्हणजे नव्यानेच प्रसिद्ध झालेल्या, सामाजिक वेशभूषेच्या (सेटिंगच्या) बुकिश नाटकाचा प्रयोग मंडळीने यशस्वीपणे सादर केला होता, हे उघड होते. याच मुक्कामात 'अहीमही–आख्यान' 'उमामहेश्वरविवाह' 'लहुकुश' 'पारिजातक' 'चंद्रहास्य–पूर्वभाग' असे खेळ केल्याचा उल्लेख सापडतो. १८६३ साली मंडळी सातारा येथे होती आणि 'शुभसूचक'वरून तिचे पस्तीसएक खेळ झालेले आढळून येतात. १८६४ मध्ये मंडळी पुन्हा पुण्यास होती, अप्पा बळवंताच्या वाडचानजिकच्या रंगमंदिरात खेळ करीत होती व 'कचाख्यान ऊर्फ मृतसंजीवनीची प्राप्ति', 'भंडासुर आणि कलिता अवतार' आणि एक चमत्कारिक फार्स, हे खेळ केल्याचा उल्लेख 'ज्ञानप्रकाशा'त येतो. (८ सप्टेंबर १८६४).

मंडळीने संस्कृत 'बुकिश' नाटकांचेही प्रयोग सादर केले. परशुरामतात्या गोडबोल्यांची नागानंद, वेणीसंहारचे तीन अंक, अभिज्ञान शाकुंतल ही भाषांतरित

नाटके त्यांनी केली. तसेच गणेशशास्त्री लेलेकृत 'जानकी–परिणय'ही केले. यांपैकी 'अभिज्ञान शाकुंतल' आणि 'वेणीसंहार'चे काही प्रयोग झाले. परंतु 'नागानंद' आणि 'जानकी–परिणय' यांचा विशेष बोलबाला झाला नाही.

या मंडळीची सर्वांत मोठी कामगिरी म्हणजे तिने मराठीतले पहिले स्वतंत्र बुकिश नाटक वि. ज. कीर्तनेकृत 'थोरले माधवराव पेशवे' हे रंगभूमीवर आणले. ते मंडळीने इतक्या उत्कृष्ट रीतीने वसविले की, ते मंडळीचा हुकमी एक्काच ठरले. अण्णासाहेब किर्लोस्करांना बुकिश नाटक लिहिण्याची स्फूर्ती या मंडळीचे नाट्यप्रयोग पाहूनच झाली. 'अल्लाउद्दिन आणि चितूरगडची स्वारी' हे त्यांचे नाटक अपूर्ण राहिले. मात्र त्यांचे 'शांकरदिग्विजय' इचलकरंजीकर मंडळीने समाधानकारक रीतीने सादर केले. 'विविधज्ञानविस्तारा'तून आलेले 'श्रीमन्नारायणराव पेशवे' नाटक पुढे १८९० च्या सुमारास मंडळीने सादर केले, पण त्यावद्दल संमिश्र प्रतिक्रियाच व्यक्त झाल्या. राघोपंताचे कुशल चालकत्व त्या वेळी नव्हते. 'राघोपंतांच्या वेळची भट्टी उतरली नाही' असा नेमके बोट ठेवणारा अभिप्राय 'नेटिव्ह ओपीनियन'मध्ये आलेला होता.

वि. ज. कीर्तन्यांनी 'बायबल'च्या आधारे रचलेले 'जयपाळ' नाटकही बरेच यशस्वी झाले. 'थोरले माधवराव' आणि 'जयपाळ' ही नाटके एक प्रकारे शोकान्तिका होत्या. मराठी रंगभूमीवरील हा नवा प्रयोगच म्हणावा लागेल. या नाट्यकांच्या निमित्ताने मराठी शोकांतिका या नाट्यप्रकारासंबंधी प्रथमच चर्चा सुरू झाली. शेक्सपियरची खरीखुरी शोकांतिका 'ऑथेल्लो' १८६७ मध्ये मंडळीने रंगभूमीवर आणली. महादेवशास्त्री कोल्हटकरांनी केलेले ते भाषांतर होते. मराठी प्रेक्षकांच्या दृष्टीने कथाभाग एकदम अपरिचित असल्यामुळे प्रवेशवार कथाभाग देणारे हस्तपत्रक तयार करून ते वाटण्याची दक्षता राघोपंतांनी घेतली होती. पुढे तेरा वर्षांनी आर्योद्धारक मंडळीने ते उत्कृष्टपणे सादर केले आणि देवलकृत रंगावृत्ती झुंजारराव शाहूनगरवासीने गाजविले. पण ही थोर शोकांतिका इचलकरंजीकरला विशेष लाभकारी ठरली नाही.

जुळ्यांच्या जोडगोळ्या

सन. १८७७ च्या सुमारास मंडळी विदर्भाच्या दौऱ्यावर होती. तेथे वि. मो. महाजनी, श्रीराम भिकाजी जठार, बजाबा रामचंद्र प्रधान या विद्वानांच्या सहवासात मंडळी आली. महाजनींनी शेक्सपीयरच्या 'सिंबेलाईन'चे 'तारा', तसेच जठार व प्रधान यांनी त्याच्या 'कॉमिडी ऑफ एरर्स'चे 'भ्रांतिकृत चमत्कार' अशी रूपांतरे केलेली होती. मंडळीने ती रंगभूमीवर आणली. ही दोन्ही नाटके खूपच गाजली. 'भ्रांतिकृत चमत्कार'त जुळ्या मालक–नोकरांची कामे करणाऱ्या उभय जोड्या सारख्याच तोंडवळ्याच्या हव्या असतात. मंडळीमध्ये थेट अशी पात्रे होती. वासु-

नाना पेंडसे आणि भास्करराव गाडगीळ हे 'हेमकांत' या मालकाची भूमिका तर रा. वि. भिडे आणि अंताजी गोखले 'धर्म्या' या नोकराची भूमिका वठवीत. रूपांतरही बेमालूम झालेले असल्याने व मूळ नाटकातच जुळ्यांच्या फसगंमतींच्या हास्योत्पादक प्रसंगांना वाण नसल्याने 'भ्रांतिकृत चमत्कार' नाटकाचा प्रयोग कमालीचा रंगत असे. 'बार्बारोसा'च्या आधारे शंकर मोरो रानडे यांनी 'दौलतराव' या नावाचे एक नाटचरूपांतर प्रसिद्ध केलेले होते. मंडळीने ते सन १८७९ साली रंगभूमीवर आणले, पण फारसे यशस्वी झाले नाही.

सन १८७३ सालापासून मंडळी 'बंदर बादशाहाचा फार्स' या नावाचे उर्दू भाषेतील नाटक करी. ते चटकदार वठे. मराठी 'दामाजीपंताचा फार्स' मुख्य नाटकाला जोडगण म्हणून करण्यात येई, तोही उत्कृष्ट होत असे. वडोद्याच्या दौऱ्यात १८८२ साली 'पतिप्रेमनिकष' नावाचे एक नाटक मंडळीने केलेले आढळते. 'चमत्कारिक खुनी मोकदमा' हे नाटक १८७७ मध्ये मंडळीने बसवून यशस्वी केले होते. 'प्रमिलास्वयंवर,' 'कच–देवयानी,' 'कंसवध' आणि 'थोरले माधवराव पेशवे' ही मंडळीची हातखंडा नाटके होती. 'भ्रांतिकृत चमत्कार' ही खूप रंगत असे. त्या नाटकाचा पुणे येथे गणेशखिंडीत राजभवनात मुंबईचे गव्हर्नर फर्गसन व लेडी फर्गसन यांच्यासाठी खास प्रयोग २७ सप्टें. १८८० रोजी मोठ्या प्रेक्षकवर्गासमोर झाला होता (**टाइम्स ऑफ इंडिया,** २८–९–१८८०). मंडळींच्या काळासंबंधी नाटचेतिहासातून निरनिराळी वादग्रस्त विधाने आढळून येतात; परंतु एक गोष्ट निश्चित की, इचलकरंजीकर मंडळी मार्च १८९६ पर्यंत चालू होती. कारण किर्लोस्कर मंडळीचे व्यवस्थापक कै. व्यंबकराव साठे यांच्या दैनंदिनीत १४ मार्च १८९६ रोजी, शनिवारी रात्री 'इचलकरंजीकर मंडळीचे शापसंभ्रम पाहिले' अशी नोंद आढळून येते.

अभिनयपटू नटसंच

मंडळीच्या नटवर्गाविषयी सुरस आणि चमत्कारिक अशा कित्येक आख्यायिका सांगितल्या गेल्या आहेत. पौराणिक नाटकांच्या पहिल्या जमान्यात तुकाराम पवार म्हणून एक राक्षसपार्टी कंपनीत होता. अप्पा तेली याने करून दिलेला नारसिंहाचा अक्राळविक्राळ मुखवटा घालून भूमिका वठविताना त्याच्या अंगी खरोखर नारसिंहाचा संचार झाल्यागत झाले. तांब्याच्या नख्यांनी तो हिरण्यकश्यपूचा कोथळा फोडण्याच्या बेतात होता. पण अन्य नटांनी त्याच्या कचाट्यातून हिरण्यकश्यपूला सोडविले. बहिरव गोविंद ओगले हेही राक्षसपार्टीत निष्णात होते. त्यांचा देह गोरापान आणि धिप्पाड व आवाज दणदणीत. 'मारुतीच्या कामाच्या वेळी राम–सीतेला खांद्यावर घेऊन नाचण्याचे काम' ते लीलेने करीत. बाळाजी जोशी आणि नारायण बापट हे विदूषकाची भूमिका उत्स्फूर्त विनोदी रीतीने वठवीत. बाळाजी जोशी

यांना ' बाळचा उंदीर ' च म्हणत. राक्षसपार्टी रंगभूमीवर मरून पडले की त्यांच्या अंगावर नाचून बऱ्याच टिवल्याबावल्या करून ते प्रेक्षकांना मनमुराद हसवीत. गोविंदराव देवलांचे बंधू रामचंद्र बल्लाळ देवल हे ' तारा ' आणि ' भ्रांतिकृत चमत्कार'मध्ये केलेल्या भूमिकांनी प्रसिद्धीस आले होते. पौराणिक नाटकात ते देव पार्टी होत. तलवारीच्या फेकीत ते पटाईत होते. राजपार्टी म्हणून शिवरामपंत सोमण, अंताजी गोखले, वासुनाना पेंडसे यांच्या भूमिका उत्कृष्ट होत. पेंडसे हे तर गुणी आणि हरकामी नट होते. हिंदुस्थानी भाषेतील सोंग ते बेमालूम वठवीत. त्यांची ' दामाजीपंताच्या फार्सा ' तील बादशाहाची भूमिका अतिशय नावाजली गेली होती. खुद्द राघोपंत आपटे हे पौराणिक नाटकातले नाणावलेले सूत्रधार होते. नांदीपासून भरतवाक्यापर्यंत सारी पदे ते दोन दोन प्रहरपर्यंत अगदी खणखणीत आवाजात म्हणत.

पुरुषनट वाटवेचा सतीचा सोहळा !

इचलकरंजीकरांचे हमखास रंगाणारे नाटक म्हणजे 'थोरले माधवराव पेशवे'. विशेषत: विष्णू वाटवे याचे नायिकेचे, रमाबाईचे काम अप्रतिम होत असे. स्त्रियांची वेषभूषा, नटणे–मुरडणे एकूण अभिनयात तो वाकबगार होता. त्याला तसेच त्या नाटकातील कुणबिणीची कामे करणाऱ्या पात्रांना कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी खुद्द लुगडे परिधान करून अभिनय शिकविल्याचे कृष्णाजी आबाजी गुरुजी यांनी ' नाटकाची स्थित्यंतरे ' मध्ये नमूद केले आहे. पुरुषपाटर्चाने स्त्रियांच्या घोळक्यात हळदी-कुंकू घेऊन आल्याच्या आख्यायिका विष्णू वाटवे या नटापासूनच सुरू झाल्या. त्या नाटकातला अखेरचा प्रसंग रमाबाई सती जाते, हा आहे. सतीचा पांढरा पोषाख, तसेच तिचे अलंकार, मळवट भरणे, हे उत्तम असेच; पण बाल नारायणरावाला जवळ घेणे, कारभाऱ्यांच्या मनधरणीला गंभीरपणे नकार देणे, आप्तेष्टांचा निरोप घेणे, या वेळचा त्याचा अभिनय अत्युत्कृष्ट होत असे. या बाबतीत राघोपंत इचलकरंजीकरांचा चाणाक्षपणा आणि लोकांचे भोळेपण यासंबंधी कै. गुरुजी यांनी जे म्हटले आहे, ते मुळातूनच वाचण्यासारखे आहे : ' रमाबाई सती जाण्यास तयार झाल्या... तेव्हा त्यांचे दर्शनाकरिता आणि ओटी भरण्याकरिता ज्या नाटकी स्त्रिया तयार केल्या होत्या, त्यांच्याच मागे गावातील सभ्य स्त्रिया उभ्या करून त्यांच्याकडूनही खणानारळाने सतीची ओटी भरविली. मग काय विचारता ! दुसऱ्या खेळापासून गावातील स्त्रियांच्या झुंडीच्या झुंडी नाटकास येऊन रमाबाईची ओटी भरू लागल्या. हे प्रकरण इतके वाढले की, रमाबाईचे सती जाणे हेच या नाटकाचे प्रमुख अंग होऊन बसले व तास, दोन तास ओटच्या भरण्याकडे, खण, नारळ, गहू, तांदूळ साठविण्याकडे जाऊ लागले...

साताऱ्याच्या सगुणाबाई राणीसाहेब यांनी स्त्रियांसाठी खास खेळ करविला. त्या दिवशी ओटचांत गव्हाबरोबर मोतीही घातले गेले ! ...रमाबाईने अग्नीस तीन

प्रदक्षिणा केल्या. आत प्रवेश करण्याच्या वेळी 'मायबहिणींनो, ही रमा यापुढे आपणास दिसणार नाही, तर लोभ असो द्या वरं' इतके बोलून तिने अग्निप्रवेश केला. त्याबरोबर सर्व श्रोतृमंडळात 'धन्य, धन्य, धन्य तुझी !' अशा अर्थाचा ध्वनी निघाला !' (नाटकाची स्थित्यंतरे, १८७५, पृ. १४ ते १६.)

प्रतिष्ठितांकडून प्रशंसा

समकालीन वृत्तपत्रांतून इचलकरंजीकर नाटक मंडळीच्या नाट्यप्रयोगांवरील अभिप्राय पाहिल्यास ते १८९० पर्यंत तरी अनुकूल असल्याचे दिसून येते. श्रीमंत गणपतराव हरिहरराव पटवर्धन, कुरुंदवाडचे राजे यांनी मंडळीला प्रशंसापत्र दिले होते. वडोदे येथील बेचाळीस प्रतिष्ठित गृहस्थांनी तिला भरघोस स्तुती करणारे जणू मानपत्रच दिले होते. त्या गृहस्थांत सर टी. माधवराव, सरदार मुझुमदार, घाटगे, दि. व. रघुनाथराव, रावजी पुणेकर यांची नावे आढळतात. वडोद्याच्या वॉटसन या इंग्रज अधिकाऱ्याने हैदराबाद येथील आपल्या मिस्टर वायली नामक मित्राला ओळखपत्र देताना मंडळींच्या कलागुणांची आणि सभ्य चाल–चलणुकीचीही ग्वाही दिलेली होती.

जवळजवळ अर्धशतकाचा काळ आणि नाटकी मंडळी एकोप्याने वागते, हे खरोखरच दुर्मिळ असेच उदाहरण होय ! इचलकरंजीकर मंडळीने रसिकांचे मनोरंजन आणि उद्‌बोधन केलेच; पण तसे करताना मराठी रंगभूमीच्या विकासाला भरघोस हातभार लावला, यात मुळीच शंका नाही.





१३. शिवस्मारक आणि रे. टिळक

रा. रा. सुधारककर्ते यांस वि. वि.

श्लोक

व्यतिवजति पदार्थानान्तरः कोऽपि हेतु
र्न खलु बहिरुपाधीन्प्रीतयः संश्रयन्ते
विकसति हि पतंगस्योदये पुंडरीकम्
द्रवति च हिमरश्मी दुग्दते चंद्रकान्तः ॥ १ ॥
(भवभूतिः ।)

साकी

हृद्गतहेतु वस्तुवस्तुची जोडी जमवून देतो
बाहेरिल गोष्टींचा आश्रय न कदा प्रेमा घेतो ॥ १ ॥
सूर्य उगवतो व्योमी, फुलते कमल पहा पाण्यांत
चंद्रा पाहून चंद्रकांतमणि किंवा द्रवूनी जात ॥ २ ॥

ही या उदार कवीची उक्ति आज किती दिवसांपासून आमच्या मनात एकसारखी घोळत आहे. भरतभूमीच्या खऱ्या पुत्रांमध्ये आगंतुकांचा समाचार घेणारे जे जे धीरवीरहीर झाले, त्यांच्यात अग्रगण्य जो राजा शिवाजी, त्याच्या समाधीच्या

जीर्णोद्धारार्थ सर्व महाराष्ट्रात चळवळ उत्पन्न झाल्यापासून ह्या श्लोकांचे आम्हाला वारंवार स्मरण होत आहे; कारण सूर्योदय झाल्यावरोबर जसे कमल फुलावे, किंवा चंद्रास पहाताच जसे चंद्रकांताने द्रवून जावे, त्याप्रमाणे तिकडे महाराष्ट्रीय हिंदूंत शिवाजीविषयींच्या पूज्यभावाचा पुनरुदय झाल्यावरोवर आमचे महाराष्ट्रीय ख्रिस्ती हृदय फुलले व द्रवूनही गेले. सामाजिक व धार्मिक दृष्टचा हिंदू लोकांच्या जातिभेदप्रियतेमुळे आम्ही कितीतरी दूर पडलो आहो ! ते लोक आम्हांस किती नीच, द्वेष्य, केवळ शत्रूप्रमाणे मानीत आहेत ! कित्येकांनी तर आम्हांला आपल्या देशाशी निमकहरामपणा करणारे म्हटले आहे ! म्हणोत बिचारे ! बिचाऱ्यांना स्वातंत्र्य, राष्ट्र, धर्म इत्यादी गोष्टींविषयी खरी कल्पना व खरे ज्ञानच नाही, त्याला काय करणार ? पण आम्ही भरतभूमीचे खरे पुत्र असून आमच्या अंगांत तेच रक्त खेळत आहे. ख्रिस्ती झालो म्हणून जसे आम्ही आपल्या हिंदूंत राहिलेल्या पत्नी–पुत्र किंवा बंधूभगिनींकरता तिळतिळ तुटत आहो; तसेच आपल्या वीरश्रीने द्युतिमान करणाऱ्या मराठ्यांच्या नांवाचा जयघोष ऐकून आमचे हृदय तल्लीन झाले यांत नवल नाही. तथापि या सत्कार्यार्थ मी जी फुलाची पाकळी आज आपल्याकडे पाठवीत आहे, ती पाठविण्याचा आजपर्यंत आम्हाला हिय्याच होईना. मिशनरी किंवा ख्रिस्ती लोकांस आवडणार नाही म्हणून नव्हे. ही कल्पनाही आमच्या मनात आली नाही. आधी हे आमचे धर्मबंधू इतके क्षुद्र मनाचे मुळीच नाहीत. घटकाभर आहेत असे जरी मानले तरी आम्ही आज सर्वस्वाचा त्याग करून जे ख्रिस्ती झालो आहो, ते त्यांच्याकरिता मुळीच नाही. तेव्हा आम्ही त्यांची परवा केली नसती. आम्हांला जे भय वाटत होते व आहे ते हिंदूंचेच वाटत आहे. ख्रिस्ती झाल्यापासून नावडतीचे मीठ अळणी ह्या म्हणीप्रमाणे त्यांचे आमच्याशी वर्तन आहे; त्यामुळे आपण मोठ्या उत्साहाने ह्या सत्कार्यार्थ आपली कवडी पुढे करू आणि ही ख्रिस्त्याची म्हणून हे एखादी वृथैव थप्पड लगावतील ह्या शंकेने आम्ही आजपर्यंत मागेपुढे करीत आहो. तरी शेवटी रहावेचना, तेव्हा आपणाकडे जावे असा निर्धार करून आलो आहे. आपणाकडूनही आव्हेर झाला तर मग थाराच नाही. तरी असे होणार नाही असा विश्वास आहे.

आपला नम्र सेवक

जगन्मित्र

आपण लिहितां त्याप्रमाणे हिंदू समाजाचे नेटिव्ह ख्रिस्त्यांशी होत असलेले आचरण अगदी गर्हणीय असते याबद्दल आम्हांस शंका नाहीं व त्याबद्दल आम्ही दिलगीरही आहो. तथापि शिवाजीफंडाच्या कमिटीचा व सेक्रेटरींचाही त्यातच कदाजित समावेश होत असेल ही आपली शंका अगदी अस्थानीं आहे असे म्हटल्या-वांचून आमच्यानें राहवत नाहीं. आपण शिवाजीफंडाकरिता पाठविलेले ५ रु. सदर

फंडाच्या सेक्रेटरींकडे भरले असून त्यांचा त्यांजकडून मोठ्या आनंदाने स्वीकार करण्यांत आला आहे, हे ऐकून आपली शंका दूर होईल अशी आशा आहे.

(सुधारक, सोमवार, ९ सप्टेम्बर १८९५.)

पत्राचा अन्वयार्थ

'जगन्मित्र' या टोपणनावाने 'सुधारका'त प्रसिद्ध झालेले हे पत्र सुप्रसिद्ध मराठी कवी रे. नारायण वामन टिळक यांचे ठरत असल्याने व त्याचा शिवस्मारक, टिळक–आगरकर यांच्याशी संबंध असल्याने त्याला ऐतिहासिक व साहित्यिक महत्त्व आहे. हे दुर्मिळ पत्र रे. टिळकांनी लिहिलेले असले पाहिजे याला अंतर्गत व बाह्य सबळ आधार देता येण्याजोगे आहेत, ते असे :

१) प्रस्तुत पत्र १८९५ सालचे आहे. याच याच काळात, 'जगन्मित्र' याच टोपणनावाखाली 'ज्ञानोदय' आणि 'बालबोधमेवा' या कालिकांतून रे. टिळकांचे लेखन प्रसिद्ध होत असे. 'जगन्मित्र' म्हणजे राजनंदगांवचे ना. वा. टिळक असा खुलासाही, 'ज्ञानोदय' च्या कर्त्यांनी, रे. टिळकांचा ख्रिस्ती होण्याचा निर्धार प्रकट करण्याच्या मिषाने संपादकीयातून केलेला आढळतो. (स्मृतिचित्रे भा. १, अभिनव आवृती १९७३, पृ. १८२ व १८३ वरील तळटीपा)

२) दुसरा महत्त्वाचा अंतर्गत पुरावा म्हणजे 'आपल्या हिंदूंत राहिलेल्या पत्नी-पुत्र किंवा बंधुभगिनींकरिता तिळतिळ तुटत आहो' हा पत्रातील उल्लेख. त्यातील 'पत्नीपुत्र' म्हणजे लक्ष्मीबाई टिळक आणि दत्तोपंत होत. पत्र लिहिले गेले, त्या काळीही दोघे हिंदूच होती, १९०० सालच्या जुलैमध्ये त्यांचा बाप्तिस्मा झाला. (स्मृतिचित्रे भा. २, **पूर्वोक्त** पृ. ८७ तळटीप) एकंदरीत पत्राचा काळ आणि वरील उल्लेखातील वस्तुस्थिती व त्यामागील भावना यांचा परस्परमेळ जमतो.

३) पत्रात 'नावाडतीचे मीठ अळणी' मानून 'वृथैव थप्पड' बसण्याची शंका व्यक्त झालेली आहे. ही शंका लो. टिळकांच्या संदर्भातील आहे. कारण शिव-स्मारकनिधीचे सेक्रेटरी लोकमान्यच होते. लो. टिळक आणि रे. टिळक यांचे घराणे एकच होते. रे. टिळकांनी दि. १० फेब्रुवारी १८९५ रोजी धर्मांतर केले. त्यानंतर सात महिन्यांनी लिहिलेले हे पत्र आहे. या दरम्यानच्या काळात रे. टिळकांना पुन्हा हिंदुधर्मात घेण्याच्या खटपटी झाल्या होत्या. (स्मृतिचित्रे भा. २, **पूर्वोक्त**, पृ. १९ तसेच परिशिष्ट ५ मधील पुरीच्या शंकराचार्यांचे पत्र, पृ. ४५–४६) या खटपटीत लो. टिळकांचे अंग होते. जे. सी. विन्स्लोकृत 'नारायण वामन टिळक; दि क्रिश्चन पोएट ऑफ महाराष्ट्र' या इंग्रजी चरित्रग्रंथात म्हटले आहे:–

'Desperately they tried to win him back to Hinduism ..... Bal Gangadhar Tilak secured permission from the leading Shastris of Benaras for his restoration.' (पृ. २५).

लो. टिळकांची सनातनी राष्ट्रीयत्वाकडे झुकणारी मते आणि आता दिलेली पार्श्वभूमी ध्यानात घेता पत्रात व्यक्त झालेली आशंका अस्थानी होती, असे म्हणता येणार नाही.

४) स्मृतिचित्रांच्या १ ल्या भागाच्या अखेरीस येणाऱ्या 'धर्मान्तर', धर्मान्तर म्हणजे देशान्तर नव्हे' या प्रकरणातून प्रकट झालेले विचार, विशेषत: 'स्वदेशाभिमान' या कवितेतील 'मरेन आपुल्या देशासाठी खिरस्ती जरि झालो कीं' ही भावना आणि वरील पत्रात व्यक्त झालेली भावना या गोष्टी एकमेकांशी मिळत्याजुळत्याच आहेत. रे. टिळकांच्या 'अभंगांजली'तील 'धन्य धन्य माझ्या जन्मभूची कुशी' (स्मृतिचित्रे भा. ४, **पूर्वोक्त**, २२–२३) किंवा 'नव्हे हिंदुस्थान लेकुराच्या चेष्टा' (स्मृतिचित्रे भा. ३, पृ. १३३) या अभंगातून व्यक्त झालेल्या वृत्तीही थेट याच तऱ्हेच्या आहेत.

चपखल मेळ

५) अशा तऱ्हेच्या राष्ट्रीय वृत्तीने लिहितील अशी तत्कालीन अन्य खिरस्ती माणसे दोनच डोळ्यापुढे येतात : एक पं. रमाबाई व दोन बाबा पदमनजी. परंतु पत्रांतर्गत उल्लेख, पत्रामागची भावार्तता, शैलीची प्रगल्भता, भवभूतीच्या श्लोकाचे सराईतपणे केलेले भाषांतर या गोष्टींचा चपखल मेळ रे. टिळकांच्या व्यक्तित्वाशी बसतो.

६) पत्रात भवभूतीच्या 'उत्तररामचरितातील श्लोक भाषांतरासह उद्धृत केलेला आहे. भवभूतीचे हे नाटक आपल्या फार आवडीचे म्हणून प्रवासात बाळगले असल्याचा उल्लेख रे. टिळकांनी १८९३ च्या सुमारासच केलेला आढळून येतो. (स्मृतिचित्रे भा. १, **पूर्वोक्त**, पृ. १८०)

एर्कदरीत हे पत्र रे. टिळकांच्या स्वभावावर व राष्ट्रीय मनोवृत्तीवर जसा प्रकाश टाकते, तसेच एका सामाजिक समस्येचेही उद्घाटन करते. 'आपणाकडूनही अव्हेर झाला तर मग थाराच नाही' अशी निर्वाणीची अगतिकता रे. टिळकांनी व्यक्त केली आहे. तीवरून परधर्मीयांच्या मनात सुधारकाविषयी आपुलकीची जी प्रतिमा आगरकरांपासून निर्माण झालेली होती, ती स्पष्ट दिसून येते. परधर्मीयांच्या हिंदूंच्या तुच्छताबुद्धीला खेदपूर्वक मान्यता देऊन शिवाजी स्मारकनिधीचे कार्यवाह (लो. टिळक) तशा मनोवृत्तीचे नसल्याची ग्वाही दिली आहे. तीवरून उदार निर्मळ मन आरशासारखे स्पष्ट दिसते.

लोकमान्यांचा विषाद

आपले न ऐकता रे. टिळक खिस्ती झाले यांचा विषाद लो. टिळकांना वाटला असेल, यात संशय नाही. तरीपण सार्वजनिक कार्यकर्त्यांच्या ठायी अवश्य असणारी

व्यापकता त्यांच्या ठायी होती, हेच या टीपेवरून निष्पन्न होते. पुढील काळात लो. टिळकांनी आपल्या 'गीतारहस्या'ची प्रत रे. टिळकांना सप्रेम भेट पाठविली होती, असा उल्लेख विन्स्लोकृत वरील इंग्रजी चरित्रात आढळून येतो (पृ. ५२). रे. टिळकांच्या पांडित्याविषयी लोकमान्य टिळकांच्याही मनात आदरभाव असावा, असे दिसते.

हिंदू माणूस ख्रिस्ती झाला की तो आपला राहात नसे, इंग्रजधार्जिणा बनून राष्ट्रीय मनोवृत्तीला पूर्ण पारखा होई, अशी जी सर्वसाधारण समजूत असे, तिला चांगलाच धक्का देणारे प्रसंग पं. रमाबाई व रे. टिळक यांच्या जीवनात आढळून येतात. रे. टिळकांचे प्रस्तुत पत्र हे त्यांपैकीच होय. हे पत्र शिवस्मारकाशी निगडित असावे हा शुभ योगायोगच !

१४. भारतीय जनगणनेची शंभरी

नियोजनाच्या या युगात निरनिराळ्या प्रकारच्या माहितीचे आकडे शक्य तितके अचूक उपलब्ध व्हावे लागतात. नाहीतर प्रकल्पांची कार्यवाही यशस्वी रीतीने होणे कठिण असते. जनगणना ही आपल्या राष्ट्रनौकेला सुकाणू-सारखी उपयोगी पडते. एखाद्या शिरगणतीची मागील शिरगणतीच्या आकड्यांशी तुलना केली म्हणजे अनेक तऱ्हेची माहिती उपलब्ध होते. दर हजारी जननप्रमाण आणि मृत्युप्रमाण किती आहे, हे तर कळतेच; पण त्याखेरीजही कित्येक गोष्टी कळतात. जनगणनेत संख्यात्मक विचार असतो; तसाच गुणात्मकही असतो. जनगणनेच्या नोंदीत अनुभवाने वाढही करण्यात आलेली आहे. काही कालबाह्य गोष्टी गाळल्याही आहेत. नुसत्या संख्येवरून देशात दाट वस्तीचे भाग कोणते आहेत, शहरात वस्ती किती आणि खेडेगावात किती, हे कळू शकते. लिंग–वयाच्या नोंदीनुसार प्रौढ स्त्री–पुरुष किती व मुले किती हे कळते. व्यवसायांच्या नोंदीवरून कोणते रोजगार तेजीत आहेत हे कळते. साक्षर–निरक्षर, पदवीधर–बिनपदवीधर, सुसंस्कृत–असंस्कृत यांचे विभागवार प्रमाण जनगणनेतील शिक्षणाच्या नोंदीवरून कळते. देशात बेकारी किती आहे, याचाही अंदाज व्यवसायविषयक माहितीतून कळतो. ज्या देशाचे अर्थशास्त्र नियोजनबद्ध असते त्याला या माहितीची नितांत

आवश्यकता असते. पहिल्या शिरगणतीनंतर पन्नास वर्षांनी म्हणजे १९२१ साली भारताची लोकसंख्या २५२ दशलक्ष होती ती १९५१ मध्ये म्हणजे तीस वर्षांनी ३६१ दशलक्ष बनली. यंदाच्या जनगणनेवरून भारताच्या लोकवस्तीत गेल्या वीस वर्षांत किती वाढ झाली आहे, हे कळून येईल.

पूर्वेतिहास

तसे पाहिले तर जनगणना प्राचीन काळीही होत होत्या. परंतु जनगणना म्हटल्यावर आज ज्या अनेक कल्पना त्या शब्दात आपण अनुस्यूत धरतो, त्या पूर्वी नव्हत्या. चीन–ईजिप्तसारख्या देशांतून प्राचीन काळी लोकांची गणती केल्याचे उल्लेख आढळतात. हिब्रूंची गणती केल्याचा उल्लेख ख्रिस्ती धर्मग्रंथात आढळतो. अथेन्स येथील नागरिकांचे प्राप्तिमान ठरविण्यासाठी सॉलोन राजाने त्या नगराची जनगणना केलेली होती आणि त्यांच्या प्राप्तिमानानुसार त्यांचे चार गट कल्पिले होते. पुढे रोमन काळात सर्विअस टचुलियस (पाचवा राजा) याने आपल्या राज्यातील प्रत्येक नागरिकाचे नाव, वय, बायकोचे नाव, वय, मुलेबाळे, गुलाम, मुक्त गुलाम यांची नोंदणी केलेली होती. त्याने आपल्या नागरिकांचे प्राप्तिमानानुसार सहा गट केले होते. परंतु आधुनिक हेतू मनात ठेवून ही जनगणना केलेली होती असे म्हणता येणार नाही. आधुनिक उद्दिष्टांनुसार पहिली जनगणना क्विबेकमध्ये सन १६६५ मध्ये झाली. तदनंतर युरोपातील स्वीडन देशात जन्म, मृत्यू, विवाह, नोंदणीची पद्धत १६८६ च्या सुमारास सुरू झाली. परंतु तेथेही खऱ्या आधुनिक अर्थाची जनगणना १७४९ मध्येच झाली. अमेरिकेत ती १७८७ मध्ये, तर ग्रेट ब्रिटनमध्ये १८०१ मध्ये झाली. भारतासह सर्व ब्रिटिश साम्राज्याची जनगणना १८७१ मध्ये प्रथमच झाली. म्हणून भारताच्या पहिल्या जनगणनेची शताब्दी १९७१ च्या जनगणनेने आपण साजरी केली.

ब्रिटिशांचे राज्य झाल्यावर शासनव्यवस्थेसाठी प्रांताप्रांतातून अलग अशी जनगणना होत होती. 'हिंन्दुस्तानांतील ब्रिटिश अंमलाच्या गेल्या ५० वर्षांतील राज्यकारभाराच्या काही परिणामांचे दिग्दर्शन' या नावाची पुस्तिका सन १९१४ साली प्रसिद्ध झालेली आहे. या पुस्तिकेत म्हटले आहे :

'पूर्वी निरनिराळ्या वेळी कित्येक प्रांतांतील खेडचांतून लोकांची मोजदाद झालेली होती. ज्याला हल्ली आग्रा प्रांत म्हणतात तेथे व पंजाब प्रांतात इंग्रजी तन्हेवर व्यवस्थित खानेसुमारी झालेली होती...सर्व हिंदुस्थानची एकदम केलेली अशी पहिली खानेसुमारी १८७१ साली; व काळजीपूर्वक तयारी करून १८८१ सालात दुसरी पूर्ण खानेसुमारी केली. हचा दुसऱ्या प्रसंगी बहुतेक एतद्देशीय

संस्थानांनीही खानेसुमारी केली. नंतर सन १८९१ व १९०१ या दोन सालांत केलेली खानेसुमारी पहिल्या खानेसुमारीपेक्षा अधिक पूर्ण तऱ्हेच्या अशा होत्या. देशांतील एकंदर लोकसंख्या, तिची निरनिराळ्या भागांत वाटणी, ठिकठिकाणच्या नैसर्गिक अडचणी व लोकांची स्थलांतरे या गोष्टीसंबंधाने आकडेवार पूर्ण माहिती सरकारास व लोकांस आता उपलब्ध झाली आहे. या बाबतीत झालेल्या सुधारणेची थोडीशी कल्पना खालील गोष्टींवरून लक्षात येईल. सन १८७१ सालाचे पूर्वी बंगालची लोकसंख्या निरनिराळ्या सरकारी रिपोर्टातून ३८ ते ४२ दशलक्षांपर्यंत दाखल झालेली आढळते; परंतु सन १८७१ चे खानसुमारीत बंगालची लोकसंख्या ६७ दशलक्ष आहे असे आढळून आले (पृ. ९–१०).

प्रदेशनिहाय लोकगणना

वर सांगितल्याप्रमाणे प्रदेशानिहाय लोकगणना ब्रिटिश राजवटीत होत असे यात शंका नाही. 'प्रभाकर'च्या (पृ. ५, कागद ३३, ७ जून १८४३) अंकात बेळगाव सुभ्याचे वर्णन 'ज्ञानोदया' वरून उतरून घेण्यात आले आहे. त्यात बेळगाव सुभ्याचा विस्तार, त्याचे विभाग, हवापाणी, व्यापाराचे जिन्नस याची माहिती देऊन १८४२–४३ सालची बेळगाव सुभ्यातील प्रजांची 'नोंद' तालुकानिहाय दिलेली आहे. ती यादी अशी :

	स्त्रिया व पुरुष
पाछापूर	४५५४६
चिकोडी	७९४४४
बिडी	६९२४८
बागलकोट	५३४०७
बदामी	७३४०६
परसगड	५१०००
संपगांव	५९७३२
गोकाक	३८०२५
हुनगुंद	२४०००
अथणी	३२५६३
एकूण	५२६३७१

वायव्य सरहद्द प्रांत (१८५३), अयोध्या (१८६९), पंजाब (१८५५–१८६८), हैद्राबादचे सोपीव जिल्हे (१८६७), तत्कालीन मध्यप्रांत (१८६६) या प्रदेशांची जनगणना महसूलव्यवस्थेसाठी घेण्यात आलेली होती. तसेच १८५१ पासून मद्रास प्रांताची पंचवार्षिक खानेसुमारी महसूलखात्याकडे नियमितपणे येत असे, अशी

माहिती पुण्याच्या गोखले अर्थशास्त्रसंस्थेचे ग्रंथपाल श्री. दा. द. दिवेकर यांनी पुरविली आहे. १८७१ साली जी पहिली जनगणना झाली तिच्यातील त्रुटींचा वर उल्लेख आलाच आहे. त्या वेळी एकूण एक सर्व प्रदेशात लोकगणना झाली नव्हती. लोकगणनेला तत्कालीन अज्ञ प्रजा बिचकत असे. लोकांना मोजून ख्रिस्ती धर्मात नेण्याचा सरकारचा इरादा आहे. अशाही गप्पा उठत. तसेच पंजाब, बिहार आणि अयोध्या यांसारख्या ज्या प्रदेशांतील जनगणना शासनव्यवस्थेसाठी आधीच झालेली होती, त्या प्रदेशांबाबत पूर्वीचेच आकडे गृहीत धरण्यात आले. खर्चात काटकसर करण्याची दृष्टीही त्यामागे असावी.

खुद्द मुंबईमध्ये माणसांची गणती करण्यास एकंदरीत कसा विरोध होता, हे 'प्रभाकरा'तील पुढील वृत्तावरून कळून येईल :

'गेले बृहस्पतवारीं रायल एशियाटिक सोसैटीची सभा भरली होती. मागील खेपेस डाकटर स्टिविनसन याणें उपक्रम काढल्याप्रमाणे मुंबईतील लोकांची वरोबर गणती करणें ही गोष्ट शक्य आहे कीं नाहीं, याचा विचार करण्याकरितां सबकमिटी नेमली होती. तिणें असा रपोट केला कीं गणती काढण्याचा उद्योग केला असतां नेटींव लोकांस आवडणार नाहीं. सबब प्रस्तुत गणती काढण्याचें काम तकूब ठेवावें असा सबकमीटीने रपोट केला आहे. (**प्रभाकर**, पु. ५, का. ४३ (२५ ऑगस्ट १८४७).

परिगणकांसाठी पुस्तिका

१८७१ साली लोकगणती करणाऱ्या परिगणकांसाठी जी मराठी पुस्तिका मुद्रित करण्यात आलेली होती, ती मला उपलब्ध झालेली आहे. या लांबडचा पुस्तिकेत बंदाच्या आकाराची सोळा पृष्ठे आहेत. या पुस्तिकेचे शीर्षक पुढीलप्रमाणे लांबलंचक आहे : गणती करणाराचे नमुन्यात उपयोग केलेले शब्दांची व्याख्या आणि इलाख्याचे वस्तीची गणती करण्यासाठी नमुने कसे भरावे याविषयीच्या तपशीलवार समजुती.

पुस्तिकेचा शेवट पुढीलप्रमाणे आहे :–

तालुक्याची व हुजुरचीं कांपिलेशनें (बुके) तयार झाली म्हणजे असल नमुने मुंबई येथील सेनसस आफिसास परत पाठवावे आणि गांसडचा मुंबईत ज्या रीतीने व जितके वजनाच्या वगैरे बांधतील त्या रीतीने व तितके वजनाच्या बांधाव्या.

जान लम्सडे

सानिटरी कमिशनर निसबत मुंबई सरकार

सानिटरी कमिशनराची कचेरी,

मुक्काम मुंबई, तारीख १ ली नवेंबर सन १८७१.

या पुस्तिकेवरून पहिल्या जनगणनेतील कित्येक गोष्टींचा खुलासा होतो. यात 'आवार' आणि 'घर' यांच्या व्याख्या प्रथम केल्या असून त्यानंतर नाव, वय, धर्म वर्ग, जात, धंदा, विद्या (शिक्षण), शारीरिक व्यंग, प्रवासी पाहुणे, धर्मशाळा, सार्वजनिक इमारती, लष्करी, गलबते इत्यादी पोटशीर्षकांखाली व्याख्या आणि स्पष्टीकरण देऊन परिगणकांना सूचना देण्यात आल्या आहेत. त्या काळी धार्मिक दृष्टचा कशी विभागणी केली होती, ही गोष्ट उद्‌बोधक वाटण्यासारखी आहे. या पुस्तिकेत म्हटले आहे, 'जे लोक ख्रिस्तास देव म्हणून मानीत असतील त्यांचे विशेष पंथाचे किंवा चर्चाचे नांव लिहावे. उदाहरण आर्मेनियन व बापटिस्ट व एपिसकोपेलियन व ग्रीक प्रेसबिटेरियन व रोमन क्याथोलिक व बेसलेयन इत्यादि. एतद्‌देशीय ज्या लोकांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला असेल, त्यांस नेटिव ख्रिश्चियन असे लिहावे. प्राटेस्टंट या सामान्य शब्दाचा उपयोग करू नये.' इस्लाम धर्मासंबंधात म्हटले आहे,

'महंमदाचे धर्माने चालणारे आहेत त्यांस मुसलमान म्हणून लिहावे. सुन्नी असतील त्यांस ओळखण्यासाठी 'स' हे अक्षर घालावे. व शिया यांस 'श' हे अक्षर घालावे. उदाहरण मुसलसान स. व मुसलमान श.'

ब्रह्मी, बौद्ध, चिनी, जैन, पारसी, शिख वगैरे भेद असेच करावे, त्यांचे अधिक पोटविभाग करू नये, असेही पुढे म्हटले आहे. म्हणजे जैन, बौद्ध व शीख यांची हिंदूंहून वेगळी गणना पहिल्या जनगणनेत केली गेली होती. वैदिकत्व हे हिंदूचे प्रधान लक्षण मानले होते. 'ज्यांचा वेदांवर विश्वास आहे ते हिंदू म्हणून लिहावे' डोंगरी आणि मागासलेल्या जातींचा धर्म हिंदूच धरावा, असे सांगताना म्हटले होते. '...त्याचप्रमाणे भिल्लासारखे जंगली लोक आहेत तेही हिंदु म्हशून लिहावे. ते आपले मूळचे धर्माने आता वागत नाहीत व ते जातीने हिंदु नाहीत तथापि सर्व प्रकारे धर्माने हिंदु आहेत.'

या पुस्तिकेत आसन क्रमांक ६ मध्ये वर्ग किंवा जात यासंबंधी स्पष्टीकरण आहे. त्यात सांगितले आहे. 'युरोपियन ख्रिश्चियन लोकांची जात किंवा वर्ग लिहिणे जरूर नाही; परंतु एतद्‌देशीय ज्या लोकांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला असेल त्यांची पहिली जात जरि राहिली नाही, तरी पहिली जात नेहमी लिहिली पाहिजे.' असे हे जातीच्या हरळीचे मूळ चिवट आहे : धर्म बदलला, तरी भारतात जात बदलत नाही !

१८७१ त स्त्रीशिक्षणाचा फैलाव फारसा झालेला नव्हता. तेव्हा स्त्रियांची माहिती विचारताना काळजी घेणे अवश्य होते. पुस्तिकेत म्हटले आहे, 'कोणतेही कुटुंबांतील स्त्रियांची नांवे सांगण्यास हरकत केली, तर त्यांची नांवे विचारू नयेत. कारण त्यांची संख्या दाखल केल्याने सर्व कार्य होईल. यास उदाहरण, घर नंवर ५० यांतील स्त्रियांमध्ये नंबर ३ ची स्त्री वयाने १८ वर्षांची आहे व धर्माने हिंदू, व जातीने गवळण व तिचा जन्म दक्षिणेमध्ये झालेला आहे व ती दूध विकते व तीस

लिहिता वाचता येत नाही. येणेप्रमाणे तपशील समजल्यावर तिचे नाव लक्ष्मी आहे हे आणखी समजून काही खराखुरा फायदा नाही.'

शारीरिक व्यंगे आणि व्याधी यासंबंधी सूचना देताना म्हटले. आहे, 'कुष्ठ-व्याधीचे लोकांबाबद मजकूर पत्रकांत लिहितेवेळी फार लक्षपूर्वक रीतीने लिहावा, असे विशेषकरून सांगणे आहे. आणि कुष्ठ, पांढरे कोड आहे किंवा खरे कोड (रक्तपित्त) आहे, हे प्रत्येक प्रसंगी लिहिले पाहिजे.' पुढे खुळे व वेडे यांत भेद करावा असे सांगून व्याख्या केली आहे : 'खुळा म्हणजे ज्या मनुष्याची बुद्धि मंद असते तो, आणि वेडा म्हणजे ज्या मनुष्याचे बुद्धीला भ्रम झाला आहे व तो बहुत-करून कोणतेही एका विशेष गोष्टीविषयी व कोणा एका विशेष वेळी असतो तो वेडा असे समजावे.'

अर्धनारी नटेश्वरांची गणना

अर्धनारी नटेश्वरांना पुरुष की स्त्री गणायचे, याविषयी प्रगणकांना प्रश्न पडणे अगदी साहजिक होते. याबाबत एवढेच म्हटले आहे. 'नपुंसक (हिजडा) म्हणजे ज्यांचे इंद्रिय छिन्नभिन्न केलेले असेल व जो तसा आहे म्हणून बहुतकरून माहीत आहे, तो नपुंसक समजावा.' या व्याख्येतील हिजडावाचक शब्द पुल्लिंगीच योजिलेला आहे, तेव्हा या मंडळींची गणना १८७१ च्या जनगणनेत पुरुषवर्गातच केली गेलेली दिसते. चालू म्हणजे १९७१ च्या जनगणनेत प्रगणकांना ज्या सूचना देण्यात आलेल्या आहेत, त्यात यासंबंधी म्हटले आहे, 'नपुंसक व उभयलिंगी व्यक्तीकरिता 'पु' (पुरुष) अशी नोंद करावी.' (पृ. १४) मात्र आपली गणती पुरुषवर्गात केली जावी, हे या लोकांना नापसंत आहे. त्यांना आपली गणना स्त्री-वर्गात व्हावी, असे वाटते. पण ऐकतो कोण ?

१९७१ चे परिपत्रक

शंभर वर्षांपूर्वी प्रगणकासाठी तयार केलेल्या सूचनांत अनुभवाने दर जनगण-नेच्या वेळी सुधारणा होत जाऊन आता त्यांना पुष्कळ व्यवस्थित स्वरूप आलेले आहे. १९५१ सालच्या जनगणनेपासून वंश, जात, जमात, इत्यादींबाबत प्रश्न विचारू नयेत, असे ठरविण्यात आले आहे. फक्त वर्गीकृत आणि मागासलेल्या जमातीपुरती ही नोंद कायम ठेवलेली आहे. १९७१ च्या प्रगणकाच्या सूचनात वेश्यांसंबंधी पुढीलप्रमाणे उल्लेख आढळतात :–

'वेश्यांच्या बाबतीत त्या जो वैवाहिक दर्जा सांगतील त्याप्रमाणे नोंद घ्यावी (पृ. १६). भिकारी आणि भटके यांच्यात वेश्यांचा समावेश करावा (पृ. ३७). हल्ली जातीची नोंद घेण्यात येत नसली, तरी हिंदू, इसलाम, ख्रिश्चन, बौद्ध, जैन अशी धार्मिक वर्गवारी नोंदवून घेतली जाते. मुलाबाळांची चौकशी करताना काळजी घ्यावी लागते. त्या बाबतीत हल्लीच्या पत्रकात सूचना आहे. गणनेच्या वेळी मूल

जिवंत नसेल तर त्याच्या जन्माची माहिती दिली जात नाही. त्यासाठी विचारायचे प्रश्न फार एक प्रकारे नाजूक प्रश्न असतात. व्यक्तीच्या भावना दुखावल्या जाऊ नयेत, म्हणून हा प्रश्न पुढीलप्रमाणे विचारावा, असे पत्रकात सुचविले आहे :– 'काही कुटुंबांतून गेल्या वर्षात मूल जन्मल्यानंतर लगेच किंवा काही कालाने मृत झाल्याची उदाहरणे आढळली आहेत. देवकृपेने तसा प्रकार आपल्या येथे घडला नाही, अशी आशा करतो.' (पृ. १७).

या सूचनापत्रकाने साक्षरतेची व्याख्या ज्या व्यक्तीस कोणत्याही भाषेचा अर्थ समजून लिहिता आणि वाचता येते, त्या व्यक्तीस 'साक्षर' समजावे (पृ. २६). भाषिक चळवळींचा जाचक अनुभव गेल्या काही वर्षांत आलेला आहे. त्याचा परिणाम म्हणून की काय पुढील सूचना यंदाच्या पत्रकात अंतर्भूत झालेली दिसते. 'एखाद्या विभागात संघटित भाषिक चळवळीमुळे मातृभाषेसंबंधी खरीखुरी माहिती उपलब्ध होत नसल्याचा तुम्हास संशय येण्यास सबळ कारण असले तरी माहिती देणाऱ्या व्यक्तीने सांगितलेल्या मातृभाषेची नोंद करा व गणनाधिकाऱ्याकडे चौकशीसाठी यासंबंधी अहवाल सादर करा.' (पृ. ९).

दशवार्षिक जनगणनेला आधुनिक राष्ट्रीय जीवनात अतिशय महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. राजकीय बाबतीतही जनगणनेचे परिणाम फार दूरगामी होत असतात. वीर सावरकर कानीकपाळी ओरडत होते की हिंदूंनी जनगणनेवर बहिष्कार टाकू नये, संख्याबळ हेसुद्धा एक बळच आहे. जातीय निवाडयानुसार जागांची जी वाटणी झाली, तीत संख्याबळच पायाभूत मानले गेले. सिंध प्रांत पाककडे गेला, पंजाब–बंगालची फाळणी झाली, ती जनगणनेच्या आकडयावर आधारूनच होय.

शेष भारतात आर्थिक प्रगतीच्या दिशेने वाटचाल चालू आहे. पंचवार्षिक योजना शक्य तितक्या सत्कारणी लागाव्या आणि या देशाचे दुःखदारिद्र्य निवारण व्हावे, यासाठी आपली धडपड आहे. कल्याणकारी राज्यकारभाराचे लक्ष्य आपण समोर ठेवले आहे. यासाठी राष्ट्राचा कोणता भाग अविकसित आहे, कोणत्या भागात शिक्षणाचे मान कमी आहे, कोणत्या भागात निसर्गसंपत्तीचा नीट उपयोग केला जात नाही, कोणत्या भागात अधिक उद्योगधंदे निघण्याची शक्यता आहे, यांसारख्या गोष्टी जनगणनेत केलेल्या नोंदीवरूनच कळून येणार आहेत. प्रगणकांना अवश्य ती माहिती देऊन प्रत्येक नागरिकाने सहकार्य दिल्याखेरीज अचूक नोंदी होणार नाहीत. पाण्याचा धर्म असा आहे की ते खड्डा भरून पुढे जाते. आपल्या देशाच्या प्रगतीचे ध्येयधोरण असेच असले पाहिजे. त्याने न्यून सरतेपुरते केले पाहिजे. त्यासाठी जनगणना पद्धतशीर झाली पाहिजे; तो आपल्या भावी प्रकल्पांचा पाया आहे.

निर्देश-सूची

अँग्लो-इंडियन डिफेन्स असोसिएशन १०७
अझिमुल्ला १११, ११४
अटकबंदी ५६, ५७, ६३
'अधिकारयोग' ७१
'अभंगांजली' १३४
अयोध्येची बेगम ११३
'अल्लाउद्दिन आणि चितूरगडची स्वारी' १२३
'अरुणोदय' ५९
अवधूतनाथ ३५
असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडिया अस्पृश्यतानिवारण ४३, ६९
आगरकर गो. ग. ८५, १३३, १३४
आँजियर ३६
'आँथेल्लो, १२७
'आत्मलिखित पुनर्विवाहचरित्र' ८५, ८६, ८८, ९१
आपटे नंदा ४१, ११०
आपटे राघोपंत इचलकरंजीकर १२३, १२४, १२५, १२७, १२९
आपटे ह. ना. ६५
आर्यसमाज ४३
आर्योद्धारक ना. मंडळी १२७
इंग्रज व धर्मप्रसार ४१-४२, १०५
इंग्रज व व्यापार ४०, ९७
इंग्रज व सार्वत्रिक शिक्षण ९
इंग्रजी न्याय २०-२१, १००, १०३, १०७
'इंग्लंड अँड इंडिया' ६२
'इंग्लंडचा प्रवास' ३७, ६०
इचलकरंजीकर नाटक मंडळी १२३-३०
इचलकरंजीकर नाटक मंडळीची पौराणिक नाटके १२५-२६
इचलकरंजीकर नाटक मंडळीची बुकिश नाटके १२६-२७
इचलकरंजीकर नाटक मंडळीची व्यवस्था १२५-२६
इचलकरंजीकर बाळकृष्णबुवा १२३, १२४
इंडियन नॅशनल काँग्रेस ४१, १०८
इंडिया रिफॉर्म सोसायटी १०३
'इंदुप्रकाश' ४४, ५८, ६४, ६५ ८१, ९३
इनामकमिशनचा कारभार १११, ११२
इल्बर्ट बिल १०७
ईस्ट इंडिया कंपनी ३९-४१, ९७-९८, १००
ईस्ट इंडिया असोसिएशन १०७
'उत्तररामचरित्' १३४
'उद्धरण' ३४, ३५
एल्फिन्स्टन नेटीव इन्स्टिटचूशन ११
एल्फिन्स्टन माउंट स्टुअर्ट ११, १२,

१८, २२, ३६, ३९ ४१, ९७, १००, १०१, ११२
औरंगजेब २१
कँडी मेजर १२, १७
कॅथेरिना ९
कन्याहत्या ४४, ५४, ६८
कबीर ३५
'करणवाघेला' ३७
करंदीकर नारायणराव ११९, १२१
करमरकर गोविंदभट ११९,१२१
करमरकर–वेणूबाई–विवाह ८१
करसनदास मूळजी ३७, ४३, ४५, ६०, ६५, ८६, ८९, ९०, ९२
कर्टिस ४१
कर्वे धों. के. (महर्षि) ३८, ६७, ९३, ९५
कर्सेटजी १०२
कलिवर्ज्य ७२
कल्याणोन्नायक मंडळी ५९
कॉटन कर्नल १०३
कॉब रिचर्ड (रे.) ९
काब्राजी के. एन. ८२, ८९
कामा मादाम ६१
'कॉमिडी ऑफ् एरर्स' १२७
कामिरन १००,१०३
कार्पेंटर मेरी ५८, ६४
'कायदा आणि राजनीति' १०४
कावसजी जहांगिरजी ९९
काशीयात्रा ५६
किसनदास गोकुळदास ४२
किर्लोस्कर ब. पां. (अण्णा) १२३, १२७
कीर्तने वि. ज. १२७
कुलकर्णी भी. ब. २१
केनेडी १५
केशवपन ४४, ६८
'केसरी' ११४
केर्सोबास ३४
केसोराम ३४
केळकर स. पां. ४२, ४४, ९३
कोल्हटकर महादेवशास्त्री १२७
खरसेटजी जमशेटजी ९९
खरे वा. वा. ७१
खोबरेकर वि. गो. ११०
ख्रिस्तीधर्मप्रचार ४१–४२, १०५
गडकरी रा. ग. ६५, ६८, ९४
गणपत कृष्णाजी ७४
गाडगीळ ज. स. ४५, ८९
गांधी मो. क. (महात्मा) ४१, ६५
गायकवाड बापूसाहेब ३५,
गायकवाड सयाजीराव महाराज ३५, ६१–६२
गार्गी ६७
गॉवर ल्यूसन १०३
गावस्कर सु. आ. ११, १२
गिरधरलाल बाबू ६०
गुजराती लिप्या १३–१४
गुजरात व्हर्ना. सोसा. ४१
गुजराती ज्ञानप्रसारक सभा
गुजराती हिंदू स्त्रीदुःखनिवारण मंडळी ४५
गुजराती–मराठी–संबंध ३३–४७, ४८, ८४
गुजराती–मराठी–स्वभावभेद ३६–४४
गुंजीकर ग. भि. ३७

'गुरुचरित्र' ६८
गुरुजी कृ. आ. १२९
'गृहिणी' ९२
गोखले गो. कृ. (ना.) ४१
गोखले सदाशिव हरी (सदोबा नाटकवाला) ११६–२१
'गोखले–कुलवृतांत' १२१
गोडबोले परशुरामतात्या १२६
गोडसे विष्णुंभटजी ११६
गोपाळदास माधवदास ४०
गीवधबंदी ११४
गोवर्धनदास गोपाळदास ४०
गोरा–काळा भेद ९६
गोळवलकर ग. सी. ६१
ग्रँट १००
ग्रामण्य प्रकरण २४, २८
घाशीराम सावळदास ७९
'घाशीराम कोतवाल' (कादं.) ७४, ७९
'घाशीराम कोतवाल' (ना.) ७९
चकरबत्ती (डॉ. चक्रवर्ती) १०२
(श्री) चक्रधरस्वामी ३४
चंदावरकर नारायणराव ४२
चँपमन १०३
चावडा व्ही. के. ६१
चिटणीस खंडो बल्लाळ २३
,, बळवंत मल्हार २० – ३१
,, बाळाजी आवजी २३
,, मल्हार रामराव २३
चिपळूणकर कृष्णशास्त्री १२९
,, विष्णुशास्त्री ७९
चोक्सी आर. डी. २८
चोनकर कृ. मा. ९२
छत्रे स. का. १४, ३७
जंगबहादुर (सर) ६५
जमन्मित्र : टिळक ना. वा. पहा
जठार श्री. भि. १२७
जदुनाथजी महाराज ४३
जनगणना व आदिवासी (डोंगरी) १४०
,, ,, जात – धर्म १४०
,, ,, नपुंसक १४१
,, ,, नियोजन १३६, १४२
,, ,, मातृभाषा १४२
,, ,, वेश्या १४१
,, ,, स्त्रीशिक्षण १४०
जनगणनेचा पूर्वेतिहास १३७ – ३८
जनगणनेचे महत्त्व १३६, १४२
जयकर राम बाळकृष्ण ४२, ४५, ६४, ७८
'जयपाळ' १२७
जयसिंह सवाई ७०, ७४
जर्विस जॉर्ज ११, १८, ११२
'जानकीपरिणय' १३७
जांभेकर बाळशास्त्री ६७, ६९
'जैमिनी अश्वमेध' १२५
जोशी आनंदीबाई ६६
जोशी गणपतराव १२३
जोशी वापू जगन्नाथ ९९
जोशी बाळाजी १२८–१२९
'झुंजारराव' १२७
'टाइम्स ऑफ इंडिया' ६७, १२८
टागोर प्रसन्नकुमार
टाटा जमशेटजी जीजीभाई (सर) ६२, ९८
टामसन २०
टिळक ना. वा. (रे. जगन्मित्र) १३१–३५

टिळक देवदत्त ना. १३३
टिळक बा. गं. (लोकमान्य) ३९, ४१, १३३, १३४
टिळक लक्ष्मीबाई १३३
टी. माधवराव (सर) १३०
'टेलिग्राफ' ७४
टोपे तात्या, ११३, ११४
ठक्कर (मि.) ५९
ठाकरसी प्रागजी ४२
ठाकरसी महिला विद्यापीठ ३८, ११०
ठाकरसी विठ्ठलदास ३८
ठाकरे के. सी. २२
ठाकूर श्री. बा. ५९–६०
डफ ग्रँट २४, २७
डिकिन्सन १०३
डोसाभाई फ्रामजी ६५
तर्खड आ. पां. (डॉ.) ८९, ९२
तर्खड दा. पां. १७, ३४, ३८, ३९, ४०, ४१, ४४, ४५, ४८, ४९, ६९, ८९, ९७
तर्खड भा. पां. ४०, ९७
तर्खडकर द्वा. रा. ९२
तर्खडकर मो. आ. ६४
'तारा' १२७
तुकाराम ३५
तेंडुलकर विजय ७९
तेलंग का. त्र्यं. ४१ ४५, ८५
तेली आप्पा १२८
तैलंग व्यंकटशास्त्री ७०
त्रिपाठी गोवर्धनराम ३७
थाकरसी नोरोजी ८९, ९०
'थोरले माधवराव पेशवे' १२७, १२८, १२९
दत्त रोमेशचंद्र ६२
'दंभहारक' ५९
दयानंद सरस्वती ४३
दयाराम ३५
'दर्पण' ५७, ६३, ६७, ६९, ७३, ९८
दांडेकर मोरभट्ट ४२
दातार पां. र. (बाबाजीशास्त्री) १२४–२५
'दातेसूची' (मराठी ग्रंथसूची) २२, ६९, ७३
दादजी जानोजी ७८
दादाजी रखमाबाई प्रकरण ९३
दादाभाई नौरोजी ३८, ४०, ४१, ४४, ४५, १०७
'दादाभाई–चरित्र' ५९
दादोबा देवजी ६६
दादोबा पांडुरंग : तर्खड दा. पां. पहा.
'दामाजीपंताचा फार्स' १२७, १२९
दामोदरदास गोवर्धनदास ४२–४३
दिघे वि. अ. २२, २३
दिनमणीशास्त्री ५०
दिवेकर वा. द. १३९
दुलीपसिंघ ६५
'दुर्गाराम...चरित्र' ३९, ४९
दुष्काळ (स. १८३३) १००
देवधर सी. ग. ८५
देवल गो. ब. १२७, १२९
देवल रा. ब. १२९
देशमुख कृ. गो. ५८
देशमुख गो. ह. (लोकहितवादी) ४१, ४३, ४४, ५८–५९, ६७–७०, ८०, ८५, ९८

'देशाटन विषये' ६०
दोन दुर्मिळ पुनर्विवाह–प्रकरणे ६७-७६
'दौलतराव' १२८
द्वारकानाथ गोपाळजी ६५–६६
द्वारकानाथ जगन्नाथजी ८०
धनकुंवरबाई माधवदास ८७–९५
'धर्मविवेचन' ३९
धाकजी ७८
धामणकर वै. वि. ३७
धीरजराम दलपतराम ८९
धीरा ३५
'नर्मगद्य' ३७
नर्मदाशंकर लालशंकर (नर्मद) ३७, ४४
नवरंगे वासुदेवराव ४४, ८९
नाईक बापूराव ११८, १२२
नागदेवाचार्य ३४–३५
'नागानंद' १२६, १२७
नामदेव ३५
'नाटकाची स्थित्यंतरे' १२९–१३०
नाट्यकलाप्रवर्तक ना. मं. 'नाट्यकवितासंग्रह' ५७
नातू बाळासाहेब ६९
नाना मोरोजी ८२, ८३, ८७, ८९
नानाभाई हरिदास ३९
नारायण दीनानाथजी ९९
'नारायणरावाचा खून की आत्महत्या' नॉर्टन १०१, १०३
'ना. वा. टिळक : दि ख्रिश्चन पोएट ऑफ महाराष्ट्र' १३३
निरांत ३५
निर्भयराम ४२
'नृसिंह' १२५
'नेटीव ओपीनियन' ५८, ६०, ८१, १२७
नेटीव स्कूल ॲन्ड स्कूलबुक सोसा. १०
नोंदणीविवाह
नौरोजी फर्दुनजी ४०, ९९, १०३, १०६, १०७
'पंचोपाख्यान' २२
पॅटन (प्रो.) ३८
पटवर्धन ग. ह. १३०
पटवर्धन चिंतामणराव
पटवर्धन परशुरामभाऊ ७०–७१
पंडित विष्णुशास्त्री ४४–४५, ६७, ८०, ८१, ८४, ८५, ८९, ९३, ९५
पंडित दाजीबा १११
'पतिप्रेमनिकष'
पदमनजी बाबा ५९, ६१
परदेशपर्यटन ५६–६६, ७२
परभू बेनिवोलंट इन्स्टिटचूशन ८०
परमहंससभा ४२, ७८,
परमानंद मामा ४५, ८९
'पराशरस्मृति' ७५, ८०
परिभाषेची समस्या १३, १५, १६–१७
परुळेकर रा. वि. १३
पलुसकर वि. दि. १२६
पवार तुकाराम १२८
पवार धारराव १११
पहिले जनआंदोलन ४०, ९८
पानसे सरदार ६८
पाळंदे भा. दा. ८५
पाठारे प्रभूसमाज ७७
पाठारे प्रभू व परदेशगमन ६३–६४
पाठारे रिफॉर्म असोसिएशन

पारशी व परदेशगमन ६३–६४
पारिभाषिक शब्दावली १३, १५, १६ १७
पुणेकर रावजी १३०
पुनर्विवाहोत्तेजक मंडळी ४५, ८३
' पुनर्लग्न गायन संग्रह ' ९०
पेटकर नरसिंहराव १११
पेटिट डी. एन. १०७
पेंडसे वासुनाना १२७–२९
पेरी अस्किन (सर) १३, १०० १०४
पेशवे नानासाहेब (बंडवाले) १११, ११३, ११४
बाजीराव रघुनाथ (राववाजी) २५, २७, २८, १११
पेशवे बाळासाहेब ११४
,, बाळाजी बाजीराव (नानासाहेब) १११, ११३, ११४
,, पेशवे–दप्तर ' २४, ५७
पेस्तनाजी माणेकजी ४२
पोतदार द. वा. ११६
' प्रतापसिंह व रंगो बापूजी ' २२
प्रधान ब. रा. १२७
' प्रभाकर ' २०, ३९, ४२, ४८, ५०, ५१, ५२, ५३, ५४, ९८, १३८, १३९
प्रभुणे रामशास्त्री ७०, ७१
' प्रभोदय ' ६२
' प्रमाणसहस्त्री ' ४२
प्रार्थनासमाज ४२–४३, ९३
' प्रिंटिंग प्रेस इन इंडिया ' १०
प्रिन्सिपल्स ऑफ इंडिया रिफॉर्म १०३
प्रिन्सेप १०१
प्रियोळकर अ. का. १०, १७, २२, ६९
फडके गंगाधरशास्त्री ३७, ७४
फडके ना. सी. ६५
फडणीस नाना ७०, ७१, ७९
फर्गसन (गव्हर्नर) १२८
फर्नांडिस ब्रांझ ९९
फाटक न. र. १२२
फॉर्बस ४१
फॉर्बस गुजराती सभा ३७
फिरोज शहाजादा ११३
फुले ज्यो. गो. (महात्मा) ३८, ४३, ६२–६३, १११
फ्रियर
बंगाली (शेट) ६५
बनहट्टी श्री. ना. १२०, १२१, ४१२
बर्क एडमंड ४०, ९७
बहादुरशहा ११३
बहुपतित्व ७४
बहुपत्निकत्व ६७, ७४
बानर्जी सुरेंद्रनाथ १०७
बापट चिमणभट १२४
बापट नारायणभट १२४
बापट विष्णुशास्त्री ७३, ७४
(धी) बॉम्बे असोसिएशन ३८, ४०, ९६–१०८, १११
बॉम्बे एज्यु. सोसा. १०
' बॉम्बे गॅझेट ' ४०, ९७
' बॉम्बे गार्डियन ' ५८
' बॉम्बे टाइम्स ' ८१
बॉम्बे प्रेसिडेन्सी असो. १०७
बारामतीकर बापूजी नाईक ७०, ७१
' बार्बारोसा ' १२८
' बायबल ' १२७
बालविवाह ४३, ६८, ७१

' वालबोधमेवा ' १३३
' बाळमित्र ' १५
' बुद्धिप्रकाश ' ४१
बुद्धिवर्धक सभा ६०
बुवाबाजी ३७, ४३, ४९, ५४
बथॅम १०४
ब्रह्मचारी विष्णुबुवा–४२
ब्रह्मोसमाज ४२
ब्रिग्ज जॉन २८
ब्रीजरतनजी महाराज ४९–५०
भगवानलाल इंद्रजी ३७
' भरत ' १२५
भवभूती १३१, १३४
भवानीशंकर राघववानंद (सौमित्र) ८२
भाईशंकर नानाभाई ८१
भाऊ दाजी : लाड भाऊ दाजी (डॉ.) पहा.
' भागवत '
भागवत भा. ह. ३७, ४५, ८९
भाटेगो. चि. ८५
भाटेबुवा १२३, १२४
भांडारकर रा. गो. ४२, ६२, ८९, ९३, १०७
भाषांतराच्या सूचना १३
भाषावार प्रांतरचना ३३
भालेराव बा. पां ४४, ४५
भावे विष्णुदास ५७, ११८, १२०, १२१, १२४
' भावे कुलवृत्तांत ' १२१
भिडे ना. ज. ८०
भोलानाथ साराभाई ४३
भोसले आप्पामहाराज २८
भोसले प्रतापसिंहमहाराज २०–३१, ५७, ६२, ७८, १११
,, राजाराममहाराज २४
,, शाहूमहाराज २१, २४, २८
,, शिवाजीमहाराज २४, २६, ३९, १३२
,, संभाजीमहाराज २४
,, सगुणाबाई १२९
' भ्रांतिकृत चमत्कार ' १२७–१२८
भ्रूणहत्या ४४, ६८, ७२
मॅके १०३
मखबा म. इ. ९९
मंगळदास नथूभाई ३८, ४१, ९०. १०६, १०७
मंडलिक वि. ना. (रा. सा.) ३७, ४३, ६१, १०६, १०७, १०८
मथुरदास खेत्सी ८७, ८९, ९२
मराठी ग्रंथनिर्मितीची नांदी ९–१९
' मराठी रंगभूमीचा पूर्वरंग ' ११८
' मराठी रंगभूमीचा इतिहास ' ११७
' मराठी ज्ञानप्रसारक ' ५७, ६०
मराठी ज्ञानप्रसारक सभा ३८, ६०
' मराठी दोलामुद्रिते ' ११, १२
मराठे कृ. बा. ११८
मॅरेज ऑफ हिंदू विडोज ' ८२
मर्झबान म. आर. ८९
महाजन भाऊ २०, ४८, ६७
महाजन रं. मो. ५९
महाजनि वि. मो. १२७
' महात्मा फुले : समग्रवाङ्मय ' ६३
' महाभारत ' १२५
महाराजा लायबेल खटला ४३, ८६
महिपतराम रूपराम ३९, ६५

' माझा प्रवास ' ११६, ११८, १२०
मॉंटिग्रल (लॉर्ड) १०३
माडगावकर गो. ना. १०६, ११२
माणिकजी बरजोरजी ८९
माधवदास रघुनाथदास ४४, ४५, ८३, ८४–९५
मानकर सर्वोत्तम स. ६४
मानवधर्मसभा ३९, ४२, ४३, ४८–५५
' मार्शल लॉ ' १५
' मालतीमाधव ' १२६
माल्कम १२, ११२
मिचेल जे. एम. (रे.)
मिराशीबुवा १२३, १२४
मुजुमदार सरदार १३०
' मुंबई अखबार ' ७३
' मुंबई समाचार ' ८९
' मुहूर्तमार्तंड ' ७४
मूळजी ठाकरसी ८९
मेकॉले १३
मेयो लॉर्ड ४१, १०६
मेहता दुर्गाराम मनसाराम ३९, ४०, ४८–५२, ८५
मेहता नरसी ३५
मेहता फेरोझशहा ४१, १०७
मैत्रेयी ६७
मोडक वा. आ. ४२, ९२
मोतीवाला बी. एन्. ६५
मोदी रुस्तुमजी कुंवरजी ४४
मोदी वनमाळी लाधा ९२
मोरेश्वर आत्माराम ६४
मोहनलाल गिरधर ३९
याज्ञवल्क्य
रखमाबाई (डॉ.) ६६
रंगो बापूजी ६२, ६९, १११
रघुनाथराव (दि. व.) १३०
रणछोडदास गिरधर २७
' रत्नमालास्तोत्र ' ३४
रमणलाल नीलकंठ ३९
रमाबाई सरस्वती (पं.) ९३, १३४, १३५
राणिया नानाभाई आर ८९
राधाबाई ३५
रानडे पां. गो. ७१
रानडे म. गो. (न्या.) ४१, ४२, ८५, ८७, ८९, १०७
रानडे शं. मो. १२८
रॉबिन्सन १०३
रामकृष्ण विश्वनाथ ४०, ९७
रामचंद्रशास्त्री
राम मोहन रॉय (राजा) ६४, ६६, १११
' रास्तगोफ्तार ' ४५, ८६, ८७, १०६
रीड (प्रो.) ३६, ३८
' रुक्मिणीस्वयंवर ' २८–२९
' रुपडचांची रूपकथा ' ११८
लम्सडेन जॉन १३९
लखमीदास खिमजी ८७, ८९
लक्ष्मीबाई झांशीवाली ११३–१४, ११६
लॉ कॉलेजची मागणी १०२
लाड भाऊ दाजी (डॉ.) ३७, ३८, ४०, ४३, ४४, ५७, ७४, ९९, १०२, १०३, १०६, १०७
लालभडाक–प्रकरण ३९, ४८–५५
लालशंकर उभियाशंकर ४२, ४४
लीटन

लीलाधर उद्धवजी
लेपेर १०६
लेले गणेशशास्त्री १२७
वरजीवनदास माधवदास ८७, ९०, ९९
वर्डस्वर्थ (प्रि.) ९३
वागळे बाळ मंगेश ८९
वाटवे विष्णू १२९–३०
वाटसन १३०
वायली १३०
वार्डन १२
विंचूरकर मा. वि. ४५, ८०
विंचूरकर रघुनाथराव ५८
विजयकर मोरोबा कान्होबा ४५, ७७–८३, ९४
विजयकर खं. मो. ८३
विजयालक्ष्मीचा खटला ४४
विद्यापीठाची मागणी १००
विद्यासागर ईश्वरचंद्र ४४
विधवाविवाहबंदी ४४, ६८, ६९, ७२, ७४
विधवाविवाहाच्या सशास्त्रतेचा वाद ७५
'विधवाविवाहाविषयी' ७८
विन्स्लो जे. सी. १३३, १३५
'विरामचिन्हांची परिभाषा' १७
विल्सन (डॉ.) ४२, १०५
'विविधज्ञानविस्तार' २७, १२७
विष्णु गोविंद ५९
वेडरबर्न १०७
'वेणीसंहार' १२६
'वेदोक्त धर्मप्रकाश' ४२
वेलोरचे बंड ११३
वैद्य चिं. वि. १२२
व्हिक्टोरिया (महाराणी) ४१, ७९
शंकरशेट जगन्नाथ (नाना) ३७, ३८, ४०, ६२, ७४, ९८, १०३, १०६
शंकरशेट वि. ज. ६२, ९९, १०६, १०७
शंकराचार्य ६०, ६१, ७१, ७५, ७९, १३३
'शतपत्रे' ६०, ९८
'शांकर दिग्विजय' १२७
'शाकुंतल' १२६
'शापसंभ्रम' १२८
शारदासदन ९३
शाहूनगरवासी ना. मंडळी १२३
शाळिग्राम त्र्यंबकशास्त्री ५९
शिंदे वि. रा. (महर्षी) ४२
शिवस्मारक १३२–३५
शिवाजीमहाराज : भोसले शिवाजी महाराज पहा.
शिक्षणाचे माध्यम १०, ११, १२–१३, १५
'शुभसूचक' १२६
शेक्सपियर १२७
शेषाद्रि श्रीपाद १०५
श्यामजी कृष्णवर्मा ६१
श्रीखंडे वि. कृ. ९२
'श्रीमन्नारायण पेशवे' १२७
सती ४३, ४४, ५४, ६८
सत्तावन्नचे बंड ४०, १००–११४
'सत्यदीपिका' ६५
'सत्यप्रकाश' ४५
सत्यशोधकसमाज ४३
सदाशिव मोरोजी ८०
'सभारंजनी' २२

समाजसुधारणा व कायदा ९४
'सयाजीराव गायकवाड द थर्ड' ६१
सरदेसाई गो. स. ६१
'सरस्वतीचंद्र' ३७
सॅलिवन जॉन १०३
ससून दाऊद ९९
सहस्रबुद्धे स. अ. ७१
साठे त्र्यंबकराव १२८
साठे मोरशास्त्री ५९
सामळदास देसाभाई ५७
सार्वजनिक सभा ४३, ४४, ५८
सावरकर वि. दा. (वीर) ६१
'सिक्स् मंथस् इन् इंडिया' ६४
'सिबेलिन' १२७
सुखठणकर ज. स. ११८, १२२
'सुखदायक राज्यप्रकरणी निबंध' ४२
सुंदरजी परभू ३४
'सुधारक' ६२, ९४, १३१–३२
सुलतान बहाद्दर ९
सूटर फ्रांक ८७
सेन केशवचंद्र ८५
सैमूर डानबी १०३
सोनी नाना १२४
स्टूडंटस् लिटररी...सोसा. ३८, १०४
स्त्रीपुरुषसमानता ७४, ७५
'सीबाळहत्या विषये ग्रंथ' ४४
स्त्रीशिक्षण १४, ३८, ६७, ६८, ६९ ७२, ७३–७४, ७५, १०४
स्त्रीसमस्या ४३–४४
स्त्रीस्वातंत्र्य ६७
स्वयंवराची चाल ६७
'स्मृतिचित्रे' १३३, १३४
हरिश्चंद्र चिंतामण ६२
'हरिश्चंद्र' ११७
'हरेराम हरेकृष्ण संप्रदाय ५५
'हिंदू-धर्मतत्त्व' ७४
हिंदूची एक व्याख्या
हिंदू-मुस्लिम ऐक्य
'हिंदुस्थानची प्राचीन....याविषयी विचार' ४०, ९७
हुंड्याची चाल ४४
हेलेवरी कॉलेज १००, १०२
हेंदशाळा व शाळापुस्तक मंडळी १०, ३६
ह्यूम आर. डब्ल्यू. (रे.) ५३–५४
'ज्ञानप्रकाश' ६३, ६४, ९८, १०६, ११३, १२६
ज्ञानेश्वर २६, ३५
'ज्ञानोदय' ५२, ५३, ५४, ५८, ५९, ६०, ६२, ६३, ६४, ६५, ६६, ११३, १३३, १३८

शुद्धीपत्र : पृष्ठ ८३ ओळ १४ : १८०१ ऐवजी १८७१ वाचणे.

डॉ. स. गं. मालशे : ग्रंथ-सूची

(वर्गीकृत व अकारविल्हे)

ललितलेखन :–

१. **ऋणानुबंधाच्या गाठी,** सुपर्ण, पुणे १९८७, पृ. ११२, मूल्य ३० रु.

२. **शिकार आणि इतर एकांकिका,** जोशी ब्रदर्स, पुणे, १९७१, पृ. ७८ मूल्य ४ रु.

समीक्षा, साहित्यविचार, संशोधन व भाषाविज्ञान :–

३. **आगळं–वेगळं,** सुपर्ण, पुणे, १९८६, पृ. १४६, मूल्य ३५ रु.

४. **आवड – निवड,** मॅजेस्टिक, मुंबई, १९५९, पृ. १७९, मूल्य ५ रु. (दुसरी आवृत्ती : सुपर्ण प्रकाशन, पुणे, १९७७, पृ. १७६, मूल्य १५ रु.)

५. **केशवसुतांच्या कवितांचे हस्तलिखित,** मराठी संशोधन मंडळ, मुंबई, १९६६, पृ. ४०, मूल्य दीड रुपया.

६. **तारतम्य,** परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई, १९८७, पृ. १५ + १९०, मूल्य ५० रु.

७. **नीरक्षीर,** विश्वमोहिनी, पुणे, १९७५, पृ. १४५, मूल्य ११ रु.

८. **फा. स्टीफन्स यांचे ख्रिस्तपुराण,** मराठी संशोधन मंडळ, मुंबई, १९६५ पृ. ७२, मूल्य दीड रुपया.

९. **भाषाविज्ञान परिचय,** संजय, मुंबई, १९८७, पृ. १६८, मूल्य ५० रु. (डॉ. दत्तात्रय पुंडे व डॉ. अंजली सोमण यांच्या सहकार्याने.)

१०. **शोधनिबंधाची लेखनपद्धती,** महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९७०, पृ. ३०, मूल्य रु. १.२५ (दुसरी आवृत्ती : सुविचार प्रकाशन, पुणे, १९७४, पृ. ४०, मूल्य ५ रु.)

११. **संतर्पण,** मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९८५, पृ. १४८, मूल्य ३५ रु.

१२. **साहित्याभ्यासाची शैलीलक्ष्यी पद्धत,** मराठी संशोधन मंडळ, मुंबई, १९८१, पृ. ४४, मूल्य ५ रु. (डॉ. मिलिंद मालशे यांच्या सहकार्याने.)

१३ **विधवाविवाह चळवळ : १८०० ते १९००,** स्त्री संशोधन केंद्र, श्री. ना. दा. ठा. महिला विद्यापीठ, मुंबई, १९७८, पृ. २०२, मूल्य १२ रु. (कु. नंदा आपटे यांच्या सहकार्याने.)

संपादने :–

१४. **अध्यापक अत्रे,** परचुरे प्रकाशन, मुंबई, १९८६, पृ. १३+१४४, मूल्य ४० रु. (आचार्य प्र. के. अत्रे यांच्या शिक्षणविषयक निवडक १५ निबंधांचे विवेचक प्रस्तावनेसह संपादन.)

१५. **आत्मलिखित पुनर्विवाह चरित्र,** मराठी संशोधन मंडळ, मुंबई, १९८१, पृ. १७+५७+६, मूल्य १० रु. (शेठ माधवदास रघुनाथदास यांच्या 'आत्मलिखित पुनर्विवाह चरित्राचे' चे गो. ग. आगरकर आणि सी. ग. देवधर यांनी १८९२ साली 'सुधारका'त केलेल्या भाषांतराच्या १९०७ च्या आवृत्तीचे संशोधनपर व गुजरात–महाराष्ट्र संबंध विशद करणाऱ्या प्रस्तावनेसह संपादन.)

१६. **आवडत्या इसापकथा,** परचुरे प्रकाशन, मुंबई, १९८२, पृ. मूल्य ८ रु. (अनंत काणेकर यांच्या 'इसाप' वरून रूपांतरित कुमारकथांचे प्रस्तावनेसह संपादन.)

१७. **काचळयाची शाळा,** परचुरे प्रकाशन, मुंबई, १९८२, पृ. मूल्य १० रु. (प्र. के. अत्रेकृत बालकथांचे प्रस्तावनेसह संपादन)

१८. **क्रांतिकारकांचे युगपुरुष सावरकर,** परचुरे प्रकाशन, मुंबई, १९८३, पृ. १०+७८, मूल्य २० रु. (वीर सावरकरांच्या कार्याविषयी व वाङ्मयाविषयी प्र. के. अत्रे यांनी लिहिलेल्या १९ निबंधांचे प्रस्तावनेसह संपादन.)

१९. **ख्रिस्तपुराणामृत,** प्रसाद प्रकाशन, पुणे, १९७५, पृ. १८+१००, मूल्य ५ रु. ५० पैसे. ('ख्रिस्तपुराण' या फा. स्टीफन्सच्या काव्याच्या पहिल्या भागाच्या संक्षिप्त आवृत्तीचे संशोधनपर प्रस्तावनेसह संपादन) (फिलीप कार्व्हालो यांच्या साहाय्याने.)

२०. **गडकरी सर्वस्व,** परचुरे प्रकाशन, मुंबई, १९८४, पृ. ३०+२४८, मूल्य ५० रु. (रा. ग. गडकऱ्यांचे व्यक्तिमत्त्व, संस्कार, काव्य, विनोद आणि नाट्यवाङ्मय यांवरील प्र. के. अत्रे यांच्या लेखनाचे विवेचक प्रस्तावनेसह संपादन).

२१. **झेंडूची फुले – प्र. के. अत्रे,** परचुरे प्रकाशन, मुंबई, १९७२, पृ. ८०+१६०, मूल्य १२ रु. ५० पैसे. (प्र. के. अत्रे यांच्या 'झेंडूची फुले' या विडंबन–काव्यसंग्रहाच्या आठव्या सुवर्णमहोत्सवी आवृत्तीचे संशोधनपर व समीक्षात्मक प्रस्तावनेसह संपादन. सदर काव्यसंग्रहाची साधनसूचीसहित सुधारित आवृत्ती १९८६ मध्ये प्रसिद्ध झाली आहे.)

२२. **दहा कथा,** मॅजेस्टिक, मुंबई, १९५२, पृ. ११०, मूल्य १ रु. ४ आ. (व्यंकटेश माडगूळकरांच्या कथांचे प्रस्तावनेसह संपादन.)

२३ **देशोदेशीच्या नवलकथा,** परचुरे प्रकाशन, मुंबई, १९८२, पृ. ५+४७, मूल्य ८ रु. (अनंत काणेकर यांच्या ७ रूपांतरित कुमारकथांचे प्रस्तावनेसह संपादन.)

२४. **दोन पुनर्विवाह प्रकरणे** (१८३७ व १८४१), मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, १९७७, पृ. १०+१६+१४, मूल्य ४ रु. (सामाजिक महत्त्वाच्या निबंधांचे संशोधनपर प्रस्तावनेसह संपादन.)

२५. **नाटकाची स्थित्यंतरे,** मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, १९७६, पृ. ८+४०, मूल्य ३ रु. ('रंगभूमी' मासिकातील कृ. आ. गुरुजी यांच्या 'नाटकाची स्थित्यंतरे' या निबंधाचे) गुरुजींचे चरित्र व ग्रंथरचना यांची माहिती देणाऱ्या प्रस्तावनेसह संपादन.)

२६. **फुले आणि मुले,** परचुरे प्रकाशन, मुंबई, १९८२, पृ. ९+४४, मूल्य १० रु. (प्र. के. अत्रे यांच्या १९ कुमारकथांचे प्रस्तावनेसह संपादन.)

२७. **भाषाविज्ञान : वर्णनात्मक आणि ऐतिहासिक,** संजय, पुणे, १९८२, पृ. ३४७ मूल्य ६५ रु. (दुसरी आवृत्ती : पृ. ३३५ मूल्य ८० रु.) (डॉ. हे. वि. इनामदार व डॉ. अंजली सोमण यांच्या सहकार्याने एम्. ए. पातळीवरील अभ्यासपुस्तकाचे संपादन.)

२८. **मराठी कवितेचा उषःकाल किंवा मराठी शाहीर,** मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई, २ री आवृत्ती, १९८६, पृ. ३४+१८६, मूल्य ५० रु. (श्री. म. वर्दे यांच्या 'मराठी कवितेचा उषःकाल अथवा मराठी शाहीर' (१९३०) या पुस्तकाचे 'श्री. म. वर्दे – जीवन व वाङ्मय' या संपादकीय निबंध व निर्देशसूची आणि ग्रंथसूचीसह संपादन.)

२९. **मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड २ रा, भाग १ व २,** महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९८२, पृ. पहिला भाग ६६२ व दुसरा भाग ४२८, मूल्य–पहिला भाग ६६ रु. व दुसरा भाग ४६ रु. (इ. स. १३५० ते

ते १९८० या कालखंडातील मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचे प्रस्तावना व समारोप यांसह संपादन.)

३०. **मराठी संशोधन – खंड ३ रा,** मराठी संशोधन मंडळ, मुंबई, १९६७, पृ. २००, मूल्य ५ रु. (मराठी संशोधन पत्रिकेतील ऑक्टोबर १९६५ ते जुलै १९६७ या कालावधीतील विविध संशोधनपर विषयांवरील लेखांचे संपादन.)

३१. **महात्मा फुले – समग्र वाङ्मय,** महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई १९६९, पृ. २१+५४८, मूल्य ८ रु. (दुसरी आवृत्ती : १९८४ पृ. २१ + ५३३ + ४६, मूल्य २२ रु.) (महात्मा फुले यांच्या उपलब्ध समग्र वाङ्मयाचे संपादन) (श्री. धनंजय कीर यांच्या सहकार्याने.)

३२. **मुंबई इलाक्यांतील इनामकमिशन खात्यांतील गैरइनसाफ (१८९९),** मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई १९७८, पृ. १ + ४४, मूल्य ५ रु. (सरकारी दप्तराच्या आधारावर लिहिलेल्या ऐतिहासिक महत्त्वाच्या निबंधाचे संपादन.)

३३. **राजनीतिविषयक निबंध,** मराठी संशोधन मंडळ, मुंबई, १९७५, पृ. १२+२३, मूल्य ५ रु. (विष्णुबुवा ब्रह्मचारी यांचे 'राजनीति' आणि 'सुखदायक राज्य प्रकरणी निबंध' या दोन निबंधांची मराठी संहिता, तसेच दुसऱ्या निबंधाची दुर्मिळ इंग्रजी भाषांतराची संहिता.)

३४. **लोकहितवादीकृत जातिभेद,** मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, १९७४, पृ. १६, मूल्य २ रु. (लोकहितवादींच्या 'जातिभेद' या निबंधाचे संशोधनपर, सटीप प्रस्तावनेसह संपादन.)

३५. **शापित प्रतिभावंत,** परचुरे प्रकाशन, मुंबई, १९८४, पृ. ६ + ७९ + ८ छायाचित्रे – पृष्ठे, मूल्य २० रु. (आचार्य अत्रे यांनी 'नवयुग'च्या १९६५ च्या दिवाळी अंकात ऑस्कर वाईल्डच्या जीवनाचा परिचय करून देणारा दीर्घ लेख लिहिला होता. त्याचे प्रस्तावनेसह संपादन.)

३६. **सत्तावन्नी उठावाची समकालीन कात्रणे,** मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, १९७७, पृ. ८ + ४४, मूल्य ४ रु. (१८५७ च्या स्वातंत्र्य समकालीन वृत्तपत्रीय कात्रणांचे संशोधनपर प्रस्तावनेसह संपादन.)

३७. **संगीत हजामत,** महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९७२, पृ. ८ मूल्य ५० पैसे (म. रा. तेलंग यांच्या 'संगीत हजामत' या 'विडंबन' काव्याचे प्रस्तावनेसह संपादन.)

३८. **सावरकर आत्मचरित्र : नासिक,** मॅजेस्टिक, मुंबई, १९७३, पृ. १५४, मूल्य ५ रु. (सावरकरांच्या आत्मचरित्रातील नासिक खंडाचे प्रस्तावनेसह संपादन.)

३९. **सावरकर आत्मचरित्र : भगूर,** मॅजेस्टिक, मुंबई, १९७२, पृ. १२८, मूल्य ४ रु. (सावरकरांच्या आत्मचरित्राच्या भगूर खंडाचे प्रस्तावनेसह संपादन.)

४०. **सावरकरांच्या अप्रसिद्ध कविता,** मराठी संशोधन मंडळ, मुंबई. १९६९. पृ. २४, मूल्य १ रुपया. (सावरकरांच्या अप्रसिद्ध कवितांचे संशोधनपर प्रस्तावनेसह संपादन.)

४१. **स्त्री–पुरुष तुलना,** मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, १९७५, पृ. २४ ३४, मूल्य ४ रु. (ताराबाई शिंदे यांनी लिहिलेल्या 'स्त्री–पुरुष तुलना' या दुर्मिळ निबंधाचे संशोधनपर प्रस्तावनेसह संपादन.)

४२. **ह. ना. आपटेकृत दोन परीक्षणे,** मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, १९८१, पृ. १५ ११९, मूल्य १० रु. (शेक्सपीअरच्या 'विक्रम–शाही-कला') व 'हॅम्लेट' या नाटकांच्या रूपांतरांच्या ह. ना. आपटे यांनी केलेल्या परीक्षणांचे संशोधनपर व समीक्षापर प्रस्तावनेसह संपादन.)

४३. **हसा आणि माणूस रहा,** मॅजेस्टिक, मुंबई, १९५३, पृ. ११२, मूल्य १ रु. ४ आणे. (विनोदाचे प्रस्तावनेसह संपादन)

भाषांतरित वाङ्मय

४४. **चीनमधील शिक्षण,** व्होरा आणि कं. मुंबई, १९६६, पृ. ६१, मूल्य रु. (चीनमधील शिक्षणपद्धतीचा विवेचनात्मक अभ्यास असणाऱ्या पुस्तकाचे मराठी भाषांतर. मूळ लेखक के. ई. प्रीस्टले)

४५. **दी डेक्कन एज्युकेशन सोसायटी** (१८८५–१९६०), सेक्रेटरी, फर्ग्युसन कॉलेज, पुणे, १९६०, पृ. ११८, मूल्य ४ रु. (फर्ग्युसन कॉलेजच्या अमृत-महोत्सवाच्या निमित्ताने लिहिलेल्या सोसायटीच्या इतिहासाचे मराठी भाषांतर. मूळ लेखक प्रो. के. जी. पंडित)

४६. **भर्तृहरिकृत नीतिशतक,** बळवंत पुस्तक भांडार, मुंबई, १९५३, पृ. ५६, मूल्य १० आणे. (मूळ संस्कृत श्लोक, वामनी श्लोक व गद्य मराठी भाषांतर)

४७. **मराठी वाङ्मयाची अभिवृद्धी – एक दिपण,** मराठी संशोधन मंडळ, मुंबई, १९८२, पृ. ३६, मूल्य ५ रु. ('ए नोट ऑन दी ग्रोथ ऑफ मराठी लिटरेचर १८९८' चे मराठी भाषांतर, मूळ लेखक : न्या. म. गो. रानडे)

४८. **साहित्य-सिद्धान्त**, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ प्रकाशन, मुंबई, १९८२, पृ. ४२१, मूल्य ४८ रु. (' थिअरी ऑफ लिटरेचर ' या इंग्रजी साहित्यशास्त्रावरील इंग्रजी ग्रंथाचे मराठी भाषांतर, मूळ लेखक-द्वय : रेने वेलेक व ऑस्टीन वॉरेन)

४९. **सुख पाहता**, पॉप्युलर, मुंबई, १९६९, पृ. २२७, मूल्य ५ रु. (युजीन ओ'नील यांच्या 'स्ट्रेंज इन्टरल्यूड ' या नाटकाचे मराठी भाषांतर)

५०. **सुखाची सुरुवात**, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९५६, पृ. ११७, मूल्य २ रु. (जॅक शॉफर यांच्या लघुकथांची मराठी भाषांतरे).

५१. **विद्यार्थिनगर**, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई १९५७, पृ. १५८, मूल्य २ रु. (' बॉईज टॉऊन ' चे संस्थापक रे. फादर फ्लानागन यांच्या ' फादर फ्लानागन ऑफ बॉईज टाऊन ' या चरित्राचे संक्षेपरूप मराठी भाषांतर. मूळ चरित्रलेखक फुलटन ऑस्कर व विल ऑस्कर)

५२. **सयाजीराव गायकवाड**, नॅशनल बुक ट्रस्ट, नवी दिल्ली, १९८७ पृ. ११४, मूल्य १६ रु. (Sayajirao Gaykawad by V. R. Chavda यांच्या पुस्तकाचे भाषांतर.)

बाल-वाङ्मय

५३. **ऊसघरातला गुरगुऱ्या**, के. भि. ढवळे प्रकाशन, मुंबई, १९७७, पृ. २०, मूल्य १ रु. (२ अफ्रिकन बालकथांची रूपांतरे)

५४. **काझीचा न्याय**, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९५४, पृ. ३९, मूल्य ६ आणे. (तीन इराणी लोककथांची मराठी रूपांतरे)

५५. **चतुर गजपतराव**, के. भि. ढवळे प्रकाशन, मुंबई १९७७, पृ. १४, मूल्य १ रु. (आफ्रिकेतील लोककथेचे मराठी रूपांतर)

५६. **जादूचा ढोल**, के. भि. ढवळे प्रकाशन, मुंबई १९७७, पृ. १६, मूल्य १ रु. (बेल्जीअन बालकथेचे मराठी रूपांतर)

५७. **जादूचा हिरा**, श्रीराम प्रकाशन, मुंबई, १९७३, पृ. २४, मूल्य ५० पैसे. (देशोदेशीच्या २ बालकथांची मराठी रूपांतरे)

५८. **जादूचे रत्न**, श्रीराम प्रकाशन, मुंबई, १९७३, पृ. ३२, मूल्य ५० पैसे. (देशोदेशीच्या ३ बालकथांची मराठी रूपांतरे)

५९. **विलक्षण तंटा**, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९५५, पृ. ४२, मूल्य ६ आणे. (देशोदेशीच्या तीन बालकथांची मराठी रूपांतरे.)

६०. **विलक्षण तंटे**, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९८७, पृ. ६१ मूल्य १२ रु. (५३ आणि ५८ मधील कथांची संकलित आवृत्ती)




REFBK-0026043

डॉ. स. गं. मालशे हे नाव मराठी वाचकांना चिरपरिचित आहे. प्राचीन आणि अर्वाचीन वाङ्मयाची संशोधनपर समीक्षा करणारे लेखन आणि संपादन हे त्यांचे वैशिष्ट्य. नीरक्षीर, संतर्पण, ऋणानुबंधांच्या गाठी, तारतम्य ही त्यांची काही विशेष उल्लेखनीय पुस्तके.

एकोणिसावे शतक म्हणजे कलहशतक म्हणतात. या शतकातील विविध व वैचित्र्यपूर्ण विषयांच्या संशोधनातून लेखकाने येथे निवडक १४ विषय मांडले आहेत हे सर्व लेख संशोधनात्मक असूनही वाचकांना मजेशीर व चिरकाल लक्षात राहतील असे आहेत.

ग्रंथनिर्मितीची नांदी, गुजराती मराठी संबंध, परदेशपर्यटन आणि प्रायश्चित्ते, दोन दुर्मिळ पुनर्विवाह, सत्तावनी समकालीन कात्रणे, इचलकरंजीकर नाटकमंडळीची भरीव कामगिरी, शिवस्मारक आणि रे. टिळक, भारतीय जनगणनेची शंभरी ही या पुस्तकातील काही लेखांची शीर्षकेच बोलकी आहेत.

वाचकांना हे 'गतशतक शोधिताना' या कलहशतकाचा समज वाढविण्यास निश्चितच मदत होईल.

प्रतिमा प्रकाशन